नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.

सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत

अनुक्रमणिका

अनुक्रमणिका

युगवाणी

महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ पुरस्कृत विदर्भ साहित्य संघाचे मुखपत्र
वर्ष २६ : अंक ७-८ : नोव्हेंबर-डिसेंबर १९७१ : हेमंत : कार्तिक-मार्गशीर्ष : शक १८९३



अनुक्रमणिका



अनुक्रमणिका

महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ पुरस्कृत : विदर्भ साहित्य संघाचे मुखपत्र

युगवाणी

संपादक : माणिक गोडघाटे
सहसंपादक जयंत देवघर

सल्लागार मंडळ डॉ. वि. भि. कोलते, दुर्गा भागवत, शरच्चंद्र मुक्तिबोध, डॉ. द. भि. कुळकर्णी, महेश एलकुंचवार

वर्ष २६ वे नोव्हेंबर–डिसेंबर, १९७१ हेमंत कार्तिक–मार्गशीर्ष १८९३

प्रकाशक : मा. नी. गलगलीकर, सरचिटणीस, वि. सा. संघ, उत्तर अंबाझरी मार्ग, नागपूर–१२.
मुद्रक : पां. ना. बनहट्टी, नारायण मुद्रणालय, धंतोली, नागपूर–१२.

या अंकाची किंमत एक रुपया पन्नास पैसे

अनुक्रमणिका

महाराष्ट्रकांच्या आगमनाचा शोध (उत्तरार्ध)

हरिहर चंद्रशेखर घोंगे

महाराष्ट्राचा जन्म मगधातील 'महाराज' टोळयांपासून झाला, हे राजवाडे ह्यांचे प्रतिपादन मान्य होऊ शकत नाही. कारण मगधातील राजसत्तेने मौर्यांच्या अंतापर्यंत तरी 'महाराज' हे बिरुद लावून घेतलेले दिसत नाही. हाथी गुंफा शिलालेखात 'महामेघवाहन' ह्याने महाराज असा किताब धारण केलेला दिसतो. 'महाराजा'चा हा प्रथम निर्देश होय. कुशाणांच्या टोळयांनी 'महारज' हे बिरुद भारतीय राजसत्तांना परिचित करून दिले असे दिसते. ऋग्वेदकालीन राजसत्ता स्वतःला पती म्हणवून घेतात. ऋग्वेद काळातील इन्द्र, बृहस्पती, 'महाराजे' नसून 'गणपती' आहेत. पाणिनीच्या कालखंडात पंजाबात 'महाराज' नावाच्या टोळ्या अस्तित्वात होत्या असे दिसते. पण ह्या टोळयांनी पंजाबात महाराष्ट्राला जन्म दिलेला नाही. महाराजांपासून रजपूत वा राजपूत कुळांचा जन्म झाला व पुढे रजपुतांचे मराठे झाले असेही मत देता येईल. कै. सरदेसाई ह्यांनी भोसले ह्या राजघराण्याचा संबंध 'शिसोदिया' नावाच्या राजपूत कुळाशी लावलेला आहे.[१] काही मराठे स्वतःला राजपूत म्हणवून घेतात. महाराजांचे अस्तित्व इ. स. पू. सातव्या शतकात आढळते. पण राजपुतांचा इतिहास इ. स. सहाव्या शतकानंतर ज्ञात होतो. मराठी घराणी इ. स. पू. पहिल्या–दुसऱ्या शतकात सातवाहन राजसत्तेच्या कालखंडात प्रकाशात आलेली आहेत. राजपुताचा प्रभाव इ. स. ७ व्या शतकानंतर सुस्पष्ट झालेला आहे. मराठी घराण्यांच्या तुलनेत राजपूत घराणी अगदी अर्वाचीन आहेत. राजपूत मराठे नव्हेत. महाराज राजपूत नव्हेत. महाराष्ट्राला साकार करणारी 'रठ्ठ' ही जमात महाराज व राजपूत ह्या जमातींपासून वेगळी आहे. अग्नीच्या प्रभावाने शुद्ध झालेल्या काही राजपूत कुळांनी ९ व्या शतकानंतर महाराष्ट्रात प्रवेश केला तरी मुळात त्यांचा आणि महारठींचा संबंध नाही.

'महार' आणि 'रठ्ठ' ह्या दोन जातींच्या एकत्रीकरणाने महाराष्ट्र निर्माण झाला ही डॉ. केतकर ह्यांची उपपत्ती देखील चूक आहे. महाराष्ट्र ह्या नावाचा इतिहास इ. स. पू. ५ व्या शतकापर्यंत नेता येतो. पण महार जमातीच्या अस्पृश्यतेचा वा अस्तित्वाचा इतिहास मात्र गुप्त कालखंडाचे आधी आढळत नाही. वैदिक वाङ्मयात वा स्मृतिग्रंथात अंत्यज अथवा अस्पृश्य म्हणून निर्दिष्ट असलेल्या जातींत किंवा अनुलोम वा प्रतिलोम विवाहाच्या संततीत, 'महार' ह्या जमातीचा अंतर्भाव नाही. अस्पृश्यतेच्या उगमाच्या कालखंडाविषयी डॉ. आंबेडकर म्हणतात, 'We can therefore say with some confidence that untouchability was born sometimes about 400 A. D. It is born out of struggle for supremacy between Buddhism & Brahmanism.[२]

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अस्पृश्यतेचा विचार थोडा पुढे रेटण्याची आवश्यकता होती. महार ही जमात प्रामुख्याने महाराष्ट्रातच आढळून येते. महाराष्ट्रातील महारांना ५२ अधिकार प्राप्त आहेत. महारांच्या वसती प्रामुख्याने गावाबाहेर असतात. 'गाव तेथे धेडवाडा' ही म्हण प्रसिद्ध आहे. वेरुळच्या लेण्यात 'धेड लेणे' वा 'महारवाडा' म्हणून एक लेणे आहे. 'धेड' हा थेड वा थेर ह्या शब्दाचा अपभ्रंश आहे. म्हणजे 'धेड लेणे' हे 'थेर लेणे' वा 'स्थविर लेणे' असावे. पुढे त्याचा अपभ्रंश धेड लेण्यात झाला. महाराष्ट्रातील धेड हे स्थविरवादी हीनयान धर्मपंथाचे अनुयायी असावेत. ह्या स्थविरपंथाच्या अनुयायांना अस्पृश्यत्व

---

१ New History of the Marathas., Vol. I, P. 45.

२. डॉ. बी. आर. आंबेडकर, दी अंटचेबल्स, पान २००.

देण्याचे वा गावाबाहेर काढण्याचे पाप मात्र ब्राह्मणांनी केले नसावे. (ब्राह्मण हा धर्मवाचक अर्थाने घेतलेला शब्द आहे.) कारण बुद्धाच्या निर्वाणानंतर स्थविरवादी आणि महासांघिक ह्या दोन पंथांमधील विरोध पराकोटीला गेलेला आढळतो. त्यामुळे महासांघिकांनी 'थेरवाद्यांना' वा धेडांना हीन लेखून त्यांना गावाबाहेर ठेवण्याचे पाप केले. पुढे ब्राह्मणधर्माच्या पुनरुत्थानाच्या कालखंडात महासांघिकांवर तीच पाळी आली. महासांघिकांचे धर्मगुरु 'महाअर्हत,' हे परधर्मीय म्हणून निष्कासित झालेत. महाअर्हतांपासून 'महार' ही अस्पृश्य जमात निर्माण झाली. महाराष्ट्रातील धेड हे महाअर्हतांच्या पिळवणुकीने अस्पृश्य झालेत. आणि वैदिक धर्माच्या श्रौतस्मार्त धर्माच्या पंथाच्या अनुदार वृत्तीने महाअर्हतांचे 'महार' झालेत. धेड वा महार ह्या दोन्ही जमाती एकाच धर्माच्या असल्यामुळे पुढे दोन्ही जमाती अस्पृश्य म्हणून जगू लागल्या. अस्पृश्यतेच्या संदर्भात धेड हा शब्द अधिक प्राचीन असावा. महार शब्दाची निर्मिती गुप्तकालखंडाचे नंतर झालेली असावी. महार जातीच्या उद्गमाचा शोध निराळ्या मार्गाने घेता येतो.

धेड ह्या अस्पृश्य जमातीचा इतिहास स्थविर थेर पंथापासून गवसू शकतो, पण महारांचा इतिहास मात्र धेडांइतका प्राचीन नाही. म्हणून महार व रठ्ठांच्या एकत्रीकरणाने महाराष्ट्र झाले असे म्हणता येत नाही. 'थेर करणे' 'थेरडा' थोर, 'खेड्डो' ही रूपे स्थविरांपासून झालेली आहेत. 'धेड-गुजरी' ही बोली स्थविरांची प्राकृत, आणि गूर्जरांची 'गुजरी' बोली ह्यांच्या एकत्रीकरणाने झालेली असावी. धेडांचा प्रभाव गुजराथेच्या मार्गाने महाराष्ट्रांत पडलेला दिसतो.--

महाराष्ट्रातील 'महा' हे विशेषण महारांनी दिलेले नाही, कारण बौद्धधर्माच्या प्रभावाखाली महा हे विशेषण प्रचलित झालेले दिसते. धार्मिक अधिकाराचे निदर्शक म्हणून हे बिरुद बौद्धांनी धारण केलेले आहे. महाअर्हतांच्या वा महाधम्मरखितांच्या प्रभावामुळे रठ्ठांचे महारठ्ठ झाले असे म्हणता आले असते. पण महारठ्ठी बोलीचा परिचय, 'महाअर्हत' वा 'महाधम्मरखितांच्या' अधिकार पदांपेक्षा प्राचीन कालखंडात होतो; म्हणून बौद्धांचे प्रभावाखाली जनपदांची जशी महाजनपदे झालीत तसे रठ्ठांचे महारठ्ठ झाले असे म्हणण्यात अडचण येते. महारठ्ठी भाषा बोलणाऱ्या टोळ्यांचे अस्तित्व वररुचीच्या कालखंडात असून त्या कालखंडात बुद्ध धर्माचा प्रभाव पश्चिमेकडे पडलेला नाही.

रठ्ठांचा वा रथेष्ठांचा परिचय इराणच्या वर्णव्यवस्थेतून मिळतो. रथी नावाची राजकुळे भारताच्या भूमीवर पुराण कालखंडात राज्य करीत होती. भगीरथ, दासरथ ही नावे भारताच्या पुराणांत प्रसिद्ध आहेत. पण भगीरथ, दासरथ ह्यांची राजकुळे भारताच्या भूमीवर इराणच्या मार्गाने आलेली आहेत. ह्या कुळांचा मूळ इतिहास देण्याचे येथे प्रयोजन नाही. तरी पण तुराणमधील, 'भग पूजकांचा' प्राचीन काळात, इराणच्या उत्तरेला असलेल्या 'दैत्या' वा 'आरा' नदीच्या काठावरील रथवींच्या टोळ्यांशी संपर्क प्रस्थापित होऊन भगीरथांची संस्कृती भारताच्या दिशेकडे वळली. रथवींचा आणि दासांचा संपर्क प्रस्थापित होऊन दासरथीचे कूळ निर्माण झाले. रथवींचा इतिहास इराणच्या प्राचीन काळखंडातून ज्ञात होतो. रठ्ठ व रथेष्ठ हे जर रथवींचे अपभ्रष्ट रूप असेल तर रठ्ठांचा रथेष्ठांचा शोध घेण्यासाठी इराणच्या प्राचीन इतिहासाकडे वळावे लागते. प्राचीन इराणमधील रथवीपासून रथी व रथींपासून रठ्ठी अशी रूपे प्राप्त होऊ शकतात. सातवाहनांच्या दानपत्रातील महारठींनी वा महारठी हे मुळांत रथी ह्या वर्णाचे प्राकृत रूप असून त्यांचा संबंध इराणातील रथवींशी जोडावा लागतो.

इराणच्या प्राचीन धार्मिक परंपरेत झोटा आणि रथ्वी ह्या दोन पुजाऱ्यांची वा याज्ञिकांची नावे उपलब्ध होतात.[१] झोटा हा वैदिक कालखंडांत होता म्हणून कार्य करू लागला. किंवा होता हे संस्कृतात झोटाचे संस्कारित रूप असू शकते. आरंभीचे काळात झोटा आणि रथ्वी हे मुख्यत: युद्धविषयक कार्ये सांभाळीत असावेत. कारण यज्ञसंस्था आणि युद्ध हे एकेकाळी परस्परापासून भिन्न नसावेत. 'देवांनी यज्ञाने यज्ञ जिंकला ही देवांच्या धर्माची प्रथम तत्वे होती' हे वचन युद्ध हा यज्ञ होता ह्याची जाणीव करून देतें. एवढेच नव्हे तर नरमेधयज्ञ, अश्वमेध यज्ञ, सर्पसत्र हे यज्ञ नसून

---

१. Dr. Martin Haug, Aitareya Brahman, Introduction, P. 13

संग्राम होते हे लक्षात घेणे आवश्यक आहे. प्राचीन अवेस्थन साहित्यातून ज्या झोटाचा आणि रथ्वींचा परिचय होतो ती योद्धा आणि सारथी अशी दोन अधिकारपदे असावीत. युद्धकार्यात झोटाचे प्रमुख कार्य झुंजण्याचे असून रथ्वी रथाला गती देण्याचे कार्य करीत असावा यज्ञसंस्थेच्या उत्क्रांतीत अग्निपूजा गृहकृत्यांत समाविष्ट होऊन यज्ञ गृहकृत्याशी निगडित झाला व युद्ध हे रणांगणांशी निगडित राहिले. गृहकृत्यांत यज्ञाला वाहून नेण्यासाठी वा होत्याला मदत करण्यासाठी अध्वर्यूची नियुक्ती झाली असे दिसते. कारण प्राचीन अवेस्थन काळात यज्ञातील अग्नी–जिवंत ठेवणे हे कार्य अतरवेक्षोला करावे लागे. हा अतरवेक्षो रथ्वी होता. 'If is that of Atarvaksho, i. e who feeds the fire a name often applied to Rathi in which we have recognised Adhvaryu.'[४] मार्टीन हौगच्या विधानातून ते स्पष्ट होते. भारताच्या धार्मिक इतिहासात देखील पुरोहिताकडे असलेले युद्धकार्य क्रमाने समाप्त होऊन पुरोहित हा केवळ गृहकृत्याची सांगता करणारा व धार्मिक बाबतीत सल्ला देणारा मुलकी अधिकारी म्हणून कार्य करू लागला. इराणच्या इतिहासात झोटा हा धर्मप्रमुख झालेला दिसतो. आणि त्याला अतरवेक्षोचे धर्मकार्यात साहाय्य प्राप्त होऊ लागले. व रथ्वींकडे युद्धविषयक कार्ये कायम राहिलीत. हा इतिहास इराणच्या उत्तरेला मीड नावाच्या प्रदेशात उत्क्रांत झाला असण्याची शक्यता आहे. कारण इराणच्या संस्कृतीत अग्निपूजेची प्रथा मगांनी ओतलेली आहे. मगांच्या प्रदेशातच आरा नावाची नदी वाहते. इराणमधील अश्वांची जात ही देखील मगांच्या प्रदेशातील झग्रस नावाच्या पर्वतातील पठारांवर पोसलेली आहे. अश्व हा शब्द इराणी असून घोडा हा शब्द तिबेटी आहे.[५] इराणच्या संस्कृतीत झोटाची कार्ये मगांकडे असावीत आणि रथ्वींची कार्ये झग्रोस पर्वतातील घोडदळांनी सांभाळलेली असावी. झोटांना मीड मध्ये शोधावे लागते, रथ्वींना पार्थियात शोधावे लागते. दारियस पार्थियन होता. तो स्वतःला क्षायथिय म्हणवून घेतो.[६]

भारतीय वर्णव्यवस्थेत ब्राह्मण, क्षत्रिय ह्या वर्गांची कार्ये सांभाळणारा एक गट होता तसाच गट इराणमध्ये देखील होता मीड प्रदेशातील अथ्रव आणि पार्थियातील रथ्वी वा रथेष्ठ हे दोन वर्ग होते. दारियसच्या सैन्याबरोबर किंवा त्याचे आधी––सीरसने भारतावरील आक्रमणाचा जे अपयशी धाडस केले त्या धाडसी स्वारीबरोबर रथेष्ठांच्या आणि मगांच्या टोळ्या भारतात स्थायी झाल्या. आणि ह्या दोन टोळ्यांतून मग आणि रठ्ठांचा संपर्क भारताच्या भूमीवर प्रस्थापित होऊन मगरठ्ठांची संस्कृती जन्माला आली. कोसलाचा नृपती ज्यावेळी प्रसेनजित ह्या विरुदाने इतिहासात प्रसिद्ध होतो त्यावेळी त्याने परशियनांवर विजय प्राप्त केला असावा असे दिसते. भारतातून सीरसचे सैन्य मार खाऊन परत गेले व केवळ सातांची तुकडी त्याचे बरोबर परत गेली हे स्ट्रॅबोचे विधान सीरसच्या पराभवाचे सत्य उकलून दाखविते.[७] पण इतिहासकार सीरसच्या भारत आक्रमणाची शक्यता नाकारतात. 'The Story of his unsuccessful March on India seems to have invented by the way of contrast to Alexander's fortunate expidtiion'[८] 'सीरसचा जो कालखंड तोच प्रसेनजिताचा कालखंड होय. सीरस नंतर भारतावर दारियसने स्वारी केली. ह्या स्वारीनंतरच भारतात मगांचे आणि रठ्ठांचे वर्चस्व वाढले. उपनिषद्‌काळात मद्रांचा संपर्क रठ्ठांबरोबर आलेला दिसत नाही. पण जातकांत मात्र तसा संबंध प्रस्थापित झालेला आढळतो म्हणून रठ्ठांच्या आगमनाचा काळ जातक कथेच्या आधी, पण दारियसच्या स्वारीनंतर ठरवावा लागतो. ह्या स्वारी नंतर जवळजवळ २० वर्षांनी बुद्धाचे निर्वाण झालेले आहे (इ. स. पू. ४८३). बुद्धाला मग ब्राह्मणांविषयी तिरस्कार होता अशा अर्थाचे वचन कुठेतरी वाचण्यात आलेले आहे बुद्धाच्या काळखंडात मगांचा प्रभाव वाढलेला दिसतो. मातंग जातकातील एका आधारावरून असे दिसते की, बनारसच्या काही ब्राह्मणांना इतर ब्राह्मणांनी वाळीत टाकल्यामुळे त्यांना 'मेज्झ' नावाच्या राजाच्या पदरी आश्रय घ्यावा लागला.[९]

---

४. Dr. Haug, P. 15

५. Robert Shaffer, Enthrography of Ancient India, P. 24

६. बेहिस्थानचा अभिलेख, पंक्ति १ ली.

७ Ancient India described by Magasthen cand Arrian - Merindle पान १०

८ Historians History of the world Vol I, P. 593.

९ Ratital Mehata Pre Budhist India. P. 29.

मेज्झ हे मज्दाचे रूप असावे. दारियसच्या काळात 'मज्दा' मताचा प्रभाव इराणवर कायम झालेला होता. दारियसचा धर्म 'अहूरमज्दाचा' धर्म होता. बनारसच्या ज्या ब्राह्मणांना चांडाळांच्या वसतीत हाकलून देण्यात आले. ते ब्राह्मण, मज्द नावाच्या राजाच्या दरबारी आश्रयाला गेले असावेत. बनारसचे ब्राह्मण मग ब्राह्मण असावेत. प्लीनीने 'मक्को कलिंगी'[10] असा शब्दप्रयोग केलेला आहे. त्यावरून कलिंगाचे आसपास, उत्तरेला चांडाळाचे वसतीला लागून मक्कांचे वा मग्गूंचे वर्चस्व असावे, असे म्हणता येते. मज्दा, मेज्झ आणि मग, ही तीनही नावे पूर्व भारतावर मगांचे वा परशियनांचे वर्चस्व दर्शविण्यास पुरेसे ठरावेत. परशियाच्या भूमीवर मग आणि मज्द ह्यांची धार्मिक मते परस्परांपासून विलग असलीत तरी भारतातील जातक कथांची निर्मिती करणाऱ्या सूतांना वा भाटांना, किंवा प्राचीन कथालेखकांना त्यांच्या धार्मिक मतांतील विरोध लक्षांत घेणे अशक्य असल्यामुळे त्यांनी मग आणि मज्ज ह्यांना 'परशियन' म्हणून एकाच माळेत गोवले आहे. प्लीनीने 'मक्को कलिंगी' हा शब्दप्रयोग वापरला आहे त्यावरून कलिंगात मगांचे वर्चस्व वाढलेले असून त्यांचा प्रभाव नष्ट करण्यासाठी अशोकाने कलिंगाविरुद्ध युद्ध पुकारले असावे. संकिच्च जातकात अधार्मिकांच्या राज्यांत (अधम्मथ्यो) स्थायी झालेला, रथींना पराभूत करणारा, आणि जनपदाला त्रस्त करून सोडणाऱ्या मग नृपतीचाही उल्लेख आलेला आहे.[11] हा मग नृपती कोण असावा ह्याविषयी काहीच बोध होऊ शकत नाही. पण भारताच्या भूमीवर मग आणि रथी ह्यांचा आपसांत विरोध प्रारंभ झाल्याचा पुरावा मात्र जातकातील उल्लेखातून प्राप्त होतो. अलेक्झांडरच्या कालखंडात गंगेचा पूर्वभाग प्रशिआई म्हणूनच ग्रीक इतिहासकारांना ज्ञात आहे. प्रशिआई, हे देखील 'प्राङ्क्' ह्या पूर्व दिशावाचक संस्कृत, (तिबेटी वर्मी भाषेच्या प्रभावाने दिले गेलेले) शब्दाचे रूप नसून ते 'प्रसी' ह्या शब्दाचे रूप आहे असे लक्षात घेणे आवश्यक आहे. पालीबोथ्रा वा पाटलीपुत्र, येथील नागरिकांविषयी कनिंगहॅमचे विधान त्या दृष्टीने मननीय आहे. 'Strabo and pliny agree with Arrian in calling the people of Palibothra by the name of Prasii; which modern writers have unanimously referred to Sanskrit Prāchyās or eastern.........

But it seems to me that Prasii; is only the Greek form of Patāsiya or man of Patasa or Parāta.[12]

प्रसाई हे 'प्राच्य' ह्या पूर्वदिशावाचक संस्कृत शब्दाचे ग्रीक रूप नसून ते परशियनांविषयीचे विधान असावे. कनिंगहॅमने पलाश नावाच्या वृक्षविशेषावरून प्रसाई हे नाव उकलून दाखविले आहे. 'It obtained this name from Palāsa. curtius who calls the people Pharrasii.'[13] कर्टिअसने पालिबोथ्राच्या नागरिकांना फारशी म्हटलेले आहे. प्रसाईच्या राजधानीचे ठिकाण म्हणून ग्रीकांनी पालिबोथ्राचा निर्देश केलेला आहे. पालिबोथ्रा हे अर्थातच पाटलीपुत्राचे नाव आहे. पाटलीपुत्राचे मूळ नाव पाटलीग्राम असे होते. त्याची पायाभरणी अजातशत्रूच्या कालखंडात आरंभ झाली. पाटलीग्रामाचे पाटलीपुत्र हे नाव इराणी प्रभावातून निर्माण झालेले आहे. अजातशत्रूच्या मृत्यूनंतर मगधाच्या राजगादीवर आरूढ झालेल्या राजांमध्ये नागदासक व शिशुनाग अशी दोन नावे उपलब्ध होतात. ह्या दोनही नावांतील दासक आणि शिशु भारतीय नसून इराणी आहेत. दासक हे वायव्य भारतातील दाहीचे कूळ असावे असावे आणि 'शिशु' सस्तानियाचा संस्कृत अपभ्रंश असावा. अजातशत्रूच्या मृत्यूनंतर काही इराणी कुळे पूर्वेच्या दिशेने सरकलेली असून ह्या कुळांतील काही सरदारांनी पूर्वेकडे राज्याची प्रस्थापना केली. मेज्झ हा अशाच राजघराण्यातील राजा दिसतो. ह्या आक्रमणामुळेच 'मक्को कलिंगाचा' जन्म झाला. इराणी सरदाराच्या कुळांनी पाटलीग्रामचे पाटलीपुत्र हे नामांतर केले असण्याची शक्यता आहे. पालिबोथ्रा हे पाटलीपुत्र ह्या नावाचा ग्रीक पर्याय आहे. बेहिस्थानचे अभिलेखात दारयवहू[14] (दारियस) स्वतःला 'दह्यु-

10. Ancient India described by Megasthenes and Arrian, पान. १३७, तळटीप.

11. Pre Buddhist India. Ratilal Mehata, पान. ३०

१२. कनिंगहॅमस् एन्शंट जाग्रफी ऑफ इंडिया, सुरेन्द्रनाथ मुजुमदार शास्त्री १९२४, पान ५२०.

१३. कनिंगहॅम, पान ५२०.

१४. प्राचीन महाराष्ट्र, पान २०९.

नाम् विस्तापह्या पुथ्र' असे म्हणवून घेतो. देवपुत्रां-सारखी बिरुदे कुशाणांनी परशियन राजसत्तेपासून उचलून घेतलेली आहेत. परशियनांनी ती पार्थियनांपासून उचलून घेतली असण्याची शक्यता आहे. दारियस हा स्वत: पार्थियातून परशियात आला असावा. कारण दारियसचा पिता विस्तास्प हा पार्थियाचा राजा होता. 'Hystaspes really was to all intents and pusposes king of a distant portion of the Persion kingdom and lands of Parthia and Hyreania.'[१५] भारतात इराणचे आक्रमण होण्यापूर्वी इराणी समाज अवतीभवतीचे प्रादेशिक रंग घेवून नटलेला होता. इराणी संस्कृतीत लिडिया, मीड, पार्थिया, बॅविलोनिया, एलाम, अशा अनेक संस्कृतीचे पाणी मिसळले होते.

वेहिस्थानच्या अभिलेखातील पुथ्र हे विशेषण केवळ पुत्र ह्या अर्थानेच वापरले नसून कुठेकुठे ते राजा ह्या अर्थाने वापरलेले दिसते. पुथ्र हे राजबिरुद पार्थिया नावाच्या प्रदेशातून हरवामनींनी इराणमध्ये रूढ केले. व ज्यावेळी त्यांनी भारतावर स्वाऱ्या केल्यात त्यावेळी ते भारतातही रूढ झाले. पण पाटलीपुथ्रातील पुथ्र हे विशेषण पार्थियन आक्रमणाचा परिणाम म्हणून स्वीकृत झालेले नाही. कारण पार्थियनांचा प्रभाव पंजाबच्या दक्षिणेला जाणवला नाही. कुशाणांच्या टोळ्यांनी त्यांचे साम्राज्य जिंकून घेतले. कुशाणांनी देवपुत्र, राव, महाराज अशी बिरुदे भारतीय राजसत्तांना परिचित करून दिलीत पण पाटलीपुत्र हे नाव कुशाणांच्या स्वाऱ्यांचे आधीच ग्रीकांना परिचित होते. त्यावरून पाटलीग्रामाला पाटलीपुत्र हे नाव इराणी आक्रमणा-नंतर पडलेले दिसते. वेहिस्थानच्या अभिलेखात ज्या अर्थाने पुथ्र शब्द वापरला आहे त्या अर्थाने तो पाटली-ग्रामाच्या रहिवाशांसाठी वा राजसत्तेसाठी वापरला गेला असावा. वेहिस्थानच्या अभिलेखात कुरौशपुथ्र:[१६] न बुनैतह्या पुथ्र[१७]; चिचिरव्रीचा पुथ्र[१८] हलिदताचा पुथ्र[१९] हे ज्या अर्थाने वापरलेले आहेत, त्याच अर्थाने पाटलीपुथ्र घ्यावा लागतो. ग्रीक इतिहासकारांनी विशेषत: मेगॅस्थेनिस व एरियन ह्यांनी त्याचे स्वरूप पालीबोथ्रा असे दिलेले आहे. मेगॅस्थेनिम सिंधू पार करून भारतात आला असावा असे दिसत नाही. त्याची माहिती प्रत्यक्ष प्रमाणावर आधारित नसून आप्तवाक्यावर आधारलेली दिसते. पाटलीपुथ्र व भारतातील राजसत्ता ह्या दोनही विषयांवरील त्याचे लेखन अप्रत्यक्ष आधारावर अवलंबून आहे. ही माहिती त्याला इराणातून पुरविली गेली असावी.*

ग्रीकांना प्रसाई हे नाव पूर्व दिशेसाठी अभिप्रेत नसून ते परशियन साम्राज्याविषयी अभिप्रेत आहे, ह्याचे अन्य पुरावे सादर करता येतात. अपोलोडोटसचे मताचा निर्देश करून स्ट्रॅबोने बलखवर राज्य करणाऱ्या टोळ्यांमध्ये असाइ, पसियानी, तोरवारी व सकरौली[२०] इत्यादी चार टोळ्यांचा उल्लेख केला आहे. ह्यावरून ग्रीकांना पसियायी वा प्रसियायी म्हणजे परशियन राजसत्ता असावी असा बोध होतो. इंडोग्रीकांचे इति-हासलेखनासाठी टालेमीचा आधार घेऊन टार्न ह्यांनी असे विधान केलेले आहे की प्रसियेन, आभीर, पतल, आणि सुराष्ट्र असे चार प्रदेश मिलांदरच्या साम्राज्यात अंतर्भूत झालेले होते.[२१] (टॉलेमीचा आधार प्रत्यक्ष-पणे पाहण्यात आलेला नाही पण डॉ. ए. के. नारायण ह्यांनी आपल्या इंडोग्रीकांच्या इतिहासप्रबंधात टार्नची विधाने खोडून काढलेली आहेत). पण सिंधूच्या परि-सरातील प्रदेशाला प्रशियायी असे नाव होते. सिंधूच्या मुखापाशी तयार झालेल्या विस्तीर्ण प्रदेशाला प्रशि-यानी असे म्हटले जात असून अरुंद प्रदेशाला 'पटल' असे नाव होते.[२२] वर निर्देशित केल्याप्रमाणे प्रसियेन, आभीर, पतल आणि सुराष्ट्र हा क्रम जर बरोबर असेल तर हा प्रादेशिक क्रम दक्षिणोत्तर आहे आणि टॉलेमीच्या भौगोलिक व्यवस्थेत तो दक्षिणोत्तर असाच असावा. आभिरांचे प्रदेश खानदेशाच्या उत्तरेला

१५. The ancient History of the near east, Hall, p. 554.
१६. बेहिस्थानचा अभिलेख, पंक्ति १०
१७. परिच्छेद १६
१८. परिच्छेद ३, पंक्ति. २५८
१९. परिच्छेद १३, पंक्ति २५९

* ह्या चर्चेसाठी मॅक्रींडलचे मेगॅस्थेनीस व एरियनवरील पुस्तक उपयोगी ठरावे.
20. Strabo, XI. 8.2.
२१. डॉ. मोतीचंद्र ह्यांच्या 'सार्थवाह' ह्या ग्रंथातून उतरविलेले विधान, पान. ९१.
२२. मेगॅस्थेनीस व एरियनचा वृत्तांत, पान १४४.

स्थिरावलेले आहेत. त्याच परिसरात आभिरानी नावाची बोली देखिल अस्तित्वात आहे. आभीर सौराष्ट्रापर्यंत पसरलेले आहेत. आभीरांच्या उत्तरेला पटलेनच्या नजीक सौराष्ट्र असा क्रम दिसतो. म्हणजे प्रशियेनांचा प्रदेश नर्मदेच्या दक्षिणेस घ्यावा लागतो. पतलापासून तो सह्याद्रीच्या किनाऱ्यावरील मुलुख हा 'प्रसियेन' म्हणून लक्षात घ्यावयाचा की काय? एवढे मात्र खरे की प्राची ह्या संस्कृत शब्दाचे (प्राची संस्कृत शब्द प्राङ्क ह्या तिबेटी-बर्मी गटातील शब्दाचे संस्कारित रूप असावे) प्रसाई असे रूप स्वीकारताना फारशी चूक होत नसली तरी पूर्वेला असलेल्या प्राचींच्या इतिहासाविषयी ज्या वेळी ग्रीक इतिहासकार विधान करतात त्यावेळी त्यांना पूर्वेच्या इतिहासाविषयी बोलावयाचे नसून प्राची ह्या टोळचांविषयी सांगावयाचे असते. मेगॅस्थेनीस व एरियन ह्यांनी प्राची बरोबरच इतर टोळच्यांचाही उल्लेख केला. त्यावरून प्राची वा प्रासई ह्यावरून परशियनांचा बोध व्हावा. दारियसच्या काळखंडानंतर प्रसाईंनी आपला प्रभाव पूर्वेलाही कायम केला.

शिरसच्या भारतविजयासंबंधीची माहिती डॉ. राधाकुमुद मुकर्जी ह्यांनी 'The age of imperial unity[23] ह्या ग्रंथाच्या तिसऱ्या प्रकरणात दिलेली आहे.

'According to Ctesias, Cyrus died of wound, inflicted in battle by, 'an Indian.'

According to Xenophen; Cyrus, "brought under his rule Bactrians and Indians; and extended his sway up to Erythean Sea."[24]

अलेक्झांडरची प्रशंसा करण्यासाठी मेगॅस्थेनीस व एरियन[25] ह्या ग्रीक इतिहासकारांनी सीरसच्या भारत आक्रमणाविषयी शंका प्रदर्शित केली असून, हे रावलस व डायोनीज ह्या प्राचीन ग्रीक वीरांचा अपवाद वगळला तर अलेक्झांडरचे पूर्वी भारत परकीय आक्रमणापासून मुक्त होता असे हे दोघे इतिहासकार सांगतात. एरियनचे दुसरे विधान त्याच्या पहिल्या विधानाशी विसंगत आहे. तो म्हणतो, 'That the Indians between ancient times subjected to Assariyars, the Medes, and finally to Persiaas under Cyrus.[26]' एरियनच्या कालखंडात भारतावर असारियन, मीड व परशियनांचे राज्य संस्थापित झाले असल्याचा इतिहास त्याने माहीत करून घेतला असावा. एरियनच्या ह्या विधानाचा सखोल अभ्यास होणे आवश्यक आहे. कारण हे विधान अतिशय महत्त्वपूर्ण आहे. परजियन आक्रमणातून पश्चिम भारताचे जे राजकीय चित्र निर्माण झाले त्यावर ह्या विधानातून प्रकाश टाकला जातो.

सीरसच्या पूर्वी असीरियन. मीड ह्या दोन प्रदेशांतील राजांनी भारतातील काही प्रदेश जिंकला असावा असा अर्थ एरियनच्या विधानातून समजून घेतला तर ती चूक होईल. परशियनांच्या सेनेत केवळ इराणी सेनेची भरती होती असे समजू नये. अलेक्झांडरचे अगोदर परकीय सत्तेच्या भारत आक्रमणाची— शक्यता मेगॅस्थेनीसने नाकारली असली तरी तो म्हणतो की परशियन सेनेत Hydrakes ची सेना भाडोत्री म्हणून लढत असे. 'Hydrakes' हे 'सौद्रक' अथवा शूद्रक टोळचांचे ग्रीक रूप होय.— त्या पश्चिम भारतात सिंधूच्या परिसरात अस्तित्वात होत्या. म्हणजे मेगॅस्थेनिसचे विधान विसंगती दर्शविते.

शूद्रकांचा प्रवेश शूद्र म्हणून गणला जावा—आणि त्यांची राजसत्ताही अस्तित्वात असावी व त्यांचे शेजारी ब्राह्मण सत्ता प्रस्थापित व्हावी हे भारतीय वर्णव्यवस्थेत फारसे सुसंगत वाटत नाही. शूद्रक, ब्राह्मण, इत्यादि टोळचांनी जेथे आपली राज्यस्थापना केली तो सिंधूच्या परिसरातील संपूर्ण प्रदेश धर्मशास्त्रकारांनी बहिष्कृत ठरविला आहे. शूद्रकांची व ब्राह्मणांची गणतंत्रे अलेक्झांडरवर तुटून पडलेली होती. पश्चिम भारतातील शूद्रक व ब्राह्मण भारतीय—वर्णव्यवस्थेतील शूद्र व ब्राह्मण वर्ण नसून ते परकीयत्वामुळे शूद्र झालेले आहेत. पश्चिम भारतातील शूद्र सत्ता 'गुणकर्मविभागाने' निर्माण झालेली नाही.

धर्मशास्त्राचे कालखंडात, सरस्वतीच्या पश्चिमेचा प्रदेश आणि प्रयागाच्या पूर्वेचा प्रदेश संस्कारहीनांचा

२३. The age of Imperial unity chapter 3. P. 3d-41.
२४. Chaptesr III, P. 39.
२५. पान ४०

२६. पान ४०

प्रदेश म्हणून बहिष्कृत ठरविलेला आहे. पतंजलीच्या महाभाष्यातून आर्यांनी जे प्रदेश टाळावयाचे आहेत त्याचा निर्देश केलेला आहे. (खंड १, पान ९) पतंजलीच्या मते सौराष्ट्र आर्यसंस्कृतीबाह्य आहे. कर्णपर्वात देखील; पंचनदावरील व सिंधूवरील प्रदेश तसेच वाहिकांचा प्रदेश वर्ज्य करावा असे सांगितलेले आहे. (४४,, ३१–३४)

'पञ्चानां सिन्धुषष्ठानां नदीनां येऽन्तराश्रिताः।
तान् धर्मबाह्यान् अशुचीन् बाहिकानपि वर्जयेत् ॥

बौधायन श्रौतसूत्रातील Robert Shafer ह्यांनी उद्धृत केलेले मत त्या दृष्टीने मोलाचा प्रकाश टाकते 'The land of Arattas and Gandhāris were not suitable for othodox Aryan .. They were of mixed blood'[२७]

बौधायन श्रौतसूत्राचे कालखंडात सौराष्ट्र आरट्ट सिन्धच्या परिसरातील टोळचा; आभीर, आणि शूद्र पश्चिम भारतात वसाहत करून होते व ह्या टोळ्यांचे प्रदेश सनातन्यांना त्याज्य होते. शूद्र, क्षूद्रक, आणि त्यांचे शेजारी असणारी ब्राह्मण राष्ट्रे ही देखील धर्मशास्त्राच्या भौगोलिक व्यवस्थेत, आर्यावर्ताचे बाहेर आहेत. मनुस्मृतीचे कालखंडात ही भावना नष्ट झालेली दिसते. कारण मनूच्या आर्यवर्ताची कल्पना संपूर्ण उत्तर भारताच्या भूमीशी व्याप्त आहे. पण त्याचे आसपासच्या कालखंडात वावरणाऱ्या पतंजलीने मात्र सौराष्ट्र आर्यवर्ताचे बाहेर टाकलेला आहे. पश्चिमेकडील टोळ्यांना आर्यावर्त ह्या भौगोलिक क्षेत्रात समावून घेण्याचे प्रयत्न मानवधर्मशास्त्र निर्मितीच्या कालखंडात म्हणजेच पुष्यमित्राच्या काळात प्रारंभित झालेले आहे. मानवधर्मशास्त्राचे अगोदर सिंधूच्या परिसरातील प्रदेश संस्कारहीनांचे प्रदेश म्हणून त्याज्य होते. पश्चिमेतील शूद्रक व ब्राह्मणांच्या टोळचा ह्या परकीयांच्या टोळचा होत. एरियनचे जे विधान मागे उल्लिखित केलेले आहे त्या संदर्भात आता असे म्हणता येईल की परशियन आक्रमणाबरोबर असीरियनांच्या म्हणजेच असुरांच्या टोळचा आल्यात. असुर म्हणून त्यांना शूद्र ठरविले गेले. परशियन सैन्याबरोबरच शुशान वा ससानियनांचा भारतात प्रवेश झाला. इराणच्या पूर्वेला असलेल्या एलामच्या संस्कृतीतून शिशुनागांचा प्रभाव भारतात कायम झाला तोही इराणी सैन्यात लामच्या फौजा भरती झाल्यामुळे. इराणच्या सैन्याचे पुजारी म्हणून वा मीड देशातील सैनिकांनी 'ब्राह्मण' राजसत्ता पश्चिमेला प्रस्थापित केली. आरा नदीच्या परिसरातून आलेल्या रथींनी आरट्टांचे राज्य पंजाबात प्रस्थापित केले. हलिस नदीच्या किनाऱ्यावरून हलिकांच्या टोळचा भारतात प्राविष्ट झाल्या. तुर्कस्थानातील भगपूजकांनी भगपूजेची स्थापना केली. परशियन सेनेत निरनिराळचा प्रदेशातील टोळ्यांचे सैन्य संघटित होऊन परशियन साम्राटाच्या वतीने लढत असे ह्याचे वर्णन हिरोडोटसने करून ठेवलेले आहे. 'Here were to be seen the cotton garmcnts of Indians, and the Ethopians from above Egypt habited in lions hides, the swarthy Baluchis of Gedrosia, and the nomad hordes from the steppes of Mangolia, wild races of huntsmen like Sagartians and besides these rich dresses of Medes and Bactrians, the Libyans drawn in war chariots of four horses, and the Arabs mounted on camel. Here were also seen the flects of Phonecians, and the Greeks of Asia Minor compelled to serve against their kindred.'[२८]

विजययात्रेच्या आरंभीच्या काळात आक्रमणाची मदार केवळ परशियन सेनेवर अवलंबून असली तर सीरसच्या काळात परशियन साम्राज्याचा जसजसा विस्तार होऊ लागला, तसतशी निरनिराळ्या प्रादेशिक टोळ्यांची सेनेत भरती होण्याची आवश्यकता निर्माण होऊ लागली. 'As cavalry the nomad nations to the south and east of the caopian were preferred, the Hyrcanians, the the Parthians, and Sacae......The Greeks however were preferred to all the rest... towards the end of the Persian monarchy they constituted the garrisons of all cities of Asia Minor...[२९]

परशियन सेनेत परकीय राष्ट्रांची सेना भरती होण्याचे मुख्य कारण सीरसचे उदार राजनैतिक धोर-

२७. **Enthrography of Ancient India, p. 32.**

२८. हिस्टॉरियनस् हिस्ट्री ऑफ दी वर्ल्ड, खंड १, पान ६५०.

२९. पान ६५४.

णात दिसून येते. सीरसच्या राष्ट्रीयत्वाच्या विवादपूर्ण समस्येची उकल करण्याची येथे गरज नाही. एवढे मात्र खरे की सीरसची मातृभूमी परशियन मातृभूमी नसून तो एलामचा रहिवासी होता. एलामची सरहद्द सुमेरियाला लागून होती. त्यामुळे एलामची संस्कृती ही प्रामुख्याने सुमेरियन संस्कृती होती. एलामचा सर्वेश्वर शिशुनाग होता.[३०] एलामच्या साम्राज्याचा शुशान हा एक प्रांत होता. सीरसने एलामची संस्कृती व शिशुनाग वंश इराणच्या गादीवर प्रस्थापित केला. सीरसच्या भारत आक्रमणाच्या कारकीर्दीत शिशुनाग वंशाचे साम्राज्य अजातशत्रूच्या मृत्यूनंतर मगधावर प्रस्थापित झालेले असून त्याला 'शूद्र' म्हणून म्हटलेले आहे. सीरसच्या राज्यारोहणानंतर त्याचे युद्ध हलिस नदीच्या पैलतीरावरील (हलीस नदी मीडची पश्चिम सरहद्द असून मीडचा प्रदेश इराणच्या उत्तरेस आहे.) लिडिया प्रांताचा सरदार क्रोएसस ह्याचो बरोबर इ. स. पू. ५४५ चे दरम्यान घडून आले. ह्या युद्धात क्रोएससचा पराभव झाला. सीरसने क्रोएससला कैद केले व पुढे उदार अंतःकरणाने त्याला क्षमा केली. 'That Croesus was removed to Persia as a prisoner and afterwords lived as a great noble at the royal eourt seems highly probable since Cyrus had not even put his old enemy Astyages to death.'[३१] तदनंतर सीरसने बॅबिलोनियावर स्वारी केली. बॅबिलोनियात सीरसचे स्वागत झाले. सीरसची संपूर्ण कारकीर्द धार्मिक सहिष्णुतेसाठी प्रसंशनीय आहे. विजित प्रदेशाची मसलत सांभाळण्याच्या कार्यासाठी सीरसने त्याच प्रांतातील सरदाराची क्षत्रप म्हणून नियुक्ती केली असावी असे दिसते. कारण त्यानतर दारियसच्या काळात अशा क्षत्रपांनी आपले स्वातंत्र्य घोषित केल्यामुळे त्यांचा बिमोड कळण्यासाठी दारियसला वळ खर्ची घालावे लागले असा इतिहास बेहिस्यानच्या अभिलेखातून ज्ञात होतो.

सीरस ते दारियसच्या कालखंडातील परशियन प्रशासनाची व्यवस्था जर लक्षात घेतली तर भारतात जी निरनिराळी टोळी राज्ये प्रस्थापित झाली ती परशियन आक्रमणातून रुजलेली आहेत असे लक्षात येते.

विजित साम्राज्याचे निरनिराळे भाग पाडून त्यावर क्षत्रपांची नेमणूक होत असे. ह्या क्षत्रपांच्या दिमतीला सैन्य दिले जात असे.—आक्रमण प्रसंगी सेनांचे आधिपत्य त्या त्या प्रादेशिक सेनाधिकाऱ्याकडे वा सरदाराकडे असे. जो प्रदेश ज्या टोळ्यांनी जिंकलेला असे त्या प्रदेशाचे राज्य वा सरंजाम जेत्यांच्या नायकाकडे सोपविण्यात येत असे. विशाल साम्राज्याच्या संचालनासाठी सोयीची म्हणून अशीच प्रशासन व्यवस्था उपयोगी ठरते. अशीच शासन व्यवस्था मौर्यांनी आपल्या कारकीर्दीत राबविली. दक्षिणेकडील दारा राज्यांविषयी समुद्रगुप्ताने असेच सरंजामशाही स्वरूपाच्या राजव्यवस्थेचे धोरण अंगिकारलेले होते. स्थानिक परंपरा जतन करण्याविषयी कौटिल्य आग्रहाने लिहितो. मेगॅस्थेनीस व कौटिल्य ह्यांच्या शासनव्यवस्थेतील अनेक साम्यस्थळे डॉ. राधाकुमुद मुकर्जी ह्यांनी दाखविलेली आहेत. (Chandragupta Maurya and his times) मेगॅस्थेनीस व कौटिल्य ह्या दोघांनी परशियन राजसत्तेचे वर्णन केलेले आहे. म्हणून त्यांत साम्यस्थळे भरपूर आहेत.

पश्चिम भारतातील अनेक गणतंत्रांत वार्ताशस्त्रोपजीवींचे संघ आढळून येतात. कांबोज, सुराष्ट्र व क्षत्रीय श्रेणी ही वार्ताशस्त्रोपजीवी आहेत असा कौटिल्याने उल्लेख केलेला आहे. यौधेयांचा अंतर्भाव पाणिनीने 'आयुधजीवी' संघात केलेला आहे. आरट्ट, शूद्र, सौराष्ट्र इत्यादि प्रदेश आर्यांनी परित्यक्त करावयाचे होते. इराणी वर्णव्यवस्थेतील रथेष्टांनी 'आरट्ट' नावाच्या टोळ्यांना जसा जन्म दिला तसाच, सुमेरकडील, शुशान प्रांतांची वसाहत करणाऱ्या एलामच्या शेजारी असलेल्या 'शुस्' नावाच्या टोळ्यांनी सौराष्ट्र आणि शूद्र ह्या राज्यांची निर्मिती केली. सौराष्ट्रातील 'शूस्' नावाच्या टोळ्यांपासून सावकार हा शब्द निर्माण झालेला आहे. पश्चिम भारतातील शूद्र हे ससानियन असावेत.

यौधेयांच्या नाण्यांवर भालदाराचे चित्र कोरलेले आहे. असेच भालदाराचे चित्र• भाजे लेण्यांतही आढळते. भालदारांचे संघ परशियन आक्रमणाचा परिणाम म्हणून भारतात वसाहत करून राहिलेले असावे. यौधेयगणांच्या मद्रांवर कनिगहॅमने कुठे कुठे 'भागवत

---

३०. मेस्पारो–इजिप्त अॅण्ड असारिया, प्रकरण १८ पान ३१६.

३१. हॉल–दी एन्शन्ट हिस्ट्री ऑफ दी नीअर ईस्ट, पान ५५८.

स्वामिना ब्राह्मण देवस्य' अशी अक्षरे वाचलेली आहेत. त्यावरून यौधेयांचा राजा ब्राह्मण असावा असे दिसते. शूद्रांपाशी असणारी ब्राह्मणांची टोळीराज्ये मीडमधून आलेल्या मग ब्राह्मणांची राज्ये असावीत. व ह्याच मग ब्राह्मणांच्या टोळचांपैकी एका ब्राह्मणाने यौधेयांवर आपले राज्य प्रस्थापित केले असावे. ब्राह्मण टोळचांनी अलेक्झांडरचे आक्रमणाविरुद्ध शस्त्रे परजली होती असा इतिहास प्राप्त होतो. हे ब्राह्मण मग ब्राह्मण असावेत. कारण त्यांची राष्ट्रे शूद्रांचे शेजारी आहेत. पश्चिम भारतातील गणतंत्रात्मक टोळी राज्यांचा एकूण दर्जा शूद्रांचा दर्जा आहे. त्यावरून ही टोळी राज्ये भारताचे बाहेरून आलेल्या सैनिकांची असावीत. पश्चिम भारतात मगांच्या वर्चस्वातूनच पुढे जैनधर्मातील काही आचार रूढ झालेले आहेत; हा मुद्दा डॉ. केतकरांनी विस्तारलेला आहे.[३२] मगांच्या मीड नावाच्या प्रांताला लागूनच लीडिया नावाचा प्रदेश होता. ह्या दोन प्रदेशांची सरहद्द हलिस नावाची नदी होती. लिडिया प्रांतातील लोकांनाच पुढे भारतात 'लाडे' नाव प्राप्त झाले आहे. जैनांमध्ये लाड नावाची जात असून ती गौरवर्णी व रेखीव आहे. लाड ह्या जैन धर्मीयांच्या तिरस्कृतीमधूनच इकडे लेढे, लेडे, 'लेड्-मंडल' अशी निंदाव्यंजक विशेषणे निर्माण झालेली दिसतात.

सिंधूच्या परिसरात अलेक्झांडरचे पूर्वी मगांची राज्ये असावीत ह्याविषयीचा अप्रत्यक्ष आधार मेगॅस्थेनीसच्या लेखनांतून प्राप्त होतो. सिंधूच्या परि-सरातील टोळचांची यादी देताना मेगॅस्थेनीसने सेसी, कीअॅट्रीवाणी, व मग्गालीस अशी नावे दिलेली आहेत.[३३] लॅसनने तळटीपेत सेसी म्हणजे खाशीया वा कच्छी असे दिलेले आहे. पण सेसी बहुधा शुशान असावेत. मग्गालीस मगांच्या टोळचांचा बोध करून देतात. सिंधूच्या परिसरात ब्राह्मणाची जी राज्ये होती ती मगांची राज्ये असावीत हे लक्षात घेण्यासाठी मेगॅ-स्थेनीसचे विधान काळजीपूर्वक तपासावे लागते. मग्गालीस ही ग्रीक भाषेत नमूद केलेली टोळी 'मग', आणि 'अरिस', ह्यांच्या संपर्कातून निर्माण झालेली आहे. अरट्टांच्या टोळचा पंजाबात वास्तव्य करून होत्या हे बौधायन श्रौतसूत्राच्या आधाराने मागे नमूद करण्यात आलेले आहे. मग्गालीस ह्या टोळचांत मग्गारठींचा बोध व्हावा. महाराष्ट्रीचे ग्रीक रूप म्हणून 'मग्गालीस' ह्या शब्दाचा विचार करता येतो.

इराणी संस्कृतीने व इराणी राजसत्तेने भारतीय संस्कृती आणि पश्चिम भारताचे सिंहासन विभूषित केले हे समजण्यासाठी इराणच्या स्वारीचा इतिहास सांगावा लागला. इराणच्या स्वारीचा परिणाम म्हणून शतकानुशतके इराणी साम्राज्य भारतावर टिकून राहावे ह्यात अशक्य वाटण्यासारखे काहीच नाही. राजपूतांच्या व मराठचांच्या सत्तेला नामशेष करून मोंगलांचा वंश आणि मोंगलांची संस्कृती गेली चारशे वर्षे भारतात रुजून बसली. आणि दीड दोनशे वर्षांचे कालखंडात भारतात इंग्रजी संस्कृती, इंग्रजी भाषा, इंग्रजी राज्य आणि धर्म वेगाने पसरला हे लक्षात घेतले म्हणजे भारतात जे जे पेरले ते, ते जोमाने उगवते हे लक्षात येईल.

हलिस नदीच्या किनाऱ्यावरून आलेल्या हलिक सरदारांची राज्ये प्रथम भारताच्या वायव्य सरहद्दीवर व तदनंतर भारतात प्रस्थापित झालेली असावीत. हेलियस वा हेलियोदोरस अशा सरंजामी सरदारांची राज्ये भारतीय इतिहासाला इंडोग्रीकांचे कालखंडात परिचयाची आहेत. हेलियोदोरस हा तर भागवत असून बेसनगरच्या गरुडध्वज स्तंभ लेखात योनराजाचा दूत म्हणून त्याचा निर्देश आहे. इंडोग्रीकांचे कालखंडात हलिकांनी भारतावर आपले प्रभुत्व प्रस्थापित केलेले दिसते. प्राचीन काळी हे दौत्यकर्म बहुधा ब्राह्मण वर्णा-कडे असे त्यावरून हलियोदोर हा ब्राह्मण असावा. हलिस नदी मीड नावाच्या प्रदेशाची पश्चिम सरहद्द असून ह्या नदीपलीकडे लिडिया नावाच्या प्रांताची सीमा प्रारंभित होत होती. हेलियोडोरस हा बहुधा हेलिओदार ह्या शब्दाचे ग्रीक रूपांतर असावे. परशियन भाषेत दार शब्दाचा अर्थ मालक असा होतो. दार ह्याचा अर्थ प्रवेश असाही होतो. दार पासूनच पुढे संस्कृतात द्वार असा उच्चार करण्यात आला. हे देखील शक्य आहे की 'वर' ह्या डोंगरी नगराला ज्या बाजूने पायवाट असेल त्या पायवाटेचे रक्षण व्हावे म्हणून तेथे प्रवेशद्वार बांधून काढण्यात येत असावे. अशा रीतीने

---

३२. प्राचीन महाराष्ट्र, प्रकरण २८ वे.

३३. Macrindle. Ancient India described by Megasthenis and Arrian, पान १४५.

वर नगराचे जे दार ते द्वार असा शब्दप्रयोग संस्कृतात रूढ झाला. दार ह्या शब्दाची रूपे दर्शविणारे, दर, दारा, घार, घारा, असे अनेक शब्द प्रचारात आहेत. इंद्र, शूद्र, शुद्र, मद्र, ह्यातील 'द्र' शब्द पाझरणे ह्या अर्थाने वापरण्यात आला असून तो वास्तविक 'पर्वतातून वाट फोडणे' ह्या अर्थाने घेणे अधिक योग्य होईल. कारण 'द्र' हा शब्द संस्कृत बोलीत रूढ होण्याचे अगोदरच, तो 'दर् दर्रा' अशा अवस्थेत असावा. पर्वतातील वा डोंगरातील वाटांना दर्‍रा शब्द वापरतात. त्यातूनच पुढे 'डेरा' हा शब्द निर्माण झाला. पर्वतातून फुटणाऱ्या वाटांवर जी प्रवेशद्वारे वा वाटा रोखण्यासाठी ज्या छावण्या असत त्या वाटा रोखणाऱ्या अधिकाऱ्यास दार असे म्हणत. दर्‍याचा जो मालक तो दार--शहाचा जो मालक तो शहरदार; दाराची रखेली ती दारा किंवा दारी; हेलियोदार हा एखाद्या पर्वतीय प्रदेशाचा अधिकारी असावा. दारयवाहू हा देखील दारवाहू ह्या अर्थाने अधिक सुस्पष्ट होऊ शकेल. हेलियोदार वा हेलियस ह्या नावाचे स्मरण ठेवणारी हलधर नावाची कुळे पंजावात आहेत. त्यांचा संबंध बलरामाशी लावण्यापेक्षा हलिकांशी लावणे अधिक योग्य होईल. (क्षह्य ह्या अवेस्थन शब्दापासून शहर हा परशियन शब्द निर्माण झालेला असावा.)

हेलियोदार, वा हेलियस, आणि हलिस नदी ह्यांचा संबंध महाराष्ट्रापर्यंत येऊन पोचतो. हेलियस ह्या नावाशी साम्य दाखविणाऱ्या सातवाहन नृपतीचे हाल हे नाव महाराष्ट्राच्या इतिहासात अतिशय प्रसिद्ध आहे. हालाने संपादित केलेला गाथासप्तशती हा महाराष्ट्री प्राकृतातील एक ग्रंथ देखील उपलब्ध असून, त्यात हलिक शब्द अठरा वेळ अवतीर्ण झालेला आहे. महाराष्ट्री प्राकृतात त्याचे रूप 'हलिअ' असे असून ते 'हेलिय' ह्या शब्दाचे रूप असावे. गाथासप्तशतीतील हलिकांना श्री. स. आ. जोगळेकरांनी नांगऱ्या व शेतकरी अशा अर्थाने संबोधिलेले आहे.[३४] हलिक शब्दाचा अर्थ नीट तपासून न पाहिल्यामुळे ती त्यांची चूक झालेली आहे. पण श्री. जोगळेकरांचे एकूण संशोधन मौलिक आहे. हाल हे राजाचे नाव देखील हलिकांपासून निर्माण झाले असावे. गाथेतील हलिकपुत्रांविषयी जी अवतरणे आलेली आहेत तो 'हलिकपुत्र' म्हणजेच हाल असावा की काय हे सांगता येत नाही. पण हलिकपुत्रांविषयी, गृहपतींच्या लेकीसुनांत फारच आकर्षण दिसून येते. हलिकपुत्रांविषयी त्या वेड्या झालेल्या आहेत. त्यांच्या स्पर्शसुखासाठी त्या उत्सुक आहेत. हलिकांच्या स्नुषा देखिल कर्पूरकांती गौरवर्णी आहेत (गाथा क्रमांक ३१७). जाणारे येणारे 'हलिक कन्यांकडे' अनिमिष नेत्रांनी बघतात (गाथा ३८८). महार हेच प्राचीन काळी हलिक असावे असे डॉ. केतकर म्हणतात.[३५] केतकरांचे हे विधान बरोबर आहे वा नाही हे सांगता येणार नाही. आमच्या मते हलिकांपासून महार निर्माण झालेत असे म्हणण्यापेक्षा हलिकांविषयी कमालीचे आकर्षण असणाऱ्या गृहपतींच्या कन्या व स्नुषा-ह्यांच्या विप्रलब्धशृंगाराविषयी गाथांमधून जी वर्णने आलेली आहेत किंवा परस्परांच्या प्रेमचेष्टांची जी वर्णने आहेत ती गृहपतींची कुळे मात्र महार कुळे असावीत. हाल हा सातवाहन राजा हलिक राजा असावा. सातवाहनांशी विवाह संबंध प्रस्थापित करून राज्य स्थापनेच्या कार्यात मदत करणारी; जी महारठींची कुळे निरनिराळ्या अभिलेखातून परिचित होतात; त्या अभिलेखातील महारठी वा महारठिनी मात्र महार अथवा महारणी असू शकतात.

ज्यांच्या अस्तित्वामुळे महाराष्ट्र शब्द सिद्ध होतो त्या महारठींची कुळे नाणेघाटाच्या परिसरांत उदयाला आलेली आहेत. सातकर्णी ह्या राजकुळांशी त्यांचा नातेसंबंध घडून आलेला आहे त्या अर्थी ही कुळे सरंजामी सरदारांची कुळे असावीत. ह्या महारठींमध्ये नानाघाटच्या देवकुलांत कोरलेल्या चित्रलेखांत महारठी त्रनकयिरो ह्याचे नाव आढळून येते. नाणेघाटच्या गुंफा लेखांत अंगियकुलवर्धन अशा प्रथमवीराचा महारठीचा परिचय मिळतो. कार्ले येथील गुंफा लेखात महारठी कोसिकांचा निर्देश आहे. महारठींचे व महाभोयांचे विवाहसंबंध प्रस्थापित झालेले आहेत, ह्यापेक्षा अधिक माहिती शिलालेखातून प्राप्त होत नाही.[३६] गाथा सप्तशतींत महारठींचा निर्देश नाही. कारण गाथासप्तशतीचा परिसर समुद्र किनाऱ्या-

---

३४. स. आ. जोगळेकर, गाथा सप्तशती, १९५६, पान २००-३००.

३५. प्राचीन महाराष्ट्र.

३६. डॉ. वासुदेव उपाध्याय, प्राचीन भारतीय अभिलेखोंका अध्ययन, पान २९-३४.

पासून दूर असावा आणि महारठींचे कार्यक्षेत्र नाणेघाटाच्या शेजारी म्हणजे समुद्र किनाऱ्यापासून नजीक आहे. महारठींची कुळे आरंभीच्या कालखंडात सह्याद्रीचे आसपास नांदत असल्यामुळे सातवाहन राज्याच्या प्रस्थापनेपासून जवळ जवळ दीडदोनशे वर्षानंतर हालाची कारकीर्द उदयाला आलेली असून त्या कालखंडात महारठींचे राजकारणातून उच्चाटन झाले असावे वा ही कुळे वाळीत टाकली गेली असावीत. महारठींची कुळे वाळींत का टाकली गेलीत त्याचे सुस्पष्ट कारण देता येत नाही.

'महारठींचे' नीट ज्ञान करून घ्यावयाचे झाल्यास नाणेघाटातील नागनिकेचा विचार करणे आवश्यक आहे. नाणेघाटाच्या शिलालेखातील यज्ञाचे जे वर्णन आलेले आहे ते नागनिकेने केलेल्या यज्ञाचे वर्णन आहे व ही नागनिका महारठीची मुलगी असून ती प्रथमवीर अशा अंगिरस गोत्रातील कुळात जन्माला आलेली असावी. शिलालेखातून मात्र निश्चितपणे असा कोणताच पुरावा मिळत नाही ही गोष्ट वेगळी. पण सातवाहनाच्या इतिहासाची आरंभाची पृष्ठे लिहिण्यासाठी इतिहासकारांनी महारठी त्रनकयिरोची कन्या नागनिका असून ती प्रथम सातकर्णीची भार्या होती असे मत मान्य केलेले आहे व तेच सर्वत्र गिरविले गेलेले आहे.

नाणेघाटातील नागनिका ही जर नागनिका असेल तर ती नग्निका म्हणून स्वीकारावी लागते. जैनधर्माच्या दिगांबरीपंथात अशी नग्नता मान्य आहे. पण नागनिका ज्या अर्थी यज्ञकार्यात रत झाल्याचे वर्णन व ह्या यज्ञाचे प्रसंगी तिच्या दानाचे वर्णन नाणेघाटाच्या अभिलेखात कोरलेले आहे त्याअर्थी ती जैनधर्मीय नसावी. कौमार्य अवस्थेलाच नग्निकेची अवस्था म्हटलेली असून,[३७] नग्निका ज्यावेळी विवाहित होते त्यावेळी ती पत्नी बनते. नग्निकेला वरापाशी नेण्याची प्रक्रिया हेच लग्न होय. पण जी आजीव कौमार्यावस्थेत असते ती सदोदित नग्निका असते. धर्मशास्त्राला स्त्रियांचे बाबतीत असे ब्रह्मचर्य मान्य नाही. म्हणून नग्निका ही वेदकाळातील अपाला, घोषा किंवा उपनिषदातील मैत्रेयीप्रमाणे वा आश्रमातील तापसीप्रमाणे ब्रह्मचारिणी नसून ती धर्मशास्त्राला अभिप्रेत नसलेली नग्निका आहे.– पुत्रप्राप्तीनंतर स्त्री नग्निका नसते. पण नाणेघाटातील नग्निका मात्र पुत्रवती आहे.

इराणच्या आक्रमणाबरोबर ज्या वेगवेगळ्या प्रथा भारतात प्रविष्ट झाल्या त्या प्रथेत देवदासींची प्रथाही दक्षिणेत रूढ झाली. ह्या प्रथेचे वेगवेगळे रंग बॅबिलोनिया व सीरिया इत्यादी प्रदेशांत प्राचीन काळापासून प्रचलित होते. मराठ्यांच्या कुळात अजूनही खंडोबाची पूजा होत असून त्याचेसाठी मुरळी सोडण्यात येते. दसऱ्याचे दिवशी खंडोबा व एकवीरांची पूजा पश्चिम महाराष्ट्रात मराठे कुळात सर्वत्र होत असते. आज सर्वत्र पूजिला जाणारा 'एकवीर' हाच बहुधा नाणेघाटातील प्रथमवीर असावा. नाणेघाटातील प्रथमवीर महारठी हे धार्मिक विशेषण असावे. आणि ह्या महारठीने देवकुलांसाठी नागनिकेला अर्पण केली असावी. अशा मंदिरवालांचा तत्कालीन समाजात आदर केला जात असे. Hutton म्हणतो की 'No Social stigma attaches to her but perhaps rather the contrary, for her presence at weddings is auspicious, probably because she cannot become a widow.[38] पुढे Hutton ह्यांनी असे लिहिले आहे की, 'It is hardly necessary to point out that devadasi is likewise married to god but may have children by men'[39]) देवदासींचा वा बसवींचा विवाह देवाशी करण्याची प्रथा मेसोपोटेमियामधून आलेली असावी. ती देखील परशियन आक्रमणाबरोबरच भारतात रूढ झाली. विशेषत: महाराष्ट्रातून ती मलबारच्या किनाऱ्याने थेट गिरीच्या व्यंकटेश्वरापाशी जाऊन स्थिर झाली. मेसोपोटेमियात सूर्य देवतेला अशा बसवी वा देवदासी अर्पण करीत असत. भविष्यपुराणात पुढे हीच प्रथा नमूद केलेली आहे.

वेश्याकदंबकं यस्तु दद्यात्सूर्याय भक्तितः ।
स गच्छेत् परमं स्थानं यत्र तिष्ठति भानुमान् ।।
१–९३–६७.

37. Altekar A. S, Position of Women Hindu Civilization तळटीप. पान ५१–५३.

38. Caste in India, p. 162.
39. Caste in India, p. 165.

सूर्यमंदिरासाठी देवदासींना अर्पण करणे हे पुण्यकर्म समजण्याची परंपरा इराणमार्गे भारतात विशेषत: महाराष्ट्रात रूढ झाली. कारण दक्षिणेकडे देवदासीच्या प्रथेचा प्रारंभ असून तिचे उत्तरेकडे मिळणारे उल्लेख मध्ययुगीन आहेत.——

सप्तशृंगी नावाच्या देवतेचे पुजारी आजही बायांचा पोशाख करून भिक्षा मागतात ह्या प्रथेचे मूळ देखील मुरळी अर्पण करण्याच्या प्रक्रियेत असावे. तात्पर्य, महारठींच्या कुळात देवकुलांना एखादी मुरळी अर्पण करण्याची प्रक्रिया असावी. व ह्या देवकुळांचे पुजारीपण प्रथमवीराकडे असावे. नाणेघाटातील नागनिकेचा अभिलेख हा देवकुळात कोरलेला अभिलेख आहे आणि ही देवकुलांची प्रथा देखील भारतीय नाही. भारतात ती कुशाणांनी रूढ केलेली असली तरी पितरपूजेच्या निमित्ताने बांधलेली ही देवकुळे बहुधा मींड वा परशियन प्रभावाखाली कुशाणांनी भारतात प्रचलित केली पण परशियनांनी मात्र ही प्रथा भारतात कुशाणांचे अगोदरच रूढ केलेली असावी. नाणेघाटातील देवकुळे इराणातून भारतात अलेली असावीत आणि सातवाहनांच्या अभिलेखातील 'देवपुतस' हे विशेषण देखील ह्या देवकुळांबरोबरच भारतात आले असावे. 'Indians do not rear monuments to the dead', असे एरियन म्हणतो.

खंडोबाच्या पूजनाचा व देवकुळाचा अप्रत्यक्ष संबंध प्रस्थापित करता येणे शक्य आहे. भारतीय परंपरेत श्वानाला फारसे महत्वाचे स्थान नसून त्याला अपवित्र समजण्यात येते. पण परशियन परंपरेत श्वान हा पितृयानाचा रक्षक म्हणून समजला जातो. देवकुळे ही पितरकुळे असल्यामुळे ह्या पितरलोकांचा रक्षक म्हणून खंडोबा वा कुत्रा हे दैवत महाराष्ट्रात पूज्य झाले आहे. नाणेघाटाच्या अभिलेखात सरकार ह्यांनी— 'खडश्री' असे वाचन केलेले आहे.[40] पण त्या ऐवजी काही इतिहासकारांनी वेदिश्री असे वाचन केलेले आहे. सरकारचे वाचन बरोबर असावे व त्या नावात खंडोबाचा बोध व्हावा खंड ह्या नावाने महाराष्ट्रील काही वीर व स्थळे प्रसिद्ध आहेत. खानदेश, खंडोजी, खंडोवल्लाळ, खंडाळा वगैरे. दसऱ्याचे दिवशी खंडोबाचे पूजन होते.

40. Selected inscriptions Sircar. P. 187

पुळुमावीच्या नासिकच्या गुंफा लेखात गोतमीपुत्रांचे नाव आलेले असून त्याच लेखात 'एक ब्राह्मण' असे विरुद धारण केलेल्या नृपतीचे नाव आढळून येते. ह्या एक ब्राह्मणाने क्षत्रियांचा मानदर्प उतरवून ठेवलेला आहे. तसेच शक, यवन, पल्हव ह्या सत्तेचे निसंतान केलेले आहे. (खतिय-दप; मान-मदनस; शक-यवन; पल्हव-निसूदनस,) खरातांच्या वंशाचा नि:पात केला. (खखरातवस निरवसेस करत). गौतमीपुत्राच्या कारकीर्दीनंतरच खरातांचा कुळाचे राजसिंहासन हिसकावून घेण्यात आले. त्यांचा निर्वंश व्हावा ह्यासाठीच महारथी व सातवाहन घराण्यातील कन्यांचे पाणिग्रहण नाकारण्यात आले. ही कुळे अशा रीतीने बहिष्कृत ठरली गेली. त्यापैकी काही महार कुळे म्हणून पश्चिम महाराष्ट्रात आजही जगत आहेत. ज्या कुळांवर अशा तऱ्हेचा राजकोप झालेला नाही ती कुळे 'थोरातांची कुळे' म्हणून मराठी कुळात अंतर्भूत झालीत. 'खरातवस निरवसेस करत' ह्याचा अर्थ खरातांच्या कुळांना आश्रयहीन केले असा देखील होऊ शकतो.

गौतमी पुत्राचे गौतम कुळ हे मगांचे कुळ आहे. म्हणूनच गौतमीपुत्र स्वत:ला 'एक ब्राह्मण' म्हणवितो. एकवीरा प्रमाणेच 'एक ब्राह्मण' हे विशेषण विशिष्ट धार्मिक पंथाचे गमक असावे. गौतमाचे पुत्र म्हणून एकत, द्वित व त्रैत प्रसिद्ध आहेत. गौतमाच्या पोटकुळात एकत, द्वित व त्रैत ह्यांचा अंतर्भाव होत असावा. दारयवाहूच्या बेहिस्थानच्या अभिलेखात गौतमाचे कुळ मग ब्राह्मणाचे कुळ म्हणून निर्देशिलेले आहे. गौतमी ही देखील मग कुलोत्पन्ना असावी. नाणेघाटाचे नजीक गोवर्धन ह्या ग्रामी मग ब्राह्मणांचीच वस्ती होती, असा आधार पुळुमावीच्या नासिक गुंफा अभिलेखातून प्राप्त होतो. 'एथ गोवधन म्हारे दखिण मगे गामो' किंवा 'एथ गोवधन पुव मगे गाम समलिपद ददाम' ह्यांत गोवर्धन हे मग ग्राम आहे हे सिद्ध होते. महाराष्ट्रात मगांचे महारठींच्या कन्यकांबरोबर विवाह संपन्न होऊन त्या विवाहाची संतती म्हणून सातकर्णीचे कुळ जन्माला आलेले आहे. ज्या कन्यकांना देवतेसाठी मुरळी म्हणून वाहिल्या अशा कन्यकांपासून मग ब्राह्मणांना जी अपत्ये झाली ती कानीन संतती म्हणून सातकर्णी ह्या नावाने गादीवर बसली. सातवाहन व सातकर्णी ह्यांत असा भेद लक्षात घेणे आवश्यक आहे. सातकर्णींचा इतिहास हा कानीन संततीचा इतिहास आहे.

हे कानिनांचे कूळ स्वतःचे पितृकत्व औरस नसल्यामुळे स्वतःला 'देवपुतस', वा 'मितदेवसपुत' म्हणजेच सूर्यपुत्र म्हणवून घेतात. सूर्यपुत्र म्हणजेच मग पुजाऱ्यांचे पुत्र असा अर्थ घेणे अधिक योग्य होईल. सूर्यापासून कर्णाचा जन्म झाल्यानंतरही कुंतीचे कौमार्य अबाधित राहिले तसेच सातकर्णीला जन्म देऊनही नाणेघाटातील अभिलेखातील नायिका नग्निकाच राहिली.

सातकर्णीचे कुळाचा इतिहास हा मग ब्राह्मण कुळाचा इतिहास असावा. मग ब्राह्मणांचे विवाहसंबंध ज्या भोजकुळांशी झालेले आहेत ती भोजांची कुळे सातवाहनांचे काळात विदर्भात असून भोईंचा परिचय 'गाथासप्तशतीतून' देखील होतो.[४१] शिलालेखांत महाभोईंचा आणि महारठींचा विवाहसंबंध नमूद झालेला असून सातकर्णीचा व महारठींचाही नातेसंबंध शिलालेखांतून ज्ञात होतो. भोजक, रठी व सातकर्णी ह्यांचे संबंध परस्परांत गुंतले आहेत. एवढेच नव्हे तर भोईंची वा भोजांची कुळे महारठांच्या कुळांत सामील होऊन स्वतःचे वेगळे अस्तित्व गमावून बसलेली दिसतात. भविष्यपुराणात ज्या भोजकांचा परिचय आलेला आहे ती भोजकांची कुळे मग ब्राह्मण व विदर्भातील भोज ह्यांची अपत्ये होत. भविष्यपुराणातील ब्राह्मपर्वाच्या अध्यायात 'मग ब्राह्मण अग्नी कुलोत्पन्न असून सोमजातीचे ब्राह्मण द्विजातीय आहेत व सूर्यवंशी भोजक आहेत' अशी माहिती उपलब्ध होते. डॉ. आंबेडकरांचे गोत्र सोमस असून त्यांची जात महार आहे व स्वतःला सूर्यवंशी समजतात अशी काही कुळे मराठे आहेत. ज्या महारठींचे गोत्र अंगिरस आहे ते अंगिरस गोत्र ब्राह्मण जातीत देखील आढळते. म्हणजे महाराष्ट्रातील अंगिरस कुलोत्पन्न ब्राह्मण, सोमस वंशी महार व सूर्यवंशी मराठे ही सारी एकाच वंशाची लेकरे आहेत. व त्या साऱ्यांच्या आगमनाची दिशा इराणकडे आहे.

मगांनी भोजकन्यांशी विवाह केल्यानंतर जी संतती जन्माला आली तिला भोजक असे म्हटले गेले आणि हे भोजक पितृकुलाच्या जातीने ब्राह्मण ठरलेत.

तत्र ते भोजकन्यासु द्विजैः उत्पादिताः सुताः ।
भोजकास्तान् गणान् आहुः ब्राह्मणान् दिव्यसंज्ञितान्*॥

मगांची भोजांची संतती ती भोजक व मगांची रठ्ठांची जी संतती ती मगरठ्ठ, असे संबंध लक्षात येतात. मगरठ्ठांचे रूप पुढे महारठ्ठ झाले असावे. मग आणि भोजांच्या संबंधातून महाभोई झालेत.

मग पुरोहितांना नागनिकेसारख्या गौतमी वा वाशिष्ठीसारख्या देवदासी अर्पण केल्या गेल्या असतात्यात—

शाकद्वीपं मया गत्वा आनीता मगपुंगवाः ।
बालाः यौवनसंपन्नाः संनिविष्टा मगोत्तमाः ।
सत्कृत्य पूजयित्वा तु पुरं तेषां समर्पितम्* ॥

गोवर्धनासारखी शहरे मगांना दान दिल्यामुळे ती मग-ग्रामे, म्हणून शिलालेखात उल्लेखित आहेत त्याचे कारण मगांविषयीची आदरवृद्धी व आकर्षण असावे.–

मग ब्राह्मण मीड नावाच्या प्रदेशांचे रहिवाशी असून हा प्रदेश इराणच्या उत्तरेला व हलिक नदीच्या पूर्वेस वसलेला असून परशियन समाज व परशियन दरबार ह्यांत मग ब्राह्मणांचे वर्चस्व होते. इराणी आक्रमणानंतर रथेष्टांचे पौरोहित्य स्वीकारण्यास मगांच्या टोळ्या भारतात आल्यात. सातकर्णीच्या दरबारात स्त्रियांचे वर्चस्व वा राजमातांचे जे वर्चस्व दिसून येते त्याचा परिचय थेट शिवाजीच्या काळापर्यंत दिसून येतो. दारियसच्या कालखंडात देखिल परशियन दरबारात राजमातांचे वर्चस्व होते.

'Uncertainty of succession is an inseperable consequence of a Harem administration...the power of the queen mother became still more considerable among the Persians than among the Turks.......Affairs of public importance are discussed in the interior......under the influence of the queen mother; the favourite wife and enuchs[42] सातकर्णीच्या कुळातील नग्निकेचे तसेच गौतमीचे, वाशिष्ठीचे वर्चस्व जर लक्षात घेतले तर मातांच्या

---

४१. स. अ. जोगळेकर–गाथासप्तशती, पान २८१–२८२.

* हे श्लोक प्राचीन महाराष्ट्र ह्या ग्रंथातून उतरवून घेतलेले आहेत. पान १९८.

42. The Historious Hithory of the world, 643. Vol I.

प्रभावाचे हे लोण परशियातून महाराष्ट्रात झिरपले. पण शिवाजीने धारण केलेला 'छत्रपती' हा किताब, मात्र त्याच्या राज्यावरील मोगलांचा प्रभाव सुचवीत नसून क्षत्रपांच्या परंपरेचा प्रभाव दर्शवितो. छत्रपती, हे 'बरुद 'क्षत्रप' आणि 'पतेसी' अशा दोन अधिकार-पदातून निर्माण झालेले असून, 'पैती' हे विशेषण पुरातन परशियात प्रसिद्ध आहे.— शिवाजी हे नाव जरी हिंदुधर्माला परिचितसे आहे तरी शहाजी, मालोजी ही नावे इराणी आहेत. शिवाजीच्या राज्याभिषेकाचे वेळी शिवाजीचे कूळ शूद्र म्हणून त्याला राज्याभिषेक करण्याचे महाराष्ट्रातील ब्राह्मणांनी नाकारले ह्याचे कारण त्या काळच्या ब्राह्मणांना शिवाजीच्या कुळाचे इराणीकुलोत्पन्नत्व ज्ञात असावे. त्या दृष्टीने शिवाजीच्या कुळाला शूद्र म्हणून संबोधण्यात आले. भोज आणि मग ह्यांची संतती भोजक ब्राह्मण म्हणून स्वीकृत झाली तद्वतच मग आणि दासकन्या ह्यांची संतती 'शूद्र मग' म्हणून संबोधिली गेली. मग व दास ही दोनही कुळे इराणी असल्यामुळे त्यांना शूद्र म्हणून संबोधिले गेले असे दिसते. शूद्र हा शब्द इराणी प्रभावाने प्रेरित झालेला असल्याची शक्यता मागे वर्तविलेली आहे— मग व रठ्ठ ह्यांच्या संपर्कातून निर्माण झालेले मगरट्ठे ह्याच संदर्भातून शूद्र म्हणून गणल्या गेले. पुराणात सिमुकाला कुठे शूद्रक असेही म्हटले आहे.

कॅ. सरदेसाई ह्यांनी भोसल्यांचा संबंध राजपुतांशी दाखविला हे इतिहासाला सर्वस्वी अमान्य आहे. खरे म्हणजे मध्ययुगातील राठोड चौहानांची कुळे महाराष्ट्रातून 'राष्ट्रकुटां'बरोबर उत्तरेला गेलीत व राजपुत कुळे झालीत. राठी, राठोड ह्यांचा शोध महाराष्ट्राचे भूमीवरच घ्यावा लागतो. भोसले ह्या नावाची उपपत्तीच शोधायची झाली तर भोई आणि 'साली' वा 'साल' ह्या सातवाहन कुळाच्या संपर्कातून 'भोइसळे' व पुढे भोसले हे नाव सिद्ध होऊ शकते.— गाथासप्तशतीत 'सालाहन' असेही नाव आलेले आहे. ते हालाचे नाव आहे[४३] छत्रसाल बुंदेला ह्यातील 'साल' ह्या कुळनामाचा संबंध 'सालाहन' वा 'शालीवाहन' कुळाबरोबर लावता येतो. भोसले हे मुळात भोज ह्या राजघराण्यातून सालांच्या संपर्कातून 'भाईसळे' व पुढे 'भोसले' असे निर्माण झालेले दिसतात. चव्हाणांच्या कर्तृत्वाला अजमेर, दिल्लीकडे विशेष कर्तृत्व आलेले असले तरी मुळात त्यांचा शोध नर्मदेच्या उत्तरेला घ्यावा लागतो. महाराष्ट्रात सातवाहनांचे कुळ हे सूर्यवंशी कुळ आहे. सात ह्याचा अर्थ सूर्य असा होतो. सात हा अक सूर्याशी निगडित आहे. सात पासूनच पुढे 'साताच्या अनुरोधाने प्रवास करणारे सार्थ,' सार्थी, सातिक, स्वास्तिक, साहानी अशी नामे उपलब्ध होतात. सातकर्णीचे सूर्य कुळ आज देखील महाराष्ट्रात सूर्यवंशी मराठे म्हणून अस्तित्वात आहे. सातवाहनाप्रमाणेच 'चंदवहन' ह्या चंद्रपूजकांपासून चव्हाणांचे कुळ निर्माण झाले. चव्हाण चंद्रवंशी आहेत. चौहाण वा चव्हाण ह्यांची नावे मराठी कुळांत आढळतात. तरी मुळात ते वाळवंटी प्रदेशातून वा राजस्थानच्या परिसरातून महाराष्ट्रात आलेत व मराठी संस्कृतीशी एकरूप होऊन मराठे बनलेत. ही प्रक्रिया १२ व्या शतकाचे दरम्यान प्रारंभित झाली असावी. महाराष्ट्रातील गुजर गुर्जर वंशाचे असून गुर्जर प्रतिहारांचे आमदानीत राष्ट्रकूटांचे सरदार म्हणून महाराष्ट्रात आले असावेत व मराठी कुळांत समाविष्ट झालेत. गुर्जरांचे कुळ श्वेत हूणांचे कुळ असून त्यांची राज्ये गुजराथ काठेवाडच्या प्रदेशात नांदत होती. वलभीत नांदणाऱ्या मिथ्र कुळांचा त्यांनी पराभव केला असावा. वलभीचे मैत्रक मिथ्रवंशाचे असून इराणी आक्रमणापासून ते कुळ तेथे नांदत असावे. गुर्जर व रठ्ठ ह्यांच्या संपर्कातून गुजराथी बोली व गुजराथी समाज निर्माण झाला. गुजराथी बोलीत व मराठी बोलीत साम्य दिसते ह्याचे कारण ती बोली मुळात महारठींची बोली असून, 'रावो नाणो कुसानो' अशा अर्थाची बिरुदे धारण करणाऱ्या कुशांनी वा गुजरी भाषेमुळे मराठीचा पोत गुजराथेत बदलला. कुशाणांच्या नाण्यांवरील बिरुदावलीत गुजराथीचा फारच निकट संबंध दिसतो असे आढळून येते. अहिरराव व गायकवाड ही दोनही कुळे आभीरांची कुळे असावी. अहिररावातील 'राव' कुशानवंशाचा प्रभाव दर्शविते. गायकवार मधील 'वार' इराणी प्रभाव दर्शविते. मराठ्यांतील राव घराणे हे उत्तरेकडून आलेले आहे. राव स्वत:ला मराठे म्हणवीत असलेत तरी गुर्जराप्रमाणे ते देखील कुशाण असावेत. राव कुळी मराठे सातकुळी मराठ्यांच्या तुलनेत बहुधा अधिक काळे-सावळे असतात.

४३. गाथसप्तशती, स. आ. जोगळेकर, पान ३२५

मराठ्यांत सातकुळी मराठे व रावकुळी मराठे अशी दोन घराणी आहेत. सातकुळी मराठे सिंह हे विशेषण लावून घेतात. स्वतःला सातकुळी मराठे म्हणवून घेणारी सारीच कुळे 'सातकुळां'ची औरस अपत्ये आहेत असे म्हणता येत नाही. सात ह्या शब्दाचा अर्थ देखील विसरला गेला आहे. त्यात मराठ्यांची निरनिराळी सातकुळे शिवाजीच्या काळात मानाचा किताब देण्यासाठी निवडली गेली अशी माहिती मराठे घराण्यातील काही वृद्ध आज सांगतात. पण सातकुळी मराठ्यांत जी सातकुळे अंतर्भूत झालेली आहेत ती पेशवेकाळात अंतर्भूत झालेली असून, कदाचित ती छत्रपतींच्या काळातच पराक्रमाच्या वा पौरुषत्वाच्या बळावर श्रेष्ठ गणली गेलेली असावीत. पण मुळात 'सात' हे कुळनाम सातवाहनांच्या घराण्याशी निगडित करणे योग्य ठरेल. परंपरांची विस्मृती झाल्यामुळे सात ह्या कुलनामाचा इतिहास विसरला गेला आणि सात हा शब्द स्मरणात राहिला. ह्या शब्दाच्या अनुरोधाने नवी परंपरा निर्माण करण्याचा प्रयत्न झाला. शिवछत्रपतींच्या काळात मोंगलांचे आक्रमण रोखून धरण्याचे कार्यात ज्यांनी शौर्य गाजविले त्या मराठी म्हणून गणल्या गेलेल्या कुळांना 'सातकुळी' मराठे म्हणून समजण्यात आले. शिवाजी, शहाजीचे अगोदर मराठ्यांचा इतिहास ज्ञात नाही. जिजाबाईंच्या जाधव घराण्याची परंपरा जशी यादवांपासून देता येईल आणि ते चंद्रवंशी यदूंचे कूळ होते हे सांगता येण्यास इतिहासात भरपूर आधार आहेत तसा आधार छत्रपतींच्या कुळाच्या इतिहासाला देता येत नाही. छत्रपतींची परंपरा शिशोदियाच्या राजपूत वंशापासून सिद्ध करण्याचा प्रयत्न तत्कालीन राजकारणातून झालेला असून, मोरोपंत पिंगळे ब्राह्मण तसेच निंबाळकर, सावंत, घोरपडे, मोहिते ही महाराष्ट्रातील सरदार घराणी देखील महाराजांच्या श्रेष्ठत्वाला आव्हान देत होती. 'At State dinners they resented that a Bhosale should sit on a seat raised above those assigned to Mohites and Nimbalkars, Savant and Ghorpades[44].'

44. History of Maharastra, p. 244. Kinkaid. Quoted from Ambedkar, 'who were shudras,' p. 203-204.

ज्यांना अस्सल सातकुळी मराठे म्हणता येईल अशी मराठी कुळी कोणती ते सांगता येणार नाही. सातवाहनांची म्हणून जी दानपत्रे उपलब्ध आहेत त्यांपैकी सातकर्णीच्या वंशाला ज्या नग्निकेने जन्माला घातले आहे ती नग्निका अंगिरस गोत्रातील होती व अंगिरसांची सप्तगु, नवाग्व आणि दशाग्व अशी तीन पोट गोत्रे आहेत. नाणेघाटातील देवकुळात कोरलेल्या अभिलेखातील महारठींची कुळे सप्तगु अंगिरस कुळे असावी म्हणून तो स्वतःला सात, सातकणी, सातवाहन, अशी कुळनामे लावून घेतात. सातवाहन हे नाम सातकणीपेक्षा पुरातन आहे. सातवाहन ह्याचा अर्थ 'सातांना वाहून नेणारा' म्हणजे सूर्यवंशी असा होतो. तसाच तो 'सप्तगु' वंशाचा भार वाहून नेणारा असाही होऊ शकतो. सिमुक हा सातवाहन म्हणून ज्ञात आहे. पण सातकर्णीची कुळे मात्र अंगिरसगोत्रोत्पन्न नग्निकेपासूनच ज्ञात होतात. सातकुळी मराठी घराण्याचा संबंध अशा रीतीने सातकर्णीशी वा सातवाहनांशी लावता येणे शक्य आहे. महारठींच्या अंगिरस गोत्रांपैकी नवाग्वांपासून नावकुळी मराठे निर्माण झाले असण्याची शक्यता आहे. सात व नव कुळी अशा दोन कुळांच्या एकत्रीकरणातून 'छान्नव' असे कुळनाम निर्माण झालेले दिसते. छान्नव, हा बहुधा 'सातनवांचा' अपभ्रंश असावा.

पवारांचे मराठे कुळ परमार कुळातून निर्माण झालेले आहे. अस्सल मराठी कुळ म्हणून पवारांचे नाव देता येईल. कारण परमार, परमार्थ ह्या नावाचा संबंध थेट सातवाहन काळात शोधता येतो. सातवाहनांचे काळात 'आहार' हा राज्यकारभाराचा घटक म्हणून समजण्यात येत असे. सातवाहनांच्या दानपत्रात 'गोवंधनाहार' असा प्रयोग आढळतो. आहाराचा जो परम त्याला परमार असे म्हटले जात असावे. परशियन भाषेत 'परधात' पुरोहितासाठी वापरतात. पवार हे मुळात आहाराचे पौरोहित्य संपादन करणारे असावेत. ज्यांनी पराक्रमाचा व्यवसाय कायम ठेवला ते पवार महारठी झालेत. पौरोहित्य कायम ठेवले ते परमार्थ झालेत. आणि ज्यांचा सामाजिक दर्जा वंचित झाला ती पवारांची कुळे महार म्हणून अस्पृश्य ठरलीत. महाडिक हे देखिल मूळ महारठींचे कुळ असावे. सुर्वे सूर्यवंशी असावेत. मोरेचा वंश कोकणातील मौर्यांपासून शोधता येतो. महत्तर ह्या इराणी शब्दाच्या संपर्कातून

मोहिते झाले असावेत; किंवा मोहिते हा गजदलाशी संबंधित असलेला किताब असावा.

आहार हे नाव का पडले असावे त्यावरून देखील महारठींच्या इराणातून झालेल्या आक्रमणाचा शोध घेता येणे शक्य होईल. आहार हा मुळात 'आगार' ह्या शब्दाचा अपभ्रंश असू शकतो. मौर्यकाळापासून तो सातवाहनांच्या कालखंडात 'आहार' आणि 'भुक्ती' असे प्रादेशिक घटक आढळून येतात. भुक्ती ह्याचा अर्थ खाणे असा आहे. विजित प्रदेशाला भुक्ती असे संबोधिले जात असावे. जेथे अग्नीची प्रस्थापना होत असावी त्या ब्राह्मण प्रमुखाच्या राजघटकाला आगार वा आहार असे म्हटले जात असावे. दशाहार म्हणून ब्राह्मणाला दान देण्याची प्रथा अजूनही अस्तित्वात आहे. दशाहार बहुधा दासांनी दिलेला आहार असावा. अगार आणि त्याला अर्पण करावी लागणारी आहुती ह्या संबंधातूनच महाराष्ट्रात आहार आणि भुक्ती असे दोन घटक निर्माण झाले. भारतातील यज्ञसंस्था मग ब्राह्मणांनी निर्माण केलेली असावी म्हणूनच मगांविषयी बुद्धाचा रोष आहे. यजुर्वेदी ब्राह्मण, मग ब्राह्मण असावेत. महाराष्ट्रातील प्रदेशांना प्राचीनकाळी आहार म्हणून संबोधिले गेले त्याचे प्रमुख कारण इराणातून मग पुजकांनी अग्नीची जी पूजा प्रस्थापित केली त्या अंगिरस गोत्रातील महारठी वा मग ब्राह्मणांच्या अगारीच्या अवतीभवतीच्या प्रदेशालाच आगर वा आहार असे नाव पडले असावे. प्रासाद आणि आहार ही दोनही संस्कृत नामे मुळात परशियन आहेत. (परस + अद = प्रासाद) = अद हा सुमेरियन शब्द असावा. आहार–आगार–आगर–अगार अशा व्युत्पत्ती देता येईल.

अस्सल मराठ्यांच्या रंगरूपाविषयी शोध घेणे अप्रस्तुत होणार नाही. मराठ्यांची कुळे इराणमधून आलेली आहेत. अंगिरसगोत्रोत्पन्न अशी ब्राह्मण घराणी बहुधा कऱ्हाडे ब्राह्मणात आढळून येतात. ती घराणी यजुर्वेदी म्हणून प्रसिद्ध आहेत. मराठे ब्राह्मण कोकणस्थात आहेत–पण त्यांचे गोत्र कपी असे आहे. ते गोत्र कपि नसून कवी असे असावे. कवी हे विशेषण अंगिरसांनाच लावलेले आढळून येते. इराणमध्ये देखील 'कयानियनांचे' कूळ राज्य करीत होते.[४५] व ते कवींचे कूळ होते. परशियन दरबाराचा विचार केला तर असे दिसून येईल की राजावरील अनिष्ट प्रभाव हटविण्यासाठी प्रार्थना करण्याचे कार्य मग पुरोहितांकडे होते. शौर्य गाजविणाऱ्या व अग्नीचे संरक्षण करणाऱ्या महारठींनी अंगिरस गोत्र कायम ठेवले, पण प्रार्थना रचणाऱ्यांना मात्र कवी हे विशेष बिरूद लावण्यात आले असावे. अंगिरस व कवी ही दोनही गोत्रे एकाच मानवीसमूहाचा निर्देश करतात.

मराठे ह्या कोकणस्थ ब्राह्मणांची कुळे जशी गोरवर्णी आहेत; तशीच मुळात अंगिरस गोत्री मराठ्यांची कुळे देखिल गोरवर्णी असावीत. मराठे कोण हे जर ठरवावयचे झाले तर गोरवर्णी, रुंद डोक्याचे, ज्यांच्या नासिका फुगीर असून नाके वाकदार आहेत, ज्यांचे साम्य पारशी कुळातील चेहऱ्या–मोहऱ्याशी वा इराणी चेहऱ्यांशी लावता येईल ती मराठी कुळे ही अस्सल असावीत. महाराष्ट्रातील मराठे म्हणून समजल्या जाणाऱ्या अनेक जातींना प्रदेशवाचक नाम जातीच्या संदर्भात लागले असले तरी महाराष्ट्र हे नाव साकार करणारी महारठींची व सातकर्णींची कुळे कशी असावीत त्याचा जर शोध घ्यावयाचा असेल तर चांद्रसेनी कायस्थ, कोकणस्थ ब्राह्मण, गोरवर्णी कऱ्हाडे ब्राह्मण, आणि गोरवर्णी मराठ्यांची कुळे ह्यांचेवर लक्ष केंद्रित करणे आवश्यक ठरेल. बाकीची कुळे ही नावाने मराठी असलीत तरी रंगरूपाने मात्र मराठी असावीत असे वाटत नाही. कित्येक शतकांच्या वर्ण–संकरात रंग रूप बदलून गेले असण्याची शक्यता नाकारली जात नाही. कित्येक महारांचे कुळातील स्त्री पुरुषांच्या केसावर सोनेरी छटा का असते? त्याची कारणे शोधून बघावी लागतील. मुळात गोरवर्णी; सोनेरी केसांची देण असणाऱ्या काही मराठी कुळांचा भिल्ल गोंड, मुंड ह्या मागासलेल्या व कृष्णवर्णी टोळ्यांशी संपर्क येऊन सध्याची महारांची पिढी निर्माण झाली असावी की काय? महार जातीत देखील काही महारांची कुळे कोकणस्थांसारखीच गोरवर्णी आहेत.

मग आणि रठ्ठ ह्यांचे एकत्रीकरणातून मगरठ्ठांचा जन्म झाला आणि मोगलांच्या काळात तो 'मरगठ्ठ' असा झाला. काळाचे ओघात मऱ्हाठा ह्या शब्दाचा अर्थ मराठी संस्कृती व महाराष्ट्र धर्म ह्यांच्या आदरातून 'मरून हटणारा' असा देखील होऊ शकेल.

४५. Haug Ait. Brah.—Introduction. P. 67

महाराष्ट्राभिमानी मनाला हा अर्थ सुखद वाटला तरी बुद्धीला मात्र व्यथित करणारा आहे. पण एक प्रश्न येथे उपस्थित होतो. मगांचा अपभ्रंश वा तद्भव 'महा' ह्या विशेषणात होऊ शकतो की काय ? भाषाविद त्यावर प्रकाश टाकू शकतील. गाथा सप्तशतीतील अंतर्गत पुराव्यातून किंवा सातवाहनांच्या दानपत्रातून तशी सिद्धता मिळत नाही हे खरे आहे. महाराष्ट्र ह्या महाराष्ट्री प्राकृताचे नियमाने रूप 'मसरठ्ठ' असे असे होऊ शकेल. महाराष्ट्राऐवजी 'मसरठ्ठ' असे रूप कुठेही आढळलेले नाही हे खरे आहे. पण अवेस्थातून त्यावर प्रकाश पडू शकतो.

अवेस्थांत 'माझॅन्य' देवांचा निर्देश आहे. 'माझनचे' संस्कृत रूप 'माहन' असे होते. माहन अथवा मागन हे 'मग' ह्या शब्दाचे रूप आहे. संस्कृतातील महाराष्ट्र प्राकृतात महरठ्ठ व अवेस्थन भाषेत 'मझरट्ट' असे होऊ शकते. एकूण महाराष्ट्र हे संस्कृत नामाभिधान, मगरठ्ठ–महरठ्ठ व 'महारठ्ठ' अशा फरकाने अस्तित्वात आले आहे. ज्ञानेश्वराचे काळात त्याचे स्वरूप मऱ्हाठा असे होते. 'माझा मऱ्हाटाचि बोल कौतुके' 'नको गा केशव देवा तुमचा अस्मात् कस्मात् मी नेणेगा, मज श्री चक्रधरे निरुपिली मऱ्हाठी तियेची पुसा' ह्या वचनावरून चक्रधराची मराठी ही गुजरातीला जवळची असे वाटते, कारण चक्रधर गुजराथी होते असेही एक संशोधन आहे. चक्रधर–ज्ञानेश्वर ह्यांचे काळानंतर मराठा जो लपून बसतो तो एकदम 'मराठा तितुका मेळवावा– महाराष्ट्र धर्म जागवावा' ह्या समर्थांच्या उक्तीतून त्याचे अस्तित्व जाणवते. रामदासाला जो मराठा अभिप्रेत आहे तो मावळांच्या सह्याद्रीच्या परिसरातील आहे. विदर्भातील गोंडांशी वा कुणब्यांशी अथवा भोजांशी त्यांच्या मराठ्यांचा संबंध नाही. संत साहित्य वाचताना एक गोष्ट लक्षात येते की संतांमध्ये निरनिराळ्या जातींचा बोध होतो पण मराठी संतांचा मात्र बोध होत नाही. संतांमध्ये माळी, न्हावी, शिंपी ह्या जातींबरोबरच महार संतांचाही निर्देश आहे. पण मराठी संतांचा अभाव आहे.

महार आणि मराठे ह्यांच्यातील अंतर कमी दर्शविणारा शब्द 'जोहार' हा होय. 'जोहार' ह्या शब्दाची व्युत्पत्ती सांगताना डॉ. घाडगे ह्यांनी ती जोषकार ह्या संस्कृत शब्दापासून सांगितलेली आहे. डॉ. पवारांनी ह्या शब्दाचा निरनिराळ्या कालखंडातील अस्तित्वाचा आपल्या लेखात शोध घेतलेला आहे.[४५] 'जोहार' हा शब्द वर्तमानकाळात, विशेषत: मालगुजारी नष्ट होण्याचे आधी, महारकुळे मराठी मालगुजारांना रामराम करताना वापरीत असत. पण मराठ्यांचे कागदोपत्री 'जोहार' हा शब्द मराठे सरदार देखिल वापरीत असत. चांभारांनी बहुधा महारांपासून हा शब्द उचलून घेतलेला असावा. गाथासप्तशतीत तो 'जोक्कार' म्हणून आलेला आहे. 'जोहार' शब्दाचे संदर्भात जर विचार केला तर ही परंपरा दर्शविणारी जात केव्हातरी एकत्र नांदत असावी. सप्तशतीच्या काळापासून तो छत्रपतीच्या काळापर्यंत मराठे आणि महार दोघेही जोहाराचा वापर करीत पण पुढे तो केवळ महारांपुरताच मर्यादित का व्हावा ह्याचे कारण सांगता येईल. शिवाजीचे कालखंडानंतर ब्राह्मणी प्रभाव वाढू लागला. त्यांचे बरोबरच संस्कृतचा प्रभाव देखील मराठा दरबारात वाढू लागला. मराठ्यांनंतर पेशवाई आली. 'महाराष्ट्राची मसलत' सांभाळणे ही मराठे सरदार आणि पेशवे घराणे ह्यांची संयुक्त जबाबदारी झाली. छत्रपतींच्या काळापासून राज्यस्थापनेच्या कार्यात पौरुषत्व गाजविणाऱ्या मराठे सरदारांना हळूहळू सामाजिक दर्जा प्राप्त होऊ लागला. पेहेरावात फरक पडला, ज्यांना ही संधी उपलब्ध झाली नाही ते महार म्हणून जगू लागलेत व अस्पृश्यत्वाला प्राप्त झालेत. जोहार हा शब्द परस्परांनी परस्पराला मोठा योद्धा वा पुरोहित ह्या अर्थाने वापरावयाचा असतो. जोहार शब्द संस्कृतातील जोषकाराचे रूप नसून, गाथासप्तशतीतील 'जोक्काराचे' तद्भव संस्कृत रूप 'जोषकार' असे ह्या महाराष्ट्री प्राकृताचे मूळ 'झोट' ह्या प्राचीन अवेस्थन शब्दात शोधावे लागते. संस्कृतात त्याचे रूप 'होत' वा 'योत' असे झाले. महाराष्ट्री प्राकृतात ते सरळ सरळ 'जोध' असे आले. जोक्कार हा 'झोटार' ह्या अवेस्थन शब्दाचा अपभ्रंश आहे. 'झोटार' ह्याचा अर्थ मोठा योद्धा असा होतो. 'झोट' ह्या शब्दाची

---

४५. डॉ. ए. जी. पवार. स्टडीज् इन् मराठा हिस्ट्री खंड. १ पान १६२.

तळटीप–डॉ. पवार–'जोहार' वरील लेख पान १५९ ते १६३.

अनेक रूपे मराठीत प्रचलित आहेत. झाटोंजी–जेठी, सेठी, जाट–अशी ती रूपे आहेत. जोहाराचा निर्देश करणारी कुळे एकाच जातीची असावीत. एक जात श्रेष्ठत्वाला प्राप्त झाली. दुसरी मात्र अंत्यज म्हणून जगू लागली. जातीयवादाच्या अस्मितेत महारडा आणि महारठा ह्या दोन जातीतील ऐक्य अभिमानाला दुखविणारे ठरेल; पण बुद्धिमंतांनी ह्या भिंती मोडून सत्यशोधनाचा प्रयत्न करणे आवश्यक आहे.

महार आणि मराठे ह्यांत सामाजिक अंतर पडले असावे असे समजण्याचे कारण हे देखील आहे की समाजात जात लपविण्याची वा अनुकरणातून उपनावे बदलविण्याची प्रक्रिया आरंभ होण्याचे अगोदरचे कालखंडात पश्चिम महाराष्ट्रात मराठे व महार कुळातील उपनावे सारखी आहेत. अंत्यजांमध्ये ज्या अनेक जाती आहेत त्यांपैकी महार ही एक जात आहे. जसे महाराष्ट्रात निरनिराळ्या जाती स्वतःला मराठे म्हणवून घेतात त्याप्रमाणे अंत्यजांना महार म्हणण्याचा प्रघात पडला असावा. पण मुळात महार जात मात्र धेड ह्या अस्पृश्य जातीपासून वेगळी असावी. मराठ्यांपासून महार वेगळे पडण्यास दोन कारणे देता येतील. राज्य भ्रष्ट झाल्यामुळे काही मराठी सरदारांना सह्याद्रीच्या दऱ्या डोंगरांचा आश्रय घेऊन गुजराण करावी लागली ते अंत्यज ठरलेत म्हणून महार झालेत. दुसरे कारण असेही देता येईल की हिंदुधर्माच्या पुनरुत्थापनाच्या काळात बौद्ध धर्माचा स्वीकार केलेल्या महारठींच्या कुळांना जातीबाह्य ठरविले गेले ते महारडे झालेत. निंदाव्यंजकत्व प्रदान करणारा 'डा' हा प्रत्यय कोणत्या कालखंडात रूढ झालेला आहे ते येथे सांगता येत नाही. कारण तसा शोध घेतलेला नाही. पण भटजी आणि भटुरडा, भिकु आणि भिकारडा, थेर व थेरडा, महार व महारडा, मुसलमान-मुसड्डा, भोसळा-भोसडा ह्यांत दोन शब्दांतील अंतर 'ड' ह्या प्रत्ययामुळे परस्परांना दूर ठेवते. महारठे व महारडे हे दोन शब्द एकाच जमातीतील सामाजिक अंतर दाखवितात असे जे विधान पूर्वार्धात केले होते त्याचा शोध घेता येणे शक्य आहे. एखादी विशिष्ट जमात ज्यावेळी आपल्याच जमातीतील वर्गाला, 'ड' हा प्रत्यय लावून संबोधते त्यावेळी त्या जमातीतील दोन घटकांतील अंतर काही कारणामुळे वाढलेले असून, 'डा' ह्या प्रत्ययाने संबोधिलेल्या घटकांशी रोटीबेटी–व्यवहार करण्यास समाजातील त्याच वंशाचा वा रक्ताचा गट उत्सुक नसतो. भट्टापेक्षा–भटुरडे निकृष्ठ ठरतात. शिद्यांना शिदडे म्हटले की आदराची भावना लुप्त होते. कुणब्यांना कुणबटे म्हटले की संघर्षाचा बोध होतो.

तात्पर्य

१. महारठींनी महाराष्ट्राला जन्म दिला. नाणेघाटात त्यांचे अभिलेख आहेत.

२. महारठींचे गोत्र अंगिरस असून त्यांचा शोध घेण्यासाठी इराणातील रथेष्ठांच्या वर्णाकडे वळावे लागते. अंगिरस गोत्र ब्राह्मणातही आहे. ते महारातही असावे.

३. तुर्की आक्रमणानंतर भारतभर जशी मुसलमान सत्ता अस्तित्वात आली तशाच प्रकाराने सीरस व दारियसच्या कालखंडातील भारत आक्रमणातून मग आणि रथेष्ठ भारताच्या भूमीवर उतरलेत व त्यांनी मगरठ्ठ वा महारठ्ठ ह्या जातीला जन्माला घातले. मोगलांनी मगरठ्ठाचा अपभ्रंश मरगठ्ठे असा केला.

४. मगरठ्ठांचे राष्ट्र म्हणून उदयाला येण्यापूर्वी महारठ्ठी भाषा बोलणारा गट भारतात पश्चिमेला नांदत होता. ही भाषा पैशाची आणि मगांची (बहुधा-Kentum वर्णातील भाषा) ह्यांच्या संपर्कातून निर्माण झाली असे दिसते. वररुचीचे नावावरून तो इराणी वाटतो. त्याने महाराष्ट्री प्राकृत व्याकरणाचा प्रथम प्रपंच केला.

५. महाराष्ट्रीय भाषेनंतर महाराष्ट्र हे राज्य अस्तित्वात आले. अशोकाच्या काळात रठ्ठ पंजाबच्या उत्तरेला असावेत. अलेक्झांडरच्या आक्रमणानंतर जी बेबंदशाही निर्माण झाली त्यातून अनेक टोळी राज्यांनी विजिगीषु वृत्तीने राज्यस्थापनेचा प्रयत्न केला त्यांत दक्षिणेला सातवाहन व रठ्ठ आणि मौर्यांना यश आले.

६. महरठ्ठांची राज्ये मौर्य साम्राज्याच्या पतनानंतर अस्तित्वात आलीत. त्यांचे आणि सातवाहनांचे अथवा मग पुजाऱ्यांचे विवाह

(पान २९३ पहा)

अनुक्रमणिका

चलो धरो न हथेलीपे... : वसंत माने

जीप पुलावरून जायला लागली तेव्हा दिशा चांगल्या उजळल्या होत्या. समोरचे झाडं पांघरलेले डोंगर टकटकीत डोळे उघडून बसले होते.

नदीवरून आलेल्या ओल्या वासानं विभाच्या नाकपुड्या फुलल्या. पापण्यांच्या कडा चुरचुरीत गार झाल्यासारख्या वाटल्या. उजवीकडे फटफटीत आकाश दोन डोंगरांतून नदीच्या पात्रात उतरलं होतं. त्याचा पांढरा पदर पाण्यावर पसरला होता. पुसट काळसरपणे थरथरत होता.

गाडी डोंगराचा चढ चढली. धारेला लागल्यासारखी सरळ धावायला लागली. पातळ पांढुरका गारवा कापीत जाताना वारा कानांवर फडफडत होता. चारी बाजूंनी दूरवर पसरलेल्या माळावरून नजर उधळत होती. पाहाता पाहाता सोन्याच्या रसावर साय धरावी तशा घट्ट सुरकुत्या समोरच्या क्षितिजावर दाटून आल्या. उतू गेल्यासारखं लुसलुशीत ऊन वाट फुटेल तिकडे धावायला लागलं. आभाळाला, गवतगोटचाला रंगरूप आलं.

दरीत अजून धुकं साचलेलं होतं. त्यात कच्च हिरव्या आणि फिकट पोपटी रंगाचे पट्टे एकमेकात मिसळून आळसटपणे पडलेले दिसत होते. ऊन ओंजळीत घेऊन विभाचे डोळे तिकडे मिस्कीलपणे पाहात होते.

जीपही आता डोंगर उतरायला लागली. कुठली तरी वस्ती आली. घरं, कुंपणं, गोठे, आंब्या-फणसाची रोपे, मिरवेली, शेणगवताचा वास, वईतनं डोकावणारी फुलं, तांबड्या भिंतीत दडणारा काळोखं, सकाळची कलकल, डोंगरावर उगवलेल्या दिवसाची इथं फक्त चाहूल पोचली होती. मुठी पांघरून लडखडत जाणारी माणसं, लगालगा धावणारी कुत्री, फडफडत जीपला आडवं जाणारं कोंबडं, सगळं नेहमीचं ओळखीचं असूनही ताजेपणानं ओढून घेत होतं. आणि मग खाचाखळग्यांचा तो आडरस्ता पार करताना दोन्ही बाजूंनी झाडांच्या नक्षीतून डोंगराच्या रांगा लाटांसारख्या उमटायला लागल्या. पुडात पूड ठेवल्यासारख्या रांगाच रांगा. संथपणे रंग माखीत हेलकावणाऱ्या.

उडत्या मारीत जाणाऱ्या जीपमध्ये हिंदकळत्या शरीरानं एक हात टपाच्या दांडीला घट्ट धरून विभा बसली होती. ओळख दाखवून भुलवणारं काहीतरी अनोळखी असं वेभानपणाची आशा दाखवीत होतं. खूप खूप जवळ येतंय असं वाटत होतं. जीपचा वेग अपुरा पडत होता.

दूरचे डोंगर पुढं सरकत सरकत आता अगदी जवळ आले. इतके जवळ आणि तरीही निळे. त्यांच्यावर शिवरलेली निळाई आता वेगळी ओळखता यायला लागली. फुललेल्या डोळ्यांनी विभा त्या निळ्या पुंजक्याकडे पहात होती. आणि इतक्यात तिच्या नजरेच्या दुसऱ्या दिशेनं एक डोंगर तिच्या वाटेलाच येऊन भिडला. वळण घेऊन गाडी त्याच्या कुशीत शिरली. विभा चपापल्यासारखी सावरून बसली. पदरानं तोंड पुसून घेत हलकेच तिनं आजूबाजूला पाहिलं.

जीप यानंतर फारशी पुढं गेली नाही. विभाच्या कामाची जागा आली होती. दुपारच्या विश्रांतीपर्यंत भेटीगाठी, बोलणं याखेरीज दुसऱ्या कशाकडे विभाचं लक्ष नव्हतं.

जेवण उरकलं आणि पाण्यानं निथळणारा चेहरा पदरानं पुशीत विभा जीपमध्ये येऊन बसली. तिला एकदम जाणवलं, इथले आवाज कसे वरवर अलग होतात. निखळून पडतात. घवघवीत शांतगार गाभा तेवढा उरतो. लुसलुशीत लव असलेल्या हिरव्या द्रोणातली ही गार गार शांतता. घुटक्या घुटक्यांनी संपवण्यासाठी भरून ठेवलेली.

पाणंदीतून बाहेर निघून जीप उघड्या माळावर आली होती. मध्यावरच छोटंसं लाल विटांचं कौलारू पंचायत घर होतं. पायवाट त्याच्या बाजूनं पुढं गेली होती.

खूप अंतरावर तिच्या एका बाजूला आंब्याची, जांभीची झाडं होती. दुसऱ्या बाजूनं करड गवतानं भरलेला माळ डोंगराला जाऊन भिडला होता. सभोवार डोंगरांच्या रांगाच रांगा होत्या. त्यातला हा एकटाच या माळावर विसावलेला डोंगर, जवळचा घरचासा.

जीपमधून उतरून विभा चालायला लागली. गारवा अंगाला भिडत होता. स्वच्छ प्रकाशात निळ्या आकाशाचं प्रतिबिंब होतं. ऊन सावळ्या चांदण्यासारखं भासत होतं. हलकीशी झुळुक करडाच्या माथ्यावरून डोंगराला स्पर्श करायला जात होती. गव्हाच्या शेतावरून जाणाऱ्या लाटेसारख्या झुलणाऱ्या, डेरेदार घागरे घातलेल्या मुली गायला लागल्या......

चलो, धरो न हथेलीपे
छू न लंगुरिया
अटके लडाई मोसे मत लीजो

पायवाटेवरून चालताना विभाचं शरीर हलकेच हेलकावा घेऊ लागलं. त्या ओळी सहजपणं तिच्या गळ्यातून उमटल्या.

हे कळलं तर सासू काय करील, नणंद कशी आग लावील, धाकटा दीर काय म्हणेल, याचं वर्णन करताना गाण्यातली ती गौळण म्हणत होती–

मोरी सौत सुनेगी
मुझे कछु न कहेगी
पर सैंयाजी पडेंगे मोरे पांव
लंगुरिया
अटके लडाई मोसे मत लीजो

दाराच्या चौकटीला टेकून विभा समोरच्या डोंगराकडे पाहात होती. पायवाटेवरून तिची नजर येरझारा घालीत होती. एका डेरेदार आंब्याखालच्या काळ्या कातळावर गाईगुरं सावलीला बसली होती. तिची नजर तिथं स्थिरावली आणि एकदम ओवळांचा घमघमाट आला. विभा आत वळली.

एका बाकावर चपराशानं उशी ठेवली होती. तिथं ती लवंडली. डोक्याखाली एक हात घेऊन दुसऱ्या हाताचा त्रिकोण तिनं तोंडावरून आडवा घेतला आणि डोळे मिटले. आपण बरेच दिवसांत कृष्णनाथाला पत्र लिहिलेलं नाही याची तिला आठवण झाली.

कृष्णनाथाची आठवण झाली की ते गाणंही आठवायचं. आज गाणं आधी आलं.

माळव्यातल्या एका शहरात कृष्णनाथ तिला भेटला होता. त्याचा उंच, धिप्पाड पण सडसडीत

[पान २९१ वरून]

होऊन सातकर्णीचे कुळ जन्माला आले. क्षहरात् आणि कर्दम ह्यांच्या विवाहातून खराट आणि कदम ही मराठी कुळे उदयाला आलीत. शिर्के, सुर्वे मुळात सूर्यवंशी आहेत.

७. मराठी संस्कृती ही मुळात महारठींची संस्कृती असून वर्तमान काळात मराठे म्हणून घेणारी सगळीच कुळे महारठींची नाहीत. भोसल्यांच्या इतिहासाचे सूत्र होयसळांपासून शोधावे लागेल.

८. महारठी, अंगिरस गोत्रोत्पन्न ब्राह्मण, आणि महार ह्यांची कुळे कधीकाळी एकाच वंशाची होती. मराठे पराक्रमाने मराठे राहिलेत. पुरोहितवृत्तीने मराठे ब्राह्मण झालेत. आणि राज्यभ्रष्टतेमुळे व बौद्ध धर्माच्या प्रभावामुळे सातव्या-आठव्या शतकानंतर महारडे झालेत. संतसाहित्यात महारडे आढळतात. मराठे आढळत नाहीत. मराठ्यांपासून महार अस्पृश्य म्हणून आठव्या शतकानंतर वा आद्य शंकराचार्यानंतर वेगळे झाले असावेत.

९. शिवाजीच्या काळात मराठे म्हणून मावळच्या खोऱ्यात व सह्याद्रीच्या दऱ्याखोऱ्यात हिंडणारी कुळे लक्तरे पांघरलेली व आर्थिक दृष्ट्या दयनीय होती हे लक्षात घेणे आवश्यक आहे. शिवाजीच्या काळानंतरच वर्तमान मराठी कुळातील सरदार घराण्यांचा उदय झाला आहे व त्यांच्यापैकी कित्येकांना सामाजिक प्रतिष्ठा प्राप्त झाली.

बांधा, तजेदार काळा रंग, सदैव हसरी जिवणी आणि हसण्याला उजाळा देणारे कणखर दात यांनी पहाताक्षणीच तिचं मन ओढून घेतलं होतं. एकदम त्याच्या विषयी आपुलकी वाटली होती.

जवळच्याच एका खेड्यात तिला जायचं होतं. कसला तरी उत्सव होता तो पाहाण्यासाठी. त्यावेळी कृष्णनाथ तिच्याबरोबर होता.

रात्रभर चालणारी गाणी तिनं ऐकली, नाच पाहिला. मोकळ्या जोषानं, लवचिक सुरांनी आणि साध्या पण शोधावा तितका अर्थ देणाऱ्या शब्दांनी ती अगदी वेडावून गेली. तिला प्रश्न पडला, युगायुगांमागच्या गोपगोपींच्या आणि राधाकृष्णाच्या गीतांशी सहजपणे एकरूप होऊन गेलेल्या या खेडवळ तरुण तरुणींच्या जीवनात या गीतांच्या अंगाअंगातून छटाछटांनी लपंडाव खेळणाऱ्या अर्थाला काही जागा असेल का ?

कृष्णनाथाच्या काळ्या कांतीवर चांदण्यानं चढलेली निळसर छटा निरखीत विभा म्हणाली, " कृष्णनाथ म्हणजे काही कृष्ण नव्हे, नाही ? "

आपला प्रश्न चुकीचा आहे हे बोलता बोलताच तिच्या लक्षात आलं. पण कृष्णनाथाला तिच्या बोलण्याचा अर्थच कळला नाही :

" म्हणजे काय ?" तो म्हणाला. " माझे मित्र मला नॅट्टी म्हणतात. "

तिला हसू आलं. " नॅटीपेक्षा नॉटीच चांगलं. खट्याळ कृष्णाला ते बरं शोभतं. "

" मीसुद्धा नॉटीच आहे बरं का विभा."

" चांगलं ते, पण माझ्याशी मात्र खट्याळपणा नको. " ती हसत म्हणाली. " मगाचं ते गाणं ऐकलंस ना ?...सैंयाजी पडेंगे मोरे पाँव, लंगुरिया अटके लडाई मोसे मत लीजो."

तिचं तिच्याच लक्षात आलं, हे निमंत्रण आहे. आणि त्यानं ते स्वीकारलं. कमरेभोवती त्यानं घातलेला हात तिनं निग्रहानं दूर केला. पण तिच्या हातावरली त्याची पकड कायम राहिली. दंगामस्ती न करता सहजपणे हात सोडवून घेत ती म्हणाली, " ऐक, तुला सांगते सारं, मला अशी कैदेची शिक्षा आवडत नाही."

" उद्या जरूर भेट बरं का, " घरापाशी त्यांचा निरोप घेताना ती म्हणाली. " या अशा दूरवर हेलावत जाणाऱ्या चांदण्यात मला देहाती सीतासारखं हिंडायचं आहे.

दुसऱ्या दिवशी तो बराचसा दूरदूरपणंच वागत होता. ती मात्र काहीच न घडल्याप्रमाणं कधी खळाळणाऱ्या तर कधी संथ वाहणाऱ्या झऱ्याप्रमाणं अखंड बडबडत होती. घरी जायला निघण्यापूर्वी ती अचानक गप्प झाली. म्हणाली, " कृष्णा, रागावलास माझ्यावर ?

दूर टक लावून पाहात तो म्हणाला, " तुम्हा बायकांना स्वत:चं मन कळत नाही. कधी कधी वाट पाहाणं बरं असतं. वयामध्ये सहज मिळणारे दुसरे नग काही कमी नसतात."

खळखळून हसत ती उठून उभी राहिली आणि म्हणाली, " चल. माझा अपमान करण्याचा प्रयत्न करतोयस ना तू ? असं काही बोललं म्हणजे खांद्यावर मान टाकून मुळूमुळू रडेन मी असं वाटलं ? नाही रे बाबा, इतकी लहान नाही राहिले मी आता."

इतक्या वर्षांत कृष्णनाथ पुन्हा भेटला नव्हता, भेटेल अशी शक्यता कमी होती. पण ती त्याला आठवणीनं पत्र पाठवायची.

ड्रायव्हरनं हाक मारताच विभा उठली. जीपमध्ये जाऊन बसताच तिचं मन आखलेल्या कामांच्या मागं धावू लागलं. काम आटोपलं तेव्हा ती घराच्या मार्गावर होती. दिवेलागणीच्या आत घरी पोचायचं तर तसंच तडक पुढं जायला हवं होतं. पण तिनं जीप मागं वळवली, दुपारच्या त्या पंचायत घराच्या माळावर येऊन पोचली. पायवाटेनं जाताना कुठं तरी आपोआप थांबली. सभोवारच्या डोंगरांच्या निळेपणात, माथ्यावरच्या आभाळाच्या निळाईत हरवून गेली.

दिवस मावळायला अद्याप अवकाश होता. पण इथल्या डोंगरावरचं ऊन हळू हळू त्याच्या धारेकडे सरकत होतं. त्याच्या निळेपणात जिवंत लहरी उठत होत्या. पाहाता पाहाता ऊन शिखरावरून नाहीसं झालं. विशाल दाट सावली सगळीकडे पसरली, पण तिचा प्रकाश स्वच्छ होता. रंगांचं अंग अंग त्यात ओळखू येत होतं. दूरच्या निळ्या डोंगरांच्या पार्श्वभूमीवर

समोरचा गोड काजळी घरू लागलेला डोंगर आता उमटून अधिकच वेगळा पडला होता. त्याच्यावरची काळी झाक आता अशी अलगद उतरत होती की तो आपल्या जवळ जवळ सरकत आहे असा विभाला भास झाला.

ती श्रीरंगपट्टणला गेली होती तेव्हा तिथल्या काळ्या तुळतुळीत पाषाणाच्या रंगनाथापुढं भक्ति-भावानं हात जोडताना तिला ती मूर्ती अचानक सचेतन भासली होती. त्या रुंद छातीवर डोकं ठेवून सारा भक्तिभाव तिथं वहावा असं तिला वाटलं. पुजाऱ्यानं देवमूर्तीला पूजा वहाताना फुलांच्या पाकळ्या प्रथम रंगनाथाच्या उजव्या वक्षावर ठेवल्या तेव्हा त्या पाकळ्यांतला स्पर्शही तिला जाणवला. आता तिला ते आठवलं.

साऱ्या आसमंतातला प्रकाश मलूल होत होता. आणि तिला बिलगून बसलेला तो डोंगर कितीतरी जलद एकाच एका रंगानं गडद होत चालला होता. त्याच्यावरच्या विलग छटा पुसल्या जाऊन एकच घट्ट आकार आणि सलग रंग त्याला येत होता. त्या प्रचंड काळ्या आकारावर आता सभोवारच्या अधिक उजळ असलेल्या वातावरणातून भुरा निळा गुलाल पुसटपणं पाझरू लागला. विभाचं अस्तित्व पंख लावून वर वर चढू लागलं. त्या निळाईचा कणकण शोषून घेण्यासाठी तडफडू लागलं. चारी बाजूंनी तो उजळ करडा परिसर विस्तारत गेला आणि तरीही ती घट्ट काळी निळाई तिच्याशी अधिकाधिक एकजीव होऊ लागली. तिच्या साऱ्या शरीरातून शिवरू लागली, आपली बारीक तार करून कोणीतरी खेचीत आहे···बारीक बारीक ···जितकी खेचावी तितकी ती मलमलीच्या सुता-सारखी पातळ आणि लोखंडाच्या कांबीसारखी कठीण होत होती. तिला तो ताण सहन होईना. तिनं आपलं सारं अस्तित्व त्या विशाल भूधरावर झोकून दिलं आणि वर्षाऋतूत काळा मेघ फुटावा त्याप्रमाणं ती त्याच्या निळसर काळ्या कठीण शरीरावरून पाणी पाणी होऊन पसरली.

❖ ❖

पुढील अंकात :

* प्रबंध संशोधनाचा बीजमंत्र	द. भि. कुळकर्णी
* सोन्याचा पिंपळ	हरिहर चन्द्रशेखर घोंगे
* फ्लॉवर्स प्लीज	सुधाकर जयवंत
* फेमिनाईन पोएट्री	पार्थसारथी
* धार आणि काठ	यशवंत मनोहर
* मेलोड्रामा	प्रभाकर नारायण परांजपे
* पाषाणघंटेचा आवाज	वसुधा माने
* होल्डरलीनच्या कविता	मनोहर चिंतामणि वझे
आणखी काही अंकातून	

आत्मशोधाचे एक टिंब : विजया राजाध्यक्ष

सातआठ वर्षांपूर्वीची गोष्ट. 'अंधाराचा अर्थ' ही कथा लिहित होते. इतकी वर्षे झाली पण सगळे काही स्वच्छपणे आठवते. फार दिवस मनात घोळत असलेल्या या कथेला एका पावसाळी सांजेला शब्द फुटले. असे वेगाने फुटले की तो लोट मलाच सहन होईना. त्या लोटात मी दोन दिवस वहात होते. त्या संध्याकाळी लिहिले, नंतर दुसरे दिवशी सकाळी, पुन्हा संध्याकाळी, आणि तिसरे दिवशी सकाळी व्यत्यय होतेच. रात्रीचा व्यत्यय, व्यवहारांचा व्यत्यय. पण त्या व्यत्ययांच्या काळात समोर कागद नव्हते, इतकेच. मनात लिहीत होते. एकामागून एक ओळी जुळत होत्या. आणि भरतीच्या समुद्राच्या लाटा सांभाळाव्यात तशा मी त्या सांभाळत होते. बाकीचे जे जे काही करत होते, त्याकडे लक्ष होतेच कुठे ? त्या दोन दिवसात मी ऊन पाहिलेच नाही. सगळे निळे, शीतल. त्या निळेपणाची एक सुंदर तंद्रा. फक्त शब्दांचीच सोबत असलेले ते दोन दिवस किती अद्‌भुत होते ! त्यांच्या आठवणीने मन अजून उचंबळते, थरारते.

अशीच आठवण 'विदेही'ची. ही कथा दोन वर्षांपूर्वी लिहिली. काही कथा सुचतात पण कधीच लिहू नयेशा वाटतात. ही तशीच होती. वाटायचे, हे धन कोणाला कधी दाखवूच नये; मनाच्या गाभाऱ्यात खोल पुरून ठेवावे; आपणसुद्धा ते कधी पाहू नये. कधी वाटायचे, ते फेकून द्यावे. ते बाळगण्याची आपली लायकीच नाही. तर कधी भीती. अदृष्टातून वार यावा तशी ही कथा आपल्यापर्यंत आली आहे. ती झेलली तर पाहिजेच. पण आपल्याला पेलेल का ? नासली तर ? . . मग कोण सोसणार त्या कळा ? नकोच ते. अशा संभ्रमात मी ती कथा लिहायला घेतलीच कशी, हे गूढ वाटते . . ते दिवस उदास होते. मनाला तऱ्हेतऱ्हेच्या चिंता, आणि एक जीवघेणे एकटेपण. कोणाशी काही बोलू नये, काही करू नये. नुसते जगावे...पण मनाला ही अर्थशून्यता, ही पोकळी सहन होईना. मग जरा हताशपणेच 'विदेही' बाहेर काढली आणि तिला पाहून डोळे निवले. वाटले; ही जवळ आहे तोपर्यंत कशी मी एकटी ? मग तिला कुशीत घेतले. पंधरा दिवस तिच्याशी कुजबुजत राहिले. ती पंधरा दिवसांची रात्र कशी संपली ते कळलेही नाही. पंधरा दिवसांनी मी जागी झाले तेव्हा मी एकटी नव्हते ! तुडुंब भरलेले जग भोवती हेलावत होते आणि त्यात तृप्त मी. पोकळी कधीच विरघळली होती—

'महानोरांची कविता' हा लेख लिहिला तेव्हाही 'विदेही'च्या वेळेसारखीच वेळ. मन खूप अस्वस्थ. तऱ्हेतऱ्हेच्या कामांचे दडपण. एरवी यातले काहीच झेपले नसते. सारखा त्याबद्दलचाच विचार करत राहिले असते आणि स्वत:चा छळ करून घेतला असता. पण महानोरांच्या कवितेने मन कसे निर्लेप ठेवले होते ! पहाटे उठावे आणि ती कविता वाचावी, तिच्यातच गुंगावे. शोधत रहावे. अनेकदा वाचलेल्या एखाद्या कवितेची एखादी नवी अर्थच्छटा उजळावी आणि खुलून जावे... व्यवहाराची टोचणी होतीच; पण खोलवर काहीच रुतले नाही. मनाभोवती महानोरांच्या कवितेचा तट होता. आत मी कशी सुरक्षित होते !—स्मृतीचे म्हणणे खरे आहे. ओटयात गोड बोरे फार नसतील; पण अगदीच नाहीत असे नाही ! ज्याने मला ती सुंदर तंद्रा दिली, ज्याने मला एकटे वाटू दिले नाही, ज्याने माझे व्यावहारिक व्यापतापांपासून संरक्षण केले, त्याने मला काहीच दिले नाही असे कसे म्हणू ?— आणि ते अगदीच निरर्थक तरी कसे म्हणू ? अजूनही तसे काही प्रसंग येत असतातच. अशा वेळी वाटते की मनात काहीतरी घोळत असावे. मग कशाचाच त्रास वाटत नाही. आणि मनात काही घोळत नसले तर ? —तर वेड लागायची पाळी येते. ज्या मनात बरेवाईट—काही रूजू शकते, ते मन तसेच ओसाड राहणे यासारखे दुसरे दुःख नाही ! माझ्या सुदैवाने मला हे वाळवंट कधी तुडवावे लागले नाही.

भोवती कोणी असो, नसो–लेखन होतेच. त्यामुळे आत्तापर्यंत तरी निभावले आहे.

नुसतेच निभावले ? माझे लेखन माझ्या बरोबर नुसतेच संरक्षकासारखे वावरले ? नाही. त्याने मला जीवनात माझी जागा शोधून दिली. कदाचित आड• वाटेला असलेली जागा, खूप लहान जागा. पण माझी जागा. या जगात सगळेचजण आपली जागा शोधत असतात. आपापल्या खुर्च्या याच पुष्कळांच्या जागा असतात. ही मंडळी दिमाख दाखवत असतात तो खुर्च्यांचा–अधिकाराचा, वैभवाचा. एरवी त्यांच्याजवळ काय असते ? त्यांच्यातून काय निर्माण होत असते ? अशी एखादी तरी त्यांच्यातून फुटणारी पारंबी की जी त्यांना त्यांच्या भूमीशी बांधून ठेवील ? न रुजताच, ही माणसे कधी ना कधी उध्वस्त होणार असतात. अशा माणसांच्या कोलाहलात वावरत असताना मला एकसारखे वाटत असते की मी यांच्यासारखी कधी उन्मळून पडणार नाही. मी फार लहान असेन कदाचित, पण मी कधी उन्मळून पडणार नाही. मी बरे-वाईट–काही तरी, निर्माण करत राहीन, स्फुरत राहीन. 'विभूती' होऊन 'विश्वामाजी पसरणे' नाही जमणार कदाचित. पण कदाचित जमेलही ? स्वतःवर इतका अविश्वास का दाखवावा ?...कधी तरी तो क्षण येईल, जिवाचा झपूर्झा होईल. त्या क्षणाची वाट पाहाणे किती सुंदर आहे ! त्या प्रतीक्षेत जीवन हे एक स्वप्न होते आणि मी केशवसुतांप्रमाणे गुणगुणू लागते, " शब्दांसगे तदा मी निजहृदयवनामाजी संचार केला ....मी त्या स्वप्नात–गद्यग्रथित जग मुळी लोटिले तुच्छतेला ! " माझे लेखन, एखाद्या क्षणी का होईना, मला हा अहंकार देते. आणि या अहंकारा-मुळेच मला या स्पर्धेच्या जगात टिकता येते. फार तृप्त, फार सुरक्षित वाटते. आणखी काय हवे ? हे क्षण विरळ असतील, पण ते आले आहेत आणि येणार आहेत हा धीर केवढा भरीव आहे !

या क्षणांची प्रतीक्षा करायची ती एकटेपणी. पण मी एकटी नसताना, माणसांच्या गर्दीत वावरत असतानाही मला बरेच काही मिळत असते, कळत असते. आयुष्यात तऱ्हेतऱ्हेची माणसे भेटतात. कोणी प्रेमळ, कोणी निष्ठुर; कोणी प्रांजळ, कोणी दांभिक; कोणी अकारण जीव लावणारे तर कोणी अकारण वैर धरणारे...या माणसांशी एकसारखा संबंध येतो. ती माणसे दूर असतानाही हा संबंध चालूच राहातो. कारण मनात त्यांचाच विचार चालू असतो. हा आतून कसा असेल ?......त्याच्या या उद्गाराचा अर्थ काय असेल ?... हा असे का वागतो ? काय कारणे असतील ?... प्रश्नांना अंतच नसतो. कोणीकोणी म्हणतातही, तुम्ही फार विचार करता. कोणी हळवे-पणाचा आरोप करते. मी आहेच हळवी. पण तो काय माझा दोष आहे ? ते माझे वळ आहे, वेगळेपण आहे. कोणी काही म्हणो, मी ते टिकवणार. एखादी गोष्ट जिवाला भिडणे, त्यामुळे सुखावणे वा जळणे, त्या सुखदुःखातच मग्न राहणे–हे सगळे किती सुंदर असते ! हे सगळे करत असताना मी खरी जगते. माणूस या विलक्षण प्राण्याचा, विश्वाच्या या पसाऱ्याचा अंधुक पण खरा अर्थ उमगतो तो हे करताना आणि तो अर्थ उमगल्यावर मी एकटी होते, जवळचीही दूर होतात, पाश तुटतात. जिवाला कसले तरी पिसे जडते ... लिहीत नसते तर यातले काहीच झाले नसते. बधीरपणे, यांत्रिकपणे जगले असते, आणि एक दिवस आयुष्याशी ओळखदेख न होताच निघून गेले असते. पण लेखनामुळे आयुष्याशी ओळख झाली. माणूस आतून समजला; साध्यासुध्या घटनांचे विलक्षण अर्थ लागले; काही कोडी माझ्यापुरती तरी सुटली. एखादी गोष्ट जिवाला भिडू शकते म्हणूनच ना हे ज्ञान, ही उमज ?

—जिवाला असेच पुष्कळ काही भिडत असते. कविता भिडते, निसर्ग भिडतो. एकादा अशीच एका फ्रेंच कवीची To paint the portrait of a bird ही कविता वाचली. त्यानंतरचे दोन दिवस खुळ्यासारखे गेले. ज्याला त्याला ही कविता वाचून दाखवावी, तिच्या संबंधी बोलावे, कोणी फारसा प्रतिसाद दिला नाही तर हिरमुसावे. आयुष्यात त्या कवितेखेरीज दुसरे काही जग नाहीच !...... माझ्यावर असे चेटूक करणारी ही एकच नव्हे–आणखीही अनेक. कुठेही जातयेत असताना त्या नेहमी माझ्याबरोबर असतात, मनात पिंगा घालत असतात. कधीकधी कोलाहलातही हा पिंगा भर रंगात येतो. आणि अंगाला 'आत्मभाव' भिडतो. मग उरते फक्त मी. माझ्याखेरीज दुसरे काही नाही. ती कविताही जणू माझीच. मीच लिहिलेली. एकदा तिला माझी मानल्यावर तीही खुलते, आपली मनोगते मला सांगू

लागते. माझे समीक्षालेखन कशासाठी ? ही मनोगते ऐकण्यासाठी. तो पिंगा चालू असतो. ती मनोगते मी ऐकत असते, आणि मला वाटते की हे सगळे—ही तंद्रा, हे एकटेपण, ही प्रतीक्षा, हे ज्ञान, हा आस्वाद—हे सगळे फक्त माझे. दुसऱ्यांना त्यातून काही लाभ नसेल कदाचित; पण जे दुसऱ्यांना देता येत नाही, आणि जे दुसऱ्यांना घेताही येत नाही, असेही काही जवळ असावे. नाहीतर खूप काही मिळूनही माणूस रिकामाच राहतो. माझी ओंजळ भरलेली नसेल—पण निदान रिकामी नाही.

——माणसे जाणणे, कविता जाणणे—आणि निसर्ग जाणणे हा माझा नाद आहे. मला तांत्रिक ज्ञान कशाचेच नाही. पण एखाद्या झाडाचे नाव ठाऊक नसले तरी ते झाड माझ्याशी बोलते. मला त्याची विविध रूपे दिसतात. समुद्र पाहिला की खुलावते. शिलंधार पावसात उत्सुक होते. आणि हे सगळे भोगत असताना मी एकटीच असते. मनात एक सुंदर उदासी असते. एकदा या उदासीतच, आमच्या घरातून दिसणाऱ्या झाडीकडे पहात होते. भोवती अंधार होता. दिवे होते—पण ते फार दूर मनात आले,

झाडीपलीकडे लुकलुकणाऱ्या दिव्यांइतके हे आयुष्य——

माझ्यापासून दूर
दिवे : अनोळखी, तटस्थ,
त्यांचा परका आविर्भाव
मी माझ्यातच वसवला
एक अंधारा गाव.

—छे. हे चुकूनच घडलेले. मी कविता लिहीत नाही...पण तेच तर माझे दुःख आहे ! आपल्या कविता का जुळत नाही ?...पण जे घडावेच लागते— आणि घडत मात्र नाही, ते घडवणारी मी कोण ?.. मीच कमी पडत असेन. पण कधीतरी हे 'कमीपण' कमी होते. सुचत जाते. स्वतःचे वेगळेपण, उत्कटपण आटापिटा करून सांभाळत असताना, असे काही घडूनही जाते. मग एक सांगता न येणारा, आतआत झिरपत राहाणारा आनंद ! आनंदाचा डोह माझ्यापासून फार दूर आहे. तो आहे देहूला. मी मुंबईला. मध्ये कसले दळणवळण नाही. मग तेथे कशी पोचू ? पण त्या 'आनंदाच्या डोही' उठणारे 'आनंदाचे तरंग'च कधी कृपावंत होतात. माझ्यापर्यंत पसरतात.

...आभाळ अजून तसेच भरलेले आहे, आणि त्यात या तुकारामाच्या, केशवसुतांच्या आठवणी !... हे आठवत असूनही मी झपूर्झाच्या आनंदाच्या डोहाच्या गोष्टी बोलते आहे ! काय हे धाडस ! हे सगळे त्यांच्याइतके तीव्रपणे आपल्याला जाणवते का ?—— त्यांच्याइतके समर्थपणे व्यक्त करता येते का ?——हे प्रश्नसुद्धा हास्यास्पद आहेत. पण मला अधुकपणे, अधुरेपणे त्या जाणिवा होतात हेच मी फार भाग्याचे समजते......आणि त्यासाठीच मी माझे लेखन कधी थांबवणार नाही. अस्वस्थपणा असेल, तडफड असेल, स्वतःच्या क्षुद्रपणाची लाज असेल...पण या सगळ्यांशी टक्कर देत मी लिहीत राहाणार. मला शोधत राहाणार, मला बदलत राहाणार. हे करत असताना, 'हे सगळे कशासाठी ?' हा प्रश्न एकदाच नव्हे, वारंवार पडणार. कारण याचे दृश्य परिणाम नसतीलच. लोक हसतील, मीही हसेन——पण थांबवणार नाही. सगळ्या प्रश्नांची उत्तरे मिळालीच पाहिजेत असे कुठे आहे ? ——आणि ज्यांना उत्तरे नाहीत अशा कृती करू नयेत असे तरी कुठे आहे ? भरलेल्या आभाळाच्या पोटी फक्त प्रश्न असतात. म्हणून तर ते आपल्याला इतके बेचैन करते !

दोन कविता : पाब्लो नेरूदा

अनुवाद मनोहर चिंतामणि वझे

पावसातील घोडेस्वार

आदीम उदके, वृष्टीच्या भिंती, वृक्ष आणि पिके झोडपत,
भिजलेल्या, गळक्या क्रौर्याने पिंजलेल्या,
रात्रीच्या जाळ्यात आता तारा जुळलेल्या,
वारंवार आक्रोशत रानटी टिपटिप;
आकाशाला चिरत त्वेषाची कर्णरेषा,
घोडे चौखूर धावत सुगंधात न्हाऊन,
पावसाखाली, त्यास देत धडका,
अडवत त्यांच्या लाल केसांच्या शाखांनी,
पाषाण आणि पाउस;
घोड्यांच्या शरीरातून दुधाळ पिसाट वाफ,
पाण्याच्या सोबत, जणु फरार कवुतरे थिजलेली.
प्रकाश अजिबात नाही
पण बिकट हवामान व सरकत्या हरितपटाचे साठवण
आणि त्यांचे खूर सांधतात चपळ पृथ्वीशी,
पावसातील घोड्यांच्या पाशवी गंधाची काळक्षेप.
घोंगड्या, खोगिरे, चामड्यांचा गडद तांबडा रंगघोस,
जंगलास मापत, चोप देत, जळत गंधकी पाठींवर.

समोर, समोर, समोर, समोऽर, समोऽऽर,
पाऊस खाली झोडपत, घोडेस्वार,
कडू अक्रोडांच्या झाडाखालून जातात;
पाऊस पिरगळत आहे आपला नित्य गहू
थरथरत्या बारिक रेषात. प्रकाश पाण्यात आहे,
एक गोंधळलेली वीज ओतलेली पानांवर,
त्याच चौखूर नादावरोबर येत,
भूमीने जायबंदी केलेले पंखहीन पाणी.
ओले लगाम, शाखांचे घुमटाकार छत,
पाउलनादामागे पाउलनाद,
गोठलेल्या दवासारखे किंवा चंद्रप्रकाशासारखे,
रात्रसंबद्ध, फुटलेल्या ताऱ्यांचे वृक्षकळप,
चक्रवादळी घोडा,
बाणांनी झाकलेल्या निश्चल समंधाप्रमाणे,
कोपजन्य ताज्या हातांनी भरपूर,
जणु मोतीने घेरलेले प्रचंड सफरचंद,
भयावह ध्वज दाखवत, त्याचे महान राज्य.

* *

एर्सिला

अॅराउकोचे पाषाण व विलग जळपुष्पे]
मूळजन्म विस्तार,
भेटतात स्पेनहून आलेल्या इसमास.
त्याच्या चिलखतावर करतात हल्ला त्यांचे विराट लोचन
फर्नच्या छाया तुडवितात त्याचे खड्ग.
नुकत्याच अवतरलेल्या ग्रहाच्या शांततेवर
देशो आयव्ही ठेवते निळे हात.
अगा, प्रतिध्वनित एर्सिला, मी ऐकतो पाण्याचा घोष
तुझ्या आदीम पहाटेपाशी, पाखरांचा उन्माद
आणि झाडाझुडुपातील कडकडाट.

ठेव, ठेव तुझी तांबड्या गरुडाची पदमुद्रा,
घास तुझा गाल रानटी मक्यावर,
सर्व काही पृथ्वी गिळणार आहे.
अगा, तूच फक्त नाही पिणार रुधिरप्याला;
काळाचे गुप्त मुख येईल वृथा सांगण्यास
तुझ्यातून निपजलेल्या चपळ मेघांकडे
अगदी वृथा.
वृथा, अगदी वृथा, स्फटिकाने माखलेल्या शाखांत रक्त
वृथा चित्त्याची रात्र, सोजिराच्या चहाळास आव्हान देणारी
वृथा सारे हुकूम, जखमी माणसाची पावले वृथा.

सारेच परतत आहे पिसांच्या राजमुकुट शांततेत
ज्यात एक दूरचा सम्राट भक्षत आहे लतावेली.

* *

भग्नावशेषातील स्तोत्र

ऑक्तॅव्हिओ पाझ

अनुवाद मनोहर चिंतामणि वझे

आपला आपणच चढवून मुकुट
दिवस मिरवितो पिसारा.
उंच पिवळी आरोळी, निःपक्षपाती
हितकारक आभाळाच्या मधोमध !
सुंदर त्यांच्या नश्वर सत्यतेत देखावे.
समुद्र एक झगमगता अष्टपाद
चढतो किनाऱ्यावर, खडकांच्या कपारीत लोंबतो;
लालभडक जखम चमचमते पर्वतावर;
मुठभर कोकरे जणु दगडांचा कळप;
सूर्य टाकतो सोनेरी अंडे
आणि ओसंडतो सागरावर.
सारेच आहे ईश्वरमय.
मोडकळलेला एक स्तंभ
ओरबाडलेला प्रकाशाने
जीवनमृताच्या दुनियेत जिवंत अवशेष.

रात्र उतरते ह्या गावात;
मुले पीत चरस पिरॅमिडच्या छतावर,
वाजत आहे कर्कश गिटार.
कोणती औषधी वनस्पती कुठले अमृतजळ
देईल आम्हास जीवन ?
कुठून खणून काढू शब्द
स्तोत्र आणि संभाषण रचणारे—
आणि शहर आणि तागड्या ?
मेक्सिकन गीत फुटते शिवीत—
एक रंगीत विक्षता तारा,
देवघेवीची दारे अडवीत दगड,
पृथ्वी किडलेल्या भुईची घेते चव.

डोळे पाहतात, हात करतात स्पर्श.
इथे थोड्याशा वस्तु आहेत पुरेश्या.
आदिवासी अंजिरे, काटेरी प्रवाळरोपे,
टोपाची अंजिरे, पुनर्उत्थानवादी द्राक्षे,
शिंपले, मीठ, पनीर, मद्य, सूर्याची भाकर.
बेटातील मुलगी (शेलाटे गिरजाघर शुभ्र वस्त्रात)
पाहत आहे मला काळसर उंचीवरून.
किनाऱ्याच्या हिरव्या पार्श्वभूमीवर
असलेल्या लवणांच्या मिनारांसारखी
बोटींची पांढरी शिडे उठत आहेत
प्रकाश बांधत आहे प्रार्थनागृहे समुद्रावर.

थरथरत्या ज्वरात असलेली झाडेझुडपे
आभासमय आयव्ही, उंदरांचे थवे,
तुरळक वृक्षांची मंदाने झाकतात छाया.
अधूनमधून रक्तक्षयी सूर्य कुडकुडतो.
काल नगरे असलेल्या ढिगाऱ्यांचा आधार
घेत पॉलिफेमस देतो जांभई.
खाली, ज्वालामुखींच्या खळग्याखळग्यात
माणसांची एक झुंड आहे फरफटत.

पहायचे. स्पर्श करायचा प्रत्येक दिवसाच्या
देखण्या आकारास.
प्रकाश स्पंदतो, बाणांच्या आणि पंखांच्या रूपाने.
टेबलक्लॉथवरील मद्याच्या डागाला येतो रक्ताचा वास.
जसाजसा प्रवाळ पसरत आहे शाखा पाण्यात,
मी पसरवितो माझी इंद्रिये ह्या जिवंत काळात :
एकेक क्षण होत आहे धन्य पिवळ्या लयीत,
अहा मध्यान्ह ! गव्हाची लोंबी वजनदार पळांनी,
अनंताचा जणु ओसंडता चषक.
माझे विचार फाटतात, वळसे घेतात, गुंतून उगवतात,
पुन्हा सुरू होतात आणि शेवटी हालचाल हरवितात—
निर्मुख नद्या, सताड, डोळचाच्या सूर्यातळी रक्ताचे
त्रिभुजदेश.
का सगळा शेवट व्हावा ह्या किडक्या पाण्याच्या
शिंतोड्यात ?

दिवस, वाटोळ्या मुद्रेचा दिवस,
चोवीस खुंट्यांत नारंगी चमचमत,
नखशिखान्त एकच एक पिवळ्या गोडव्याने !
बुद्धि शेवटी अवतरते आकारात,
दोन प्रतिस्पर्धी अर्धांचा होतो समेट,
जाणीव दर्पण विरघळतो,
होतो पुन्हा एकदा झरा,
दंतकथांची झुळझुळ.
मनुष्य, प्रतिमांचा वृक्ष, शब्द आहेत जी फुले,
जी आहेत फळे
म्हणजे कर्म !

* *

दोन कविता : फेदेरिको गार्सिया लोर्का

अनुवाद मनोहर चिंतामणि वझे

१. सांडयोद्धयाच्या मरणाचा शोक

शिंगाने भोसकणे आणि मरण

पाच वाजता दुपारी
तंतोतंत पाच वाजता दुपारी
एका पोराने आणली सफेद चादर.
चुन्याची बादली होती तिष्ठत
पाच वाजता दुपारी.
अवशेष होते मरण केवळ मरण
पाच वाजता दुपारी.

वाऱ्याने पांगविला कापूस
पाच वाजता दुपारी.
भस्माने पेरले स्फटिक आणि निकेल
पाच वाजता दुपारी.
आता झुंज कबतर आणि बिबटयाची
पाच वाजता दुपारी.
उजाड शिंग घेऊन एक मांडी
पाच वाजता दुपारी
गंभीर खालच्या आवाजातील तारांचा आरंभ
पाच वाजता दुपारी.
धूर आणि सोमलाच्या घंटचा
पाच वाजता दुपारी.
कोपऱ्याकोपऱ्यावर मूकतेचे कळप
पाच वाजता दुपारी.
आणि सांड, विशुद्ध अभिमान
पाच वाजता दुपारी.
जेव्हा बर्फाचा घाम फुटून निघाला
पाच वाजता दुपारी.
सांडफड झाला ओतप्रोत आयोडीनने
पाच वाजता दुपारी.
मरणाने रोविली अंडी जखमेत
पाच वाजता दुपारी.
पाच वाजता दुपारी.
तंतोतंत पाच वाजता दुपारी.

एक सचक्र शवपेटी त्याच्या बिछान्यास
पाच वाजता दुपारी.
अस्थी आणि पावे नादत त्याच्या कानात
पाच वाजता दुपारी.
सांड डरकाळतो त्याच्या कपाळातून
पाच वाजता दुपारी.
दालन झगमगत यातनेत
पाच वाजता पुपारी.
तोवर महाकुष्ठ येते जवळ
पाच वाजता दुपारी.
लिलीची तुतारी त्याच्या हिरव्या ओटीपोटातून
पाच वाजता दुपारी.
जखमा जळलेल्या सूर्यासारखा
पाच वाजता दुपारी.
आणि झुंडीने फोडल्या खिडक्या
पाच वाजता दुपारी.
पाच वाजता दुपारी
हाय ते भयंकर पाच घडयाळात
सर्वच घडाळयात वाजलेले पाच
वाजलेले पाच अंधारात दुपारच्या !

सांडलेले शोणित

ते पाहणे मी नाकारतो !
चंद्रास सांगा येण्यास
कारण मी नाकारतो पाहण्यास
वाळूवर सांडलेले इग्नॅशिओचे शोणित.

ते पाहणे मी नाकारतो !

उघाडीत चंद्र.
निमूट ढगांचा घोडा,
स्वप्नाचा करडा सांडफड
ज्याच्या कटघरात आहेत विलोवृक्ष
ते पाहणे मी नाकारतो.
जळो माझी सय.
इवलीशी शुभ्रता असलेल्या
जाईला द्या तंबी

अनुक्रमणिका

ते पाहणे मी नाकारतो !
जुनाट दुनियेच्या गाईने
फिरविली आपली दुःखी जीभ
वाळूवर सांडलेल्या
रुधिराच्या मुस्कटावर;
आणि गुड्सँडोचे सांड
अर्धमरण, अर्धपाषाण,
भुई तुडवून कटाळलेले
करकाळले दोन शतकांसारखे.
नाही !

ते पाहणे मी नाकारतो !
मरण घेऊन स्वतःच्या खांद्यावर
इग्नॅशिओ पायऱ्या चढतो.
त्याने शोधिली पहाट.
पहाट नव्हतीच.
तो शोधतो स्वतःचा अटळ
बाजूने दिसणारा चेहरा
आणि स्वप्न तंद्राभंग करते.
त्याने शोधले स्वतःचे देखणे शरीर
आणि गवसले त्याचे उघड रक्त.
मला सांगू नका पाहण्यास !
कमजोर होत गेलेला उफाळ
नाकारतो मी भावणे;
तहानलेल्या झुंडीच्या
मखमलीवर व चामड्यावर
एकावर एक रचलेल्या आसनांचे
उंचवटे आणि खोल जागा
उजाळणारा उफाळ
कोण ओरडत आहे
की मी प्रगट व्हावे ?
मला सांगू नका पाहण्यास !

त्याने जवळ शिंगे पाहिली
तेव्हा मिटले नाहीत त्याचे डोळे.
पण भयंकर मातांनी
उचलली आपली डोकी.
आणि कुरणांच्या पलिकडे

गुप्त आवाज घुटमळले,
स्वर्गस्थ सांडांवर ओरडत,
निस्तेज धुक्याचे कळपाग्रणी.
सेव्हिल्‌मध्ये नव्हता एकही राजपुत्र,
ज्याची व्हावी तुलना त्याच्याशी,
त्याच्या खड्गासारखे नव्हते खड्ग,
किंवा त्याच्यासारखे धैर्यवान हृदय.
सिंहांच्या नदासारखी त्याची अद्‌भुत शक्ति,
संगमरवराच्या देहासारख्या
त्याच्या धोरणाच्या रेषा.
अँड्‌लुसीअन रोमच्या लकबीने
केला सोनेरी मुलामा त्याच्या मस्तकाचा,
जिथे त्याचे स्मित होते
इमानी तरबेज झुडुप.
अहा कसा भव्य पाय उतार !
सांडयोद्धा रिंगणात !
किती तलम पर्वतारोहक
खडबडीत डोंगर मालिकांवर !
किती हळुवार कणसांशी !
किती क्रूर टाचेचा !
किती नाजुक दवात !
किती झगझगीत जत्रेत !
संधिप्रकाशी अंतिम भले
घेऊन किती उज्वल !

पण तो आता अंतहीन झोपतो.
त्याच्या कवटीचे फूल आता
उघडते निर्धास्त बोटांनी
शेवाळ आणि गवत.
आणि त्याचे रक्त
आता येत आहे गात,
दलदल आणि कुरणातून गात,
घसरत थंड शिंगांवरून,
आत्महीन भटकत धुक्यातून,
अडखळत हजारो खुरांवर,
तारकांच्या मर्मकेंद्राजवळ
जणु काळीभोर दुःखरूप जीभ
घडविण्यास वेदनेचा डोह.

हाय शुभ्र स्पेनच्या भिंती !
हाय यातनेंचा काळा सांड !
हाय कठिण इग्नॅशिओचे रक्त !
हाय तुझ्या धमन्यांचा बुलबुल !
ते पाहणे मी नाकारतो !

दर्शनासाठी ठेवलेले कलेवर

वक्र पाणी किंवा गोठलेल्या चिनाराशिवाय
जिथे स्वप्ने आक्रंदतात असे कपाळ आहे पाषाण.
पाषाण आहे पाठ नेण्यासाठी काळ
ज्यास आहेत अश्रूंची झाडे व नाडे व ग्रह.

मी पाहिला आहे लाटांकडे धावता करडा पाऊस
उचलत त्यांचे सुकुमार जखमपूर हात
झपाटू नये विस्तारलेल्या पाषाणाने म्हणून
जो रक्त न शोषता खांडोळी पाडतो.

कारण पाषाण गोळा करतो वीजे आणि ढग
चंडोलांचे सापळे आणि पडछायेचे लांडगे;
पण आवाज, स्फटिक किंवा अंगार देत नाही
देतो भिंती नसलेले चौकच चौक, चौकच चौक.

आता घरंदाज इग्नॅशिओ पाषाणावर पहुडला आहे.
सर्व आता संपले. काय हो घडले ? पहा त्याची मुद्रा;
फिकट गंधके आहेत त्यावर पसरलेली मरणाने,
ठेवला आहे त्याच्या डोईवर नरभक्षक काळा दैवी सांड.

आता सर्व संपले. पाऊस खुपसतो त्याच्या तोंडात.
वेड्यासारखी हवा पळून जाते त्याच्या उतरत्या
वक्षापासून,
आणि प्रेम, बर्फाच्या अश्रूंनी भिजून चिंब,
होत आहे गरम कुरणांच्या शिखरांवर,

लोक काय म्हणतात ? दुर्गंधांची शब्दशून्यता,
विरघळत्या दर्शनार्थ कलेवरानजीक आहोत आम्ही;
चंडोलांनी व्हावे आकृष्ट अशा सुस्पष्ट आकृतीजवळ,
आम्ही पाहत आहोत तिला अपरंपार छिद्रांनी भरताना.

कोण पाडतो वळचा धुडक्यावर? त्याचे बोल खरे नाहीत.
इथे कुणीच नाही गात, कुणीच नाही रडत कोपऱ्यात,
कुणीच नाही खोचत टाच वा भेडसावत सर्प;
इथे पाहिजेत मला वाटोळी लोचने,
संभवनीय विश्रांती नसलेले शरीर न्याहाळण्यास.

मी पाहू इच्छितो कर्कश आवाजांची माणसे.
जी माणसे मोडतात हाडे आणि वळवितात नद्या,
ज्यांची हाडे वाजतात आणि जी गातात,
गारगोट्या आणि सूर्याने भरलेल्या तोंडाने.

मी पाहू इच्छितो इथे त्यांना. दगडासमोर.
ह्या लगाम मोडलेल्या कलेवरासमोर.
मरणाने गाठलेल्या ह्या नायकासाठी
दाखवून द्यावे त्यांनी मला बहिर्गमनाचे दार.

दाखवून द्यावा त्यांनी मला नदीसारखा शोक,
असेल जिथे मधुर धुके आणि चढावाचे किनारे
इग्नॅशिओचे शरीर नेण्यास आणि स्वतःस
हरवत सांडांचे द्वंद्वश्वास न ऐकता.

हरव स्वतःस वाटोळ्या चौकात चंद्राच्या
जो करतो बतावणी जेव्हा उदास स्तब्ध पशु,
हरवलेला जो मत्स्याच्या गानहीन रात्रीत
आणि गोठलेल्या धुराच्या पांढऱ्या गर्द झाडीत.

नका लपवू त्याचा चेहरा कपड्याने कारण
व्हावी त्यास सवय त्यांनी चढविलेल्या मरणाची.
जा, इग्नॅशिओ, दुर्लक्ष कर उष्ण डरकाळीकडे.
झोप, उड, आराम कर : समुद्र सुद्धा मरतो !

अनुपस्थित आत्मा

सांड तुला नाही जाणत, नाही जाणत अंजिर वृक्ष,
घोडे, तुझ्या घरातील मुंग्या, हे मूल
नाही तुला जाणत. ही दुपार सुद्धा नाही.
कारण तू सर्वकाळ मृत आहेस.

अनुक्रमणिका

बगडाची पाठ तुला जाणत नाही.
तू फिडतोस ते काळे रेशीमवस्त्र नाही जाणत.
तुझी मूक स्मृती नाही जाणत तुला.
कारण तू सर्वकाळ मृत आहेस.

घुश्याचे द्राक्ष, गुरगुटलेले डोंगर
पोकळ शिंगांचा शरद येईल.
पण कुणीच नाही बघणार तुझ्या डोळ्यात.
कारण तू सर्वकाळ मृत आहेस.

कारण तू सर्वकाळ मृत आहेस,
भूतलावरील सर्वच मृतांसारखा,
विसरले जातात जसे सर्वच मृत
अनुच्चारित श्वानांच्या ढिगाऱ्यात.

कुणीच नाही तुला जाणत. पण मी गातो.
तुझ्या मुद्रेसाठी, ऐश्वर्यासाठी सतत गातो.
राजस परिपक्वता तुझ्या प्रज्ञेची.
तुझी मृत्युक्षुधा व त्याच्या मुखाचा स्वाद.
तुझ्या पराक्रमी खुशहालीचे औदासिन्य.

बराच काळ लोटेल तुझ्यासम जन्मण्यास,
असा नेकदार साहससंपन्न अँडलुसीअन येण्यास,
रडव्या शब्दात गातो गा तुझी शोभा,
स्मरत आलिव्हराईतून वाहणारा उदास वारा.

* *

२. चंद्र येतो वर

जेव्हा चंद्र येतो वर
हरवतात घंटिका
खडतर वाटा
उगवतात.

जेव्हा चंद्र येतो वर
समुद्र आच्छादितो पृथ्वी
हृदयास वाटते मी स्वतः
अंनतातील द्वीप.

कोणीच नाही खात
संत्री पौर्णिमेत
हिरवी शीत फळे भक्षिणे
असते योग्य.

जेव्हा चंद्र येतो वर
शेकडो सारख्या मुद्रांनी
बटव्यात देते हुंदके
रजतद्रव्य.

* *

काल मारल्या गेलेल्या प्रत्येकासाठी गाणे

डेव्हिड वॅग्नर अनुवाद जयंत देवधर

अजून काहीच गमावले नाहीस तू :
एक पहाट, एक न्याहारी, थोडेसे हवापाणी,
अनामिक पाखरांचा चिवचिवाट,
कदाचित थोडे घरकाम, डागडुजी,
किंवा झटपट विक्री.
वृक्ष अजून आहेत त्याच रंगाचे
तोच आहे अजून महापौर,
आमच्याकडे खाण्यासाठी नाही काही विशेष बेत
तिचे कुणीही नाही घेतले अजून चुंबन
वा नाही कोणी केली त्याची शय्यासोबत
आमची सामान्य आयुष्ये
गुणगुणत, खडखडत
झाली आणखी एका पहाटेतून पसार

पण पळभर आम्ही केलाच पाहिजे विचार
की तुला कसे दिसावे, काय करावेसे
वाटले असते
अजून तुझा विचार करताना
कोणी नाही विसरला त्याला आठवावेसे वाटले ते.
तुझे मरण–तरारलेल्या भाजीसारखे
ताजे–ओळखीचे पण चकित करणारे
कौतुकास्पद पण अजून उपयुक्त नसलेले–
आणि तुझ्या सारखा आहेस तूच

तुझे काय करावे
अजून नाही कळले आम्हाला.

तू जाणतोसच मरण नसते येत एकाएकी
काही माणसे, माझ्यासारखी
अजून वाहतात तुला आपली गाणी
कारण
अधिक चांगले नसते आम्हाला ठाऊक
आणि असे जे काही आम्ही तुजबद्दल गातो
–जे कुणाला स्वप्नातही नसते वाटले गावेसे
त्याचा तुला विश्वास पटावा
: आठवते तुला जेव्हा तू चुकला होतात ?
आणि बरोबर होतास.
हे आणखी थोडे सांत्वन
आगी तितक्याच लवकर विझतात
जितक्या त्या पेटतात.
त्या संपतात आपणास जाणवण्यापूर्वीच
अपघातासारख्या—

वाटेल तुला कदाचित की
तुझा उद्धट अवसानघात झाला
अति निर्वाणीच्या क्षणी मधूनच तोडला गेलास
आणि कदाचित असशील तू बरोबर आज
पण उद्या तसे नाही वाटणार कुणालाच.
आज लक्षावधी किरकोळ घटनांनी घडलेला
जणू इथून क्षितिजापर्यंत पसरलेल्या काटक्या-दगडांचा.
काय गमावणार आहेस तू ?
आमचा कार्यक्रम दिनदर्शिका फक्त.

येता आठवडा अगर येते संवत्सर
तू गमावू इच्छिल्या नसत्यास अशा
छोट्या घटनांचा विचार करण्यास फार तोकडा काळ
घटना : विचित्र, प्राणार्पणही केले असतेस तू
कदाचित ज्यांच्यासाठी
उदाहरणार्थ प्रेम
किंवा मेंदूची कवची पेटविणारे;
थक्क करणारे, ते अटळ क्षण
ज्यांच्या स्वागताची देत होतास आश्वासने तू
ते पूर्वीइतकेच आहेत
अजूनही दूर–दूर.

* *

खोड : ज्योत्स्ना पांडुरंग दीक्षित

नागमोडी तुझी भाषा
    कशी मला आकळावी
माये झाले पाषाणाचे
    चेतवेना काही काही—
थंड चांदण्याची वाटी
    खुल्या ओठांना लागता
किरणांच्या आसुडाचे
    वळ निवळती आता.
पेड सुटले स्पर्शाचे
    देहफूल हुंगवेना
कळलाव्या चांदव्याची
    खोड मला उमगेना !

* *

डोळेभेट : वसंत बापट

अनोळखी देशाची आटपाट राजधानी.
दुथडी वाहणारा दुधारी राजरस्ता
सभोती गर्दीची बेगुमान वर्दळ
मध्ये मी. एकटा. अनेकांत एकाकी.

अनोळ्या रंगाचे असंख्यात डोळे
तल्लख आदिवासी तिरकमठे रोखलेले
सहज शत्रुत्वाच्या शिळेवर पाजवून
आदिम संशयाच्या विषाने माखलेले.

जळणारे जाळणारे असंख्यात डोळे
घेरणाऱ्या वणव्याच्या ठिणग्यांची बुबुळे...
थरथरत्या काळजांच्या टिपणाला टपलेले
ठिपक्या ठिपक्यांचे महाकाय बिबळे !

माझे दोन्ही हात अदृश्य वर करून
बेफिकीर स्मिताचा घेतला मी आडोसा
तेवढ्यास कोठूनसा तरंगत आला हा
आश्वासन देणारा चंद्राचा कवडसा.

डोळ्यांच्या रानातच अचानक उगवली
दोन विशाल डोळ्यांची लाजाळू पाने
माझ्या डोळ्यांचे दूरस्थ चुंबन घेत
थरारली फडफडली संजीवक हर्षाने.

* *

अनुक्रमणिका

भावगीत यशवंत देव

त्या बकुळ वनातुन सांगत आला वारा ।
कुणि मत्त मयूरी निघे निळ्या अभिसारा ।।ध्रु०।।

चमकत्या विजांचा पाउस लेवुन अंगी ।
ती सचैल न्हाली इंद्रधनूच्या रंगी ।
मेघांनी केला गगनातून पुकारा ।
कुणि मत्त मयूरी निघे निळ्या अभिसारा ।।

आंधळ्या दिशांचे वादळ भरे नसात ।
लय आतुरतेची व्याकुळल्या कंठात ।
भावार्त सुरांनी आळवीत मल्हारा ।
कुणि मत्त मयूरी निघे निळ्या अभिसारा ।।

हाकेसह घुमले पयोधरांचे नाद ।
संकेत हेच, हे प्रीतीचे पडसाद ।
सावरीत लगबग थरथरत्या शिणगारा ।
कुणि मत्त मयूरी निघे निळ्या अभिसारा ।।

* *

मोर वा. रा. सोनार

एका सावळ्या मुलीला सावल्यांच्या साक्षीत
दिलेली सायलीची फुले
तिचा अभिसार दरवळतानाच कसे
सांजेच्या डोळा पाणी आले
याच हातांनी सावरून आणले तिला
मीच घरावाहेर भर रस्त्यावर.
अशा किती पावलांचे चटके कोवळ्या
झेलणाऱ्या उद्दाम वाहूवर.
कहाणीला आपल्या येणाऱ्या धृपदासरखं
गुल्मोहरांचे हुंकार उमाळे
सोडवून घेतानाच कसे शेवटचे
अंतःकरणाहून जड झाले तळवे.
गर्दीत हरवली अशी की
माझे प्राण घुमसटले श्वासात.
आता आठवणींसाठी मोर सोडलेत
मीहि अंगावरून भर रस्त्यात !

* *

एक कविता नामदेव लक्ष्मण ढसाळ

वास्तविकाची वाळवी फुलारत सस्वरूप
सप्तर्षी वडवानल घेऊन खांद्यावर
आम्ही नांदवतो फ्लूट गवताचे

वीर्यदानावर हुकूम जवळीकतो सहजासहजी हमामखाने
व्यभिचार पडताळून
देवांचे काळवंडलेले सद्गुणी FORMS
आम्ही स्वच्छवतो झंझावती केरसुणीने

चुंबन घेऊन स्वतःतल्या पहिलारूपणाचे
अंगिकारून कवाकडचाच्या मानवशी
हद्दपार मिरवतो बार्शिंगातून
उच्छवासासह सामावतो काळ्या समुद्राच्या अंतःकरणात
ज्याच्या पोटातले पाणी जोखता जोखता
होतो लांछनाहून हीनदीन

आमच्या डोळ्यातले आदिवासी शिल्पकाम
कुठल्याही माणसाला. टांगेवाल्याला. दिव्याच्या खांबाला
रस्त्याला. इमारतीला. वाचता येत नाही
७० M. M. मध्यही
आम्ही कर्पूरी अंगाने आल्यागेल्याच्या
तळव्याखाली जाऊन होरपळतो
दे माय धरणी ठाय

* *

शिळा वसुधा माने

स्वयंपाक घरात बसलेल्या सरलेच्या कानी बाहेरचं दार वाजल्याचा आवाज आला. आणि मघाचपासून आकसलेला तिचा जीव एकदम मोकळामोकळासा झाला. शरद ऑफिसांत गेल्याची खूण होती ती. निदान संध्याकाळी पाच वाजेपर्यन्त तरी निश्चिती झाली.

एक सुस्कारा टाकून ती डायनिंग टेबल–जवळून उठली. अर्धवट निवडलेली भाजी तिनं तशीच पडू दिली. एक कप चहाचं पाणी गॅसवर चढवलं. बाथरूममध्ये जाऊन खळा खळा चुळा भरल्या. तोंडावर पाण्याचे हबके मारले. थोडंसं ताजंतवानं झाल्यासारखं वाटलं तिला.

चहा घेता घेता तिनं स्वयंपाक घराच्या खिडकीतून बाहेर नजर टाकली. शेजारच्या इमारतीचा सांगाडा पुरा झाला होता. आणि हळू हळू ती आकार घेत होती. पूर्वी दिसणारे गर्द हिरव्या वनराजीचे, डेरेदार आंब्याच्या झाडांचं जिवंत दृश्य हळू हळू नजरेआड होत होतं. रोजच्या रोज ते पाहाणाऱ्या सरलेला आजही नेहमीप्रमाणे स्वत:लाच कुणीतरी जिवंत चिणल्यासारखं झालं. तिचे डोळे चुरचुरू लागले. कडांशी पाणी साठलं. पण दुखऱ्या मनाला मलमपट्टी करायला तरी तिच्यापाशी वेळ कुठं होता ? पाचपर्यन्त बारीक सारीक सुद्धा काम आटोपून, जमल्यास थोडी झोप काढून अंगात थोडी ताकद जमवणं आवश्यक होतं. शरद सकाळी जेवूनही गेला नव्हता. नशीब की मुलं सकाळीच शाळेत गेली होती. पण असंच सारखं चालत राहिलं तर मुलांपासून तरी कसं लपवून ठेवायचं ?

रात्रीचा कुकर तयार करून, आंघोळ आटोपून सरल बेडरूममध्ये आली तेव्हा घड्याळात दीड वाजला होता. कोणत्याही क्षणी मुलं येतील. थोडा वेळ पडण्यात अर्थ नव्हता. खरंच ती फार थकून गेली होती. कसंबसं पातळ गुंडाळून तिनं मुलांची ताटं ठेवली. पाणी ठेवलं. अन्न मध्ये ठेवलं. आज मंगलला वाढायला सांगून स्वत: झोपायचं तिनं ठरवलं.

बेडरूममध्ये येऊन ती आडवी झाली. दुखऱ्या डोळ्यांना पापण्यांचं पांघरूण घातल्यावर तिला फार फार बरं वाटलं. कानशीलाच्या तडतडणाऱ्या नसा थोड्या कमी तडतडू लागल्या. एक प्रकारची गुंगी तिच्या मनावर शरीरावर पसरू लागली.

एवढ्यात कर्कश घंटीनं ती दचकून जागी झाली. मुलं असतील म्हणून घाईघाईनं जाऊन तिनं दार उघडलं. आणि आश्चर्यानं खिळून ती स्तब्ध झाली. तिची टाळू सुकली. दारांत शरद उभा होता. तिला ढकलून तो आत आला. मागं वळून त्यानं दाराला कडी घातली. संथपणं तो बैठकीच्या खोलीत गेला. हातातली ब्रीफ केस त्यानं टेबलावर ठेवली. बाथरूममध्ये जाऊन हातपाय तोंड धुतल मुकाट्यानं तो जेवणाच्या टेबलाशी जाऊन बसला.

अजून काय बोलावं ते सरलला सुचत नव्हतं. यांत्रिकपणे तिनं वाढायला सुरुवात केली. त्याची एक पोळी खाऊन झाल्यावर ती स्वत:शीच बोलली, " मुलं आली नाही कशी अजून ? "

" मुलं येणार नाहीत ", अचानकच धारदार आवाजात उत्तर आलं.

" म्हणजे ? ", तिच्या शब्दात भीती ओतप्रोत भरून राहिली होती.

" मी त्यांना आजोळी सोडून आलोय " पाण्याचा पेला खाली ठेवत शरद म्हणाला. " आईना सांगितलं की मी व सरल सिनेमाला जाणार आहोत. "

अनुक्रमणिका

" पण...पण... तिला काय बोलावं ते सुचेना. ती मांडलेली ताटं बघून उगीचच तिच्या डोळ्यांत पाणी आलं.

" तुला एकंदरीत अभिनय छान करता येतो हं. मी मेल्यावर विधवा झालीस की फटफटीत कपाळानं कशी रडशील ते दिसून आलं. पण मी अजून आहे. कृपा करून कपाळाला कुंकू चिकटवा ".

कानावर हात घेऊन सरल लटलटा कापत उभी होती. तिला आता कुठं या भडिमाराचा अर्थ कळला. धावत ती बेडरूममध्ये गेली. कपाळावर गंध लावून त्यावर तिनं पिंजर टेकवली आणि पुन्हा जेवणघरात जाण्याऐवजी पलंगावर बसकण मारून ती ढळढळा रडू लागली.

गेला महिनाभर हे अस्सं चाललं होतं.

नेहमीच्या इतर दिवसांसारखाच तोही दिवस उजाडला. नेहमीप्रमाणंच सकाळच्या प्रहरी सरलची धावपळ सुरू होती. मुलं शाळेत गेली होती खरी, पण त्यांनी घालून ठेवलेला पसारा तसाच पडला होता. त्यातच स्वत:ची आंघोळ, शरदचं दाढीचं पाणी, त्याचं इतर सामान मांडणं; कपडे तयार ठेवणं या रोजच्या कामात आणखी एक काम वाढलं होतं. शरदच्या बुशशर्टाचं बटन तुटलं होतं ते लावायचं होतं. गडबडीत सुई बोचली त्याची कळ मस्तकापर्यंत पोचली ती तशीच सोसून दोरा सुईत ओवत ती बेडरूममध्ये बसली होती.

एवढ्यात तिला शरदची हाक ऐकू आली,

" सरल, ए सरल. "

तो असाच क्षुल्लक कामाला तिला हाका मारायचा. समोर हाताच्या अंतरावर असलेलं पुस्तक किंवा सिगारेटचं पाकिट किंवा ॲश ट्रे द्यायसाठी त्याला सरल हवी असायची. तेवढ्यासाठी तो घायकुतीला यायचा. नुसतं ' आले आले ' एवढ्यानं तो थांबत नसे. ती प्रत्यक्ष समोर दिसेपर्यन्त त्याचा आरडा-ओरडा थांबत नसे. पण आजच्या त्याच्या आवाजात निव्वळ घाई नव्हती. वेदना होती. आणि अमाप रागाची वाफ कोंदटली होती. तिचा भपकारा सरलला लगेच जाणवला. हातातला सुईदोरा तसाच टाकून ती दाराकडं वळली. इतक्यात शरदच तिथं आला.

त्याच्या हातात एक पत्र होतं. ते तिच्यापुढं धरून ठासलेल्या सुरुंगासारख्या आवाजात म्हणाला, " हे वाच. "

" कुणाचं आहे ? " हातातल्या पत्रावरच्या अक्षराकडं पहात सरलनं विचारलं, " अक्षर काही माझ्या ओळखीचं दिसत नाही.

" अक्षर नसू दे ओळखीचं, मजकूर ओळखीचा आहे का सांग. " पूर्वीच्याच आवाजात शरद म्हणाला.

" आता ? यावेळी ?, " सरल आश्चर्यानं म्हणाली, " अहो पण हे बटन लावायचं आहे आणि··· " पण तिचं वाक्य अर्धवटच राहिलं. कारण संतापानं फुललेल्या शरदनं तिच्या हातातला बुशशर्ट ओढून घेऊन कोपऱ्यात भिरकावून दिला आणि सळसळणाऱ्या आघणाच्या शब्दांत तो म्हणाला, " बटन गेलं खड्डुयात आणि मीही गेलो त्याच्याबरोबर. सालं सगळ्या आयुष्याला आग लागयची वेळ आलीय. ' यावेळी ' म्हणून विचारते वर तोंड करून ? हलकट कुठची! जातीचीच हलकट. "

अचानक झालेल्या त्याच्या त्या रुद्रदर्शनानं सरल भांबावून गेली होती. शेवटचे अपशब्द कानावर पडतांच ती ताठ झाली. तिचे डोळे आग ओकू लागले. इतका वेळ हतबुद्धपणे शरदकडे पाहणारी तिची नजर बदलली. तो बदल शरदलाही जाणवला. पण म्हणून त्याचा पवित्रा मुळीच बदलला नाही. काही न बोलता त्यानं पुन्हा त्या पत्राकडे बोट दाखवलं.

अपशब्दांच्या माऱ्यानं आणि अपमानाच्या जाणीवेन कासावीस होणारं अंत:करण दाबून सरलनं ते पत्र वाचायला सुरुवात केली. पहिल्या चार ओळी वाचल्यावर तिच्या चेहऱ्यात एकदम फरक झाला. तिनं आधी सही बघितली. नुसतंच " तुमचा एक हितचिंतक."

मग तिनं उरलेलं सगळं पत्र वाचलं. शरद तिच्याकडं तसाच रोखून पहात उभा होता. त्याला ते पत्र देत ती हळू स्वरांत म्हणाली, " हे घ्या." पण हात पुढं न करता नजर तशीच ठेवून तो म्हणाला, " मला याचा खुलासा पाहिजे."

इतका वेळ शब्दांचा मार निमुटपणे खाणा-या सरलनं प्रथमच तिरमिरुन उत्तर दिलं,

" विचारा जाऊन तुमच्या त्या हितचिंतकालाच."

दोन्ही दातकड्या एकमेकांवर घट्ट दाबून धरून चिणलेल्या स्वरात शरद म्हणाला, " अग ऽऽ तुझ्या

घेरांचा आणि हलकट चाळयांचा खुलासा मी त्याला विचारू म्हणतेस ? तुझ्यासारखी बेशरम बाई जगात तरी सापडेल का ? मोठी साळसूदपणे सात्विक संताप दाखवतेस !"

सगळा प्रकार असह्य होऊन सरल केविलवाणेपणे म्हणाली, "हे बघा, काही नसताना उगीच भोई धोपटू नका. मी सांगते ते तरी ऐका."

"सांग, सांग. तेच मी मघापासून म्हणतोय" शरद पिसाळून ओरडला.

"हे बघा, प्रथम नीट लक्षात घ्या. हे पत्र साफ खोटं आहे." सरल.

"कमाल आहे तुझी ? अग तो पत्रलेखक तुझं माहेरचं नाव, शाळा, सगळं व्यवस्थित लिहीतो. तू कुणा-बरोबर कधी कसली साडी नेसून कोणत्या सिनेमाला गेली होतीस हे लिहितो......"

त्याचं वाक्य अपुरंच ठेवून सरल मध्येच म्हणाली, अहो, पुष्कळ वर्षांनी रंगूनच्या गोदू आत्याचा मुलगा आमच्याकडे आला होता. त्याच्या बरोबर मी गेले होते सिनेमाला. त्याचं तुम्ही एवढं वाघोरं काय करताय?"

"म्हणजे तू सिनेमाला गेली होतीस हे खरं ना ? तिला शब्दात पकडत शरदनं विचारलं.

"हो, पण... मान हलवत सरल म्हणाली. पण तिचं वाक्य पुरं न ऐकता शरद तिरसटून म्हणाला, "मग झालं तर, एक चांगली भली भक्कम गोष्ट खरी-खुरी लिहिली असतानाही जी बाई शांतपणे सगळं पत्रच खोटं म्हणते ती बाकीच्या स्वत: विरुद्ध जाणाऱ्या गोष्टी खऱ्या म्हणून सांगेल कशी ? पुरे. काही नको खुलासा. शरदनं रागारागानं कपाट उघडलं. हाताला लागला तो शर्ट अंगावर चढवला. कुठली तरी पॅन्ट चढवली. पैशाचं पाकिट खिशात टाकलं आणि स्वत:च्या अवताराबद्दल कसलीही फिकीर न करता तो बाहेर पडला.

आणि मग अशाच तऱ्हेचे समरप्रसंग रोज झडू लागले. मुलं काही अगदीच लहान नव्हती. ती कावरी-बावरी व्हायची. अभ्यासाचं पुस्तक पुढं ओढून एक-मेकांना बिलगून बसायची.

एकदा शरद ऑफिसातून आल्यावरही सगळं ठीक चालू होतं. कधी नव्हे तो, तो सरलशी नीट बोलत होता. एक दोन विनोद करून ती दोघं हसली सुद्धा. आठ साडे आठ पर्यंत हवा अशी निरभ्र होती. मग कधी कोण जाणे ढग जमू लागले. प्रसन्नता मावळली. मुलांनी जेवायला सुरुवात केली आणि शरद पानावरून उठला. बेडरूममध्ये गेला आणि तिथूनच सरलला म्हणाला, 'मुलांचं होऊ दे ग, मी जेवणार नाही मला भूक नाही.'

खरं म्हणजे ती नेहमी अशा वेळी गप्प रहायची. पण मघाच्या निश्चित वातावरणाची साय अद्याप तिच्यावर रेंगाळत राहिली होती म्हणून ती म्हणाली, "बरं तर. आपण नंतर जेवू."

पण शरदनं फक्त पहिले दोनच शब्द ऐकले आणि तो चवताळून ओरडला, 'तूं बायको थोडीच आहेस माझी, मला भूक नाही याची काळजी करायला ?' बोलता बोलता त्याचा संताप वाढत गेला आणि गंजि-फ्रॉक पायजम्यानिशी तो चपला सरकावून बाहेर पडला. मुलं भेदरून गेली त्यांना चुचकारत ती म्हणाली, 'बाबाच्याकडं लक्ष देऊ नका हं. येतील ते आता.'

पण तिचा स्वत:च्या स्वरांवर, शब्दांवर विश्वास नव्हता.

मुलं जेवून झोपी गेली. सगळे दिवे मालवून ती हॉलमध्ये येऊन बसली. वरचेवर तिचे डोळे घड्याळा-कडं वळत होते. साडे बाराचा ठोका पडला आणि बेल वाजली.

तिनं दार उघडलं. शरद मुकाट्यानं आत आला. हातपाय धुण्यासाठी तो बाथरूममध्ये गेला. तेवढ्यात तिनं अन्न गरम केलं, मुक्याचं व्रत घेतल्यासारखा तो तोंडातून ब्र न काढता जेवला. मागची सगळी झाका-पाक करून सर्व स्वीचीस ऑफ करून ती बेडरूममध्ये आली.

चांदण्याचा भला मोठा झोत खोलीत पडला होता. बिछाना त्यात न्हाऊन निघाला होता. हा दुर्दैवाचा फेरा सुरू होण्यापूर्वीच्या अनेक रात्री सरलच्या डोळ्यांसमोरून गेल्या. अगदी अगदी हट्टी होता शरद ! मुलुखावेगळ्या कल्पना प्रत्यक्षात आणा-यचा हट्ट धरायचा !!

'कसला विचार करतेस सलू ?' शरदच्या त्या अनपेक्षित प्रेमळ शब्दांनी सरल सरल राहिली नाही. खूप मार खाल्लेलं, खात असलेलं मूल जसं शेवटी आधा-राला मारणाऱ्या आईलाच बिलगत तशी ती एकदम

शरदच्या बाहुपाशात शिरली आणि स्फुंदून स्फुंदून रडू लागली. इतक्या दिवसांच्या साचलेल्या दु:खाला वाट फुटली. काही न बोलता शरद तिला थोपटत राहिला. कुशीवर वळून त्यानं तिचे डोळे ओठांनी टिपले. शिपलीतले सारे मोतीदाणे अलल्द त्याच्या ओठांत ओघळले. तिच्या भोवतालचा त्याचा विळखा आणखीच घट्ट झाला. एकाएकी तिच्या कुशीत शिरत तो आवेगानं म्हणाला, 'सलू, सलू मी पोरका आहे ग तुझ्याशिवाय. पोरका आहे.'

सरलला ती रात्र समेटाची वाटली. घेतलं असेल काही वेड डोक्यात; पण उगीच कुणीतरी काही पत्र लिहिलं म्हणून शरद काही सारखी डोक्यात राख घालून घेणार नाही. इतका दहाबारा वर्षं संसार झाला त्याची पुण्याई काय फुकट जाईल ?

आणि ही भावना बळावत जावी असंच शरदचं वागणं चालू झालं. नाटकसिनेमा, थट्टामस्करी, फिरणं पुन्हा पहिल्यासारखं चालू झालं. मात्र मध्येच शरद आपल्याकडं निरखून पाहात असावा अशी शंका सरलला यायची. पण तिकडं तिनं दुर्लक्ष केलं.

असा जवळजवळ महिना गेला. मुलं गावात असलेल्या आजोळी गेली होती, शरद व सरल बाहेरून फिरून आली होती. खाणं बाहेरच झालं होतं. सगळ्या घरात शांतता होती.

सरल कानांगळ्यातलं काढून ठेवत होती. पलंगावर बसलेल्या शरदकडं तिची पाठ होती. शरदचा आवाज आला,

'सरल, एक विचारलं तर सांगशील ?'

'होऽऽ. इश्श त्यात परवानगी कसली विचार-तोस ?' मान मागं न वळवता ती म्हणाली. खुशी आनंद स्वरांना गुदगुल्या करत बाहेर पडले.

पुन: शरदचा आवाज आला, 'खरं सांगशील ?'

सरल गर्कन् मागं वळली. पुढच्याच क्षणी पाठी-वर कोसळणारा आसूड दिसावा तशी तिची चर्या झाली. अधिक वेळ न दवडतां शरदनं विचारलं.

'ते पत्र खरं ना ?'

केवळ मानेनं सरलनं 'नाही' म्हटलं.

आणि इतके दिवस न घडलेलं घडलं. आवेगाने शरद उठला आणि पांढऱ्या फिकट पडलेल्या सरलच्या फाडकन् मुस्काटीत मारली. त्या अनपेक्षित प्रहारानं प्रथम तिच्या तोंडून एक किंकाळी निसटली पण लगेच तिनं तोंड दाबून धरलं.

तिच्याकडं तिरस्काराची एक जळजळीत नजर टाकून त्यानं आपली उशी व चादर उचलली आणि हॉलमधल्या कोचावर स्वत:चं अंथरुण केलं. अंधारात अखंड जळणारी सिगरेट त्याचं जागतं अस्तित्व जळ-जळून दाखवत होती.

भयानं विस्फारलेल्या डोळ्यांनी सरलनं शरदची ती वागणूक वघितली. तिला रडू सुचेना की देव आठवेना. मनातल्या मनात आक्रोश करून ती म्हणू लागली.

'हे काय भलतंच माझा नवरा डोक्यात घेऊन बसलाय ? शाळेत खालमानेची म्हणून ज्या माझा लौकिक होता तिच्यावर प्रेमप्रकरणाचा आरोप यावा ? आणि ते सुद्धा भलत्या थरापर्यंत गेलेलं ? आता हे खोटं तरी कसं शाबित करू ? आई भावापुढं माझी बेअब्रू मांडू ! या सगळ्या तमाशात मुलं काय समज करून घेतील ?

मुलांची आठवण होताच सरलच्या डोळ्यांना धारा लागल्या. हुंदके गळ्यांत दाटत होते. पण आवाज करायला भीती वाटत होती.

दुसऱ्या दिवशी मुलं आली. घर भरलं. त्यांच्या चिवचिवाटानं सुतकीपणा गेला. दिवस ठीक गेला, संध्याकाळ भीतीची सावली घेऊन सरलच्या हृदयात शिरली.

पण शरदनं प्रश्न सोडवला. जेवताना बाह्या-त्कारी शांत स्वरात तो म्हणाला.

'हे बघ सरल, मला ऑफिसचं काम करायचं आहे. दिवा जास्त वेळ ठेवावा लागेल. तू आज तुझं अंथरूण मुलांच्यात घाल हं ?'

सरलनं मान हलवली.

मुलं एकदम खुशीत आली. 'आई, आज गोष्ट सांगशील ना ?' 'आई तोंड माझ्याकडं हं.' 'आई, मग उद्या माझ्याकडं ? असा किलबिलाट चालू झाला. सरलच्या अंत:करणात आवाज उठत होता.

'माझ्या चिमण्यांनो, अरे ही माझी हद्दपारी आहे. न बोलता, जगाला दिसण्यांत न येणारी शिक्षा आहे ही.'

मुलं झोपली. पण सरलच्या डोळ्याला नीज शिवेना. इतक्यात शरदची हाक ऐकू आली. चटकन उठून ती खोलीशी गेली.

तिची चाहूल लागून त्यानं वर पाहिलं. त्याचे डोळे लालसर झाले होते. चेहरा ओढला होता. सरलचं हृदय भरून आलं.

शरद तिला म्हणाला, 'ये बैस.'

पलंगाच्या एका टोकाला तो बसला होता. दुसऱ्या टोकाला ती बसली. तो शांत आवाजात बोलू लागला, 'हे बघ, मी खूप विचार केला. पण तू न् मी एकत्र राहू शकू असं वाटत नाही मला. दिवसेंदिवस मला तुझा जास्त तिटकारा येत चाललाय. शिवाय माझी मुलं आहेत. त्यांच्यावर माझं प्राणापलिकडे प्रेम आहे. त्यांच्यावर भलतेसलते संस्कार होऊ नयेत असं मला मनापासून वाटतं तू माझ्या घरात राहू नयेस, म्हणजे, लगेच उद्याच जा असं माझं म्हणणं ना... अरे सरल सरल...'

बसल्या जागेवरून मूर्च्छित होऊन सरल खाली कोसळली होती. स्टुलावर ठेवलेला पाण्याचा तांब्या घेऊन शरदनं तिच्या चेहऱ्यावर मस्तकावर पाणी मारलं.

सरल हळू हळू शुद्धीवर आली. पडल्या पडल्या पुढं सरकून तिनं शरदचे पाय धरले आणि अश्रूंच्या शब्दांनी ती बोलू लागली.

' मी कुठं जाऊ ? आज दहा बारा वर्षं संसार झाला. काय वावगं दिसलं माझ्यात तुम्हाला ? अहो, सीतेला निदान रानात तरी सोडली होती. जनात, आप्त-स्वकीयात मला घरातून काढून देता ती काय म्हणून ? कोणता तरी काल्पनिक कलंक माथी मारता ? ज्या मुलांसाठी तुम्ही मला ही शिक्षा देता त्यांच्याच हितासाठी मी प्रार्थना करते, मालकीण म्हणून नव्हे तुमची मोलकरीण म्हणून रहाते. पण घरातून जा म्हणू नका मला.'

तिच्या आसवांनी त्याचे पाय धुतले जात होते. आणि लोकाराधनेचं ब्रीद सांगणाऱ्या श्रीरामाच्या जातीच्या मस्तकावर आणखी एका पापाचा बोजा वाढला होता.

या अंकात व्यक्त झालेल्या मतांशी विदर्भ साहित्य संघ, संपादक व सल्लागार मंडळ सहमत असतीलच असे नाही.

वि. सा. सं. च्या सभासदांना 'युगवाणी'चा अंक पाठविला जातो. ज्या महिन्यापासून सभासदत्व स्वीकारले जाईल त्या महिन्यापासून पुढील उरलेल्या आर्थिक वर्षाच्या काळात निघणारे अंक पाठविले जातील.

केवळ युगवाणीचे वर्गणीदारांकरिता वार्षिक वर्गणी रु. १० फक्त. एका अंकाची किंमत दीड रुपया.

स्वर्णशृंग : अरुण भिकाजी कुळकर्णी

[स्टेजचे दोन प्रमुख भाग. मागल्या भागात एका डोंगराळ भागाचा देखावा. आजूबाजूला झाडे-झुडपे. मध्यभागी एक ओबडधोबड मातीचा चौथरा. चौथऱ्यावर एक उंच पीळदार माणूस झोपला आहे. हा मेंढपाळ, जटा आणि दाढीमिशा भरपूर वाढलेल्या पण डौलदार, कंबरेपासून वरचा भाग उघडा, खाली आखूड धोतर, डोक्याला कपाळापासून गाठ मारलेला पटका, कमरेला आडवी लाकडी बासरी खोचलेली आणि हाती एक उंच काठी, असा मेंढपाळ उठून उभा राहिल्यावर दिसावा. स्टेजचा समोरचा अर्धा भाग, अगदी साधा. डावी–उजवीकडे प्रवेशद्वार. समोरचा भाग हा मागच्या भागापेक्षा बराच सखल आहे. त्याप्रमाणे ह्या दोन भागांना वेगळा करणारा एक अतिशय पारदर्शक पडदा स्टेजचे मध्यभागी आहे. दूर क्षितिजावर उगवतीचा प्रकाश—] (मेंढपाळ उठून बसतो) – सकाळ – एका नव्या दिवसाचा जन्म – नव्या ! (कडवट स्वरात) कालचा दिवस हा नव्हे म्हणून नवा असलेला हा आजचा दिवस, उद्याचा दिवस असाच असणार. उदयास्तात बांधलेला. म्हणून जुनाच असलेला हा दिवस. विचित्र ! पण विशेष नव्हे. निसर्ग म्हणजे असाच एकमार्गी, एकसूरी स्वतः-च्याच नैसर्गिकतेत बांधलेला. स्वतःच्याच कक्षेमध्ये जखडलेला. दिवस उजाडणार, तो माध्यान्ही जाणार, मग मावळणार, रात्र होणार ! दुसरं काही होणारच नाही. जे काल, ते आज, तेच उद्या—सहर हर रात के बाद होती हैं क्यूं ? हादसा चाहिये जिंदगी के लिये––हादसा चाहिये... (घुमटात घुमल्यासारखा आवाज निनादतो) ही सकाळ. हा सोनेरी अभ्रकातून गाळल्यासारखा किरणांचा रंग. ही फांदीफांदीवर लुकलुकणारी फुलांची नक्षत्रं. हे दुथडी भरून वाहणारं सौंदर्य आणि तरीही...आणि तरीही आम्ही उदास ! मनामध्ये घट्ट दाटून बसलेली उदासी आणि शिळांना लगटून बसणाऱ्या शेवाळासारखा आमच्या मनाला बिलगून बसलेला हा एकांत. हा एकांत ! सदा जवळ असूनही परका असलेला. काही म्हणून आमचं होऊ न देणारा एकांत. आमच्या जगात आम्ही आहोत फक्त. न धड जगणारे, न संपणारे. संपणे. संपणे. (हुंदके दिल्यासारखे हास्य) संपणे म्हणजे काय हे इथं कुणालाच ठाऊक नाही. सारं काही फक्त इथं असतं. कुणालाच इथं संपता येत नाही. सारं काही इथलं नेहमीकरता आहे, हा एकांतसुद्धा इथं असाच असतो. नेहमीकरता. (मनातली उदासी त्याला स्वस्थ बसू देत नाही जणू बाहेर निघायला वाट शोधू लागतो. आर्त आणि उंच स्वरातल्या तानांच्या रूपात ! या ताना मेंढपाळ आपल्या मेंढरांना बोलावताना त्या तानांची आठवण करून देणाऱ्या असाव्यात. या दोन तीन ताना होतात तोच एक संपूर्ण काळा पोषाख केलेली व्यक्ती चपळ हालचाली करत स्टेजच्या समोरच्या भागात प्रवेश करते. उंच सडपातळ तरीही अतिशय पीळदार आणि शक्तिमान. अंगालगट बसलेला सिल्कचा झळकता पोषाख आणि डोक्यावरची दोन एडक्यासारखी बाकलेली सोनेरी शिंगे ही दोन वैशिष्ट्ये त्याचे–स्वर्णशृंगाचे व्यक्तिमत्व उठावदार करतात.)

मेंढपाळ– कोण ? स्वर्णशृंग ? तू आलास ? फार बरं झालं.

स्वर्णशृंग– होय तात, मीच. स्वर्णशृंग ! तुमच्या इच्छे-वरच माझं येणं अवलंबून नाही का तात !

मे० – तरी पण तू आलास की जरा बरं वाटतं. ये, इकडे ये. माझ्याजवळ.

स्व० – रोज रोज हीच निरर्थक मागणी तुम्ही करता तात ! पण त्यात काही अर्थ नाही, हे तुम्हाला चांगलं ठाऊक आहे. तुमच्या जगात मला प्रवेश नाही. आम्हाला कुणालाच नाही.

मे० – होय, माझ्या या जगात तुला प्रवेश नाही. माझी तशी इच्छा झाली तरी तुला मी इथे प्रविष्ट करून घेऊ शकत नाही.

स्व० – (स्मित करुन) होय तात. तुमच्या इच्छेवर माझा जन्म झाला असला तरी तुमच्या इच्छेवर तुम्ही माझं सान्निध्य मिळवू शकत नाही. स्वतःच्या राज्याच्या–स्वतःच्या जगाच्या ह्या सीमामध्ये तुम्ही स्वतःच बंदिस्त आहात. (हास्य)

मॆं० – होय, स्वर्णशृंगा, आम्ही बंदिस्त आहोत.

स्व० – पण फक्त या एकाच बाबतीत. बाकी तुमच्या जगात तुम्ही सार्वभौम, स्वायत्त, स्वतंत्र.

मॆं० – (मान हलवीत) एकटा, एकाकी, उदास.

स्व० – तात !

मॆंढ० – आज आम्हाला जास्तच उदास वाटतंय स्वर्णशृंगा. मन कसं काठोकाठ भरलंय. जाणीवेचा कणन्‌कण एका अनामिक वेदनेनं स्पंदन करतोय, काय करावं हेच कळेनासं झालंय.

स्व० – हे काय तात ? उदास व्हायचं कारणच काय ? तुमच्यातल्या कर्तृत्वाची, तुमच्या शक्तीची आठवण करा. स्वतःच्या शक्तीचं विस्मरण झालं की उदासिनता मनाला ग्रासू लागते. औदासिन्य कुणाला येत नाही? एकाकी कुणाला वाटत नाही ? उदासी आणि एकांत हे विश्वाचे स्थायीभाव आहेत. त्याचं अस्तित्व सदासर्वदा असणारच. कारण ते जगापेक्षाही जुने आहेत. शक्तीहीन माणसं उदासीनतेनं कर्तृत्वशून्य होतात. एकांतानं भयभीत होतात पण तात, तुम्ही सामान्य नाही. असामान्य आहात. तुमच्यात सामर्थ्य आहे. निर्मिती सामर्थ्य (दूर कुठे तरी सोसाट्याच्या वाऱ्याचे आवाज, मेघांचा गडगडाड. स्वर्णशृंगाच्या काळ्या शरीरावर वीजांचा लखलखता प्रकाश क्षणात चमकून जातो.) बासरी वाजवा, तात. बासरी वाजवा. मनातल्या उदासीला स्वरास्वरातून वाट करून द्या. जवळच कुठं तरी आपली मेंढरं असतील. आपण केलेलं गवत खात असतील. आपण खेळवलेलं पाणी पीत असतील. त्यांना खेचून आणा, तात. तुमच्या बासरीच्या सुरांनी, बासरीच्या सुरांनी. (मेंढपाळ विचित्र सुरात बासरी वाजवू लागतो. स्वर्णशृंगाचा चेहरा आसुरी समाधानानं चमकू लागतो. घशातल्या घशात हसत तो आ ऽ आ ऽ करून मेंढरांना बोलावू लागतो. एका किंचित प्रौढ बाईचा प्रवेश. वेश पांढरा. डोक्यावर जुनाट शिंग. एक तुटकं. चेहऱ्यावर अत्यंत लाचार आणि समर्पणाचे भाव. ती येऊन स्टेजच्या मध्यावर उभ्या असलेल्या स्वर्णशृंगासमोर गुडघे टेकून बसते. मेंढपाळाच्या बासरीचे स्वर थकून बंद झालेले)

पहिली मेंढी– महाराज, मी आलेय. आपल्या पायांची दासी. आज माझ्यावर कृपा होणार; महाराज ? (आशायुक्त स्वर).

स्वर्ण० - (आवाजात तिरस्कार) तू ? तू कशाला आलीस ? कुणी बोलावलं तुला ? जरूर काय तुझी इथं ? हुंऽ कृपा होणार का म्हणे ! कसली कृपा व्हायचीय ?

१ ली – आपल्या सेवेसाठी दासीचं शरीर आतूर आहे त्याचा स्वीकार व्हावा महाराज.

स्वर्ण० – तू ! आणि माझी सेवा ?

१ ली – होय, मागे एकदा स्वामींनी दासीची सेवा स्वीकारली होती.

स्वर्ण० – स्वीकारली असेल.

१ ली – तशीच आजही स्वीकारावी, महाराज.

स्वर्ण० – नाही (एकदम तोडून).

१ ली – (अगतिक) हो, महाराज, आजचा दिवस, फक्त आजचा, बरेच दिवस झालेत. त्या दिवसानंतर कधीही.

स्वर्ण० – कसली घाण मनोवृत्ति तुझी ! आणि तुझं ते शरीर...

१ ली – तहानलेलं आहे महाराज, आसुसलेलं आहे.

स्वर्ण० – थकलेलं आहे, जून झालेलं आहे. शिळं झालेलं आहे.

१ ली – पण...पण त्या दिवशी तर तुम्ही म्हणालात की मी चिरतरुण आहे, नित्यनूतन आहे.

स्वर्ण० – तो दिवस ? (हासतो) तो दिवस गेला. त्या दिवशीचं त्या दिवशी. आज नाही.

१ ली – तो दिवस आज नसला तरी तुम्ही तेच आहात महाराज, तुमच्या वाक्यांना अर्थ देणारं तुमचं हृदय तेच आहे.

स्वर्ण० – मला आणि हृदय ? (हास्य) आणि त्या वाक्यांना अर्थ ? मूर्ख ! त्या वाक्यांना अर्थ नसतो, किंबहुना ती वाक्यच नसतात. ते असतात आवाज, शरीराच्या क्रीडेतले शारीरिक आवाज, हृदयाशी ज्यांचा काहीही संबंध नसतो. समजलीस ? जा आता इथून.

१ ली – पण शरीराला तर असतो ना अर्थ ? (पाय पकडून) मग शरीरालाच स्वीकारा, महाराज, मला राहवत नाही हो आज. अगदी राहवत नाही. त्या दिवशीच्या साऱ्या आठवणी मला तुमच्या पायाशी लोळण घ्यायला लावताहेत. त्या क्षणापासून हे शरीर मी जपून ठेवलंय महाराज, आपल्यासाठी. अगदी जसंच्या तसं.

स्व० – चुप, मूर्ख ! या स्वर्णशृंगानं हाताळलेलं शरीर कधीही जसंच्या तसं राहात नाही. खिळखिळं होऊन जातं.

१ ली – नाही हो. हे .हे खोटं आहे. खोटं आहे.

स्व० – नाही. हे सत्य आहे. कारण ठाऊक आहे ? कारण हा निसर्ग आहे. निसर्ग कधी खोटा नसतो. तो नेहमीच खरा असतो. त्याचं हे अनिवार्य खरेपण अपवादांच्या पलीकडचं असतं. ते कुणाला सोडत नाही. त्यानं तुलाही सोडलं नाही. जा, परत जा. आपल्या म्हाताऱ्या नवऱ्याकडे. त्या मरतुकड्या मेंढ्याकडे.

१ ली – आज तोंड भरून नवऱ्याकडे जायला सांगता ! आणि त्या दिवशी ? त्या दिवशी मला मोळीला एकटी पाहून तुम्ही–तुम्ही माझ्यावर.

स्व० – (वाक्य पूर्ण करीत) बलात्कार केलात.

१ ली – हो, हो. बलात्कार केलात.

स्व० – काही लाज वाटते खोटं बोलताना ? बेशरम ! या माझ्या पीळदार स्नायूंकडे बघ, या चकचकीत अंगाकडे बघ, या बाकदार शिंगांकडे बघ आणि मग म्हण की, मी तुझ्यावर बलात्कार केला. या स्वर्णशृंगाचं आकर्षण टाळण्याचं सामर्थ्य होतं तुझ्यात ? आज तरी आहे ? (कुत्सित हसून) आशाळभूतासारखी तू सारखी माझ्या पाया पायात कशाला येत होतीस, हे काय मी ओळखलं नव्हतं ? माझं सर्वांग चाचपत फिरणारी तुझी नजर काय मागतेय हे काय मला कळलं नव्हतं ? त्या दिवसाच्या आदल्या दिवशी तुझं लग्न झालं होतं, त्या लग्नसमारंभाच्या खुणा तुझ्या अंगावरच्या पुसट सुद्धा झाल्या नव्हत्या. पातिव्रत्याच्या बाता मारणारी तू, माझ्या एका इशाऱ्यासरशी माझ्या मागे आली होतीस. आठवतं ? बोल. आली होतीस ? (ती त्याच्याकडे भारल्यासारखी पाहते. तो बोलता बोलता जिकडे जाईल तिकडे जाते. त्याच्या मागोमाग गुलामासारखी. मेंढपाळ स्वस्थ पडून वाटेल तेव्हा बासरीचे सूर काढीत असतो. उगाचच.)

१ ली – आठवतं. हो आठवतं ना. आठवतं हो. (स्वप्निल)

स्व० – (एकदम तिची वेणी पिरगाळतो) आठवतं ना ? मग जा. मला तुझा काही उपयोग नाही. शिळं अन्न खायची या स्वर्णशृंगाला सवय नाही. (ढकलून) जा. जा म्हणतो ना. हलकट.

१ ली – (घाईला आल्यासारखी) नाही हो नाही महाराज. मी अगतिक झालेय. मला तुम्ही हवे आहात. मी वाटेल ती किंमत द्यायला तयार आहे. वाटेल ते करायला तयार आहे.

स्वर्ण० – (खोटया आश्चर्याने) अच्छा; वाटेल ते करायला तयार आहे ?

१ ली – (आवेगे) हो महाराज. वाटेल ते अगदी वाट्टेल ते.

स्वर्ण – पहा बरं !

१ ली – होय महाराज.

स्व० – (क्षणभर थांबून शांतपणे) तुझ्या पोरीला पाठवून दे.

१ ली – काय ?

स्व० – तुझ्या पोरीला पाठवून दे.

१ ली – क...क...कशाला महाराज ?

स्व० – मूर्खासारखे प्रश्न विचारू नकोस.

१ ली – पण–पण ती लहान आहे महाराज. कोवळी आहे.

स्व० – त्या वेळी तू ज्या वयाची होतीस, त्याच वयाची ती आज आहे. मला अक्कल शिकवू नकोस, तुला तुझा स्वार्थ साधावयाचा असेल तर माझी अट पूर्ण केली पाहिजे.

१ ली – पण महाराज.

स्व० – मला तुझा पण नकोय. बेवकूफ. तुझी पोरगी हवीय. बोल, आहेस कबूल ?

१ ली – कबूल आहे.

स्व० – अगदी मनापासून ?

१ ली – अगदी मनापासून.

स्व० – (धबधब्यासारखा हासतो.) तात, बघा तात, आपल्या घाण वासनेकरिता आपल्या पोटची पोर नासवणारी ही आई पहा तात. तुमची उदासी दूर करायला हिचा हा वृतान्त फार छान आहे, तात. (मेंढपाळ क्षणभर बासरी थांबवून ऐकतो)

स्व० – (पुन्हा वळून) तुला काय वाटलं ? तुझ्या पोरीला जवळ करायला मला तुझी परवानगी लागेल ? या स्वर्णश्रृंगाला अडवणारी शक्ती अजून पैदा व्हायची आहे. मला फक्त पाहायचं होतं, तुम्ही मेंढरं किती खाली पडू शकता. किती नीच, हलकट होऊ शकता. वासनेकरिता.

१ ली – चांडाळा, दुष्टा ते; ते तुला शक्य होणार नाही. ती येणार नाही. कदापि नाही.

स्व० – एक इषारा, फक्त एक इषारा पुरे, जशी तू आलीस, तशी ती सुद्धा येईल. (हसून) काय ? येईल की नाही ?

१ ली – (एकदम कोलमडून) येईल. येईलही कदाचित. न येऊन सांगेल कुणाला ? दुबळी बिचारी मेंढरं आम्ही.

स्व० – दुबळी बिचारी काय ? एकदा चव घेतल्यावर पुन्हा पुन्हा अंगाला झटणारी तू काय दुबळी होतीस ? नवऱ्याच्या तोंडाला पानं पुसून आज माझ्याकडे आली आहेस ती काय दुबळेपणानं ? तुम्हा मेंढरांची रीतच ही. पाप करूनच्या करून वर साळसूद व्हायचं. आणि स्वर्णशृंगानं हळूच येऊन तुमच्या त्या खपलीसारख्या मुखवट्याचा टवका काढला की, मग दुबळेपणाची बोंब मारायची. अरे, जसं जगायचं असेल तसं छातीठोकपणे जगावं. मी बघ, समोर येईल त्याची छाती चिरून टाकणारी ही सोनेरी शिंगं कशी उंच धरून राहतो. दिसेल त्या तरुणीला पायाशी लोळवणारं हे पौरुषत्व मिरवत हिंडतो.

१ ली– किती दिवस–किती दिवस मिरवशील हे चांडाळा. पहातेच मी. पहातेच मी.

स्व० – मला आव्हान ? या स्वर्णशृंगाला ? ठीक आहे पहाच मग (डोंगराकडे तोंड करून आ ऽ आ ऽ करतो. मेंढपाळ आपल्या बासरीतून मंजुळ स्वर काढू लागतो.) एक तरुणी प्रवेश करते. हिच्या डोक्यावर दोन काळीशार शिंगं आहेत.

२ री – (भारावून) स्वर्णशृंग–स्वर्णशृंग महाराज. साऱ्या मेंढरांचे अधिपती, तरुणांचे दैवत, तरुणींचे हृदयस्वामी, स्वर्णशृंग !

१ ली – (दोघांच्या मध्ये येत) त्याच्याशी बोलू नकोस. तो हलकट, चांडाळ...

२ री – (भयंकर दचकून) काय, बोलतेस हे आई ? वेडबीड तर लागलं नाही ना तुला ? ते आपले स्वर्णशृंग महाराज, आपले त्राते—

१ ली – खोटं, खोटं आहे ते सगळं. तो आणि आपला त्राता ? नाही ग बाई. तो कसला त्राता तो तर वैरी आहे आपला. आपली आयुष्य उजाडणारा. आपली घरं उध्वस्त करणारा. आपले... आपले संसार धुळीला मिळवणारा.

२ री – नाही, आपले महाराज असं कसं करतील ? तुझा काही तरी गैरसमज झालेला दिसतोय. आपल्या भल्याची सतत काळजी घेणारे, आपलं चारापाणी आपल्याला उपलब्ध करून देणारे, आपल्याला सांभाळणारे... :

१ ली – देखावा आहे तो, त्याचा. आव आहे खोटा सगळा. त्याचं खरं रूप पाहिलं नाहीस तू. ते भयंकर राक्षसी रूप......

२ री – (आपल्यातच हरवून) त्यांचं रूप ! त्यांचं विशाल रूप !

१ ली – ते खोटं रूप आहे माझे बाई. बनावटी आहे.

२ री – कशावरून ?

१ ली – मी सांगते त्यावरून.

२ री – माझा नाही विश्वास बसत ! मला जाऊ दे त्यांच्याकडे. त्यांनी बोलावलंय मला. त्यांना माझी सेवा हवीय.

१ ली – सेवा ? अग तो एक बहाणा आहे.

२ री – सेवा म्हणजे बहाणा कसा असेल ? ते माझं कर्तव्य आहे.

१ ली – स्वत:च्या दुबळेपणाला कर्तव्याचे आधार देऊ नकोस. तुला त्याच्याबद्दल वाटणाऱ्या आकर्षणाचा तो फायदा घेईल.

२ री – कशावरून ?

१ ली – माझ्या अनुभवावरून माझं ऐक. तुला भ्रष्ट करील.

२ री – तुला केलं होतं वाटतं त्यांनी भ्रष्ट ?

१ ली – (चिडून) फालतू चौकशी करू नकोस. सांगते तेवढं ऐक.

२ री – म्हणजे, तुला त्यांनी भ्रष्ट केल होतं तर ?

१ ली – (एकदम उसळून) हो, हो, हो, त्यानं मला भ्रष्ट केलं, माझं शरीर डागाळलं. माझा संसार उधळून लावला, या चांडाळानं, ऐकलं ? झालं समाधान तुझं ?

२ री – आणि मग आज पुन्हा कशाला आली होतीस इथं ?

१ ली – (दचकून आणि गोंधळून) काय ? काय म्हणालीस ?

२ री – इथं कशाला आली होतीस आई तू ? काय काम होतं तुझं ? या स्वर्णशृंगाच्या तर तू वाऱ्यालाही उभं राहायला नको होतंस. मग असं असताना तू इथं काय करत होतीस ?

१ ली – क...क...काही नाही. काही नाही.

२ री – मला काय दुधखुळी समजतेस तू ? मला समजत नाहीय, तुझा कावा ?

१ ली – नाही, नाही, कसला कावा करतेय मी ? मी–मी तुला उपदेश करतेय माझ्या बाळे ! तुला सावध करतेय, हे बघ, मी तुझी आई आहे. तुझं नेहमी भलं व्हावं हीच माझी इच्छा आहे. मला अधिकार आहे, तुला मार्ग दाखवायचा.

२ री – अधिकाराच्या गोष्टी पुरे कर आई. आणि तू काय मला मार्ग दाखवणार ? या वयात थेरं करायला, स्वर्णशृंगाच्या मागे फिरताना तुझा मार्ग किती भरकटलाय याची शुद्ध आहे का तुला ? घरी नवरा असताना तुला महाराज हवेत आणि ते सुद्धा पूर्णपणे ! त्यात तुला वाटेकरी सुद्धा नको, म्हणून उपदेशाच्या गोष्टी ? तुला हेवा वाटतोय माझा, माझ्या तारुण्याचा, माझ्या सौंदर्याचा.

१ ली – बेशरम ! काही लाज वाटते प्रत्यक्ष आईला असं बोलताना ?

२ री – तुला करताना नाही वाटली आणि मला बोलताना वाटेल ? (तिला एकदम ढकलून) चल, हो बाजूला (स्वर्णशृंगाकडे जाते). महाराज मी आलेय्, माझा स्वीकार व्हावा.

स्वर्ण – कशाकरिता आली आहेस ?

२ री – समर्पणाकरिता.

स्व० – कुणी पाठवलं तुला ?

२ री – मीच आले, माझ्या इच्छेनं, तुमची हाक ऐकून.

स्व० – आणि मी हाक मारली नसती तर ?

२ री – तरीही आले असते महाराज. मला आल्यावाचून राहवलं नसतं.

स्व०– (१ ली कडे वळून) ऐकलंस ? पाहिलास माझा प्रताप ? आणि हो (१ लीला) ही वाक्यं आठवतात तुला ? याच अर्थाची वाक्यं तू सुद्धा बोलली होतीस त्या दिवशी. मला आव्हान देते, बेवकूफ. (एक प्रौढ माणूस प्रवेश करतो, दोन्ही शिंगे निखळून लटकत असलेली, एक पाय दुखापतीत लंगडा झालेला.) तो बघ, तुझा बुढ्ढा नवरा येतोय. त्यालाही विचार माझा प्रताप.

१ ली – अहो, अहो, अहो, बघा हो. त्या पोरीला बघा.

मेंढा – (स्वर्णशृंगाला) महाराजांचा विजय असो. (बायकोला) काय बघा म्हणतेस ?

१ ली – अहो, तो चांडाळ त्या पोरीला फितवतोय, तिला नासवील तो.

मेंढा – नासवील ? बरं मग ?

१ ली – बरं मग ? (ओरडून) अहो, तिला अडवा.

मेंढा – (थंडपणे) तुला अडवू शकलो होतो का ? मग तिला काय अडवणार ? (स्वर्णशृंग) हसतो आणि त्याच्या पोरीच्या कंबरेभोवती हात घालतो.)

१ ली – (भयंकर संतापून) अरे भेकडा ! तुझ्या पोरीला तो कवटाळतोय तुझ्या डोळ्यासमोर आणि षंढासारखा पाहतोय ?

मेंढा – तुला त्यानं जेव्हा कवटाळलं माझ्यासमोर तेव्हासुद्धा मी असाच उभा होतो, षंढा-सारखा. त्यावेळी तू जर त्याला थोडा जरी प्रतिकार केला असतास तर मी सुद्धा षंढा-सारखा उभा राहिलो नसतो. ही सुद्धा जर अशी आज त्याच्या गळ्यात जाऊन पडली नसती. पण तसं होणं शक्य नाही, कारण– कारण (एकदम उफाळून आलेल्या तिर-स्काराने)–कारण तुम्ही साऱ्या, झाडून सगळ्या वदजात असता. सहारा शोधण्याच्या मिषानं, आधार मागण्याच्या कांगाव्यानं कुणाच्या तरी गळ्याला बिलगणं हाच तुमचा धंदा असतो. एकदा बिलगलं का जळूसारखं त्याचं सत्व पिणं हेच तुमचं जीवनातलं एकुलतं एक लक्ष असतं, आणि म्हणूनच जास्तीत जास्त मोठं कूळ शोधणं हीच तुमची नीती असते. नीती ! वासनेच्या घाणीनं बरबटलेली. स्वतःच्या तारुण्याचं भांडवल घेऊन आणि दुबळेपणाचं गोंडस रूप दिलेला सापळा घेऊन सावज हेरत हिंडायचं आणि दिसेल त्या सावजावर झडप घालायची. त्याच्यापेक्षा सरस कुणी दिसला की पहिला सोडून दुसऱ्याकडे, त्यानंतर तिसऱ्याकडे. स्वार्थ, स्वार्थ, स्वार्थ. दुसरं तत्व नाही, त्या स्वार्थापायी. ज्याला आज आपण बिलगतोय त्यालाच आपण काल भाऊ मानलं होतं हे सुद्धा सोईस्करपणे विसरून जायचं–

१ ली – (एकदम वर्मी वोट लागल्यासारखी) नाथ, नाथ.

स्वर्ण० – (एकदम उडी मारून मेंढयाची मानगूट धरतो) हरामखोर, माझ्यासमोर तोंड वर करून बोलतोस ?

मेंढा – (लीन होऊन) पण अन्नदाता, मी जे बोललो ते सत्य आहे.

स्वर्ण० – सत्य नाही असं कोण म्हणतो ? पण, म्हणून त्याचा उच्चार करायचा अधिकार तुला मिळत नाही. (त्याला ढकलून देत) आपल्या पायरीनं वागत जा.

मेंढा – होय महाराज, आपलंच म्हणणं बरोबर आहे. महाराज आपण आपल्या इच्छेप्रमाणे वागावं. महाराज, माझी मुलगी आणि पत्नी दोघीही आपल्या सेवेत आहेत.

स्वर्ण० – माझ्या वागण्याला तुझ्या संमतीची आव-श्यकता नाही मला.

मेंढा – होय महाराज. बरोबर आहे महाराज.

स्वर्ण० – हे सुद्धा सांगण्याची गरज नाही. मी म्हणतो ते बरोबरच असतं, समजलास.

मेंढा – समजलो.

स्वर्ण० – मग नीघ इथून. उभा राहू नकोस इथे लोचटा सारखा.

मेंढा – महाराजांच्या पायाशी एक विनंती आहे.

स्वर्ण० – बोल लवकर. वेळ घालवू नकोस माझा.

मेंढा – महाराज, या दासाला उद्यानातल्या झऱ्यातलं पाणी पिण्याची परवानगी द्यावी.

स्वर्ण० – काय ?

मेंढा – वय झालंय, थकलोस आता. अंग अंग शिथिल पडू लागलंय माझं. उद्यानातलं पाणी प्यायलो तर पुन्हा तारुण्य येईल मला ? मला जीवदानच ठरेल ते.

स्वर्ण० – नाही, मुळीच नाही. उद्यानातलं पाणी पीतोय म्हणे ! काय करणार आहेस ते पाणी पिऊन ! हे फरपटत चालणारं जीणं लांबवणार आहेस ? लाळ घोटत फिरणारं तोंड घेऊन बेंबाटणार आहेस ? काय उपयोग काय तुझा आम्हाला ?

मेंढा – पण मला माझा तर आहे ना उपयोग ? अस्तित्वाच्या जाणिवेचा मोह सोडवत नाही महाराज !

स्वर्ण० – खड्ड्यात घाल तुझं अस्तित्व. असल्या अस्तित्वापेक्षा दहा वेळाला मरणं बरं. तुला अस्तित्वाचा मोह नाही मेंढ्या तुला तुझ्या शेवटाची भीती वाटतेय.

अनुक्रमणिका

मेंढा – दुर्दैवानी खरंय महाराज आपलं म्हणणं ! त्या अस्तित्वाला संपवणाऱ्या पूर्णविरामाची भयंकर भीती आहे हो मनात.

स्वर्ण० – तुझ्या भीतीशी मला काहीही कर्तव्य नाही. वाटतेय भीती तर भी. तुझी वेळ आली की तुला कत्तलखान्याकडे पाठवण्यात येईलच. आणि तुझी खांडोळी होतीलच.

मेंढा – नाही, महाराज, नाही. नका हो असं बोलू महाराज. अपवाद म्हणून मला सूट देण्यात यावी महाराज. पहा मी माझी पत्नी, मुलगी आपल्याला अर्पण केलीय महाराज !

स्वर्ण० – अच्छा ! ही लाच आहे तर. मूर्खा जी वस्तू लाच म्हणून द्यायची असते ती पहिल्यांदा स्वतःची असावी लागते आणि ज्याला द्यायची असते त्याच्याजवळ ती नसावी लागते (पहिल्या व दुसऱ्या मेंढीस कवेत घेतो.) पहा, या तुझ्या वस्तूंकडे नीट पहा. आहे तुझी मालकी यांच्यावर ? यापूर्वी कधी होती ? (विकट हास्य) जगातली कुठलीही गोष्ट तुम्हा मेंढरांची नाही. मेंढरांकरता नाही. त्यांच्यावर मालकी आहे फक्त स्वर्णशृंगाची. जा, निघून जा. माझी सोनेरी शिंगं तुझ्या छाताडात घुसायच्या आधी इथून काळं कर. नीघ. चालता हो. (मेंढा जाऊ लागतो) थांब मी तुझ्या पोरीला नेतोय. तिला परत आणीपर्यंत इथेच थांब (१ ल्या मेंढीकडे) आणि तूही थांब ग थेरडे. मी इथे नाही तोपर्यंत माझ्या तातांना तुम्ही सोबत करा.

[स्वर्णशृंग दुसऱ्या मेंढीला घेऊन जातो या पुढील संभाषणाला पार्श्वभूमी म्हणून वापरण्यात येणारे संगीत हे माधुर्याकडून हळूहळू रौद्र व भीषणतेकडे जाणारे हवे. स्टेजवर अंधार. मेंढपाळ, १ मेंढी व मेंढा यांच्यावर स्पॉटस्. दूर क्षितिजावर विजा चमकत आहेत.]

मेंढपाळ – सूर कुठेच गवसत नाही. सूर कुठेच लागत नाही. एकांत कधीच भंगत नाही.

मेंढा – सूर कसा लागेल ? (तळमळून) आमच्या कापल्या जाणाऱ्या गळ्यांचे आवाज त्यात मिसळले आहेत तात !

मेंढी – आमच्या मृत्यूनंतरचा एकांत आहे तो.

मेंढपाळ – कुणास ठाऊक. कधीकधी मला वाटू लागतं की मृत्यूनंतरचा एकांत म्हणजेच तर मी नव्हे. मृत्यूनंतरचा एकांत आणि जन्मापूर्वीचा कोलाहल ! हे सारं म्हणजेच तर माझं अस्तित्व नव्हे ?

मेंढा – आणि जन्मापासून मृत्यूपर्यंत आयुष्य म्हणजे आमचं अस्तित्व ! जे आम्ही कधी मागितलं नव्हतं, जे आम्ही नाकारूही शकत नाही. एखाद्या घेणेकऱ्याकडनं वसूल करून घ्यावं तसं हे आयुष्य असं वसूल करून घेण्यात येतं. का ? कशासाठी ? कारण नसताना जन्माला यायचं, चोथा झालेला चारा खायचा, मचूळ पाणी प्यायचं आणि वाटचाला येणारा जुलूम सहन करायचा. का ? का ?

१ ली – आणि अशा जीण्याच्या सोबतीला टोचणी लावणाऱ्या वासना, इच्छा घेऊन जगायचं. त्याला खोड्यात टाकू पहाणाऱ्या नीतिमत्ता उरावर बाळगायच्या. त्या तोडाव्या लागायच्या. तुटल्यानंतर स्वतःचं आयुष्य आणखीनच भारी वाटू लागायचं आणि शेवटच्या क्षणी कळायचं की हे सुद्धा सारं फोलच ! हे काय आहे तात ! हे काय आहे ! ह्याला काय म्हणायचं आम्ही तात ?

मेंढा – अस्तित्व ? अस्तित्व म्हणायचं ? या शब्दाचा अर्थ इतका घाण असतो तात ? सांगा तात सांगा ? असे गप्प राहू नका.

मेंढपाळ – प्रश्न नको ऽ ऽ. प्रश्न आधीचेच खूप आहेत माझ्याजवळ. एकांताच्या कुपीत साठवलेले अनंत प्रश्न. मला उत्तर हवंय.

मेंढा – तुमच्या जवळही उत्तर नाही ? मग आम्हाला निर्माण करण्याचा हा उपद्व्याप कशाला केलात तुम्ही तात ?

मेंढपाळ – मी ? तुम्हाला निर्माण केलं ? बेटा, निर्मितीशिवाय दुसरा पर्याय तरी आहे का मला ? निर्माण केल्याशिवाय दुसरी गती नाही अशी परिस्थिती असल्यावर 'मी' तुम्हाला निर्माण केलं असं तुम्ही म्हणाल ? कुणीच निर्माण

[पान ३२० पहा]

माधवस्वामी व एकनाथ   मधुकर रामदास जोशी

तिरुवेळंदूरचे माधवस्वामी

इसवी सनाच्या सतराव्या शतकात तंजावर हे मराठी संस्कृतीचे केंद्र उदयाला आले. तेथील भोसले राजे हे विद्याप्रिय होते. त्यामुळे तंजावराच्या राजसभेत साहित्य, काव्य व कला बद्दल चर्चा नेहमी चालत असे. संस्कृत व मराठीचे पंडित व ग्रंथकार यांचा सन्मान राजघराण्यातील मंडळी करीत असत. ग्रंथकार व विशेषतः कवी मंडळींना भोसल्यांचा उदार आश्रय असून संतमहंतांबद्दल भोसले राजघराणे आदर प्रगट करीत असत. ह्या संतमंडळींत माधवस्वामी प्रसिद्ध आहे. माधव स्वामीने विपुल ग्रंथरचना केली अनुगीता, भगवद्‌गीता व योगवासिष्ठावर त्याची रचना असून योगवासिष्ठाची ओवी संख्या १२,३३९ आहे. तर त्याच्या रामायणाची ओवी संख्या १८,९७५ व महाभारताची ओवी संख्या ८८,२७४ इतकी आहे.[१] माधवस्वामी तिरुवेळंदूर येथे राहात असत. हे गाव कावेरी तीरावर असून तंजावर पासून सुमारे ३५ मैल अंतरावर आहे. गावात माधवस्वामींचे राममंदिर आहे. माधवस्वामी रामदासी संप्रदायी असून राघवस्वामींचे शिष्य होत. माधवस्वामींच्या घराण्यात कवित्वशक्ती सर्वांना होती. डॉ. तुळपुळे लिहितात, " माधवस्वामी विवाहित असून त्यांच्या घराण्यात विपुल कवित्व झालेले आढळते. रामपंडित आणि कृष्णपंडित हे पुत्रद्वय, वासुदेव पंडित हा नातू, मीनाक्षीअम्मा ही नातसून, अंबाजी हा पणतू याप्रमाणे त्यांच्या कुटुंबातील बऱ्याच जणांनी काव्यरचना केली आहे ".[२]

माधवस्वामी व मराठी अभ्यासक

माधवस्वामींच्या वासुदेव नावाच्या नातवाने भागवताचे काही स्कंध रचले असून त्याच्या नवमस्कंधात पुढील उल्लेख आढळतो,

अध्याय १ पान ३ ओव्या ४१–५६ एकनाथस्तवन

वंश–तो अस्मत्कुळभूषण ॥ तदनुग्रहे मद्वंश पावन ॥
तेणे देऊनि कन्यारत्न । वंश नूतन वाढविला ।।५१।।

तयाची (श्रीकृष्णाची) दिव्यमंगळ मूर्ती ॥ कन्यादानसमयी अति प्रीति ॥ अर्पिता होय नागनाथाप्रती ॥
भावे निश्चिति एकनाथ ॥ श्रीएकनाथ एकादशस्कंध ॥"[३]

यावरून असे दिसून येते की, वासुदेवपंडित 'अस्मत्कुलभूषण' म्हणून एकनाथांचा गौरव करतो व त्यांनी भागवताच्या एकादशस्कंधावर टीका रचली अशीही माहिती पुरवितो. मराठी वाङ्मयात पैठणकर एकनाथांनी भागवताच्या एकादशस्कंधावर रचलेली टीका प्रसिद्ध आहे. म्हणून काही अभ्यासकांनी असा अभिप्राय दिला की, वासुदेवाला अभिप्रेत असलेले एकनाथ हे पैठणचे आहेत. त्यात भरीला भर म्हणजे इ. स. १९३० साली श्री गोविंद बाळस्वामी मठाचे अधिपती रामदासीसांप्रदायिक श्री. टी. बी. रामचंद्रराव यांनी सरस्वती महाल लायब्ररीतील हस्तलिखितांची सूची प्रसिद्ध करून माधवस्वामी हे एकनाथ महाराजांचे नातू आहेत, असे मत मांडले. काही दिवसानंतर श्री. दा. के. ओकांना तंजावर येथील श्री गोविंद बाळ स्वामी मठात एकनाथ, रामदास व मुक्तेश्वर यांच्या चरित्रावर प्रकाश टाकणारे एक हस्तलिखित टिपण मिळाले. त्या टिपणात एकनाथांच्या उमा नावाच्या मुलीचा उल्लेख आहे. ही उमा तंजावर प्रांती असलेल्या नागनाथाला दिली होती. माधवस्वामी हा उमेचा मुलगा. म्हणून श्री. दा. के. ओक यांनी असा निष्कर्ष काढला की; "तंजावर प्रांतस्थ महाभारत रचनाकार श्री. माधवस्वामी हेही नाथांचे दौहित्रच."[४] ह्या पूर्वी श्री. चि. ग.

---

१. महाराष्ट्र सारस्वत, पाचवी आवृत्ती पान ८९१
२. महाराष्ट्र सारस्वत, पाचवी आवृत्ती पान ८९०
३. T. M. S. S. M Library cat. Vol. II No. 1438, 1439
४. मुक्तेश्वर विराटपर्व द्वितीयावृत्ति १९३९, उपोद्घात पान २, १५ ओकप्रत.

कर्वे यांनी देखील असा अभिप्राय दिला की, माधवस्वामी हा एकनाथांच्या उमा नावाच्या मुलीचा मुलगा आहे.[५] या मताचा पुरस्कार करणारे अजून एक अभ्यासक म्हणजे श्री. मु. ग. पानसे होत. ते लिहितात, " Madhava also was the grandson of Ekanath by his daughter named Uma."[6] या नंतर याच मताचा पुरस्कार करून डॉ. शं. गो. तुळपुळे लिहितात, " समर्थ रामदास हे माधवस्वामींचे आजेगुरु, तर प्रसिद्ध संत कवि एकनाथ हे त्यांचे खरो-खरचे आजे ठरतात. हरि पंडित हा मुलगा आणि गंगा, गोदा व उमा या मुली, अशी एकूण चार अपत्ये नाथांना होती. नाथांची तिसरी कन्या उमाबाई ही तंजावर प्रांती कोणा नागनाथास दिली होती व तिचा मुलगा म्हणजेच आपले माधवस्वामी होत. म्हणजे माधवस्वामी हे एकनाथांचे नातू व मुक्तेश्वराचे मावस बंधु होत."[७] माधवस्वामी एकनाथ संबंधाचा पंडित आवळीकरांनी मुक्तेश्वर चरित्राच्या भूमिकेमधून विचार केला आहे. त्यांनी असे सुचविले आहे की, " गोदेचे सासरचे नाव उमा होते व तिलाच तंजावर प्रांती नागनाथास दिले होते. माधवस्वामी हा तिचा मुलगा. याला आधार म्हणजे नाथांची दुसरी मुलगी गंगा ही कर्नाटकातच पण तंजावरास दिलेली नव्हती हा होय."[८]

५. भा. इ. सं. मंडळ त्रैमासिक वर्ष १९ अंक १ पान १०.

६. B. O. R. I. Anuals Vol. XXV part N. 1944, Page 189

७. महाराष्ट्र सारस्वत पांचवी आवृत्ती पान ८८९.

८. महाराष्ट्र साहित्य पत्रिका वर्ष ३३, अंक १२९, " मुक्तेश्वरावर प्रकाश "

माधवस्वामी हे पैठणकर एकनाथांचे नातु या कल्पनेचा जबरदस्त पगडा मराठी विद्वानांवर बसलेला होता. परंतु एकनाथ–मुक्तेश्वर–माधवस्वामी यांच्या वयातील अंतराचा अभ्यास करून श्री. ना. ब. जोशी यांनी प्रथम आवळीकरांचे सर्व निष्कर्ष खोडून काढले. त्यांनी असे मत मांडले की, " माधवस्वामींचे आजोबा एकनाथ महाराज नसून शके १५२२–२३ च्या सुमारास गोदास, नाथांच्या मुलीस जो मुलगा झाला त्याचे नाव एकनाथ असून या एकनाथाची मुलगी ' उमा ' तंजावर कडील नागनाथास दिली असावी व तिला शके १५६९–७० मध्ये माधवस्वामी झाले असावेत."[९] माधवस्वामी–एकनाथ संबंधाचा अभ्यास करणारे प्रा. पंगु, हे एक आहेत. त्यांनी मुक्तेश्वरकृत विराटपर्वाच्या प्रस्तावनेत या मुद्याचा विचार करून ओक व तुळपुळे यांच्या माधवस्वामी विषयक निष्कर्षावर टीका केली. त्यांचे महत्त्वाचे आक्षेप म्हणजे—

(अ) एकनाथांच्या वंशावळीत ' उमा ' ह्या नाथांच्या कन्येचे नाव नाही.

(आ) नाथांच्या दोन्ही मुलीत ६०–७० वर्षाचे अंतर पडणे संभवनीय नाही.

(इ) मुक्तेश्वर व माधवस्वामी हे सख्खे मावसभाऊ नाहीत.

(ई) उमा हे नाव नाथांच्या मुलीचे होते हे डॉ. तुळपुळे नि:संदिग्धपणे सिद्ध करू शकले नाहीत.

९. ' नवभारत ' वर्ष १३, जानेवारी ६०, अंक ४ व महाराष्ट्र साहित्य पत्रिका अंक १३०.

[पान ३१८ वरून]

झालं नाही. सारं काही इथे होतंच. आहेच. कुणी मृत्यूही पावणार नाही. सारं काही इथं असेल. तुम्ही, मी .आणि आणि अनिवार्य असा स्वर्णशृंगही .स्वर्णशृंग... तीक्ष्णशृंग— अजेयशृंग (धडपडत २ री मेंढी आत येते. जागोजाग रक्ताळलेली. विस्कळीत ढासळल्यासारखी उभी राहते. वातावरण क्षणभर तीन मेंढरांच्या हुंदक्यांनी दाटून जातं) स्वर्णशृंगाचे प्रश्न निराळे, उत्तरं तयार असलेले प्रश्न. इथले. या मातीतले, इथल्या इथे सुटणारे पण आपले प्रश्न मात्र असे अनादी अनंत. का ? का ? प्रश्न प्रश्न आणि पुन्हा प्रश्न . . (आवाजाचे प्रतिध्वनी) सहर हर रातके बाद होती है क्यु ? हादसा चाहिये जींदगी के लिये ?

[कोलमडलेल्या अवस्थेत सारी मेंढरे, मेंढपाळ ओटचावर पहुडलेला, आर्त ताना मारत. स्वर्णशृंगाच्या हास्याचा गटगडाट] (पडदा)

माधवस्वामी–एकनाथ यांच्यातील संबंध विवाद्य आहे. ह्या समस्येचा विचार डॉ. व. वि. पारखे यांनी केला आहे. त्यांच्यामते, 'स्मृतिकौस्तुभ'कार अनंतदेवाचा पूर्वज गोदातीरवासी कृष्णभक्त एकनाथ होय.[१०] डॉ. पारखे यांनी आराध्यदैवताचा मुद्दा उपस्थित केला आहे. त्यांच्यामते पैठणकर एकनाथांचे उपास्य श्रीविठ्ठल आहे तर माधवस्वामीचा आजा कृष्णोपासक आहे. डॉ. पारखे विठ्ठल व कृष्ण यांच्यात अभेद मान्य करीत नाहीत. परंतु एकनाथी वाङ्मयात पदोपदी श्री विठ्ठल व कृष्ण यांच्यात कोणताही भेद दिसून येत नाही. एकनाथांचे रुक्मिणीस्वयंवर हे एकच काव्य जरी घेतले तरी त्यात विठ्ठल व कृष्णविषयक एकनाथांची भूमिका स्पष्ट झाली आहे.

दुसऱ्या एकनाथाचा एकादश स्कंध

एकनाथ–माधवस्वामी संबंधाचा विचार करताना माधवस्वामीच्या वासुदेव नावाच्या शिष्याने पुरविलेली माहिती महत्त्वाची आहे. तो असे म्हणतो की, एकनाथ हे आमच्या कुलाचे भूषण आहेत, कारण त्यांनी भागवताच्या एकादश स्कंधावर टीका केली आहे. माधवस्वामींच्या बाबतीत विचार करताना सर्व अभ्यासकांनी हा मुद्दा उचलून धरला तरी त्यांची दिशा चुकली आहे, कारण एकादशाची टीका म्हणजे एकनाथी भागवत आपल्या सर्वांच्या डोळ्यासमोर येते. वास्तविक पैठणकर एकनाथाप्रमाणे अन्य एकनाथ नावाच्या व्यक्तीने एकादशावर टीका रचली असे जर आपण दाखवू शकलो तर एकनाथ–माधवस्वामी समस्या सुटण्यास मदत होईल. सुदैवाने या विधानाला पुरावाही उपलब्ध आहे. समर्थभक्त नानासाहेब देव यांना बीड मठांमधून एकनाथी भागवताची एक प्रत उपलब्ध झाली, त्या प्रतीकडे अभ्यासकांचे लक्ष मी वेधू इच्छितो. श्रीरामदासी संशोधनात या प्रतीचा बाडांक ७२९ आहे. देव या प्रतीचे पुढीलप्रमाणे वर्णन करतात.

'बाडांक ७२९ एकनाथी भागवत. पोथी पत्रे ५५६. पाणी गळून काही अध्यायांची भाकरी झाली आहे ! सावधानतेने व युक्तीने पत्रे उलगडता येतील. काही अध्याय नाहीतही. शेवटी लेखनकाल दिलेला नाही. श्लोकसंख्या व टीकेची ओवी संख्या नमूद आहे : 'उत्तरार्ध श्लोक ॥ ७२७ ॥ उत्तरार्ध टीका ॥ ९२०६ ॥ एवं संख्या पूर्वार्ध उत्तरार्ध ग्रंथ ॥ श्लोक ॥१३७०॥ टीका १८५०० श्रीमज्जनार्दनार्पणमस्तु ॥

या ७२९ बाडात जे एकनाथी भागवत आहे ते पैठणकर एकनाथांचे नसून जनी जनार्दन शिष्य एकनाथांचे आहे. या प्रतीच्या काही ओव्या मी धुळे येथील समर्थ वाग्देवता मंदिरातून नकलवून मागितल्या. ह्या ओव्या पैठणकर एकनाथांच्या एकनाथी भागवतात नाहीत. निर्णयसागरची पांगारकर प्रत (शके १६५३), कामत प्रत, दातार शास्त्री संपादित एकनाथी भागवतात या ओव्या नाहीत. धुळे येथे एकनाथी भागवताची (बाडांक ३९४) शके १५६९ ची जुनी प्रत आहे. तीत सुद्धा या ओव्या नाहीत. त्याचप्रमाणे तंजावर प्रतीत (बाड क्र. १४४६) या ओव्या नाहीत. पैठणकर एकनाथांनी ज्याप्रमाणे भागवताच्या एकादश स्कंधावर टीका रचली त्याचप्रमाणे बीड येथील जनी जनार्दनांचे शिष्य एकनाथांनी सुद्धा टीका रचली. या टीकेतील या ओव्या पुढीलप्रमाणे :—

श्री गणाधिपतये नमः ।
श्री अन्नपूर्णायै नमः ॥
श्रीजनार्दनगुरवे नमः ॥

ॐ नमो सद्‌गुरु श्रीमूर्ति ।
चराचर तुझि विभूति ॥
विश्वात्मा विश्व स्फूर्ति ।
अमूर्त मूर्ति गुरुराया ॥१॥

तुझे मूर्तिचे महिमान ।
सकळ शास्त्रां अतर्क्य जाणे ॥
श्रुतिने घेतले मौन ।
शब्दे आण वाइली ॥२॥

अगा वाइली दृष्टांति ।
तुज समान नाही दुजि स्थिति ॥
जे जे योजावि उपपत्ति ।
ते ते विभूति पैं तुझि ॥३॥

तुझ्या प्रभावाचि ऐसिचि रेवडि ।
जे दुजेपणाचे मूळ तोडी ॥
मग येकपणाचे परमवडि ।
दृष्टांतु काढी कोण कोठे ॥४॥

---

१०. माधवस्वामी : कालनिर्णय व एकनाथ संबंध; "नवभारत" अंक ७. एप्रिल १९६०.

कोठे तुझे स्थानमान ।
हेचि सर्वथा न कळेचि जाण ॥
अगाध तुझे महिमान ।
कैसेनि ध्यान धरावे ॥५॥

हे तु मां तु दृष्टांतु ।
न रिघे ज्याचे सिवे आंतु ॥
तो भागवतीचा भागवतार्थु ।
वोव्या आंतु वोलविसि ॥६॥

ते माझे मन्हाटे वारिखे बोल ।
सद्गुरुनि केले सखोल ॥
तेथिच्या प्रेमाचि जे वोल ।
जाणति केवळ गुरुभवित ॥७॥

ज्यासि नाही गुरुचरणी भवित ।
त्यासि कैसेनि होईल विरक्ति ॥
जरि पढिले श्रुति स्मृति ।
शास्त्र वित्पत्ति केल्यांहि ॥८॥

करिता साधनाच्या कोटि ।
साधनि समाधान लुटि ॥
जालिया सद्गुरु कृपादृष्टि ।
ब्रह्मत्वें पुष्टि गुरुभक्तां ॥९॥

तो तुं सद्गुरु जनार्दन ।
सकळ जगाचे अधिष्टान ॥
भुति भूतात्मा तुं आपण ।
सहजेचि जाण सम साम्ये ॥१०॥

समाप्तीच्या ओव्या पुढीलप्रमाणे आहेत—

येका जनार्दन नामे करी ।
जालि पातके राणभरी ॥
प्रपंचाचि जालि बोहरी ।
उरले उरि येकि येक ॥

येका जनार्दनी ज्या स्मरण ।
स्मरणे प्रकटे जनार्दन ॥
जनार्दनि हारपे जन ।
येकि येकपण संचले ॥

एका जनार्दनी जो विनटला ।
त्याचा संसारुचि वावो जाला ॥
ते कि येकपणाहि मुकला ।
येकि येकला जनार्दनु ॥

येका जनार्दन नामोच्चार ।
करितो पावन नर ॥
येका जनार्दन ज्यांचि धुर ।
तो नव्हे किंकर काळाचा ॥

येका जनार्दनु ज्याचा मित्रु ।
त्यासी त्रैलोकी नाही शत्रु ॥
येका जनार्दनु ज्यासी बीजमंत्रु ।
त्याचा संसारु सुखरुप ॥

येका जनार्दनि विमुख ।
त्याचे कोण निरसि भवदुःख ॥
जन्म मृत्युचे आवर्त्त देख ।
भोगिति अनेक विमुखत्वे ॥

विमुखत्वे भासे जन ।
सन्मुख दृष्टि जनार्दन ॥
जनि वनी न दिसे आन ।
येकि येक पण संचले ॥

येका जनार्दन कृपे करून ।
जन्म मरणा जाले शुन्य ॥
विजयि जाले साधकजन ।
अनूहात निशान लाविले ॥

येका जनार्दन नाम चित्ति ।
धरिता निरसे सकळ भ्रांती ॥
हारपे अज्ञान तमराति ।
उगवला गभस्ति विवेकभानु ॥

विवेक भानु उगवला ।
तेथ एका जनार्दनु प्रकटला ॥
श्री भागवती तीरी गमु जाला ॥
प्रेमा दिधला हरिदासी ॥

ईति श्री भागवते महापुराणे देशभाषा येकाकार टिकायां संपूर्णमस्तु ॥ श्रीमज्जनार्दनार्पणमस्तु ॥ तथास्तु ॥ श्लोक २८ वोविया ५२७ ॥ श्रीरस्तु ॥ उत्तरार्ध श्लोक ७२७ ॥ उत्तरार्थ टीका ९२०६ एवं संख्या पूर्वार्ध उत्तरार्ध ग्रंथ ॥ श्लोक १३७० ॥ टीका १८५०० श्रीमज्जनार्दनापर्णमस्तु ॥

जनार्दन शिष्य एकनाथ

ही भागवत पुराणाच्या एकादशस्कंधावरील टीका एकनाथाची आहे. हे एकनाथ पैठणकर एकनाथ

नाहीत. यांचे गुरू म्हणजे बीडचे (जनी) जनार्दन होत. यांनी एकादशाप्रमाणे दशम स्कंधावरसुद्धा टीका रचली असून याबद्दलचे विवेचन मी स्वतंत्र लेखात केले आहे.[११] त्याचप्रमाणे निर्विकल्प नावाचा ग्रंथ सुद्धा जनार्दन शिष्य एकनाथांचा आहे. त्यांचा समय शके १५००–१५७० दरम्यानचा आहे. एकनाथकृत दशम-स्कंध टीका ३३९७ आहे तर एकादशाची टीका १८५०० च्या आसपास आहे. भागवताच्या एकादश-स्कंधाचे ३१ अध्याय असून १३६७ श्लोक आहेत. बीड येथील जनार्दनांचे शिष्य एकनाथ मात्र १३७० श्लोक देतात. माझा असा अंदाज आहे की, धुळे बाडांक ७२९ मध्ये दशम व एकादश या दोन स्कंधांवरील रचना एकत्र असावी. ह्यांच्या एकादशस्कंध टीकेचे वैशिष्ट्य म्हणजे त्यांनी पूर्वार्धाची ९२०६ ओवी संख्या दिली आहे. हे एकनाथ जनार्दनांचे जसे शिष्य आहेत तसेच त्यांचे जावई आहेत. बीड येथील जनार्दनपंतांचे मामे-भाऊ विसाजीपंत नावाचे होते. त्यांना एकूण तीन मुली होत्या. त्यांची नावे रेणुका, गंगा अशी होती. त्यापैकी रेणुका ही जांब येथील सूर्यपंतांना दिली होती. श्रेष्ठ उर्फ गंगाधर आणि समर्थ रामदास ही रेणुकेची मुले. दुसरी गंगा ही कमलाकरपंतांना दिली असून त्यांना तात्या नावाचा मुलगा होता. ह्या तात्याचा मुलगा म्हणजे रुद्राजी उर्फ भीमस्वामी शहापूरचा राहणारा. ही हकीकत समर्थ वाग्देवता मंदिर बाडांक १२८५ पुढील प्रमाणे आहे.

> हरूनि जननमृतिगदास ।
> फिरती न गणुनि विपदास ।।
> उद्धरावया स्वदास ।
> शाहपुरास पातले ।।३४।।
>
> तेथे जे कमलाजीपंत महिला ।
> वीसाजीपंत आत्मजा गंगाबाई असे ।।
>
> तत्सुत तात्या त्यांचे सुत ।
> नाना विरतिवर्य रुद्राजी ।
> त्या दिधली ते सुरवदा रामभजन ।
> संप्रदायमुद्रा जी ।।३७।।

या चरणातील रुद्राजी म्हणजे भीमस्वामी. श्री. वि. ल. भावे लिहितात,

> कऱ्हाडजवळ शहापूर येथे कमळाजीपंत या नावाचे गृहस्थ राहत असत. यांच्या बायकोचे नाव गंगाबाई. यास एक पुत्र होता. या पुत्रास तीन पुत्र होते. या तिघांपैकी सर्वांत वडील मुलाचे नाव 'नाना' किंवा भीम. हाच भीमस्वामी होय. या भीमस्वामीची आजी म्हणजे गंगाबाई उर्फ सतीबाई. हिने श्रीसमर्थ रामदास स्वामींचा उपदेश घेतला होता.[१२]

भीमस्वामी शहापूरहून तंजावर येथे गेले. त्यांचा मठ खुद्द तंजावर येथे असून भीमस्वामींचे झोळीराम बाबा, गोविंद बाळ व अण्णाजी बावा असे तीन शिष्य प्रख्यात होते. "यांपैकी गोविंद बाळ हे एक नाव नाही. बाळाजीपंताचा मुलगा गोविंद, अशी पितापुत्रांची नावे आहेत. बाळाजीपंताचे कुटुंब आणि भीमस्वामीचे कुटुंब या बहिणी बहिणी आहेत. याही मठात दासबोधाची जुनी प्रत व चित्रपट आहे."[१३]

रामदासी परंपरेमधील माहितीवरून असे दिसून येईल की, ज्या गोविंद बाळ स्वामी मठात एकनाथ, समर्थ, माधवस्वामीबद्दल हस्तलिखित टिपण दा. के. ओकांना मिळाले, तो मठ भीमस्वामी परंपरेतील आहे. भीमस्वामी, समर्थ रामदास व जनार्दनशिष्य एकनाथ यांचा नातेसंबंध आहे. गोविंद बाळ स्वामी मठातील टिपणातून ऐतिहासिक माहिती जी मिळते ती रामदासी परंपरेतील माहितीशी जुळते. प्रा. पंगु समजतात त्या प्रमाणे हे टिपण बनावट नाही. या टिपणामुळे समर्थ रामदास, भीमस्वामी, एकनाथ व माधवस्वामी समस्या सुटण्यास मदत होते. म्हणून या टिपणातील महत्वाचे मुद्दे असे—

(अ) जनार्दन स्वामींच्या मातुलांचे पुत्र विसा-जीपंत म्हणून कोणी होते.

(आ) त्यांना तीन मुली होत्या.

---

११. एकनाथ कृत दशम स्कंध व ज्ञानदेवीची फाटकप्रत—'प्रसाद' अंक ५, डिसेंबर १९७०.

१२. महाराष्ट्र सारस्वत, पाचवी आवृत्ती, पान ३९८.

१३. 'तंजावर प्रांतातील श्रीरामदासी मठ' रामदास आणि रामदासी, अंक १६६, पान २७६, वर्ष १४, १२–१०–१९३५.

कोठे तुझे स्थानमान ।
हेचि सर्वथा न कळेचि जाण ।।
अगाध तुझे महिमान ।
कैसेनि ध्यान धरावे ।।५।।

हे तु मां तु दृष्टांतु ।
न रिघे ज्याचे सिवे आंतु ।।
तो भागवतीचा भागवतार्थु ।
वोव्या आंतु वोलविसि ।।६।।

ते माझे मऱ्हाटे वारिखे वोल ।
सद्गुरुनि केले सखोल ।।
तेथिच्या प्रेमाचि जे वोल ।
जाणति केवळ गुरुभक्ति ।।७।।

ज्यासि नाही गुरुचरणी भक्ति ।
त्यासि कैसेनि होईल विरक्ति ।।
जरि पढिले श्रुति स्मृति ।
शास्त्र वित्पत्ति केल्यांहि ।।८।।

करिता साधनाच्या कोटि ।
साधनि समाधान लुटि ।।
जालिया सद्गुरु कृपादृष्टि ।
ब्रह्मत्वें पुष्टि गुरुभक्तां ।।९।।

तो तुं सद्गुरु जनार्दन ।
सकळ जगाचे अधिष्टान ।।
भुति भूतात्मा तुं आपण ।
सहजेचि जाण सम साम्ये ।।१०।।

समाप्तीच्या ओव्या पुढीलप्रमाणे आहेत—

येका जनार्दन नामे करी ।
जालि पातके राणभरी ।।
प्रपंचाचि जालि बोहरी ।
उरले उरि येकि येक ।।

येका जनार्दनी ज्या स्मरण ।
स्मरणे प्रकटे जनार्दन ।।
जनार्दनि हारपे जन ।
येकि येकपण संचले ।।

एका जनार्दनी जो विनटला ।
त्याचा संसारुचि वावो जाला ।।
ते कि येकपणाहि मुकला ।
येकि येकला जनार्दनु ।।

येका जनार्दन नामोच्चार ।
करितो पावन नर ।।
येका जनार्दन ज्यांचि धुर ।
तो नव्हे किंकर काळाचा ।।

येका जनार्दनु ज्याचा मित्रु ।
त्यासी त्रैलोकी नाही शत्रु ।।
येका जनार्दनु ज्यासी बीजमंत्रु ।
त्याचा संसारु सुखरुप ।।

येका जनार्दनि विमुख ।
त्याचे कोण निरसि भवदुःख ।।
जन्म मृत्युचे आवर्त्त देख ।
भोगिति अनेक विमुखत्वे ।।

विमुखत्वे भासे जन ।
सन्मुख दृष्टि जनार्दन ।।
जनि वनी न दिसे आन ।
येकि येक पण संचले ।।

येका जनार्दन कृपे करून ।
जन्म मरणा जाले शुन्य ।।
विजयि जाले साधकजन ।
अनूहात निशान लाविले ।।

येका जनार्दन नाम चित्ति ।
धरिता निरसे सकळ भ्रांती ।।
हारपे अज्ञान तमराति ।
उगवला गभस्ति विवेकभानु ।।

विवेक भानु उगवला ।
तेथ एका जनार्दनु प्रकटला ।।
श्री भागवती तीरी गमु जाला ।।
प्रेमा दिधला हरिदासी ।।

ईति श्री भागवते महापुराणे देशभाषा येकाकार टिकायां संपूर्णमस्तु ।। श्रीमज्जनार्दनार्पणमस्तु ।। तथास्तु ।। श्लोक २८ वोविया ५२७ ।। श्रीरस्तु ।। उत्तरार्ध श्लोक ७२७ ।। उत्तरार्थ टीका ९२०६ एवं संख्या पूर्वार्ध उत्तरार्ध ग्रंथ ।। श्लोक १३७० ।। टीका १८५०० श्रीमज्जनार्दनार्पणमस्तु ।।

जनार्दन शिष्य एकनाथ

ही भागवत पुराणाच्या एकादशस्कंधावरील टीका एकनाथाची आहे. हे एकनाथ पैठणकर एकनाथ

अनुक्रमणिका

नाहीत. यांचे गुरू म्हणजे बीडचे (जनी) जनार्दन होत. यांनी एकादशाप्रमाणे दशम स्कंधावरसुद्धा टीका रचली असून याबद्दलचे विवेचन मी स्वतंत्र लेखात केले आहे.[११] त्याचप्रमाणे निर्विकल्प नावाचा ग्रंथ सुद्धा जनार्दन शिष्य एकनाथांचा आहे. त्यांचा समय शके १५००–१५७० दरम्यानचा आहे. एकनाथकृत दशम-स्कंध टीका ३३९७ आहे तर एकादशाची टीका १८५०० च्या आसपास आहे. भागवताच्या एकादश-स्कंधाचे ३१ अध्याय असून १३६७ श्लोक आहेत. बीड येथील जनार्दनांचे शिष्य एकनाथ मात्र १३७० श्लोक देतात. माझा असा अंदाज आहे की, धुळे बाडांक ७२९ मध्ये दशम व एकादश या दोन स्कंधांवरील रचना एकत्र असावी. ह्यांच्या एकादशस्कंध टीकेचे वैशिष्टय म्हणजे त्यांनी पूर्वार्धाची ९२०६ ओवी संख्या दिली आहे. हे एकनाथ जनार्दनांचे जसे शिष्य आहेत तसेच त्यांचे जावई आहेत. बीड येथील जनार्दनपंतांचे मामे-भाऊ विसाजीपंत नावाचे होते. त्यांना एकूण तीन मुली होत्या. त्यांची नावे रेणुका, गंगा अशी होती. त्यापैकी रेणुका ही जांब येथील सूर्यपंतांना दिली होती. श्रेष्ठ उर्फ गंगाधर आणि समर्थ रामदास ही रेणुकेची मुले. दुसरी गंगा ही कमलाकरपंतांना दिली असून त्यांना तात्या नावाचा मुलगा होता. ह्या तात्याचा मुलगा म्हणजे रुद्राजी उर्फ भीमस्वामी शहापूरचा राहणारा. ही हकीकत समर्थ वाग्देवता मंदिर बाडांक १२८५ पुढील प्रमाणे आहे.

> हरूनि जननमृतिगदास ।
> फिरती न गणुनि विपदास ।।
> उद्धरावया स्वदास ।
> शाहपुरास पातले ।।३४।।
>
> तेथे जे कमलाजीपंत महिला ।
> वीसाजीपंत आत्मजा गंगाबाई असे ।।
>
> तत्सुत तात्या त्यांचे सुत ।
> नाना विरतिवर्य रुद्राजी ।
> त्या दिधली ते सुरवदा रामभजन ।
> संप्रदायमुद्रा जी ।।३७।।

या चरणातील रुद्राजी म्हणजे भीमस्वामी. श्री. वि. ल. भावे लिहितात,

कऱ्हाडजवळ शहापूर येथे कमळाजीपंत या नावाचे गृहस्थ राहत असत. यांच्या बायकोचे नाव गंगाबाई. यास एक पुत्र होता. या पुत्रास तीन पुत्र होते. या तिघांपैकी सर्वांत वडील मुलाचे नाव 'नाना' किंवा भीम. हाच भीमस्वामी होय. या भीमस्वामीची आजी म्हणजे गंगाबाई उर्फ सतीबाई. हिने श्रीसमर्थ रामदास स्वामींचा उपदेश घेतला होता.[१२]

भीमस्वामी शहापूरहून तंजावर येथे गेले. त्यांचा मठ खुद्द तंजावर येथे असून भीमस्वामींचे झोळीराम बाबा, गोविंद बाळ व अण्णाजी बावा असे तीन शिष्य प्रख्यात होते. "यांपैकी गोविंद बाळ हे एक नाव नाही. बाळाजीपंताचा मुलगा गोविंद, अशी पितापुत्रांची नावे आहेत. बाळाजीपंताचे कुटुंब आणि भीमस्वामीचे कुटुंब या बहिणी बहिणी आहेत. याही मठात दासबोधाची जुनी प्रत व चित्रपट आहे."[१३]

रामदासी परंपरेमधील माहितीवरून असे दिसून येईल की, ज्या गोविंद बाळ स्वामी मठात एकनाथ, समर्थ, माधवस्वामीबद्दल हस्तलिखित टिपण दा. के. ओकांना मिळाले, तो मठ भीमस्वामी परंपरेतील आहे. भीमस्वामी, समर्थ रामदास व जनार्दनशिष्य एकनाथ यांचा नातेसंबंध आहे. गोविंद बाळ स्वामी मठातील टिपणातून ऐतिहासिक माहिती जी मिळते ती रामदासी परंपरेतील माहितीशी जुळते. प्रा. पंगु समजतात त्या प्रमाणे हे टिपण बनावट नाही. या टिपणामुळे समर्थ रामदास, भीमस्वामी, एकनाथ व माधवस्वामी समस्या सुटण्यास मदत होते. म्हणून या टिपणातील महत्वाचे मुद्दे असे—

(अ) जनार्दन स्वामींच्या मातुलांचे पुत्र विसा-जीपंत म्हणून कोणी होते.

(आ) त्यांना तीन मुली होत्या.

---

११. एकनाथ कृत दशम स्कंध व ज्ञानदेवीची फाटकप्रत—'प्रसाद' अंक ५, डिसेंबर १९७०.

१२. महाराष्ट्र सारस्वत, पाचवी आवृत्ती, पान ३९८.


१३. 'तंजावर प्रांतातील श्रीरामदासी मठ' रामदास आणि रामदासी, अंक १६६, पान २७६, वर्ष १४, १२–१०–१९३५.

(इ) पहिली एकनाथास, दुसरी सूरोपंतास व तिसरी कमलाकरपंतास दिली होती. विसाजीपंताने ह्या कन्या आप्तकीने दिल्या होत्या.

(उ) सुरोपंत हे समर्थांचे तीर्थरूप व एकनाथ रामदासांचे मावसे.

(ए) कमलाकरपंत हेही रामदासांचे मावसे.

(ऐ) एकनाथ हे समर्थाच्या बारशास गंगातीरी जांबगांवास आले होते. यावरून पुढील प्रमाणे आलेख काढता येतो. (रामदासी बाड १२८५ व गोविंद बाळ स्वामी मठातील टिपणाच्या आधारे).



यावरून पुढील गोष्टी कळून चुकतात–

१. समर्थ रामदास व माधवस्वामीची आई उमा ही मावसभावंडे आहेत.

२. जनार्दनशिष्य एकनाथ समर्थांचे मावसे आहेत.

३. भीमस्वामी, माधवस्वामी व समर्थ यांचा नातेसंबंध होता.

उमा व माधवस्वामी

गोविंद बाळ स्वामी मठातील टिपणावरून असे दिसते की, एकनाथ हे समर्थांच्या बारशास उपस्थित होते. एकनाथांचा समय शके १५००–१५७० आहे हे आपण पाहिलेच आहे. समर्थांचा जन्मशक शके १५३० आहे. यावरून रामदासांच्या जन्मवेळी एकनाथांचे वय सुमारे ३० वर्षांचे होते. पैठणकर एकनाथांचा समाधि शक १५२१ आहे. त्यांची उपस्थिती असणे शक्य नाही. उलट समर्थ रामदासांची आई व बीड जनार्दन शिष्य असलेल्या एकनाथांची पत्नी या बहिणी बहिणी आहेत. म्हणून आपल्या पतीला–एकनाथाला घेऊन ती जांब येथे भाच्याच्या बारशास गेली असावी. त्यावेळेस तिला मूलबाळ नसावे. उमाचा जन्म नंतर झाला असावा. ही शक्यता मान्य केल्यास एकनाथांच्या उमा नावाच्या मुलीचा जन्म शके १५३०–३५ दरम्यान असावा. हीच उमा एकनाथांनी तंजावर येथे असलेल्या नागनाथास दिली व आपल्या पूजेतील गोपाळकृष्णाची मूर्ती दिली. माझ्या मते एकनाथांना उमा ही एकटीच मुलगी होती. म्हणून विवाहप्रसंगी व उत्तर आयुष्यात आपल्या उपास्य दैवताची मूर्ती त्यांनी उमेस प्रदान केली. उमा व तिचे पति नागनाथ यांना याचा मोठा अभिमान वाटत असावा असे दिसते. म्हणूनच माधव-स्वामीचे वंशज पदोपदी 'अस्मत् कुलभूषण' असा गौरव करताना आढळतात. उमा–नागनाथ यांना दोन मुले झाली. शके १५३३–३४ उमेचा जन्म झाला असावा. वयाच्या ६–७ वर्षी तिचा विवाह (तत्कालीन प्रथेप्रमाणे झाला असावा. तिचा वडीलमुलगा सिद्धनाथ आहे. याचा जन्मशक १५५१ व माधवस्वामीचा जन्मशक १५५३ चा असावा. माधवस्वामी हा दीर्घा-युषी असावा. शके १६१८ त त्याने योगवासिष्ठ रचले. गणेश पुराणाचा रचनाशक १६३५ आहे. शके १६३५–३६ च्या सुमारास तो समाधिस्थ झाला असावा. माधव स्वामीने शके १५५३–१६३६ दरम्यान दक्षिण भारतात प्रचंड स्वरूपात वाङ्मयनिर्मिती करून व्यासवाल्मिकी व दासोपंत–मोरोपंतांची परंपरा चालविली असे दिसून येईल.

अनुक्रमणिका

संशोधकांच्या धोपटमार्गाचे बळी : श्रीनामदेव : व. स. येरकुंटवार

संतशिरोमणी श्रीनामदेवांच्या सातव्या जन्मशताब्दीचा उत्सव गेल्या वर्षी साजरा करण्यात आला होता. या समारंभाचा ऊत व फेस आता जिरला असल्यामुळे, श्रीनामदेवांविषयी उत्पन्न झालेल्या प्रमुख समस्यांची स्वरूपे व उत्तरे नीट कळण्यास आता अनुकूल परिस्थिती आली आहे असे म्हणता येईल. 'यस्य विवाहः तस्य पूजनं' या न्यायाने श्रीनामदेवांच्या जन्मशताब्दिमहोत्सवात जे गुणगान झाले ते समुचितच होते. महाराष्ट्र-मंडळाच्या प्राचीन इतिहासातले जे काही प्रथम म्हणून होते ते सर्व श्रीनामदेवांशी संबद्ध करण्यात आले; मराठी मनाची 'भावुकता' त्यात प्रतिबिंबित झाली हे खरे! आता त्याचा 'विवेक' प्रकट होणे अवश्य आहे!!

पहिले कीर्तनकार, पहिले अभंगकार, पहिले अस्पृश्योद्धारक, आध्यात्मिक लोकशाहीचे पहिले उद्गाते, महाराष्ट्राबाहेर पंढरीचा भागवतधर्म नेणारे पहिले प्रचारक इ. इ. बिरुदावलींचा मान श्रीनामदेवांना देण्यात आला आहे आणि त्यात वावगे काही नाही. पण या गोष्टी त्यांनी केल्या नसल्या तरीही त्यांचे थोरपण अक्षुण्णच राहते, ते स्वयंभू आहे, हे या समारंभाच्या जल्लोषात फार नजरेआड झाले आहे हे मात्र म्हणावेसे वाटते!

प्रस्तुत विवेचनाचे मी तीन भाग करू इच्छितो. पहिला भाग, आजच्या संशोधनात 'प्रमाण-प्रमेय-पद्धतीं'चा अवमान कसा केला जात आहे हे स्पष्ट करील, दुसरा भाग, श्रीनामदेवांच्या गाथेच्या संपादनात अलक्षित व दुर्लक्षित असलेल्या गोष्टींचे आणि त्यांच्या जीवनातील घटनांचे विवरण करील आणि तिसरा भाग, श्रीज्ञानदेव व श्रीनामदेव यांचे संबंध आणि श्रीनामदेवांची पंजाबयात्रा याबाबत चर्चा करील.

डॉ. दप्तरींच्या धर्ममीमांसेत 'प्रमाण-प्रमेय-पद्धतीं'चा जसा ताळमेळ नाही, तसाच श्रीनामदेवांवरील संशोधनात आज आम्ही ठेवलेला नाही. या महोत्सवापूर्वीच्या एकदोन वर्षांत व त्याच्या कालावधीत जे वाङ्मय निर्माण झाले आहे, त्यातील काही उदाहरणे घेऊन हे दाखविता येईल, की या विषयातील संशोधनात 'प्रमाण-प्रमेय-पद्धतीं'चा विलक्षण चोळामोळा झाला आहे!

'प्रमाण-प्रमेय-पद्धती' म्हणजे प्रतिपाद्य विषयाला अनुलक्षून असलेले पुरावे नीट तपासून त्यांची प्रतवारी लावणे व ती लावल्यानंतर तर्कदृष्टया सुसंगत सिद्धांत रचणे. नेमका या बाबतीतच आम्ही कसा गोंधळ घातला आहे हे पाहण्याजोगे आहे. काही नमुनेदार उदाहरणे पाहू.

डॉ. कोलत्यांनी आपल्या 'नभोवाणी'वरील अध्यक्षीय व्याख्यानात 'योगिराज ज्ञानदेवालादेखील भक्तिरहस्य नामदेवांजवळून घ्यावे लागले' असे म्हटले आहे, तशी वस्तुस्थिती असली, तर श्रीज्ञानदेव काही कमी प्रतीचे ठरत नाहीत व श्रीनामदेव उच्च प्रतीचे ठरत नाहीत. साधकजीवनात असे नेहमीच दिसून येते, की एक दुसऱ्याची साधना सर्वांगपूर्ण करावयास सदैव तत्पर असतो व तसे करताना 'मान-दंभ-चेष्टे'स तो कधीच आळवीत नसतो. तसे पाहिले, तर भक्तीच्या उच्चतम पायरीवर चढावयास श्रीज्ञानेश-भावंडांनीच श्रीनामदेवांना खरी मदत केल्याचे त्यांनीच लिहून ठेवले आहे. तें असो. तेव्हा या दृष्टीने डॉ. कोलत्यांच्या विधानाकडे लक्ष देण्याचे कारण नाही. पण इतिहास-संशोधनाच्या दृष्टीने? त्यांच्या विधानास किंमत तेव्हाच येईल, की ज्यावेळी ते, भक्तिरहस्य म्हणजे काय, ते श्रीज्ञानदेवांत श्रीनामदेवांच्या भेटीच्या पूर्वी कसे नव्हते, भेटीनंतर त्यांनी ते अंगी कसे

बाणविले, त्यामुळे त्यात कोणता आमूलाग्र फरक झाला इ. चे पद्धतशीर विवेचन करतील. उपलब्ध निश्चित पुरावा तर असे दाखवितो, की श्रीज्ञानदेवांना, भक्तिरहस्य म्हणून जगात जे ओळखले जाते, त्याचे बाळकडू घराण्यातूनच पाजले गेले होते. विठ्ठलपंतांचे भक्तिप्रधान आयुष्य, श्रीनिवृत्तिनाथांना श्रीगहिनीनाथांनी दिलेली त्याचीही दीक्षा व संथा, श्रीज्ञानदेवांचा श्रीज्ञानदेवीच्या निर्मितीपूर्वीचा कालक्रम, शुद्धिपत्र देणाऱ्या पैठणकर ब्राह्मणांचा गंभीर हितोपदेश प्रत्यक्ष श्रीज्ञानदेवीतील भक्तीचा कल्लोळ इ. पुरावे डॉ. कोलत्यांच्या विधानातील सहेतुकता स्पष्ट करतात. 'युगवाणी'तील त्यांच्या लेखात (नोव्हें. १९७०) श्रीज्ञानदेवांचा वारकरी संप्रदायात प्रवेश व त्यांचा कीर्तनाभ्यास याबाबत असेच सहेतुक विधान आहे. विठ्ठलपंत वारकरी होते व त्यांचा हरिकीर्तनाचा परिपाठ होता हे श्रीनामदेवांच्या 'आदी'वरून स्पष्ट होते. श्रीज्ञानदेवांचे दोन्हीकडचे आजे श्रीविठ्ठलाचे उपासक होते हेही आदी'वरून निःसंदिग्धपणे दिसते. पैठणला गेल्यानंतरची श्रीज्ञानदेवांची जी दिनचर्या श्रीनामदेवांनी दिली आहे, तीत 'सांगती पुराण रात्री हरिकीर्तन' असे ठसठशीतपणे नमूद करण्यात आले आहे. या कीर्तन-रंगात व अन्य काळीही श्रीज्ञानदेवांनी भक्तिरहस्य प्रतिपादन केले नसावे तर काय केले असावे ? याच लेखात त्यांनी श्रीज्ञानदेवीतील कीर्तनविषयक ओवी दिली आहे, ती तर डॉ. साहेबांच्या प्रतिपादनातील हेतुपूर्वकता अधिकच स्पष्ट करते ! श्रीनामदेवांनी कीर्तनाचा—वारकरी कीर्तनाचा—मांड प्रथम मांडला इ. विधानेही अभ्यासकांनी पारखूनच घेतली पाहिजेत. कारण श्रीनामदेवच म्हणतात, की आमच्या कुळवाडीतच कीर्तनाची परंपरा आहे. पंढरीची वारी व भजन-कीर्तनादी भक्तिव्यापार श्रीनामदेवांच्या कितीतरी पूर्वीपासूनचे आहेत हे अनेक पुराव्यांनी स्पष्ट झाले आहे. श्रीनामदेवांनीच तत्कालीन हरिदास व कीर्तनसंस्था यांच्या ऱ्हासाचे एका अभंगात (हरिदासपणे उभविला ध्वज) विदारक चित्रण केले आहे.

श्रीनामदेव पहिले अभंगकार आहेत हे प्रतिपादनही केवळ भावडे आहे. (लोकराज्य, ९ नोव्हें. १९७०, श्री. द. रा. बगाडे) पुष्कळांनी हे हिरीरीने मांडले आहे. पण याला पुरावा ? स्वतः श्रीनामदेव कवित्व केव्हा करू लागले ? अभंगरचनेची घटना वर्णन करणारा त्यांचा अभंग म्हणतो, की 'आताचि अवधि थोडी असे ?' श्रीज्ञानदेवादी भावंडांच्या भेटीनंतर व श्रीगोरोबांची थापटी खाल्यानंतर श्रीनामदेवांना गुरुकृपेचा प्रसाद फळला आणि त्यानंतर केव्हा तरी त्यांना शतकोटी कवित्व करण्याची तळमळ वाटली व तशी स्फूर्ती झाली. त्यानंतर ते लवकरच श्रीज्ञानदेवांबरोबर तीर्थयात्रेस निघून गेले. याच्या उलट श्रीज्ञानदेवप्रभृतींचे कवित्व परिपाकास येऊन बहरून गेले होते. कीर्तन करणाऱ्या श्रीज्ञानदेवांचे अभंग श्रीनामदेवांच्या अभंगरचनेच्या पूर्वीच संभवू शकतात हे या कालक्रमावरून उघड होते. श्रीनामदेवांनी 'आदी'त श्रीज्ञानदेवांच्या रचनेनंतरचा प्रसंग नमूद करून असे म्हटले आहे, की 'क्रमिताती मार्ग अनुभव कुशळ । हरिनाम सकळ कवित्व कळा ।।' म्हणजे सर्व प्रकारचे कवित्व करीत करीतच ही भावंडे आळंदीस परतली. या काव्यनिर्मितीत अभंगरचना नव्हतीच असे जोवर दाखविता येत नाही, तोवर तरी पूर्वोक्त विधाने निमूटपणे मान्य करता येत नाहीत. स्वतः श्रीनामदेवांची साक्ष देखील असल्या विधानांच्या विरुद्ध आहे. श्रीनामदेवांच्या म्हणून समजल्या गेलेल्या जन्मपत्रिकेच्या अभंगात, 'शतकोटि अभंग करील प्रतिज्ञा' असे म्हटले आहे त्यावरून हे स्पष्ट होते, की या प्रकारच्या छन्दोरचनेची कल्पना समाजात रूढ होती. त्याशिवाय भविष्यकथनात ती येणे अशक्य आहे. स्वतः श्रीनामदेवांनी अभंगप्रेरणेची घटना वर्णन केली आहे तीतही त्यांना या रचनेची पूर्वकल्पना होती असे ध्वनित झालेच आहे; पुन्हा ते स्वतः अथवा कोणीही समकालीन नवीन वृत्त म्हणून त्याला म्हणत नाहीत. केवळ लक्षण सांगितले एवढ्यावरून हे सिद्ध होत नाही. अनुज्ञा देणाऱ्या विसोबा खेचरांनाही तसे वाटत नाही. लहान अभंगाचेही लक्षण त्यांनी दुसऱ्या अभंगात दिले आहे. श्रीगहिनीनाथासारखे पूर्ववर्ती सत्पुरुषही अभंग करीत असत. लीळाचरित्रात एका ठिकाणी या रचनेचा, विकृत का होईना, उल्लेख आला आहे. 'विठ्ठल-विरू-कथन' या लीळेत विठ्ठलावतार, त्याची पूजाअर्चा व त्यावरील भक्ति-

काव्य, पंढरपूर याबद्दल जो मजकूर आला आहे, त्यात 'तेयाचे पुत्र जाति : पदें करिति : ते वीठो रुक्मीणि अभंगीं घालीति' (लीळा ४२३) असे निःसंदिग्धपणे म्हटले आहे इथे 'स्मृतिस्थळ' इ. महानुभाववाङ्मयात आलेल्या अर्थाहून वेगळया अर्थाने 'अभंग' शब्द आला आहे. जाती म्हणजे जती-आरती व पदे यांच्याबरोबर असलेल्या या शब्दाचा अर्थ प्रसिद्ध छन्दोरचना हाच संभवतो. म्हणजे अभंगाची जन्मकथा श्रीनामदेवांच्या काव्यरचनेच्या काळाच्या पुष्कळच अगोदरची ठरते त्या काळी आबालवृद्ध, स्त्री-पुरुष, श्रेष्ठ-कनिष्ठ, शिक्षित-अशिक्षित असे सर्वच जण अभंग करताना दिसतात तेव्हा ती समाजात चांगलीच रुळली होती असे सिद्ध होते. श्री. कविटकरांनी अभंगरचनेचा काळ शके १२१२ च्या पूर्वीचा ठरविण्याचा जो प्रयत्न केला आहे (श्रीनामदेव : चरित्र काव्य आणि कार्य, महाराष्ट्र प्रकाशन) तोही कसा बुद्धिपुरस्सर व सदोष आहे हे या स्पष्टीकरणावरून उघड होईल

अभंगाप्रमाणेच आरतीच्या छंदाबद्दलही म्हटले जाते. श्री. दे व्यं चौहान यांचे, 'आरती छंदप्रकाराचे नामदेव हेच निर्माते होत असे म्हणावयास प्रत्यवाय नाही. नामदेवांनी मराठी साहित्यात पहिली आरती लिहिली.' (श्रीनामदेव-दर्शन, पृ ३९३) हे विधानही पूर्वीच्या अभंगविषयक विधानाप्रमाणे भोंगळ व चुकीचे आहे. 'आरती' या शब्दाच्या व्युत्पत्तीच्या वादात न पडता एवढे लक्षात आणून द्यावेसे वाटते, की देवतेच्या पूजोपचारातील हे अंग फार प्राचीन काळापासून प्रचलित आहे व त्यात तंत्रमार्ग, वैष्णव-शैव भक्तिमार्ग, पौराणिक परंपरा, धर्मशास्त्र इ.चाही मोठा वाटा आहे. देवपूजेशी संगीताचा संबंध जडल्यापासून नीरांजनविधी अथवा दीपदर्शन अथवा दीपसमर्पण या पूजांगांत गेयता येऊन आरती छंदाचा जन्म झाला हे उघड आहे. श्रीनामदेवांनी आरती छंदाची निर्मिती केली त्या वेळेपर्यंत पूजाविधीत अंधारच होता असे मानणे हास्यास्पद आहे. कवित्व करण्याच्या पूर्वी लहानपणापासून श्रीनामदेव कीर्तन-भजन-पूजन करीत होते, तेव्हा त्यांच्या कवित्वाच्या पूर्वी कोणत्या तरी रूपात अस्तित्वात असलेल्या या गोष्टींनीच ते आपले भक्तिजीवन व्यतीत करीत होते, हे उघड आहे. श्रीतुकारामांनी 'काही पाठ केली संतांची उत्तरे' असे स्वतः विषयी म्हटले आहे, तसेच श्रीनामदेवांनीही 'पाठ वेदादि वचने । शास्त्रदृष्टि अवलोकनें । कीर्तनीं गुण वानणें । ते नारायणें अंगीकारावीं ॥' असे म्हटले आहे. त्यांचा ठळकट ठसा त्यांच्यावर उमटावा हेही सहजच आहे. तत्कालीन वाङ्मय व कोरीव लेख यांवरून स्पष्ट दिसते की गेय आरतीचा छंद श्रीनामदेवांच्या पूर्वीपासून महाराष्ट्र-मंडळात रूढ होता. 'विठ्ठल-वीरू-कथना'त श्रीचक्रधरांनी विठ्ठलाच्या आरतीचा उल्लेख केलाच आहे. स्वतः श्रीचक्रधरांची आरती होत असे हे भावे देवव्यासांच्या 'पूजावसरा'-वरून सविस्तर दिसतेच धूपार्ति, मंगलार्ति, आरति पद्य (जतु व जती हे दोन शब्द 'जयतु' व 'जयति' या शब्दांचा संकोच होऊन सांकेतिक अर्थाने रूढ झाल्याचेही लक्षात येते.) महींद्राचा 'जतीचा दशकु' (सुमारे शके ११९३) प्रसिद्धच आहे. म गोपीराजबुवा यांनी दिलेल्या शके १३८४ मधील स्मृतीत आरतीचा उल्लेख आहे. (मराठी आरती, डॉ म. वि. गोखले) तत्पूर्वीच्या शके ११७२ च्या तासगाव ताम्रपटातही तसाच उल्लेख आहे. कोरीव लेखांवरूनही एतद्विषयक स्पष्ट कल्पना येते. तात्पर्य हे, की अभंगाप्रमाणेच आरतीचा छंदही महाराष्ट्र मंडळात श्रीनामदेवांच्या पूर्वकाळीच समाजाच्या हाडीमासी भिनला होता. श्रीज्ञानदेवांची म्हणून सद्गुरुविषयक जी आरती आहे, ती श्रीनामदेवांच्या आरतीच्या पूर्वीची असणे शक्य आहे. याच आरतीवरून श्रीतुकारामांना तशीच आरती करण्याची स्फूर्ती झाली असावी. असाही प्रश्न विचारता येण्याजोगा आहे, की आरतीचा छंद म्हणजे कोणता छंद? कारण आरतीच्या पद्यांत विविधता आहे डॉ. म. वि. गोखले यांचे अल्प विवेचन विचारात घेण्याजोगे आहे. पुनः असे, की श्रीनामदेवांची काकड आरती, शेजारती इ.ही रचना आहे. यापैकी कोणती त्यांनी प्रथम केली? असे झाले असणे मात्र शक्य आहे, की श्रीनामदेवांच्या पूर्वीच्या पांडुरंगाच्या आरत्या अस्तंगत होऊन, विभूतिमत्वामुळे व रचनावैशिष्ट्यामुळे, त्यांच्या आरत्या समाजाने शिरोधार्य केल्या. श्रीसमर्थांची मंगलमूर्तीची आरती महाराष्ट्राने अशीच

उचलून धरली. तिच्या पूर्वी ती नव्हती, त्यांनी ती नवीन केली असे नव्हे.

श्री. कविटकरांचे आग्रही प्रतिपादन 'प्रमाण–प्रमेय–पद्धती'च्या मुद्याच्या दृष्टीने तपासण्याजोगे आहे. श्रीज्ञानदेवांबरोबर केलेल्या तीर्थयात्रेनंतरची पंजाब-यात्रा हा केवढा वादविषय झाला आहे हे अभ्यासकांना ठाऊकच आहे. तीच निर्वीवादपणे सिद्ध होण्याची जिथे मारामार, तिथे श्री. कविटकरांच्या चार तीर्थयात्रांचे प्रतिपादन गळी उतरणे कठीण आहे. उपलब्ध पुराव्यांची छाननी न करता ते यात्रासंख्या वाढवीत आहेत. एखादी आणखी यादी सापडली तर ते पाचवीही तीर्थयात्रा; प्रतिपादितील ! इतर कित्येकांच्या बरोबर त्यांनीही निर्गुण निराकार परमेश्वराच्या महत्तेची हिंदी पदातील विशेषता विलक्षण ताणली आहे. हिंदी विद्वानांचे संतमतविवरण दिशाभूल करणारे आहे हे उघड आहे. एक तर हे, की ते पुष्कळसे निराधार व स्वैर आहे. वस्तुस्थिती तर अशी आहे, की संतमताचे विशेषेकरून प्रवर्तन ज्यात आढळेल, असे नामदेवांचे हिंदी पदसाहित्य संख्येच्या दृष्टीने अधिक नाही. दोन–तीन पदे व दहा–बारा साखी एवढचापुरतेच ते मर्यादित आहे.' (श्रीनामदेवदर्शन : हिंदीसंतमताचे आद्यप्रवर्तक नामदेव, ले. डॉ. भगीरथप्रसाद मिश्र, पृ. ५६५) आपाततः व घुणाक्षर न्यायाने निघालेल्या एखाद्या दुसऱ्या उद्‌गारावरून कोणत्याही वाङ्मयातून काहीही काढून दाखविता येईल ! दुसरे हे, की वेदांतातील निर्गुण निराकार ब्रह्म व त्याची उपासना मूलतः इतकी भिन्न आहे, की तिची इस्लामी ईशतत्त्वाशी व एके-श्वरीवादाशी कोणत्याही प्रकारे तुलना करता येत नाही. इस्लामी धर्माने मूर्ती मानली नाही याचा अर्थ तो निर्गुण निराकार मानणारा होता असा कसा केला जातो हे कळत नाही. हिंदु–मुस्लिम ऐक्याच्या आजच्या राजकीय कल्पनेच्या आहारी जाऊन हा अपसिद्धांत आम्ही आपल्या गळचात आज बांधून घेत आहोत. तसेच त्यांचे दुसरेही प्रतिपादन मोठे विक्षिप्त आहे. मुसलमानी आक्रमकांमध्ये वर्णविशिष्ट उच्चकनिष्ठत्व नसल्यामुळे, त्यांच्या प्रभावाने, सर्वांना समान मानण्याची दृष्टी येऊन श्रीनामदेवप्रभृतींनी जातिभेद वर्ज्य ठरविला. (श्रीनामदेव : चरित्र, काव्य व कार्य, पृ. ६०) श्रीनामदेवांच्या जातिभेदविषयक दृष्टीबाबत केलेले विधान चूक तर आहेच, पण इतिहासदृष्टचाही ते काही तरी लिहून गेले आहेत !

प्रा. रेळेकरांनी श्रीनामदेवासंबंधी अनेक ठिकाणी लिहिताना जो मुद्दा मांडला आहे त्यात 'जातिभेदातीत धार्मिक लोकशाहीचा उदय', 'आध्यात्मिक लोक-शाहीचे धार्मिक लोकशाहीत रूपांतर', 'व्यक्ति-प्रतिष्ठेचे नवे नैतिक मूल्य' इ. अगडबंब शब्द आले आहेत. (लोकराज्य, ९ नोव्हें. १९७०) ते वाचले, की माझ्यासारख्याला वाटते, या शब्दांचे निश्चित अर्थ या विद्वानांना खडसून विचारावे. आमच्या हाडी-मासी खिळलेली ही 'Euro–American eth-nocentrism'ची भूतावळ इतकी जबरदस्त आहे, की त्यातील अवास्तवता व रिक्तता आमच्या ध्यानात येत नाही. युरोप–अमेरिकन संस्कृतीने निर्माण केलेल्या आवडी–निवडी सर्वस्वी प्रमाण व उन्नत धरून चालू नये, संस्कृतींच्या उच्चनीच प्रतींचे निकष विश्वव्यापी नाहीत, cultural relativism'चे तत्त्व ओळखले पाहिजे इ. सिद्धांत आधुनिक शास्त्रज्ञ कंठरवाने सांगतात आणि आम्ही मात्र बुरसटलेपणाने जुनेच घोटीत असतो. श्रीनामदेवांच्या बाबतीत असले निरर्थक व भ्रामक प्रतिपादन करणाऱ्यांना हेही मान्य करावे लागेल, की जनाबाईची गुलामगिरी नष्ट करण्याचे धैर्य श्रीनामदेवात नव्हते व मानवतावादात एवढी प्रगत उडी घेण्याइतपत ते विकसित झालेले नव्हते ! जनाबाईच्या अभंगांवरून तिच्या कष्टी जीवनाची स्पष्ट कल्पना येते !!

'प्रमाण–प्रमेय–पद्धती'च्या चोळचामोळचाची आणखीही अनेक उदाहरणे देता येण्याजोगी आहेत.

या शताब्दीच्या निमित्ताने पुनः काही चिररूढ व धोपटमार्गी पूर्वग्रहांचा जयजयकार जो करण्यात आला त्याच्याकडे अभ्यासकाचे लक्ष वेधले जाणे स्वाभाविक आहे. सामान्य जनतेला अज्ञानाच्या अंधारात उच्च वर्णीयांनी डांबून ठेवले होते, संतांनी तिचा कैवार घेऊन आंदोलने केली, उच्च वर्णीयांनी कनिष्ठ वर्णीयांचा छळ केला इ. इ. मते डॉ. कोलते, डॉ. देशपांडे आणि इतर कित्येक यांनी जी आवर्जून मांडली आहेत तीही

'प्रमाण–प्रमेय–पद्धती 'चा कुस्करा करूनच ! या मतांबद्दल आज चर्चा करणे मोठे जोखमीचे व नाजुक काम आहे ही चर्चा करताना प्रथम दोन गोष्टी लक्षात ठेवल्या पाहिजेत. कोणत्याही प्रकारे वर्तमान काळाशी या चर्चेचा संबंध असू नये आणि दुसरे असे, की कोणत्याही बाजूचे वकिलपत्र घेऊन अभ्यासकाने पक्षपात करू नये. ऐतिहासिक सत्याची सर्वंकषता राहील असाच संशोधकाचा बाणा असला पाहिजे. चालू परिस्थितीचे हर्ष व अमर्ष संशोधनात घुसडू नये, तसे केले तरच 'प्रमाण–प्रमेय–पद्धती 'चा बोज राहील !

या पूर्वग्रहांना धरून असा प्रश्न उपस्थित करता येईल, की यादवकाळात लोकप्रबोधनाची काय व्यवस्था होती ? स्वत: श्रीनामदेव बहुश्रुत व शिकलेले होतेच. श्री. ग. वि. कुळकर्णी यांनी आपल्या लेखात यासंबंधी साधार दिग्दर्शन केले आहे. (श्रीनामदेवदर्शन) पण जनाबाईच्या एका अभंगावरून (ज्ञानेश्वर अभंग बोलिले......)तर हे नि:संशय दिसते, की समाजाच्या सर्व थरांत साक्षरतेची सोय व शिक्षणाची व्यवस्था होती. कोण कोणाचे अभंग उतरवून घेत असे याची नोंद करताना तिने असे सांगितले आहे, की चांगदेवाचे अभंग श्यामा कासार लिहित असे, पूर्णानंदाचे तेली परमानंद, सांवत्या माळ्याचे काशिबा गुरव, कूर्मदासाचे वासुदेव काईत इ. इ. स्त्री–शिक्षणाच्या बाबतीतही काही अनुमान करता येते. 'बाई मी लिहिणे शिकले सद्‌गुरुरायापाशी ' या तिच्या पदात काही आलंकारिता आहे असे म्हटले, तरी स्त्री–शिक्षण ही अंगावर शहारे आणणारी गोष्ट वाटत नव्हती हे उघड आहे. नगर व ग्राम यांत सर्वत्र पाठशाळा होत्या व शिक्षणेच्छू शिकू शकत होता, त्याबाबत प्रतिबंध वा निषेध नव्हता. संस्कृतच्या बरोबरीने दीर्घकाळ महाराष्ट्री अपभ्रंश भाषेतले वाङ्मय लोकप्रबोधन करीत होते. पाचव्या शतकातील नारदस्मृतीने शिक्षकाची व्याख्या 'देशभाषाद्युपायैश्च बोधयेत् ' अशी खणखणीतपणे सांगितली आहे. ती का नजरेआड करावी ? तेव्हा शास्त्री–पंडित व संस्कृत यांच्यावर आग पाखडण्याचे कोणतेच कारण दिसत नाही. नगर व ग्राम यांत संगीत–नृत्यादि कलांचाही भरपूर विकास झाला होता. विविध शिल्पे

म्हणजे कारागिरीही विलोभनीय होती. यादवांच्य
समृद्ध राज्यामुळे अल्लाउद्दिन प्रभृति परकीयांच्य
तोंडाला पाणी सुटले होते. म्हणजे साक्षरता व शिक्षण
याबाबत कोणी कोणाला डांबून ठेवल्याचे दिसत नाही
आध्यात्मिक व धार्मिक ज्ञानाच्या बाबतीत देखील हीच
वस्तुस्थिती दिसते. डॉ. पानसे आपल्या 'यादवकालीन
महाराष्ट्रा 'त लिहितात, " . .पण देवतांवरील श्रद्धेच्य
मुळाशी भक्तीचा ओलावा सतत टिकविण्याचे काय
गावोगावी देवळा–देवळांमधून प्रत्यही चाललेल्या पुराण
प्रवचनांनी केले. पुराणांच्या आधाराने होत असलेल्य
प्रवचनांमध्ये संस्कृत ग्रंथांचे स्पष्टीकरण,लोक–भाषेत–
मराठीत केले जात असल्याकारणाने त्याचा फायद
सुविद्य पंडितांइतकाच अशिक्षित श्रोतृवर्गालाही हो
होता. लोकशिक्षणाच्या उदात्त कार्यात सहभागी होऊ
श्रीधरासारख्या गाढ्या पंडितांनी भागवतादि ग्रंथांव
टीका लिहिल्या. पुराण–प्रवचन–कीर्तनांचे माध्य
मराठी झाले तेव्हा बहुजनसमाजामध्ये धार्मिक विच
राच्या क्षेत्रात जागृती होऊ लागली." (पृ. १६७
ही साक्ष आधुनिक विचारप्रवाहातल्या एका विद्वाना
आहे हे लक्षात घेण्याजोगे आहे. श्रीनामदेव प्रभृत
पासून श्रीचोखोबांच्या परिवारापर्यंत अनेकांच्या का
संपदेत संस्कृतप्रचुर व प्रौढभाषा जी आढळून येते
त्यांचे गंभीर व उदात्त विचार जे दृष्टोत्पत्तीस येता
त्यावरून असे नि:शंकपणे म्हणता येते, की 'अज्ञान
डांबणे ' व 'शिक्षणाची द्वारे बंद करणे ' इ. आ
विकृत व अनैतिहासिक आहेत. सर्व समाजात ग्रंथां
प्रमेये, रहस्ये व धर्मतत्त्वे खोलवर रुजली असल्याशिव
असले प्रबोधन संभवनीय नाही !

'उच्चवर्णीयांनी कनिष्ठवर्णीयांचा केलेला छ
या घोटीव व ठोकळेबाज मताची आतडी निष्ठुर
व बारकाईने तपासली पाहिजेत. डॉ. ज. ना. देशपांड
सारखे विद्वान, एखाद्या संधिसाधु व राजकीय पुढा
सारखे ज्यावेळी लिहितात, त्यावेळी त्यांच्या प्र
विधानाला 'प्रमाण–प्रमेय–पद्धती 'वर घासून पाहण
अट्टाहास बाळगावासा वाटतो. असल्या प्रक
आडदांड व बेजबाबदार विधाने करताना सम
जीवनाच्या अभ्यासाचा किती परिचय आम्ही

वितो ! एक व्यक्ती विरुद्ध दुसरी व्यक्ती, व्यक्तिगत आढ्यता विरुद्ध व्यक्तिगत शालीनता असला प्रकार समाजजीवनात अहर्निश पुष्कळ घडत असतो. एका संघाचा वा समुदायाचा दुसऱ्या संघाशी वा समुदायाशी पद्धतशीर, बुद्धिपुरस्सर, योजनाबद्ध दुष्ट लढा असतोच असे काही नाही. वर्गविशिष्ट लढ्याची वैचारिक खोड 'युरो–अमेरिकन' आढ्यताखोरीस बळी पडल्यामुळे आम्हाला जी जडली आहे, तिचा हा दुष्परिणाम आहे. वैयक्तिक जीवनातले संघर्ष सर्व काळी सर्व समाजात घडत आले आहेत व पुढेही घडतील. इतकेच कशाला ? या वर्ण संघर्षाबाबत, आपल्याच अंगावर वळ उठल्यासारखे करून ठणकणारे तथाकथित मानवतावादीही; आज, या नाही त्या प्रकारे, ओकारी येईल इतक्या ओंगळपणाने सर्वत्र संघर्ष करीतच आहेत ! हा कोण्या एका विशिष्ट समाजरचनेचा वारसा नव्हे; असलाच तर तो मानवी स्वभावाचा आहे !! आणि फार मोठमोठेही या मानवी स्वभावापुढे हार खाताना आजवर दिसत आले आहेत. निखळ मानवतावादी बनण्याइतपत मजल मानव जातीने आजवर मारलेली नाही आणि पुढेही ती केव्हा मारील हे सांगवत नाही. 'बहुजनहिताय बहुजनसुखाय' अशी घोषणा करणाऱ्या भगवान् बुद्धाला आपल्या क्षत्रियपणाचा अभिमान टाकता आला नाही याची साक्ष अविवाद्यपणे बौद्धग्रंथामध्ये आहे. अशा महान् विभूतीपासून तो 'सुभाषबाबूंचा विजय म्हणजे माझा वैयक्तिक पराजय' असा सरोष खेद करणाऱ्या महात्मा गांधींपर्यंत अनेक दिग्गजांची जेथे त्रेधा उडाली आहे, तेथे, श्रीतुकारामांच्या भाषेत बोलावयाचे म्हणजे संसाराच्या पुढे पुढे नाचणाऱ्या आम्हा मोलाच्या माकडांची काय केवा ? आपले प्रज्ञावंत पूर्वज साधन चतुष्टय संपन्न नसलेल्या वेदान्त्याबद्दल असे म्हणत, की शेणमाती माखलेल्या चेहऱ्याची पोरटी शिमग्यात जशी शोभतात, तसे कलियुगात वेदान्ती ! आम्हा मानवतावाद्यांबद्दल श्रीनामदेव प्रभृती असेच म्हणत असतील ! 'दंभ, पोट भरायाचे चाळे' !! दुसरे काय !!!

छळ आणि जाच या प्रकाराबाबत दुसरीही महत्त्वाची गोष्ट लक्षात घेतली पाहिजे. कोणत्याही ध्येय–धुंद व उत्कट अंतःकरणाच्या व्यक्तीबाबत समाजात प्रथमतः हाच अनुभव दिसून पडतो. समाज सर्वसामान्यतः थंडपणे, दैनंदिनपणे, धोपटपणे जगत असतो. 'गतानुगतिको लोकः न लोकः पारमार्थिकः' हे नागडे सत्य आहे. मानवतावादी म्हणविणाऱ्या समाजातही हेच अनेकदा आढळत आले आहे. त्यामुळेच उत्कट, भव्य, दिव्य अशा ध्येयाने धुंद बनणाऱ्या व्यक्तीत व समाजात नेहमीच मोठी खाई निर्माण होते. एकमेकांचे पटत नाही, कळत नाही व जुळतही नाही. त्यामुळे व्यवहार संघर्षमय होतात. कलेच्या संकुचित क्षेत्रात हीच समस्या कशी असते याचे अलिकडचे उत्कृष्ट व प्रभावी चित्रण श्री. शिरवाडकरांच्या 'नटसम्राट' या नाटकात आकर्षकपणे झाले आहे. राजकारणाच्या क्षेत्रातले थोडे पूर्वीचे उदाहरण द्यावयाचे तर फासावर लटकणाऱ्या जहाल क्रांतिकारक देशभक्तांच्या जीवनाचे देता येईल. या दोन्हीही क्षेत्रांच्या मानाने अगणित पटीने श्रेष्ठ, सूक्ष्म, व्यापक व तरल असलेल्या संतजीवनात तर हा संघर्ष शिगेस पोहोचताना दिसतो. देहाविषयी उदासीन होऊन जिवावर उदार होणाऱ्याची झेप समाजास सामान्यतः घेता येत नसल्यामुळे, छळ, जाच व्हावा अशी वागणूक ओघात घडते; बुद्धिपुरस्सर ती नसते. मार्क्सवादाची चटणी तोंडास लावून आपल्या इतिहासाची छाननी करण्याची खोड आम्हाला जी छळत आहे त्याचाच परिणाम म्हणजे उठपळ 'सामाजिक आशय' शोधणे. (श्रीनामदेवांच्या गाथेची पाठनिश्चिति करण्याच्या मुद्याच्या ओघात, पुढील भागात, या 'सामाजिक आशया'चा जास्त ऊहापोह करण्याचे मी योजिले आहे.) जणु 'सामाजिक आशया'चा कौल न घेणारा अभ्यासक बहिष्कृत समजला जावा ही आजची अलिखित विद्वत्परंपरा; वैयक्तिक स्वरूपाच्या घटनांना सामूहिक स्वरूप देणे वस्तुतः 'irrational' व 'illogical' आहे. याचे गमक हे आहे, की ध्येयधुंद व्यक्तीची अलौकिकत प्रत्ययास आली, की छळणारा एकदम बदलतो व प्रांजळपणे नम्र होतो. श्रीनामदेव व परिसा भागवत यांच्यातला प्रसंग हेच स्पष्ट करतो. परिसा भागवताच्या बायकोने त्याच्या दंभाभिमानाबद्दल कानउघाडणी

केल्यावर तो त्यांचा एकनिष्ठ शिष्यच झाला. याला 'सामाजिक आशय' या लाडक्या आधुनिक ढंगाने छळ म्हणणे म्हणजे केवळ असंबद्ध प्रलाप होय; आणि मग त्याच्या बायकोच्या वर्तनातील 'सामाजिक आशय' कोणता समजावयाचा ? गोणाई, दामाशेटी, राजाई यांनी श्रीनामदेवांच्या बाबतीत छळ, जाच असे शब्द पश्चात्तापदग्ध होऊन जे वापरले आहेत, ते काही 'सामाजिक आशया'तून नव्हे अथवा मुक्ताईनेही 'छळिलें ब्राह्मणें प्रतिष्ठानीं जातां' असे जे म्हटले आहे, तेही त्या अर्थाने नव्हे. श्रीनामदेवांनीही नाही का एकप्रकारे छळ केला ? आळंदीच्या चार भावंडांच्या बाबतीत, प्रत्यक्ष खात्री पटतपर्यंत, 'कैवाड्याचे वानी करिती गुडगुड' हीच त्यांची वृत्ती होती. विसोबा खेचरांच्या विषयी देखील 'उठीउठी प्राण्या आंधळा तू काय ! देवावरी पाय ठेवियेले ॥' हा अहंगंड त्यांना होता. 'अज्ञानाचा भाग होता माझे मनीं' या त्यांच्या अवस्थेसारखी स्थिती समाजात नेहमीच असते. त्यातून संघर्ष होतो. अधमपणा, दुष्टपणा वा अप्रामाणिकपणा असतो असे नव्हे. आळंदीकर व पैठणकर ब्राह्मणांच्या वागणुकीचा विचार या दृष्टीने व्हावयास हवा. सारांश हा, की व्यक्तिविकासातील टप्पे व त्यांतील द्वंद्व यांना 'सामाजिक आशय' हे एकांगी व आग्रही तत्त्व लावून सामूहिक स्वरूप देणे बुद्धिमत्तेचे लक्षण खास नव्हे !

डॉ. अ. ना. देशपांड्यांनी संत–मीमांसेच्या बाबतीत आणखी एक लोकविलक्षण झेप घेतली आहे. आर्यानार्यसंघर्षाच्या वाळूच्या पायावर त्यांनी आपली सारी पत्त्यांची इमारत उभी केली आहे या बाबतीत त्यांची स्थिती श्रीनामदेवासारखीच झालेली दिसते ! 'टाळ मृदंग दक्षिणेकडे । माझं गाणं पश्चिमेकडे ॥' अशी शेवटी त्यांची स्थिती झाली होती, तशीच, इतिहास–संशोधन जाते दक्षिणेकडे व विवेचन जाते पश्चिमेकडे, अशी डॉ. साहेबांची स्थिती झाली आहे ! श्री. देशमुख यांच्या ग्रंथाचेही पर्याप्त समीक्षण करून आपले प्रमेय सिद्ध करण्याची त्यांना आवश्यकता वाटली नाही. तो ग्रंथ सदोष असून अनेक प्रमादांनी भरला आहे. प्रत्यक्ष संशोधनाची अवस्था आजपर्यंत अव्याहत अशी दिसत आली आहे, की ज्यामुळे आर्यानार्यसंघर्षाच्या कल्पनेबद्दल विचारवंताने साशंक राहावे. 'प्रज्ञालोक'च्या 'न्याय–मंदिरा'त (वर्ष १०–११) त्यांच्या या तर्कटाचे काहीसे विस्तृत परीक्षण करण्यात आले आहे तिकडे त्यांनी दुर्लक्ष केले. ते असो. पण या क्षेत्रातील अधिकारी व्यक्तींचे अभिमत पाहून तरी त्यांनी आपली भूमिका व्यवस्थित करावयास हवी. गेल्या वर्षीच्या इतिहास–परिषदेचे अध्यक्ष डॉ. पिल्ले यांनी निःसंदिग्ध शब्दांत सांगितले, की "In fact there is no archaeological evidence to show that the Aryans destroyed the Harappan culture.' त्या विषयाचे तज्ज्ञही, "Lest the conclusions be devilled by extrapolations and surmises, it must be re-affirmed that the available objective evidence for the movement of Aryans into India is still in-conclusive." (The Aryans: A Reappraisal of the problem by B. K. Thaper, in India's Contribution to World Thought and Culture. P. 161, Oct. 1970.) असा अभिप्राय देतात. श्री. सुधांशुकुमार रे, डॉ. राव इ. लिपितज्ज्ञांनी सिंधुलिपीचा जो उलगडा करण्याचा प्रयत्न केला आहे, त्यामुळेही आजवरच्या कल्पनेस जोराचा धक्का बसतो. म्हणून संशोधकाने अतिशय सावधगिरी बाळगावयास हवी. पर्यायी व सबळ स्पष्टीकरणे देता येण्याजोग्या या विषयाबाबत डॉ. साहेब मात्र अगदी पैज मारल्यासारखे करून सारी संत–मीमांसा उभारतात ! याला 'प्रमाण–प्रमेय–पद्धती'चा छळ म्हणू नये तर काय म्हणावे ? या छळाचा 'सामाजिक आशय' मात्र शोधला पाहिजे !

छळ, जांच इ. चा संबंध नसतानाही केवळ व्यावहारिक कारणामुळेही काही सामाजिक घटना घडत असतात. उदाहरणार्थ आज संस्कृत विद्या शिकण्याबाबत कुणालाच निर्बंध नाही. गोऱ्यापासून काळ्यापर्यंत सर्वांना त्या बाबतीत अनिर्बंध मुभा आहे. पण तिला आज विद्यार्थी किती मिळतात ? ज्यांना परंपरेने वारसा लाभला आहे तेही ही विद्या टाकून देत आहेत. कोणी त्यांचा छळ केला ? समाजातील विविधरूपी प्रक्रिया न ओळखण्याइतपत आम्ही आज बुद्दू का बनावे ? व्यवहारोपयोगी व सुकर अशा गोष्टींकडे माणसाचे मन लवकर वळते आणि नेट

[पान ३३३ वर पहा]

पुस्तके

महाराष्ट्र एक अभ्यास

हरिहर चंद्रशेखर घोंगे

महाराष्ट्र–एक अभ्यास. डॉ. इरावतीबाई कर्वे यांच्या तीस वर्षांच्या अभ्यासाची व संशोधनाची तीन प्रकरणे. मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयात केव्हा तरी डॉ. इरावतीबाईंनी तीन व्याख्याने दिलीत. प्रा भीमराव कुळकर्णी यांनी त्या भाषणांची ध्वनिते प्राप्त करून –मुद्रित करून पुस्तिकेच्या स्वरूपात उपलब्ध करून दिलीत. इरावतीबाईंचे अप्रकाशित राहून गेले असते ते साहित्य प्रकाशात आले. प्रा. भीमरावांना धन्यवाद.

' महाराष्ट्र ' या विषयावर खूपच लिहून झालेले. कै. डॉ. केतकरांचा वाटा त्यात अधिक. अर्थातच डॉ. भांडारकर, स. आ. जोगळेकरांची नावेही स्मरणात आहेतच. पण महाराष्ट्राविषयी अजूनही बरेच अज्ञात आहे याची जाणीव देणारी ही त्रेचाळीस पानांची पुस्तिका. ह्या पुस्तिकेत मांडलेल्या अल्पशा संसारात अनेक प्रश्नांचे गवाक्ष. प्रत्येक गवाक्षातून दृष्टिपथात येणारी संशोधनाची कुमारी क्षेत्रे. तीन व्याख्यानातून निर्माण झालेले एकशेतीन प्रश्न. या प्रश्नांच्या उत्तरा-तच महाराष्ट्राची काया आणि कर्तृत्व सुस्पष्ट होण्याची शक्यता सर्वात अधिक. प्राचीन इतिहासाच्या विसंवादी रंगांनी नटवून व्याख्यानाच्या कथा झालेल्या नाहीत. कारण प्रत्येक व्याख्यात्याला वर्तमानकाळात जडलेला तो मनस्वी छंद—कथा नसतील. पण महाराष्ट्राच्या संस्कृतीवरील व्याख्यानांचे कथन. कथांपेक्षाही सरस, सुबोध आणि सुडौल.

ह्या पुस्तिकेत ग्रथित केलेल्या व्याख्यानांचा प्रारंभ व शेवट प्रश्नातच होतो. ' इतरांमध्ये मी सामावलेली आहे हे कळल्याशिवाय मी महाराष्ट्रियन कशी हे कळण्याची सुद्धा शक्यता नाही···मला त्या-साठी आपल्या सगळ्यांचे साहाय्य पाहिजे आहे. ' (पान २). मराठी संस्कृतीच्या मातेचा शोध घेण्या-साठी निघालेल्या इरावतीबाईंनी–सारेच गवसले असता स्त्रीसुलभ उतावळेपणाने–आपलाच शब्द काय तो परवलीचा अशी भूमिका कुठेही घेतलेली नाही··· ' तेव्हा मी आपल्याला महाराष्ट्र–एक अभ्यास ' अशा-साठी सांगितला की आम्ही कोण ह्याचं उत्तर देत असताना···आम्ही हे अमुकच अशा तऱ्हेचा आग्रह धरणं जवळ जवळ अशक्य···गेल्या तीन दिवसात हातात काहीही न देता··नुसतं मला वाटतं, शंभर प्रश्न विचारले असतील···ह्या प्रश्नांपैकी काहींची उत्तरं पुढची पिढी देईल. ' (पान ४२–४३). अंतर्मु-खता आणणारी, आपल्याच धुंदीत वाट चुकलेल्या संशोधकांना पायवाटा सांगून जवळच्या एखाद्या खेड्यात आणून सोडणारी ही महाराष्ट्राच्या संस्कृतीची मार्गदर्शिका.

प्रथम व्याख्यानात महाराष्ट्राच्या चतुःसीमेच्या त्रिकोणाचा शोध घेऊन महाराष्ट्रात केव्हा तरी झिरप-लेल्या संस्कृत द्राविडी भाषा प्रवाहाचे शोध घेत असता संशोधकांना उत्तर व दक्षिण दिशा सांगता सांगता ' ते बिचारे मुंडारी भाषा बोलणारे लोक आहेत ते मुळात आठवत नाही. त्यांच्या सगळ्या म्हणून ज्या दंतकथा आहेत त्यात त्यांचा पूर्वेतिहास असेल काय ?' (पान ६). ह्या प्रश्नाने वैदिक साहित्याचा ' प्रमाणे ' म्हणून

अधिकार काय ? हा प्रश्न काहीसा बेचैन करणारा. महाराष्ट्राच्या वसाहतींचा इतिहास, अगस्त्य, परशुराम ह्यांच्या आक्रमणातून जाणून घेण्यापेक्षा····मुंडांच्या खेड्यातच दडून असलेला···भासणारा.'

डॉ. इरावती कर्वे ह्यांनी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे त्यांना माहित आहेत. आपल्याला देखील त्या उत्तरांची जाणीव आहे. ऋग्वेदात 'सिंधु' शब्द कोणी दिला. 'सिम्–गा' आणि 'सिम्-धु' ह्या छटांना अर्थ असावा. ऋग्वेदांत गाईचे दुभते न करणारे मंगदातील कीकट आणि आजही गाईच्या दुधाला स्पर्श न करणारे मुंडारी ह्यांचा कुठे नातेसंबंध जडू शकतो काय ? किंवा विदर्भात शिमग्याच्या दिवशी अश्लील गाणी म्हणताना सुश्लील संस्कृतीचे सलील रंगवून टाकताना आपण सुद्धा मुंडाऱ्यांचे देणे लागतो की काय ह्याची जाणीव देणारे डॉ. इरावतीबाईंचे प्रश्न. संस्कृतातील सुस्पष्ट होऊ शकणाऱ्या काही शब्दांच्या व्युत्पत्ती मुंडारी भाषेच्या अभ्यासाने सिद्ध होण्याची शक्यता अधिक.

आपण मराठी का बोलतो ? दुसरी एखादी भाषा का बोलत नाही ? ह्या प्रश्नांचा शोध घेत असता पुन्हा इरावतीबाई म्हणतात आपल्या मराठी–प्राकृता जवळची 'पाकृत' गुजराथमध्येही बोलली जात होती— तिथे एका बाजूने गुजराथी निराळी झाली आणि एका बाजूने मराठी निराळी झाली. आपल्याला सांगता येईल का कधी झाली ती ? (पान ९). प्रश्नाचे उत्तर सापडत नाहीच. पण कधीतरी मराठी गुजराथी समाज एकत्र नांदत असावा असे सुचविण्याची इच्छा. ते खरे वाटावे ह्यासाठी आपल्याच समाजात पुरावे आहेत. पण अभिमानाच्या धुंदीत तिकडे झालेले दुर्लक्ष. 'घेडगुजरी' हा शब्दप्रयोग काय सुचवितो? महारी वा कोष्टी बोलीवर गुजराथीचा परिणाम असतो. माझे एक मित्र ते बौद्ध झालेले आहेत. ते म्हणाले होते. 'आमची महारी भाषा पारश्यासारखी आहे '··· पारशांची भाषा गुजराथी. डॉ. इरावतीबाईंच्या ह्या मार्गदर्शिकेने महारांच्या अभ्यासाला मिळू शकणारा वेग—महाराष्ट्रातील अस्पृश्यतेचे उद्‌गम सापडू शकण्याचीही शक्यता.

दुसऱ्या भाषणात डॉ. इरावतीबाईंनी महाराष्ट्रातील दैवतांचा शोध घेऊन त्यावरून वसाहतींची मुळे सापडण्याऱ्या प्रयत्नाचे स्वरूप विशद केले आहे. महाराष्ट्रातील मराठेकालीन इतिहासावर भाष्य करताना मराठ्यांच्या इतिहास संशोधनात एक वेगळे दालन उघडून गेले. मानववंश शास्त्रज्ञाने वा उत्खननविदांनी साहित्यातून गवसलेल्या इतिहासाचे पांघरूण घेतले नाही तरी चालते. पण इतिहासकाराला मात्र उत्खननाचा आणि मानववंशशास्त्राचा आधार घ्यावाच लागतो. डॉ. इरावतीबाईंनी तसा भक्कम आधार दिलेला. आता रिसायतकार चुकले असे वाटते. 'मी काही इतिहासाची अभ्यासक नव्हे म्हणता म्हणता... 'भोसल्याचा शिसोदियाशी जो संबंध जोडतात त्यामध्ये काही तथ्य आहे असे मला वाटत नाही. एकदा मनात असा विचार येतो, की होयसळ आणि भोसले ही नावे इतकी जवळची आहेत की त्यांचा काहीतरी संबंध होता का ? (पान १२) असे सांगत असता हे जे भोसले (भोयसळ) आले त्यांचे डोळे दक्षिणेकडे वळलेले

[पान ३३१ वरून]

लागणाऱ्या व तादृश उपयोग नसलेल्या गोष्टींकडे मनुष्य दुर्लक्ष करतो हे आज जसे आहे, तसेच यादवकाली होते हे जाणण्याइतपत प्रबुद्धपणा न दाखविता, आम्ही विकृतीकरण व ग्राम्यीकरण (vulgarization) करीत बसलो आहोत. याचे कारण 'प्रमाण–प्रमेय–पद्धती'चा चोळामोळा हेच आहे ! जाच, छळ इ.चा निवाडा करण्यास संतवाङ्मयाबरोबरच तत्कालीन स्वतंत्र ऐतिहासिक पुरावा विचारात घेतला पाहिजे. त्यात जर हे आढळले तरच तद्विषयक मत प्रतिपादन करता येईल. आज सर्वात मोठी निकड जर कोणती असेल तर ती या गोष्टीची आहे, की असल्या प्रस्थापितांच्या विरुद्ध बंड पुकारले पाहिजे ! 'प्रमाण-प्रमेय–पद्धती'च्या चोळामोळाचे पराकाष्ठेचे उदाहरण म्हणजे प्रा. यशवंत मनोहर यांचा लेख. (युगवाणी विशेषांक, नोव्हें–डिसें १९७०) तो वाचून मला 'मृच्छकटिका' तील विदूषकाची आठवण झाली. दूर पळणाऱ्या वसंतसेनेस म्हणतो तो, 'किं द्रौपदीव पलायसे रामभीता। एण हरामि सहसेति यथा हनूमान्'। त्यांची काही विधाने तशीच आहेत ! (अपूर्ण)

आहेत' (पान १२) म्हणजे आता सरदेसायांच्या नव-मराठा इतिहासातील पहिल्या प्रकरणावर लाल काट मारण्याचे पाप करावे लागणार. 'There is no doubt that the ancestors of several present day Maratha families.. migrated from the north and settled in Maharashtra, representing to this day the Rajput or Kshatriya blood.' (Vol. I. p. 46) हे सरदेसायांचे विधान अगदीच अग्राह्य.

'पश्चिम महाराष्ट्रात हे निरनिराळया कुळींचे मराठे आहेत. अजून मी मनुष्य शोधतेय... कधी तरी एखाद्या दिवशी येईल एखादा विद्यार्थी आणि मराठ्यांच्या कुळी आणि त्यांनी पूर्वीचा व्यापलेला प्रदेश असे म्हणून महाराष्ट्राचा, निदान पश्चिम महाराष्ट्रापुरता तरी आपल्याला नीट नकाशा काढता येतो का हे त्याच्या साह्याने मला पाहायचे आहे' (पान २३). संशोधनाच्या पाटावर बसून स्वार्थाने ताव मारणाऱ्या मगरूर संशोधकांना ह्या विधानामुळं खंत वाटावी—वाटणार नाहीच. संशोधनात अर्थ नसला की मुजोरी वाढते. मराठ्यांविषयी डॉ. इरावतीबाईंनी केलेले विधान मार्मिक. 'तुम्ही रजपुतांकडे का बघता, त्यांच्यापेक्षा जुने राजवंश आहेत तुमचे! त्यांचेकडे बघा.

कागदपत्रांशी, संस्कृत साहित्याशी भांडून इतिहासाची तर्कटे मांडणाऱ्या इतिहासकारांना मावळरान, भिल्लांची खेडी, मुंडाऱ्यांच्या वसतीतून हिंडून येण्याची प्रेरणा देणारी ही पुस्तिका.

दोन व्याख्यानातील ताण तिसऱ्या भाषणाने हलका होतो. तिसऱ्या भाषणाचा आधार केवळ मानववंशशास्त्र व समाजशास्त्र. कोकणातील ग्रामरचनेविषयी दिलेली माहिती मनोरंजक. कोकणातील जीवनाचा प्रत्यक्ष अनुभव घेतल्यामुळे निवेदन अर्थपूर्ण आणि रसाळ—त्यातही मामेबहिणीशी, आतेबहिणीशी विवाह करण्याच्या पद्धतीवर टाकलेला प्रकाश. दैनंदिन जीवनातील क्षुल्लक वाटणाऱ्या वस्तूंचाही इतिहास शोधण्यासाठी सांगितलेला उपयोग. उत्तरेची भाजी कापण्याची सुरी व दक्षिणेतील विळी. पक्वान्नातील पुरणपोळी, जाते, पाटा, वरवंटा ह्यांना देखिल मानवजातीच्या इतिहासावर भाष्य करावयास लावणारी इरावतीबाईंची प्रेरणा. ह्या भाषणात इरावतीबाईंनी विचारलेले कमी. सांगितलेले खूप. इरावतीबाईंनी सुचविलेला पोळ ह्या शब्दाचा अर्थ मननीय. त्यावरून आपल्याकडील पोळा सणाचा बोध व्हावा. 'वेताळ' शब्दाची व्युत्पत्ती इरावतीबाईंनी वर्तुळापासून सिद्ध केलेली आहे. पण 'वेत' ह्या शब्दापासून वेताळाचे निर्माण अधिक बरोबर असावे. एका माणसाचे वेत म्हणजे वेताळ गोत्रापासून गोताळ वा गोतावळ व्हावे तसेच काहीसे मोठ्या भावजयीबरोबर लग्न करण्याची पद्धती दक्षिणेतून उत्तरेकडे गेली वा उत्तरेकडून दक्षिणेत आली ह्याचा विचार आवश्यक असावा. कौरवांचे कुळ अशाच लग्नसंबंधातून निर्माण झालेले आहे. डॉ. कर्वे एके ठिकाणी म्हणतात, "एकदा एकीला मी विचारलं का बाई आली नाहीस? त्यावर त्या बाईने दिलेले उत्तर, कुठे तरी ऋग्वेदाच्या काळाचा बोध करून देणारे किंवा चंद्रगुप्त व ध्रुवदेवीच्या विवाह संबंधावर प्रकाश टाकणारे — 'काय करावं ह्या घाकट्या दिरानी उच्छाद मांडलाय···" (पान ३६). भाषेवरून बाई अडाणी समाजाची असावी... स्मृतिकारांनी देवराशी होणाऱ्या विवाहाला मान्यता दिलेली. त्यावरून स्मृतिकारांनी तयार केलेली सामाजिक नियमावली ज्ञाती व जातींच्या परंपरागत आचारांना आश्रय देऊन तयार केली असण्याचा संभव. स्मृतीकारांना मग दोष तरी का द्यायचा? की एकेकाळचे सुसंस्कृत समाज, भाषा व आचार–विचार हरवून बसले असण्याचीही शक्यता अधिक. कोरकू समाज कौरवांचा अंश असावा वा कोरकूंना संस्कृत तज्ज्ञ प्राचीनांनी कुरु म्हटलेले असावे? डॉ. इरावतीबाईंनी न मांडलेली ही अनेक प्रमेये त्यांच्या व्याख्यानातून स्फुरावीत.

पण ह्या व्याख्यानातून शेवटी वाचक प्रश्नातच गुंतून राहतो. आपल्याला ज्यांची उत्तरे माहित आहेत अशो कोडी घालण्याचा प्रयत्न. विदर्भाच्या प्राचीन इतिहासाचा शोध घेताना अति प्राचीन काळापासून विदर्भात संस्कृत भाषिकांचे राज्य होते हा डॉ. इरावतीबाईंचा मुद्दा अग्राह्य. कारण शृंग सातवाहनकालाचे अगोदर भोयांचे राज्य विदर्भात होते. भोयांची भाषा निश्चितपणे संस्कृत नव्हती. कारण ते ययातीचे वंशज.—ययातीच्या वंशात पुरूंचे कूळ प्रसिद्ध. पण त्यांना मृध्रवाच म्हणून ऋग्वेदात हेटाळलेले आहे.—अगस्त्याच्या पत्नीची लोपामुद्रेची भाषा संस्कृत नसावी. 'अनास' ह्या अर्थानं तर तिला लोपामुद्रा वा लुप्तमुद्रा म्हणून गौरविलेली असणाची शक्यता. ती निषधकन्या असण्याची शक्यता अधिक.

'भोसले' ह्या उपनावाचा अर्थ काय घ्यावयाचा. भोसले हे जर होयसळांचे जवळ असतील—तर भोईसळांच्या म्हणजेच भोजांच्या ते कुठं तरी जवळ असण्याची शक्यता अधिक. भोजांना शूद्र म्हटलेलं आहे त्यावरून तर भोसले कुळाला शूद्र म्हटले गेले नसेल? डॉ. बाबासाहेब आंबेडकर ह्यांनी हा प्रश्न अगदी समर्थपणे 'Who were the Śudras' ह्या ग्रंथात चर्चिलेला आहे (पान २०६). महाराष्ट्राच्या पश्चिम किनाऱ्यावरील व पुढे दक्षिणेत कर्नाटकात रुंद डोक्याची माणसे आहेत. ती पारस देशातून तर आलेली नसावीत? डॉ. इरावतीबाईंनी ह्या प्रश्नांची उत्तरे देण्याचे टाळले आहे. त्यातही पश्चिम महाराष्ट्राविषयीचा अभिमान देखील जाणवतोच. खरे म्हणजे पश्चिम महाराष्ट्राच्या वसाहतींचा इतिहास जर शोधायचा असेल तर विदर्भ, गुजराथ, आणि कर्नाटक ह्याविषयीच खूप बोलण्याची आवश्यकता आहे. मुंड हे पश्चिमेकडून पूर्वेकडे सरकलेत असे म्हणत असता मुंडांना आपला अर्धा इतिहासच ज्ञात आहे असे म्हणता येईल. मुंडांच्या टोळ्या वास्तविक पूर्वेकडून पश्चिमेकडे गेल्या असाव्यात व पुढे इतिहासकाळात झालेल्या आक्रमणामुळं त्या पुन्हा पूर्वेकडे सरकल्यात असा इतिहास दिसतो.—डॉ. इरावतीबाईंच्या पुस्तिकेत उत्तरे नाहीत ह्याची व्यथा. पण महाराष्ट्राच्या इतिहासाला आणि लोकजीवनाला समर्पक ठरणारी एक मोलाची प्रस्तावना.—पानांच्या संख्येपेक्षा ह्या पुस्तिकेतील मार्गदर्शनाचे महत्त्व अनेक पटींनी अधिक म्हणून निर्विवाद.

* *

महाराष्ट्र (एक अभ्यास) : इरावती कर्वे.
प्रकाशक : महाराष्ट्र–साहित्य–परिषद, टिळक रस्ता, पुणे ३०. पृष्ठे ४३ : किंमत १.५० रुपये.

महात्मा उर्फ मानभाव पंथ व चक्रधर

मधुकर रामदास जोशी

'महात्मा उर्फ मानभाव पंथ व चक्रधर' हे पुस्तक लक्ष्मण शिवराम चौधरी यांनी लिहिलेले आहे. पुस्तकाची निर्मितीची प्रेरणा त्यांना खटल्याच्या अनरोधाने मिळाली व "या खटल्याचे आरोपीचे तर्फे काम करीत असताना चक्रधर व त्याचा महात्मा उर्फ मानभाव पंथ या संबंधाने जी जी माहिती मिळाली व आरोपीच्या बचावासाठी जी जी माहिती संशोधन करून मला मिळविता आली ती सर्व माहिती जर प्रबंध रूपाने एकत्र करून ठेविली तर मानभाव पंथाबद्दल इतस्ततः विखुरलेली माहिती आहे ती एके ठिकाणी वाचावयास मिळेल अशा हेतूने हा प्रबंध मी अभ्यासू वृत्तीने तयार केला. या प्रबंधात दिलेली माहिती शक्य तितकी साधार दिलेली आहे. मी त्यावरून काढलेली अनुमाने माझ्या समजुतीप्रमाणे प्रामाणिकपणाने आणि इतर वाङ्मयीन आधारावरून काढलेली आहेत. जरी असेही असले तरी काही विधाने बरोबर नाहीत असे संशोधनाने सिद्ध झाल्यास मी काढलेल्या अनुमानात जरूर तो फेरफार करण्यास मी तयार राहीन" अशी ग्वाही लेखकाने 'प्रास्ताविक' निवेदनात दिलेली आहे. पुस्तकाला 'प्रबंध' म्हणून लेखक संबोधतात. यात एकूण २४ प्रकरणे असून शेवटी परिशिष्ट जोडले आहे. सर्व विवेचन १३६ पृष्ठांत आहे. पुस्तकाला आधारभूत असलेल्या ५४ ग्रंथांची यादी संदर्भ ग्रंथ म्हणून दिलेली आहे. कै. बाळशास्त्री हरदास यांची प्रस्तावना व प्रारंभी सोनोपंत दांडेकर यांचे पत्र आहे.

पुस्तकाचा विषय 'मानभाव पंथ व चक्रधर' आहे. लेखकाची महानुभाव पंथाविषयीची भूमिका स्पष्टपणे ग्रंथात दिसून देते. मराठी वाङ्मयेतिहासातील महानुभाव पंथाचे घडणारे दर्शन व लेखकाने 'प्रबंध' रुपाने मांडलेला 'मानभाव पंथ व चक्रधर' या मध्ये दोन ध्रुवाचे अंतर आहे. चक्रधर हा महानुभाव पंथाचा प्रवर्तक, परमार्गाचा प्रकाशक व परमार्गीयांचा ईश्वरावतार. उपलब्ध चरित्रावरून गुजराथचा राजपुत्र रामटेक यात्रेनिमित्ताने विदर्भात आला व रितपूर येथे गोविंदप्रभूकडून अनुग्रह घेऊन परशास्त्र

मताचा प्रसार करू लागला. गुजराथ, महाराष्ट्र व आंध्र प्रदेशात भ्रमण करून महाराष्ट्रात त्याने आपल्या मताचा प्रसार केला. त्याचे व्यक्तिमत्त्व आकर्षक व वक्तृत्व वेधक होते. संस्कृत, मराठी व गुजराथी भाषेवर प्रभुत्व असून तत्कालीन अनेक सिद्धांशी त्याचा संबंध आला होता. विदर्भ व पैठण परिसरातील रामदेव दादोस व पद्मनाभी सारखी साधक संन्यासी मंडळी व माहिमभट सारखे पंडित त्याच्या भोवती जमले. नागदेवाचार्य त्याचा पट्टशिष्य होता. परंतु चक्रधरांचे हे स्वरूप प्रस्तुत ग्रंथाच्या लेखकाला नामंजूर आहे. चक्रधराविषयी संशोधन व अभ्यास करून डॉ. कोलते यांनी चरित्र वाचकांसमोर मांडले असता व त्याच्या जीवनातील काही गोष्टींचा विचार, संशोधनपूर्वक वा. ना. देशपांडे यांनी सादर केला असता, त्या गोष्टीकडे साफ दुर्लक्ष करून 'नागेशकृत महात्म्यकथनम्', 'मानभावोत्पत्तिकथा' या मधील गोष्टी खऱ्या व भाकड कथा खऱ्या समजून प्रखर टीकास्त्र चालविले. कृष्णभट व त्याची मुलं म्हणजे महानुभावांचे पाच कृष्ण अशी ही कल्पना आहे. कृष्णभट विषयक दंतकथा ही खरी आहे, असा जो चौधरींचा समज आहे, तो साफ चुकीचा आहे; कारण रामदेवराव देवगिरीस असताना देवपाळ नावाचा राजा पैठण येथे होता, याला ऐतिहासिक पुरावा नाही. शके ११९३ मधील रामदेवरावाचा संस्कृत ताम्रपट उपलब्ध असून त्यात 'देवपाळ' नावाच्या मांडलिकाचा उल्लेख नाही. एकनाथ संशोधन मंदिरातील (औरंगाबाद) ताम्रपटात देवपाळाचा उल्लेख नाही. हा ताम्रपट संस्कृत असून रामचंद्रदेवाचा आहे. याचा शक ११९४ आहे. पैठण येथील सोमेश्वरदेव शिलालेखात सुद्धा देवपाळ किंवा त्याच्या पूर्वजांचे उल्लेख आढळत नाहीत. यादवांच्या वेळेस त्यांच्या मांडलिक असलेल्या राजांची राजधानी पैठण होती व त्यांच्या मांडलिक राजवंशात देवपाळ नावाची कोणी व्यक्ती होती असे समजण्याला कोणताही ऐतिहासिक पुरावा उपलब्ध नाही. दुसरे असे की, ज्या देवपाळाच्या वेळेस कृष्णभट होता व त्याला पाच पुत्र झाले असे चौधरी समजतात ती गोष्ट तरी खरी आहे काय ? चौधरींच्या मताप्रमाणे देवपाळ व रामदेवराव समकालीन आहेत. देवपाळाने कृष्णभटास राजदंड केला म्हणून तो डोमेगावी रहावयास गेला व त्याने सिद्धेश्वरी अनुष्ठान केल्यामुळे विष्णू त्याला प्रसन्न झाले व त्याला मुकुट दिल्यामुळे तो चतुर्भुज होत असे !! त्याला पाच पुत्र झाले व त्यांना मठ बांधून दिले. पुढे कृष्णभटाचे सोंग गणपतीच्या प्रसादामुळे हेमाद्रीने उघडकीस आणले. याचा शक चौधरी शके १२१५ देतात. परंतु हेमाद्री शके १२०८ नंतर जिवंत नव्हता हे म. म. डॉ. मिराशींनी प्रसिद्ध केले आहे. कृष्णभटाची हकीकत संपूर्ण बनावट व खोटी आहे हे यावरून दिसून येईल. चौधरी असे समजतात की, चक्रधर हा कृष्णभटाचा मुलगा. परंतु चक्रधराचा जन्मशक देत नाहीत. चक्रधर जन्माविषयी चौधरींचा प्रमुख आधार चांदोरकरांचा आहे. परंतु चांदोरकरांनी 'बनावट व खोट्या' असलेल्या ग्रंथांवरून आपले निष्कर्ष काढले होते. अभ्यासकांचे निष्कर्ष कधी अनुमानावर असतात तर कधी संभवनीयतेवर आधारलेले असतात. काही वेळा केवळ तर्क असतात !! अभ्यासकांच्या अनुमान व तर्कांना पुरावा समजण्याचा दोष, चौधरींच्या ग्रंथात पानोपानी आढळतो. अनुमाने ही नेहमी सापेक्ष असतात. परंतु त्यांना statement of fact समजणे म्हणजे वस्तुस्थितीचा विपर्यास करणे होय. चक्रधर चरित्राबद्दल चांदोरकरांनी उभारलेली केवळ तर्कटे असून त्यांनी ज्या पुस्तकाच्या आधारे चक्रधर–चरित्रविषयक आपले विचार मांडले, तो नागेशाचा ग्रंथ विश्वसनीय नाही. या ग्रंथात कालविसंगती, पूर्वग्रह व बिनबुडाच्या गोष्टी आहेत. ग्रंथाची निर्मितीच मुळी विशिष्ट हेतू मनात बाळगून केली आहे. हा ग्रंथ सर्व प्रकारे अविश्वसनीय असता याला प्रमाण मानून चक्रधर चरित्र सांगणे म्हणजे पाण्यावर देऊळ उभारणे होय. दुसरे असे की, मानभावोत्पत्ती या शीर्षकाखाली, चांदोरकरांनी भा. इ. सं. मं. वार्षिक १९३८ अंकात जो लेख लिहिला त्यात तोरणमाळ येथील कथडीनाथाचा व कृष्णभटाचा संबंध होता असे सूचित केले आहे. कथडीनाथ हा नाथपंथीय सिद्धपुरुष असून त्याचा समय शके ९४१–१००० दरम्यानचा आहे. हा नाथसिद्ध प्राचीन असून मत्सेन्द्रनाथ समकालीन आहे, तर कृष्णभट हा रामदेवराव यादवाचा समकालीन (शके ११९४–१२३०) आहे. अतएव कथडीनाथ व कृष्णभट यांच्या संबंधीची कथा बनावट आहे. वराड गॅझेटीअर, इंपीरिअल गॅझेटीअर, व्हा. १२, पार्ट ८ व व्हा. २१, मुंबई गॅझेटीअर व्हा. १७ यांचे संदर्भ जागोजागी लेखकाने जे दिले आहेत त्यावरून त्यामधील माहिती

परिपूर्ण आहे असा त्यांचा समज दिसतो. वास्तविक अधिक संशोधनामुळे नवीन माहितीची भर पडली आहे. डॉ. कोलत्यांनी शके १४५१ मधील दामोदर पंडिताच्या वछाहरणाच्या हस्तलिखिताची माहिती दिली असून, मराठीमधील शककालाचा सर्वात बिनचूक निर्देश करणारे हे हस्तलिखित आहे. कार्बन फोरटीन तत्त्वानुसार ह्या महानुभावीय हस्तलिखिताची प्राचीनता शास्त्रीय पद्धतीने सिद्ध करता येते. 'नागेशकृत महात्म्यकथन' पोथी त्या नंतरची आहे. अर्थात वछाहरणाच्या प्राचीनतम हस्तलिखिताच्या आधारे महानुभाव पंथाचा प्रारंभीचा इतिहास आपणास कळून चुकतो, म्हणून कालबाह्य झालेल्या गॅझेटिअरवर अवलंबून राहून त्यांच्या आधारे काढलेले निष्कर्षही गतार्थ होतात. ही गॅझेटीअर्स जेव्हा तयार झाली तेव्हा महानुभाव वाङ्मय गुप्त लिपीत होते. त्यांच्या लिपीचा उलगडा **स्वतंत्रपणे प्रथम इतिहासाचार्य राजवाड्यांनी केला.** नंतर महंतांनी लिपीसंकेत श्री. वि. ल. भावे यांना सांगितला. त्यानंतर डॉ. य. खु. देशपांडे, ह. ना. नेने, वा. ना. देशपांडे, डॉ. कोलते यांनी त्यांच्या लिपीसंकेताचा स्वतंत्र अभ्यास करून ग्रंथ संपादित केले. अर्थात गॅझेटीअर्समधील माहिती कालबाह्य व दंतकथात्मक असल्याने त्याज्य आहे. श्री. चौधरी यांचा दावा असा आहे की, पाध्ये व भांडारकर, लेखकास माहिती पुरविणारे माहूरकर महंत दत्तलक्षराजच असल्याने व भांडारकरांनी महानुभाव ग्रंथ न पाहिल्याने त्यांचे लेख संशोधनपूर्ण नाहीत व म्हणून खरेही नाहीत. परंतु वास्तविक परिस्थिती अशी आहे की, महानुभावीयांचे ग्रंथ मधून मधून अभ्यासकांना उपलब्ध होत असत. डॉ. य. खु. देशपांडे यांना असाच एक ग्रंथ मिळाला व काही दिवसानंतर भावे यांचे सारस्वत पाहिल्यावर त्या मधील संकेतांचा त्यांना उलगडा झाला. हरि नारायण आपटे यांना कवीश्वर महानुभाव कृत एकादशस्कंद मिळाला होता. रामदासी संशोधन बाडांक १६९३. यावर कै. राजवाडे यांनी स्वदस्तुरचा मजकूर लिहून ठेवला आहे तो, "मानभावांच्या एकादश स्कंदाची (शा. श. १५०० तील) ६० छापील पृष्ठे। रा. रा. हरी नारायण आपटे यांनी ज्ञानप्रकाशात अर्धी छापून प्रसिद्ध न केलेली। आपटे यांस ही पोथी ज्ञानेश्वरीच्या बरोबरीची चुकीने वाटली. वि. का राजवाडे." रामदासी संशोधन बाडांक १६८८ असेच मानभावांचे एक सांकेतिक प्रकरण आहे. तंजावरी मानभावांची काही बाडे आहेत. (बाडांक १५३८). सांकेतिक लिपीमधील ५२९ लीळाचरित्राची पोथी चांदोरकरांना मिळाली होती व तिचा परिचय वि. का. राजवाड्यांनी करून दिलेला आहे (भा. इ. सं. मं. शके १८३७). वा. ना. देशपांड्यांनी तर स्मृतिस्थळाच्या पानाचा फोटो दिला आहे. यावरून महाराष्ट्रात अभ्यासकांना स्वतंत्रपणे महानुभाव पोथ्या उपलब्ध होत असत. त्यांचा संकेतही राजवाड्यांनी उकलून सिद्ध केला. त्यांच्या ग्रंथामधील प्राचीन मराठीचे स्वरूप व भाषिक वैशिष्ट्ये शिलालेखातील मराठीच्या रूपाशी जुळतात. त्यांच्या ग्रंथातील नगरे, ग्रामसंस्था, नद्या, वनस्पती व पर्वत यांची वर्णने यांचा पडताळा पाहता येतो. Topography व Etymological Geography दृष्टीनेही त्यांच्या वाङ्मयातील स्थलनाम विचार सत्य आहे, असे दिसून येते.

परसा हा कृष्णभट देवकीचा पुत्र असून तोच चक्रधर असे विधान करताना श्री. चौधरी लिहितात की, "मानभावी ग्रंथकार ग्रंथ लिहिण्यापूर्वी "श्री परेसा(शा)य नमः' असे परसा उर्फ चक्रधर यास नमन करतात." हे विधान चूक आहे, कारण 'पर' ही संज्ञा परमेश्वराला उद्देशून आहे. परशास्त्र किंवा परमार्ग हे त्या पंथाचे मूळ नाव कसे आहे हे डॉ. कोलत्यांनी दाखवून दिले आहे. गोविंदप्रभू व माहुरचा दत्त हे चक्रधराचा वडील बंधू असाही विचित्र समज त्यांचा आहे. वास्तविक गोविंदप्रभू उर्फ गुंडम राऊळ याचा सिद्ध म्हणून उल्लेख सिद्धांच्या नामावळीत येतो. तत्त्वसार, (रचना शके १२३४), शिवदीनमठ संग्रह, या नाथसिद्ध ग्रंथांत गुंडम राऊळ यांचा उल्लेख सिद्धनामावळीत आहे.

महानुभाव हा पंथ आहे. त्याला स्वतःची विचार पद्धती आहे. त्यांच्या अनुयायांची परंपरा पिढ्यानुपिढ्या चालत आलेली आहे. व ह्या पंथाला स्वतःचे स्वतंत्र अस्तित्वही आहे, चांगदेव चक्रपाणी व गोविंदप्रभू म्हणजे या पंथाची formative stage आहे तर चक्रधर समय म्हणजे या परमार्गाची creative stage आहे. नागदेवाचे आचार्यपद म्हणजे definitive stage या पंथात आढळून येते तर माहिमभट केसोबास म्हणजे scholastic stage दिसते.

ईश्वर, देवता, जीव व प्रपंच व त्यातही प्रामुख्याने पहिल्या तीनचाच विचार करणारे हे स्वतंत्र असे परशास्त्र आहे. शास्त्र म्हटले म्हणजे खंडनमंडण आले; परंतु तत्त्वबोधाची जागा वावदूकपणाने घेतली की, परमताच्या खंडनाऐवजी निंदानालस्तीचा प्रांत सुरू होतो. अभ्यासक व जिज्ञासूंकडून पंथाची सूत्रे व नेतृत्व सामान्याकडे गेले की, संप्रदाय तग धरू शकत नाही. नागेश या आनंद सांप्रदायिकाने महानुभाव पंथाबद्दल ओंगळ ग्रंथ रचला तर सोंगोबास व दर्शनप्रकाशकारांनी नाथ व दत्त पंथीयांचा हीन पातळीवर उतरून उल्लेख करण्याचा प्रयत्न केला. त्यात भर म्हणजे विठ्ठल ही केवळ देवता नसून भडखंबा आहे असे उल्लेख महानुभाव ग्रंथात आले. या सर्व गोष्टींचा परिणाम म्हणजे शास्त्र डळमळीत झाले. अध्यात्म्याचे कुळ बनले व पंथद्वेष वाढू लागला. वास्तविक महानुभावपंथासह सर्वच पंथ हे विद्याशाखेचे अभ्यासाचे विषय आहेत.

हा पंथ प्रारंभी निरीश्वरवादी होता असा समज लेखकाचा आहे, परंतु हंसावतार, गीता व भागवत पुराणाच्या परंपरेतील एका विचार प्रवाहाचे प्रतिनिधित्व करणारी मंडळी या पंथात पूर्वीपासून आढळून येतात. श्रीकृष्ण, दत्त व हंस याबद्दल तर्क व विपर्यासयुक्त अनुमाने या ग्रंथात आहेत. 'अहिंसा' शब्द फार ताणून त्यावर अप्रयोजक भाष्य करण्यात आले आहे.

'मानभावी वाङ्मय' असे स्वतंत्र २२ वे प्रकरण या ग्रंथात आहे या प्रकरणात डॉ. य. खु. देशपांडे यांना प्रधानमल्ल कल्पून लेखकाने स्वतःचे प्रतिपादन वकिली पद्धतीने केले आहे. पुरावा नसताना पुराव्याचा भास निर्माण करून माहिती एकत्रित करणे म्हणजे संशोधनपूर्वक शास्त्रप्रतिपादन अशी जी भूमिका लेखकाने अथपासून स्वीकारलेली आहे, तिचेच पडसाद ह्या प्रकरणात उमटले आहेत. महानुभाव वाङ्मयावर विपुल संशोधन होऊन त्यांच्या काही ग्रंथांच्या चिकित्सक आवृत्तीही प्रसिद्ध झाल्या आहेत. संहिता निश्चिती, लेखनकाल, कविविषयक माहिती व इतिहास हा संशोधनक्षेत्राचा विषय आहे. केवळ महानुभावच नव्हे तर सर्वच प्राचीन वाङ्मयाच्या संशोधनाचे शास्त्र आहे. काशीराज ट्रस्टतर्फे प्रसिद्ध होणाऱ्या पुराणांच्या संहिता, भांडारकर प्राच्य संशोधन मंडळाने प्रसिद्ध केलेली महाभारताची आवृत्ती किंवा काव्यशास्त्रातील काही ग्रंथांचे प्रकाशन करताना उपलब्ध हस्तलिखितांत numerous errors, misreadings व lacunae आढळतात. अशा परिस्थितीत उपलब्ध साहित्याच्या आधारे पुढचा मार्ग शोधून काढणे एवढेच अभ्यासकांच्या हाती असते. कुन्तकाच्या वक्रोक्तिजिवित ग्रंथांची संहिता संपादन करताना डॉ. एस्. के. दे लिहितात, "I have given full extracts wherever the text was presentable or could be reconstructed with conjectural emendations, and have also tried to restore the missing Karikas where they could be restored with the help of the vritti I am aware that my reconstruction of this part of the text is open to criticism, and perhaps in many places capable of happier emendations; but it will give me satisfaction if it fulfils its very humble object of giving a general outline of this part of the text." वाङ्मयसंशोधनात मूळ संहिता उपलब्ध नसली तर मिळालेल्या प्रतीवरून संहितापाठ संपादक संपादित करीत असतात. अशा प्रसंगी हस्तलिखित प्रती, त्यांच्या परंपरा व वंशवृक्ष तयार करून लेखनकालाचा शक निश्चित करण्याचा प्रयत्न असतो. मूळ प्रतीवर बिनचूक शक नसेल तर अंतर्गत व बाह्य पुरावे धुंडाळावे लागतात. पोथ्यांवरील शकनिर्देश कधी प्रतलेखकाचे किंवा प्रतमालकाचे असू शकतात. त्याचबरोबर बनावट ग्रंथ व शंकास्पद ग्रंथ (apocryphal) यांचाही विचार करावा लागतो. परंतु खेदाची गोष्ट अशी की, या समस्येचे यथार्थ स्वरूप लक्षात न घेता लेखकाने सदोष प्रतिपादन वारंवार केलेले आहे. भानुविजय एक ग्रंथ बनावट म्हणून सर्वच वाङ्मय बनावट व उत्तरकालीन हा जो सूर पदोपदी आढतो तो संशोधन शास्त्र व्याकुळ करणारा आहे. "जे जे वाङ्मय मराठीत रूपांतरित झाले ते ते मानभावी दृष्टीकोणाने, 'पसंती' या चाळणीतून गळाल्यानंतर, त्यावर 'बरोबर' असा शिक्कामोर्तब झाल्यावरच बाहेर पडले आहे. यात शंका उरत नाही" (पान. ११२) अशी तक्रार करून महानुभावीयांचे सर्वच वाङ्मय अविश्वसनीय व बनावट कसे आहे, हे सांगण्याची पराकाष्ठा लेखकाने केली आहे. लेखकाचे हे विधान अज्ञानजन्य आहे,

कारण महानुभावीय वाङमयांतील अंतर्गत पुरावा, पाठ संहितेचे स्वरूप ठरविणारे स्वतंत्र पाठ संशोधन शास्त्र आहे. आग्रही मतासाठी शास्त्राचा बळी लेखकाने दिला ही अतिशय खेदाची गोष्ट आहे. महानुभाव महंताने 'बरोबर व 'पसंती'चे शिक्कामोर्तब केले म्हणून ग्रंथ प्रमाण व शुद्ध ठरत नाही, तर पाठसंशोधन विद्येने मान्य केला म्हणून खरा व प्रमाणभूत ठरत असतो.

महानुभाव पंथावर, त्यांच्या प्रवर्तकांवर जे अनेक आक्षेप घेण्यात आले आहेत त्या आक्षेपांचे स्वरुप जटिल व गुंतागुंतीचे आहेत. धर्म, नीती, तत्त्वज्ञान, वाङ्मयसंशोधन, पाठसंशोधन, कायदा इत्यादी अनेक विषय गुंतले आहेत. एकाच लेखात सर्व आक्षेपांचा परामर्श घेणे अशक्य आहे. हा ग्रंथ कमालीचा वादग्रस्त असून भाषा काही ठिकाणी प्रखर व आवेगपूर्व आहे, तर काही ठिकाणी कमालीची सुबोध, प्रवाही आहे. महानुभाव पंथ व वाङ्मय विषयक तीव्र प्रतिक्रिया यात आली असून तिचे प्रतिध्वनी मराठी जगतात दीर्घकालपर्यंत उमटत राहतील.

* *

महात्मा उर्फ मानभाव पंथ व चक्रधर
लेखक : लक्ष्मण शिवराम चौधरी
प्रकाशक : डॉ. यशोदा चौधरी, ६, नवी पेठ, जळगांव
पृष्ठे १३६; किंमत ६ रुपये.

श्रीपाद कृष्ण कोल्हटकर : आत्मवृत्त

म. ना. लोही

'आत्मवृत्त' या श्रीपाद कृष्ण उपाख्य तात्यासाहेब कोल्हटकर यांच्या आत्मचरित्राची नवीन आवृत्ती त्यांच्या जन्मशताब्दीच्या निमित्ताने पुण्याच्या मॉडर्न बुकडेपोने नुकतीच (दि. २९ जून १९७१) प्रकाशित केली आहे. तात्यासाहेब कोल्हटकर हे मराठीचे विनोदाचार्य, मराठी नाटककारांचे नाटककार आणि तत्कालीन आघाडीचे टीकाकार. 'तात्या ती तलवार एक तुमची, बाकी विळे–कोयते' असे ज्यांच्या प्रतिभेचे गडकऱ्यांसारख्या प्रतिभावंताने आदराने वर्णन केले, त्यांचे आत्मचरित्र ही अभ्यासकांना देणगीच होय. इ. स. १९३५ साली म्हणजे श्रीपाद कृष्णांच्या निधनानंतर एकच वर्षाने हे 'आत्मवृत्त' पहिल्यांदा प्रकाशित झाले. मराठीतील 'नाटककाराचे पहिलेच आत्मचरित्र' म्हणून डॉ. वाळिंब्यांनी त्याचा गौरवही केला आहे. पस्तीस वर्षांनी का होईना त्याचे पुनर्मुद्रण होत आहे, ही समाधानाची गोष्ट आहे. शिवाय, या आवृत्तीत अभ्यासोपयोगी बराच अधिक मजकूर जोडण्यात आला आहे.

तात्यासाहेब कोल्हटकरांनी इ. स. १९१९ साली 'आत्मवृत्त' लिहून संपवले. त्यावेळी त्यांनी पन्नाशी गाठली होती. त्या आधीच (इ. स. १९०९) 'महाराष्ट्राचे अग्रगण्य नाटककार' म्हणून खाडिलकरांनी रमेशचंद्र दत्तांना बडोदा येथील साहित्य संमेलनात त्यांचा परिचय करून दिला होता. तात्यासाहेब केळकरांनी 'अठरा धान्यांच्या कडबोळ्या'चे कौतुक केले होते. प्रथितयश नाटककार आणि पहिले विनोदी लेखक म्हणून त्यांना मान्यता लाभलेली होती. अशा प्रौढावस्थेत कोल्हटकरांनी लिहिलेल्या 'आत्मवृत्ता'चा बोलवाला मात्र झाला नाही.

कोल्हटकरांना आत्मचरित्र लेखनाची अंतःप्रेरणा झाली नव्हती. त्यामुळे त्यांच्या लेखनात रंग भरला नसावा. कवी मायदेवांनी विनंती केल्यावरून त्यांनी विद्यार्थ्यांना उपयुक्त ठरावी अशा स्वरूपाची चरित्रविषयक माहिती देण्यासाठी 'आत्मवृत्ता'चा खटाटोप केला. हे नैमित्तिक कारण जरी लेखनाला मर्यादा पडण्यास कारणीभूत झाले असले तरी त्या मर्यादेतही तात्यासाहेबांच्या खुमासदार व विनोदगर्भ लेखनशैलीचा परिचय मिळू शकला असता. पण कुठे माशी शिंकली न कळे, या 'आत्मवृत्ता'त त्यांच्या सौंदर्यदृष्टीचा व कलात्मकतेचा अंशमात्र स्पर्शही जाणवत नाही. त्यावरील अभिप्रायात लेखकांनी निराशाच व्यक्त केली आहे. प्रा. अवधूत म. जोशी 'चरित्र–

आत्मचरित्र' या ग्रंथात लिहितात, "थोर साहित्यिकांकडून विशिष्ट दृष्टिकोन, व आत्मचरित्रलेखनाच्या शास्त्रीय व कलात्मक बाजू यांची जाणीव, यांची अपेक्षा कोणी वाचक झाला तरी करणारच. या बाबतीत श्री. कृ. कोल्हटकर यांच्या 'आत्मवृत्ता'ने मात्र साहित्यप्रेमी जनतेची निराशाच केली. सौंदर्यदृष्टी, कलात्मकता, तटस्थवृत्ती, इत्यादिकांचा संपूर्ण अभाव साहित्यसम्राट कोल्हटकरांच्या ग्रंथात आढळेल, ही कल्पनाच आपणास भावत नाही. परंतु दुर्दैवाने या ग्रंथात तसा प्रकार झाला आहे खरा."

आत्मचरित्र हा तसा लेखकाचे व्यक्तिमत्व उलगडून दाखवणारा वाङ्मयप्रकार, आपल्या जीवनयात्रेत जे बरेवाईट अनुभव मिळतात, त्यांचे जे संस्कार मनावर होतात, त्यातून जे आत्मचिंतन घडते, जी जीवनदृष्टी लाभते, त्या सर्वांचा मोकळ्या मनाने आविष्कार करण्याचे उत्तम साधन म्हणजे आत्मचरित्र. लेखकाला आयुष्यात जो शोध लागला व बोध मिळाला तो समकालिनांस आणि पुढच्यांस सांगण्याचे कार्य आत्मचरित्राद्वारे करता येते. चरित्रलेखकाला चरित्रनायकाविषयी आदर वाटत असल्याने अप्रिय गोष्टींचा उल्लेख टाळण्याकडे कल असतो. त्या दृष्टीने आत्मचरित्रकार स्वतंत्र असतो. यांपैकी कोणत्याही दृष्टीने कोल्हटकरांचे 'आत्मवृत्त' कसाला उतरत नाही. त्यांच्या आत्मनिवेदनात त्यांची संकोची वृत्ती आड आल्याने त्यात मोकळेपणाचा व खेळकरपणाचा अभाव जाणवतो. ते म्हणतात, "स्वस्तुती व वैयक्तिक निंदा करण्याचा मला मनापासून कंटाळा असतानाही या चरित्रात त्या गोष्टी मला कराव्या लागल्या" (आत्मवृत्त–प्रस्ता. पृ. ६). आत्मस्तुतीच्या बाबतीत त्यांनी संयम बाळगला असला तरी इतरांवर टीका करताना क्वचित संयम सुटल्याचा भास होतो. त्यामुळे या आत्मचरित्रातील संतुलनाला धक्का पोचला आहे.

'आत्मवृत्ता'ला सत्याचा भक्कम आधार आहे असे म्हटले जाते. स्वतःविषयी काही अप्रिय गोष्टी कोल्हटकरांनी या आत्मचरित्रात सांगितल्या यात शंकाच नाही. हिराबाई पेडणेकरांविषयी सांगताना त्यांनी बराच मोकळेपणा दाखवला असला तरी देवल आणि गुर्जर यांच्याविषयी लिहिताना ते कठोर झाल्यासारखे दिसतात. त्यांच्या आयुष्यातील काही 'नाजूक' घटनांचा उल्लेख न केल्याबद्दल त्यांना कोणीच दोष देणार नाही. कारण, आपल्या समाजात स्त्री–पुरुष संबंधांची मोकळी चर्चा अनेक दृष्टींनी निषिद्ध आहे. मात्र इतर अनेक व्यक्तींबद्दल संयमित का होईना पण आकस दर्शवणारे जे उल्लेख आढळतात त्यावरूनही समतोल विचारांचा अभाव आणि भावनाक्षोभ जाणवल्याशिवाय राहत नाही. साहजिकच त्यांच्याकडून सत्यापलाप नव्हे तरी सत्यविकृती झाली असणे संभवते.

अलीकडेच, श्रीपाद कृष्णांचे शिष्य श्री. ग. त्र्यं. माडखोलकर यांनी 'व्यक्तिदर्शन' हा कोल्हटकरांवरील ग्रंथ प्रसिद्ध केला आहे. त्यात माडखोलकरांनी तात्यांच्या व्यक्तिमत्वाचे विविध पैलू प्रकाशात आणले आहेत. स्वतः कोल्हटकरांना हे करता आले असते. आणि त्यांचे आत्मवृत्त अधिक प्रभावी, उद्बोधक व मनोरंजकही झाले असते. तथापि, आपल्या चरित्रापासून वाचकांनी धडा घ्यावा अशी अपेक्षा बाळगल्यामुळे तात्यांनी आपले अंतःकरण खुले केले नाही (पहा- प्रस्तावना पृ. ६). शिवाय, पुरेसा अलिप्तपणाही त्यांना राखता आला नाही. तसे असते तरीही हे आत्मवृत्त अधिक सरस उतरले असते.

आणखीही एका बाबतीत या 'आत्मवृत्ता'ने वाचकांचा व अभ्यासकांचा अपेक्षाभंग केलेला आहे. ती बाब अशी की, आपल्या साहित्यामागील अनुभव आणि प्रेरणा यांची कोल्हटकरांनी दिलेली माहिती फारच त्रोटक आहे. 'प्रेमशोधन' नाटकाच्या नायिकेचा स्वभाव हिराबाईवरून रेखाटल्याचे आणि "हिराबाईशी परिचय झाल्यापासून एका बुद्धिमान स्त्रीच्या सौंदर्याचा व विभ्रमाचा एक बराच चांगला आदर्श मिळाल्यासारखा होऊन माझ्या सौंदर्याभिरुचीचे पोषण होऊन त्याचा परिणाम माझ्या पुढील कृतींवर दिसू लागला." असे जरी तात्यासाहेब सांगून जातात तरी 'जन्मरहस्य' नाटकाच्या नायिकेविषयी काहीच माहिती देत नाहीत. (ती माडखोलकरांच्या 'व्यक्तिदर्शन'मध्ये पृ. ६ वर सापडते.) कोल्हटकरांची साहित्यरचना स्वतंत्र असली तरी त्यांच्या लेखनशैलीवर व लेखनप्रकृतीवर काही पाश्चात्य अगर समकालीन लेखकांचा प्रभाव पडलाच नसेल असे म्हणता येईल का? 'प्रेमशोधन' लिहिण्यापूर्वी 'जुळ्या भावंडासंबंधाच्या संविधानकाची (दोन–तीन सदृश) पुस्तके वाचल्याचे' ते कबूल करतात. मात्र अन्य रचनांबद्दल त्यांनी काहीच लिहिले नाही.

तात्यासाहेब कोल्हटकर केवळ आपल्या साहित्या-संबंधी सांगून मोकळे झाले असते तरी 'आत्मवृत्त' अधिक दर्जेदार झाले असते. पण त्यात तत्कालीन नाटकमंडळचांचे व्यवस्थापक, त्यांचे आपसातील हेवे-दावे, त्यामुळे झालेला मनस्ताप याबद्दलचा उहापोहच फार आहे. बरे, त्या निमित्ताने कोल्हटकरांच्या काळा-तील रंगभूमीच्या इतिहासाची साधनेही उपलब्ध होत नाहीत. कारण त्यांचा नाटकमंडळचांशी निकटचा संबंध आला नाही. त्यामुळे डॉ. वाळिंबे यांनी 'मराठी नाट्यसमीक्षा' या ग्रंथात दिलेल्या अभिप्रायाविषयी मन साशंक होते.

श्रीपाद कृष्णांनी आपले 'आत्मवृत्त' स्वतःच्या हयातीत प्रकाशित करू दिले नाही एवढेच नव्हे तर 'माझ्या मृत्यूनंतर ते वीस वर्षांनी प्रकाशित करण्यात यावे' असे त्यांनी आपल्या निकटवर्तियांना सांगितले. याचा अर्थच हा की, आपण निरनिराळ्या व्यक्तींविषयी केलेल्या विधानांमुळे गैरसमज निर्माण होतील याची त्यांना जाणीव होती. किंबहुना, 'आत्मवृत्ता'चे लेखन करताना क्षणिक भावनेच्या उर्मीत ते जे काही लिहून गेले ते काहींना अन्यायकारक होते. त्यामुळेच त्यांनी आपल्या हयातीत हे आत्मचरित्र प्रसिद्ध तर होऊ दिलेच नाही, पण निवडक विश्वासातील मंडळी सोडून इत-रांना ते वाचूही दिले नाही (पहा कोल्हटकर आणि हिराबाई, प्रस्ता. पृ. २९). ज्या मायदेवांसाठी त्यांनी हा खटाटोप केला त्यांना तरी ते पाहता आले किंवा नाही, हेही कळले नाही.

कोल्हटकरांच्या 'आत्मवृत्ता'चे अंतरंग असे आहे. आत्मचरित्र म्हणून ते अपूर्ण तर आहेच पण लेखकाचे व्यक्तिमत्वदर्शन घडवण्याच्या दृष्टीनेही निराशाजनक आहे. मात्र एवढ्यानेच त्याची महती नष्ट होत नाही. 'आत्मवृत्त' अनेक अभ्यासकांना उपयुक्त ठरले आहे. प्रा. वा. ल. कुलकर्णी आणि डॉ. रा. शं. वाळिंबे यांनी अभ्यासकांच्या वतीने त्याचे ऋण मान्य केले आहे. कोल्हटकर या व्यक्तीचा व त्यांच्या साहित्याचा अभ्यास करणाऱ्यांना साधन-ग्रंथ म्हणून उपयुक्त ठर-ण्याच्या दृष्टीने संपादक श्री. रा. प्र. कानिटकर यांनी मूळ ग्रंथाला पूरक व पोषक अशी पत्रे, आठवणी, ग्रंथ-सूची इ. साहित्य जोडले आहे. शिवाय पद्मभूषण वि. स. खांडेकर यांची मर्मग्राही प्रस्तावना जोडल्यामुळे साधन-ग्रंथ म्हणून त्याचे महत्त्व वाढले आहे. [तरीही कोल्हटकर अधिक समजून घेण्याच्या दृष्टीने खांडेकरांची 'नाटककार कोल्हटकर' (कै. डॉ. द. रा. गोमकाळे) या ग्रंथाला लिहिलेली विस्तृत व विवेचक प्रस्तावना उपयोगी ठरेल, अशी सूचना अनाठायी ठरू नये.] असा हा महत्त्वाचा साधन-ग्रंथ पुनर्मुद्रित केल्याबद्दल अभ्या-सक प्रकाशकाला व उपयुक्त सामग्रीबद्दल संपादकाला धन्यवाद दिल्याशिवाय राहाणार नाहीत !

* *

श्रीपाद कृष्ण कोल्हटकर : आत्मवृत्त
संपादक : रा. प्र. कानिटकर
प्रकाशक मॉडर्न बुकडेपो, बाजीराव रस्ता, पुणे १०
पृष्ठे १८०+२८ (डेमी) किंमत १५ रुपये

'असा प्रदेश अशी माणसं'

केशव मुळे

सौ. इंदुमती शेवडे यांचा 'असा प्रदेश, अशी माणसं' हा प्रादेशिक कथासंग्रह अकृत्रिम कथनशैलीने वाचकाला आकृष्ट करतो. रूढ अर्थानं हा संग्रह कुणाला प्रादेशिक वाटणार नाही किंवा कथासंग्रहही वाटणार नाही. संग्रहाच्या आतील पानावर याचे वर्गीकरण 'व्यक्तिचित्रे' या वाङ्मयप्रकारात केलेले आहे. पण ही सगळी व्यक्तिचित्रे एका विशिष्ट प्रदेशातील व्यक्तींची असल्यामुळे ती आपल्याबरोबर त्या प्रदेशाचे काही संस्कार, आगळेपण, तेथल्या आसमंताशी निग-डित झालेली जीवनपद्धति घेऊन येतात. तिथल्या मातीशी ज्यांचं संचित जोडलं गेलं आहे अशा व्यक्तींचे स्वभाव, त्यांच्या मनाची जडणघडण, विशिष्ट लकबी, त्यांची सुखदुःखं यांचा पट आपल्यासमोर उलगडत असताना प्रत्येकाच्या आयुष्याची कहाणी

आपल्याला समजत जाते. ती वाचताना आपण कधी अस्वस्थ होतो, कधी विस्मित होतो, कधी उदास होतो तर क्वचित् कधी सुखावतोही. सतत पुढे काय ? पुढे काय ? अशी विकृत उत्कंठा जरी नाही तरी त्या, त्या व्यक्तीच्या ललाटीच्या ललिताविषयीची सहानुभूतिपूर्ण उत्सुकता आपल्याला वाटत राहाते.

पेशवाईच्या काळात मुलुखगिरी करत अनेक महाराष्ट्रीय कुटुंबे महाराष्ट्राबाहेर दूर, दूरवर स्थायिक झालीत. त्यातल्याच सागरला स्थायिक झालेल्या, आधीच्या संपन्न पण आता विपन्नावस्थेत असलेल्या महाराष्ट्रीय कुटुंबाच्या या कहाण्या आहेत. त्या केवळ काल्पनिक नाहीत हे उघड आहे. लेखिकेच्या आयुष्याची संस्कारक्षम वर्षे सागरला गेलीत. ज्या आप्तेष्टांबरोबर, सुहृदांवरोवर काही काळ त्यांनी तिथे घालवला, त्यातल्या ज्या परिचितांनी लेखिकेच्या मनात स्मृतीची घरं केली आणि ज्या स्मृतींच्या उर्मी अनावर होऊन लेखिकेला, एका अर्थानं, लिहिणं भाग पडलं अशा जिव्हाळ्याच्या व्यक्तींच्या ह्या कथा आहेत. बहुतेक सर्व कथांचं निवेदन प्रथमपुरुषी असून वाचकाला समोर बसवून कथा सांगितल्या जात आहेत अशा तऱ्हेचा संवाद लेखिकेनं यात साधला आहे.

यातली क्रमांकानं आणि गुणांनी पहिली कथा आहे ' नकोशी '. जन्मापासून शरीरानी आणि मनानी पांगळ्या, विकृत असलेल्या भिकू नावाच्या मुलीच्या उद्ध्वस्त जीवनाची ही कथा मन उदास करते. देहधर्म कुणालाच चुकत नाही. पण भिकूच्या अगतिकतेचा, वेडसरपणाचा गैरफायदा घेऊन तिला फशी पाडणारा आणि फसवणारा, या कथेतल्या गाडीवानासारखा, तथाकथित शहाण्या जगातला महाभाग पाहिला की माणसाच्या चांगुलपणावरचा विश्वासच उडतो. या उलट अशाही स्थितीत, आंधळ्या मायेपोटी मुलीचं कुठे तरी लग्न जमवण्याची निष्फळ खटपट करणाऱ्या आईचं आतडं पाहून मति कुंठित होते.

' अवशेष ' ही कथा, एकेकाळी वैभवानी झगमगत, दिमाखात उभ्या असलेल्या पण कालांतराने नियतीच्या फेऱ्यात सापडून उन्मळून पडलेल्या भव्य वास्तूची आणि त्यात राहाणाऱ्या घरंदाज कुळाची आहे. यातली आजी जीवनासक्तीनी रसरसलेली स्त्री आहे. तिचा या वास्तूवर फार जीव आहे. लग्न होऊन घरात आल्याआल्याच, तिच्या पायगुणानी की काय, घराची भरभराट झालेली असते. ऐश्वर्य कळसाला पोचलेलं असतं. पण काही वर्षांनी तिच्याच डोळ्यादेखत या वैभवाला ओहोटीही लागलेली असते. घराची आणि कुटुंबाची वाताहात झालेली असते. कर्जामुळे घरावर आलेली जप्ती ती खंबीरपणे परतवून लावते. पण त्या प्रसंगाने हाय खाऊन ती महिन्याभरात मरते. दुसऱ्यांदा घरावर जप्ती येते तेव्हा घराला वाचवणारं कुणीच नसतं. घर दुसऱ्याच्या ताब्यात जातं पण आजीचा अतृप्त आत्मा त्या घरात भटकत राहातो.

' वारुआत्या ' या कथेत ' सारा जन्म उन्हात ' काढलेल्या एका सोशिक स्त्रीची कथा आहे. लहानपणी आई वारल्यामुळे ती अकालीच प्रौढ होते. त्यात लग्न होऊनही प्रथम ' परित्यक्ता ' आणि नंतर ' विधवा ' या दोनच अवस्थांतून गेलेली वारुआत्या दिवसभर फक्त कष्ट आणि कष्टच करत राहाते, माणसांच्या गराड्यात राहूनही अत्यंत एकाकी जीवन कंठत राहाते. तरीही तोंडातून दुःखोद्गार न काढता, चेहेऱ्यावरचं मंद स्मित मावळू न देता, ' दोन्ही टोकांनी जळत रहाणाऱ्या वाती ' सारखी ती नष्ट होते.

' आजोबा, चुकलो ' या कथेत ' वज्रादपी कठोराणि ' अशा वृद्ध माणसाची आणि त्याच्या तितक्या हट्टी नातवाची कथा आहे तर ' असे होते ' दा ' मधे देशासाठी तुरुंगवास सोसलेल्या त्यागमय जीवन जगलेल्या, एका समाजधुरीणाची कथा आहे.

' अदृष्ट ' आणि ' पराभव ' या कथा सांकेतिक उरबडव्या आणि ठोकळेबाज आहेत. ' अदृष्ट ' कथेत लग्नानंतर प्रथम बरीच वर्षे मुल न होणारी स्त्री आहे. पुढं तिला सात मुलं होतात आणि मग हिंदी चित्रपटातल्याप्रमाणे किंवा कालेलकर, बाळ कोल्हटकर यांच्या नाटकातल्याप्रमाणे तिच्यावर संकटांची परंपरा कोसळते. तिची पाच मुलं काहीही कारण नसताना मरून जातात, म्हातारा नवराही मरतो. उरलेल्या दोन तगड्या मुलांतला एक मुलगाही पटकीनं पट्कन मरतो. मग राहिलेला मुलगाही जीवंत पाहणं लेखिकेला (आणि वाचकांनाही) असह्य होतं. म्हणून कथेतल्या म्हातारीचा उजवा डोळा फडकू लागतो, तिला अदृष्टाची चाहूल लागते. पाण्यात मासोळीसारखा पोहणारा तिचा मुलगा (लच्छूभैया) लहान मुलांना पोहणं शिकवायला नेहमीप्रमाणे तळ्यावर जातो तर त्यालाही पाण्याची वेगळीच ' खेच ' जाणवायला लागते.

आजूबाजूला जमलेल्यांपैकी एक जण 'हर तिसऱ्या सालाला बळी घेतं हे तळं' अशी सुरूवात करून तळ्याविषयीची (अनेकांनी वापरून चोथा झालेली) दंतकथा सांगतो, की कोणे एके काळी पाण्याचा दुष्काळ पडतो. गावच्या मुखियाच्या स्वप्नात देवी येऊन त्याच्या मुलाचा आणि सुनेचा बळी मागते. तो बळी देतो आणि मग तळं पाण्यानी भरून येतं वगैरे. इतकं झाल्यावर लच्छूभैयाचा बळी जाणं अपरिहार्यच असतं· त्याप्रमाणे नवीनच पोहणं शिकणारा मुलगा बुडता-बुडता वाचतो आणि पोहण्यात पटाईत असलेला लच्छूभैय्या पोहता, पोहता बुडून मरतो.

'पराभव' कथेत सुस्थितीतली, अतिशय सुंदर कमळी, गजूसारख्या कुरूप, गुणहीन, साठ रुपड्या मिळविणाऱ्या भिकार शाळामास्तरशी प्रेमविवाह करते. तिच्या अवतीभोवती वावरणारी श्रीमंत, रुबाबदार तरुण मुलं गजूचा हेवा करतात. दोघात बेबनाव होईल, फार दिवस हा विजोड संसार टिकणार नाही अशी आशा करतात. पुढे देवीच्या साथीत कमळीचे डोळे जातात. त्याही स्थितीत गजू कमळीची सेवा करतो. तिच्यावर जीवापाड प्रेम करतो अशा रीतीने असुंदर शरीराच्या गजूच्या सुंदर मनाचं दर्शन होऊन कमळीची अभिलाषा धरणाऱ्या लोकांचा 'पराभव' होतो. (आणि हे वाचून वाचक धन्य होतो.)

'सोवत' या कथेत, जीवनातील सुखदु:खं ज्याच्याबरोबर एकत्र भोगलीत, जोडीनी संसार करत असताना ज्यांच्या सहवासात दु:खाचा आघात कमी झाला आणि सुख द्विगुणीत झालं असा पती मृत्युशय्येवर पडला असता पत्नीची जी तडफड होते, घटिताच्या कल्पनेनेच जीवाचा जो थरकाप होतो, जी भग्नमनस्कता येते, जो भयाण काळोख भेडसावत राहतो त्याचं हृदयद्रावक चित्रण केलेलं आहे अशा काहीशा भ्रमिष्ट अवस्थेत स्वत: असताना पतीचा मृत्यू झाल्यानंतर जो भास, जे आभास होत राहतात; अतिंद्रीय, अशरीरी अवस्थेत पतीचं सान्निध्य जाणवत रहातं आणि चिवट जिवनासक्ती त्या आभासाचाच ध्यास घेते. त्या आधारानी जगू पाहते असं काहीसं गूढगुंजन या कथेत आहे.

'पिंडदान' ही कथा फडकेप्रणीत तंत्रानी लिहिल्यासारखी वाटते. आश्रित म्हणून एका घरात वाढलेला भैय्या नावाचा तरुण काही भांडण झाल्यामुळे आत्महत्या करतो. क्रियाकर्माच्या वेळी त्याच्या पिंडाला कावळा शिवत नाही. म्हणून घरातली दिनू, दामू, माधव, उमा, मावशी वगैरे मंडळी स्मशानात जाऊन आपले अपराध कबूल करतात आणि त्याच्या अतृप्त इच्छा पूर्ण करण्याचं आश्वासन देतात. या 'कन्फेशन्स'च्या वेळी वाचकांना एकामागोमाग धक्के बसत जातात की भैय्या या भांवडाचा सर्वात वडील (सावत्र) भाऊ असतो. त्याची आई एक ठेवलेली बाई असते. शेवटी माया, दिनूची पत्नी, कबूल करते की तिचं खरं प्रेम भैय्यावर असतं पण तो आश्रित, विनशिकलेला असल्यामुळे ती तडजोड म्हणून दिनूशी लग्न करते. हे सगळं झाल्यावर अर्थात कावळे पिंडाला भराभर शिवू लागतात, टोचा मारू लागतात.

असा हा कथासंग्रह. कथा काही जमलेल्या, काही फसलेल्या. यातील भाषा मात्र साधी, सुटसुटीत पण अर्थवाही आहे. अलंकरणाचा फारसा सोस भाषेला नसला तरी आवश्यक ठिकाणी भाषेचा सुंदर फुलोराही दृष्टीस पडतो. थोडक्या शब्दात मूर्तिमंत चित्र डोळ्यासमोर उभं करण्याचं सामर्थ्य भाषेत आहे. यात एक गोष्ट प्रामुख्यानी लक्षात येते की लेखिकेला मृत्यूच गूढ आकर्षण आहे. निदान या संग्रहातल्या प्रत्येक कथेत मृत्यू आपल्याला सामोरा येतो. एक उदास, सुन्न, विषण्ण सूर लाऊन जातो. पण या बरोबर आवश्यक असलेलं सखोल तत्त्वचिंतन मात्र फारसं आढळत नाही. हरहमेश आडव्या येणाऱ्या मृत्यूच्या संदर्भात संपूर्ण जीवनाचा अर्थ शोधण्याचा प्रयत्न (एक, दोन कथांचा अपवाद वगळता) झालेला दिसत नाही. कदाचित, या कथा लिहिण्यामागचा, लेखिकेचा तसा उद्देश नसेलही.

* *

असा प्रदेश अशी माणसं
इंदुमती शेवडे, ज्ञानदा प्रकाशन,
पृष्ठे ११७, किंमत ६ रुपये.

नरसिंहाचे रुक्मिणी-स्वयंवर

वि. बा. प्रभुदेसाई

प्राचीन मराठी काव्याच्या प्रासादातील स्वयंवर काव्याचे दालन अतिशय समृद्ध आहे. श्रीकृष्ण आणि रुक्मिणी यांचा विवाह हा विषय तर प्राचीन मराठी कवींपैकी अनेकांना स्फूर्तिप्रद ठरला आहे. श्रीकृष्ण हा महानुभावांच्या पंचकृष्णांपैकी एक असल्यामुळे, 'श्रीकृष्ण-रुक्मिणीविवाह' हा महानुभाव-पंथीय कवींचा एक विशेष आवडता काव्यविषय ठरावा याचे नवल वाटायला नको. श्री. कृष्णदास महानुभाव यांच्या माहितीप्रमाणे, "केवळ भगवान श्रीकृष्ण व रुक्मिणी यांच्या स्वयंवर आख्यानावरच रचलेले एकोणीस काव्यग्रंथ आजपर्यंत उपलब्ध झाले आहेत. संशोधन जसजसे प्रगती करील तसतशी ही संख्या वाढण्याचीही शक्यता आहे. महानुभावांपैकी, महदाइसा उर्फ महदंबा हिचे 'मातृकीरुक्मिणी स्वयंवर' आणि कविवर नरेन्द्राचे 'रुक्मिणी स्वयंवर' हे काव्यग्रंथ विशेष प्रसिद्ध आहेत. नरसिंह (नृसिंह) कृत 'रुक्मिणी स्वयं-वर' हे महानुभावांच्या अशा काव्यग्रंथांपैकीच एक होय. श्री. ज. शा. देशपांडे व श्री. कृष्णदास महानु-भाव यांनी ते संपादून प्रसिद्ध केले आहे.

महानुभावेतर अशा एकनाथ, जयरामस्वामी वडगावकर, नागेश, सामराज इत्यादी कवींच्याही श्रीकृष्ण-रुक्मिणीविवाहविषयक काव्यरचना उपलब्ध आहेत. जयरामस्वामी वडगावकर आणि सामराज या कवींनी आपल्या प्रस्तुत विषयावरील काव्यरचनांना 'रुक्मिणीहरण' या नावाने निर्देशिलेले आढळते. महानुभाव कवी मात्र प्रस्तुत विषयावरील आपल्या काव्यांना 'रुक्मिणीहरण' असे न म्हणता कटाक्षाने 'रुक्मिणी स्वयंवर' असेच नाव देताना आढळतात हे ध्यानात ठेवण्यासारखे आहे. मात्र यात आश्चर्य वाटण्यासारखे काहीच नाही. मुळात, श्रीकृष्णाने रुक्मिणीचे हरण केलेले असले तरी, महानुभावपंथी-यांच्या दृष्टीने त्यांच्या पंचकृष्णांपैकीच एक अशा श्रीकृष्णाविषयी किंचित अनादराची भावना सूचित करणारा 'हरण' हा शब्दप्रयोग महानुभावकवींना खटकणे स्वाभाविकच आहे. नरसिंह कवीचे 'रुक्मिणी स्वयंवर' काव्यही या विधानाला अपवाद नाही, हे उघडच आहे.

नरसिंह हा चौदाव्या शतकातील एक महानुभाव कवी होय. प्रस्तुत 'रुक्मिणीस्वयंवर' काव्याव्यति-रिक्त, 'संकेतगीता' या नावाची त्याची आणखीही एक रचना उपलब्ध आहे. 'संकेतगीता' ही भगवद्-गीतेवरील टीका असून तिचे वैशिष्टय 'महाराष्ट्र सार-स्वत'कार वि. ल. भावे यांनी पुढीलप्रमाणे वर्णन केले आहे:-" या टीकेत लेखकाने आपल्या पूर्वीच्या गीता-टीकांचा उल्लेख केला आहे; प्रायः महानुभाव टीका-कार आपल्या पंथातील टीकांशिवाय इतर मराठी टीकांचा उल्लेख करीत नाहीत. इतक्या इतर गीताटीका असता ही नवी टीका का लिहिली, हे सांगण्याच्या मिषाने कवी म्हणतो, 'पाहिलिया समस्तांही टीका परी शब्दार्थूचि नेटका सिद्धात भेटू आंवाका तो दिसेचिना ॥.'

नरसिंह कवीच्या चरित्र विषयक माहितीच्या दृष्टीनेही या 'संकेतगीते'चे फार महत्त्व आहे. नर-सिंहाच्या वडिलांचे नाव चाल्हण व तेच त्याचे गुरू होत. या संदर्भात पुढील काही उल्लेखही पाहा:- 'वरदु जालासी **नंदना** । **चाल्हराजाचेया** ॥ १२ ॥ **कवी भास्कराचीया** प्रतिबिंबा । न म्हावेचि मोह प्रळंबा । तया उपदेसीले **नागांबा** । **रामसीधाते** । ॥ ३२ ॥ त्याचा **कमळारण्य** प्रसीधु । जो ब्रह्माअनु-भूतीचा षटपदु । तयाचा करीत असे अनुवादु । **जनक-तनया** ॥ ३३ ॥ ते सगुण **चांगुणा** । जे प्रसन्न जाली **चाल्हणा** । तयाचा **नरसींहू** कवीजना । विनवीत असे ॥ ३४ ॥ नेणें चातुर्याचा विगोवा । नाही शब्दब्रह्मी रिगावा । परी **गुरुकृपेचा** वोलावा । संतसनेंधी ॥३५॥ तरी ते संत सांधो कैसे । जे अनुसरले मने मानसे । उन्नत ब्रह्मरसे । निर्वासनारूप ॥ ३६ ॥ ते आईका **पुर्वज माझे** । जेही अहंकाराचे सांडिले वोझे । वैराग्य वीरश्री साजे । कासीले मन्मथावरी ॥ ३७ ॥ मज **विश्वास गुरुचां शब्दी** । म्हणौनि धरीली समबुधी । आहो गर्वे काई सीधी । पावीजताए ॥ ५३ ॥.'
(रुक्मिणी-स्वयंवर । प्रसंग पहिला)

वर उद्धृत केलेल्या ओव्यांतील उल्लेखांवरून, ज. शा. देशपांडे यांनी, नागांवा→रामसिद्ध→ कमलारण्य ऊर्फ कमलाकर→जनकतनया ऊर्फ सीतांवा। चांगुणा→चाल्हण→नरसिंह, अशी वंशावळ सिद्ध केलेली आढळते. नरसिंह हा कवी कवीश्वर आम्नायातील कारंजेकर वंशावळीतला असून त्याचे जन्मस्थान विदर्भातील चिखली हे गाव होय, वंशावळीच्या संदर्भात 'नागांवे'च्या आधी 'कवी भास्करा'चा उल्लेख आहे. 'महाराष्ट्र सारस्वत'कार वि. ल. भावे यांनी 'चाल्हणपंडिता'ची परंपरा पुढीलप्रमाणे दिली आहे:– चक्रधर→नामदेव कवीश्वर→नागांवा →कमळाकर → सीतांवा→चाल्हण [महाराष्ट्र सारस्वत, आवृत्ती ५ वी, पृ. १८०]. खुद्द नरसिंहाने दिलेल्या वंशावळी अधिक बरोबर मानाव्या व त्यातील 'रामसीध' (रामसिद्ध) म्हणजे रामेश्वर व्यास असावेत, असे मत ज. शा. देशपांडे त्यांनी व्यक्त केलेले आढळते.

नरसिंहाच्या 'रुक्मिणी-स्वयंवर' काव्याचे एकंदर पंधरा 'प्रसंग' असून ओवीसंख्या दोन हजार तीनशेसोळा भरते. ही शके १५७१ ची (सर्वात प्राचीन) प्रत असून तीच प्रमाण मानून संपादकांनी संहिता सिद्ध केली आहे. संपादकांना उपलब्ध झालेली दुसरी प्रत शके १५८३ ची असून तीत अठरा प्रसंग व २५५४ ओव्या आहेत. या दोन्ही प्रतींची तुलना करून दुसरीतील महत्त्वाचे पाठभेद संपादकांनी तळटीपांत नमूद केले आहेत. उपलब्ध पुराव्याच्या आधारे त्यांनी ग्रंथलेखनाचा काळ शके १३२५ हा ठरविलेला आहे. 'महाराष्ट्र-सारस्वत'कार भावे यांनीही 'अङ्कानां वामतो गतिः' या नियमानुसार हाच शक मान्य केलेला आहे.

आपल्या काव्यरचनेसाठी कोणकोणत्या ग्रंथांचा आधार घेतला हे स्पष्ट करताना नरसिंह कवी लिहितो:– 'कवीत्वाचेनि मीसे । गाईन देवाची चरीत्रे सुरसे । जे भागवती सूकव्यासे कथन केली ।। ६७ ।। न बोले कथेविरहित । पसरू नेघे बहुत । महाकवीचे मत । ते मज कैंचे ।। ६८ ।। परि आपुलिए मतीसारीखे । काही एक बोलैन उल्लेखे । बोबडा उत्तरी बाळके । रंजविजे जैसे ।। ६९ ।। (प्रसंग पहिला).

कवीचे हे उद्‌गार त्याच्या विनयी वृत्तीला शोभून दिसतील, असेच आहेत.

भागवत पुराणाशिवाय ज्ञानेश्वरी आणि नरेंद्र 'रुक्मिणी-स्वयंवर' ही नरसिंह कवीच्या समोर ह असे साधार विधान करता येते. नंतरच्या कालखंडात कवी संतोषमुनी याच्यासमोर नरसिंहाचे प्रस्तुत का होते हेही दोहोंच्या तुलनेने दाखवून देता येते.

नरेंद्र, नरसिंह आणि संतोषमुनी या 'रुक्मि स्वयंवरा'वर रचना करणाऱ्या तीन महानु कवींची काव्य गुणांच्या दृष्टीने तुलना करताना शा. देशपांडे लिहितात, 'नरेंद्र नरसिंहापेक्षा ज प्रतिभावान कवी वाटतो तर संतोषमुनींच्या काव्य भाषा नरसिंहापेक्षा अनेक ठिकाणी जास्त ओघवत प्रासादिक वाटते. नरेंद्र व संतोषमुनी या दोघांच काव्यारंभ फार सरस आहे. तथापि नरसिंहाची व चांगली उठतात. सातव्या प्रसंगातील यादवांची नरसिंहाची विनोदबुद्धी दाखवते.' (प्रस्तावना)

शृंगार, वीर, रौद्र, शांत इत्यादी वि रसांचा परिपोष करण्याच्या दृष्टीने रुक्मिणी-स् वराचे आख्यान अतिशय समृद्ध आहे. अनेक नाट्य प्रसंगातून संघर्षाच्या असंख्य ठिणग्या उडताना तात. रुक्मिणीचा ज्येष्ठ बंधू रुक्मी हा शिशुपाल पक्षाचा तर तिचे वडिल आणि इतर चौघे बं श्रीकृष्णाची बाजू उचलून धरणारे आहेत.

श्रीकृष्णाच्या विरहाने व्याकूळ झालेल्या रुक्मि वर तिच्या सख्यांनी केलेले शीतलोपचार, तिने ब्राह्मणाकरवी कृष्णाला पाठविलेली प्रणयपत्र रुक्मिणीच्या सौंदर्याचे आणि श्रीकृष्णाच्या परा वर्णन, द्वारकाशोभा, रुक्मिणीने केलेले देवीचे श्रीकृष्ण-रुक्मिणी भेट, रुक्मिणी हरणातून उद्भ घनघोर युद्धाचे प्रसंग आणि कृष्णाने प्रतिप मिळविलेला विजय, तसेच श्रीकृष्ण व रुक्मि 'वोहरा'चे कवीने केलेले भक्तिभावपूर्ण वर्ण प्रसंग नरसिंहाच्या काव्यामध्ये विशेष सरस आहेत. भीमकाचा भक्तिमार्ग, रुक्मीचा कृ आणि रुक्मिणीची विरहव्यथा साकार करताना शब्दकळा सजीव झाल्याचा भास होतो. या रेखाही अतिशय वेधक वठल्या आहेत.

नरसिंहाच्या वर्णनशैलीचे काही नमुने दे करणे उचित होईल. रुक्मिणीने भीमकाच्या द आपल्या सख्यांसह प्रवेश केला त्या प्रसंगाचे

करताना कवी लिहितो, "जेवि सत्रावी कळा । तैंसी ते भीमकाची बाळा । मेलीया मदनासी जिवाळा । जाला जिएचेनी ॥१००॥ आंगवळेकारी सखीया । ठकारें चालती सरीसीया । दोघी नाचती धाकुटीया । रुक्मिणी पुढें ॥१०१॥ दोघी गाती वाती वीणा । दोघी देव्हडीया जाणवीती वींजना । दोघी कन्हीरीणी जीवना । सोडीती तुषार ॥१०२॥ ... सूर्यो तपताये खडत्र । म्हणौनि चौघीं धरिलें पालवछत्र । तळउपर जाणवीती वीचीत्र । दोघीजणी ॥१०४॥ ... ऐसी सतिसांचेनी मेळे । चालतां भीमकाचिए बाळे । उमटति निरियांची मंडळे । वर्तुळें काचिभूमिके ॥१०६॥ जैसीया समुद्रावरी । हेलावे देताति लहरी । तैसीया त्या राजकुमरी । चालतां दीसती ॥१०७॥ कैसिया चमकती डोळसा । जेवि हरणी चवकती डोळसा । तेयामाजि रुक्मिणी हंसा । पदीं जींकीलें पैं ॥१०८॥"
(प्रसंग दुसरा)

रुक्मिणीच्या सौंदर्याचे कविकृत वर्णनही असेच सुरेख वठले असून त्याचा एक नमूना पाहा :—
"जैसी कीळ सूर्याची । तैसी दीप्ति फांके कुंडलांची । झळफळित श्रींधाराची । वोप दींसे ॥११५॥ रत्नांची लेणी सविकारे । वरि चालती तारूण्याचेनि ठाकारें । विरहातुरें जाली शरीरें । कामीकांचीं ॥११६॥ सभासागरू पावतां भीमकी । जैसी गंगासंगमी सहस्रमुखी । ना तरी सोळाही कळां ससांकीं । पूर्ण जैसा ॥१२०॥ अंदु नेपुरांचेनि झणकारें । गमक पदाचेनि गजरें । खूणा गोष्टी सांधती अनुकारें । नेत्रांचेनि ॥१२१॥ काळंद्रीजळ नीर्मळ । तैसे समस्तीं सोगयांचें काजळ । माजि कृष्णवींव ते वुवळ । मिरवति नयन ॥१२२॥ ... रुक्मीणी नयनाचें माजवण । तेणें माजले सभेचे कामीकजन । अनंगु क्षोभला रूप देखौन । अवळेचें ॥१२७॥ बीजेसी चंद्र दावी । मग दीसेदीसे कळा चढवी । तैसी आळुमाळ मन्मथ मातवी । उमटली दीसें ॥१२८॥ निवर्तली बाळवेंसा । मुहुरैली मुगुधदसा । नावेक संचरली संका सरिसा । पालउ करीताये ॥१२९॥ देखा जैसी जळकासवी । आपुली आंगें लपवी । तैसी अप्टांगें आंवरौनि देवी । वैसली पदमासनी ॥१३०॥" (प्रसंग दुसरा)

बाल्यावस्था संपवून मुग्ध अशा यौवनावस्थेत प्रवेश करणाऱ्या रुक्मिणीच्या विभ्रमांचे कवीने येथे रेखाटलेले शब्दचित्र अतिशय सुरेख वठले आहे.

नरसिंहाच्या काव्यातील रुक्मिणी पुढे कृष्णाला प्रणयपत्रिका लिहून ती हळदीच्या हाताने सुशोभित करते आणि सुदेव ब्राह्मणाला पाठवणीचा विडा देते. हा विडा देत असताना श्रीकृष्णाच्या विरहाग्नीमुळे रुक्मिणीच्या नाजूक देहाची कशी लाही लाही होत होती पाहा—"बरवीं साजुकें सकोमळें । पानें नीवडौनि उजळें । ब्रीजा देतां हातीचेनि जाळें । कर्पौनि गेलीं ॥६२६॥ सखी एवरी कोपली । म्हणे पानें काई-सेनि कोळसैलीं । मग आणीके देवों वैसली । तवं तेही तैसींची ॥६२७॥ म्हणे सूदेवा ताता । हे ऐसी असे अवस्था । धीरु नवटे आतां । तुं कै एसी ॥६२८॥"
(प्रसंग पाचवा)

सुदेव ब्राह्मण रुक्मिणीचे सांत्वन करून द्वारकेला जाण्याची तयारी करू लागला त्यावेळी रात्र झाली. त्या रात्रीचे कवीने केलेले वेधक वर्णन असे आहे—
"ऐसें करितां संबोखन । सूर्या जाले अस्तमान । सपींजर दीसे गगन । सध्यारागें ॥६३३॥ कीं कामीनी कामभारें सीणती । तेया होआवया वीश्रांती । द्वीज-अर्धनी गभस्ती । अस्तु जाला ॥६३४॥ सांजवेळेचां भरी । दीप लागले घरोघरीं । स्नेहगुणें सविरी । प्रकासे जेणें ॥६३५॥ कीं तो श्रीहरी सारंगु साचे । जिणावेयां आधारे कामाचें । की अज्ञान त्रीमिर जगाचें । फेडी ज्ञान प्रकासुन ॥६३६॥ तैसे नगरामाजि सुहावे । घरोघरी पाजळती कुळदीवे । गणिका श्रींधारभावें । रामपाहारीचा ॥६३७॥ अज्ञानरात्री काळवखें । वोभारे दाटती कण्हाती भवदुःखें । अवीद्येचेनि पैं दुःखें । घारैंले भूतजात ॥६४२॥ म्हणोनि भरे सार्वरी नीस्वंग । निद्रीस्त अवघें जग जयां साधला ध्यानयोग । ते जागृत सदा ॥६४३॥ तयां समस्थां मुनींद्रां । अज्ञान-रात्री नाहीं नीद्रा । आत्मरमणी ध्यानमूद्रा । ते लाभली तयां ॥६४४॥" (प्रसंग पाचवा)

भीमकाने आपली कन्या श्रीकृष्णाला देण्याचे निश्चित केल्यावर रुक्मी हा क्रोधाने कसा संतप्त झाला पाहा:—"जैसें घृत घालीजे पावका । जाळ उठो अधीका । तैसा चढौनि तवका । कडाडे मेघु जैसा ॥४४६॥ सभेमाजि राहूनि उभा । तवकें डोळे वाउनि नभा । टाळें न लगतां जीभा । बोले भवै ताणौनि ॥४४७॥ जैसा प्राणियां पावे अंतु । संचरे तेरावा सन्य-पातु । वैद झाडी हातु । असाध्य म्हणौनि ॥४४८॥

तैसा जल्पे उघटु । जैसा मतला वसोडरे बन्हांटु । कीं नीरांजनीं मोकलीला पाटु । जेवि सैरावैरा ॥४४९॥ ...माएबाप न पडती ठाई । ऐसीयासि म्हणावें काई । तयासि करितां जावाई । लाज नाहीं तुम्हां ॥४५७॥ रूपें तरि काळा ढीमू । ज्यातें देखोनि संके एमू । कांवळा पांघूरतां जन्मु । गेला सदा ॥४५८॥ जातिचा तरि गौळी । गोपाळपणाची नामावळी । त्यासि हे रूपवंत वाळी । केवि साजें ॥४५९॥ (प्रसंग पाचवा)

हा रुक्मीकृत श्रीकृष्णाच्या निंदागर्भ स्तुतीचा सगळाच प्रसंग अत्यंत सरस वठला आहे.

प्राचीन मराठी कविता, खंड सहावा (नृसिंहकृत रुक्मिणी–स्वयंवर) या ग्रंथाचे संपादक श्री. ज. शा. देशपांडे यांनी आपल्या संपादित ग्रंथाला जोडलेल्या 'प्रस्तावने'त, उपलब्ध हस्तलिखितांची माहिती, ग्रंथ-लेखनकाळ, कवीची चरित्रविषयक माहिती, कवीवरील पूर्वसूरींचा परिणाम, तसेच कथाभाग, काव्यगुण, भाषा इत्यादी विषयांचा साधार परामर्ष घेतला आहे. ग्रंथाच्या शेवटी, 'शब्दकोश', 'स्थळांची सूची व माहिती', 'व्यक्तींची सूची व माहिती', 'संदर्भ ग्रंथ व संक्षेप' यांच्या जोडलेल्या विविध सूची अभ्यासकांच्या दृष्टीने अत्यंत उपयुक्त अशाच आहेत. मात्र, संपादकांनी घेतलेला काव्यगुणांचा आणि भाषिक वैशिष्टयांचा परामर्श बराच त्रुटित वाटतो. प्राचीन मराठी भाषा आणि वाङमय यांच्या अभ्यासकांच्या दृष्टीने प्रस्तुत वैशिष्टयांचा सविस्तर परामर्श उपकारक ठरला असता. ही त्रुटी काही प्रमाणात शेवटी 'परिशिष्टांनी' भरून काढली आहे. ही [illegible] गोष्ट आहे.

अशा प्रकारच्या (गद्य किंवा पद्य) संपादनात, कठिण शब्दांच्या कोशाबरोबर स्पष्टीकरणात्मक टीपा असाव्यात आणि [illegible] प्रमाणे महत्त्वाच्या पाठभेदांची चर्चाही [illegible] उपरही एखाद्या टीकाकाराला अशा प्राची[illegible] काव्यगुण आणि भाषिक वैशिष्टये यांच्या काणाडोळा करून त्या काव्यग्रंथाची '[illegible] म्यूझिअममधील एक पुराणवस्तू' अशा शब्दा[illegible] करावयाची असल्यास त्याला प्रतिबंध करण[illegible] नाही. श्री. ज. शा. देशपांडे यांनी आताप[illegible] 'प्राचीन मराठी कवितेच्या' सहाही खंड मराठी वाङ्मयाच्या अभ्यासकांच्या दृष्टी[illegible] मोलाचे आहे यात काही शंका नाही.

प्राचीन मराठी कविता, खंड ६ वा,
नृसिंह (नरसिंह) कृत रुक्मिणी–स्वयंवर
संपादक श्री. ज. शा. देशपांडे,
श्री. कृष्णदास महानुभाव
प्रकाशक : मुंबई, मराठी ग्रंथसंग्रहालय, मुं[illegible]
पृष्ठे १२+१७३ किंमत : चार रुपये

डिसेंबर आणि इतर कविता

सुधाकर जोशी

मराठी साहित्यात आताशा नार्सिसस–युग सुरू झाले आहे असे वाटू लागले आहे. म्हणजे असे की खूपशी पुस्तकं वाचायची, त्यांचे संस्कार होऊ द्यायचे, ते जरा अंगभर जिरले की जवळ जी थोडीशी संवेदनेची पुंजी असते तिला जोडून कविता प्रसूत करायच्या. अशा शेसव्वाशे कविता जवळ तयार झाल्यात (आणि त्या होणारच कारण हा नार्सिसिझमचा मूड तसा बराच काळ टिकून राहू शकतो) व जरा फुरसतीने लक्ष घालून, हात फिरवून दिला की लिहिलेली प्रत्येक कविता ही अस्सल आहे असा सुखद भ्रम निर्माण होतो. कुणी कौतुक करणारं असलं की विचारूच [illegible] क्षमता असते, प्रेस असतो, प्रकाशन संस्थ[illegible] विणारे स्नेही असतात वगैरे. नार्सिसस[illegible] अटी पूर्ण झाल्यात. बदलत्या कालमानानु[illegible] प्रेमात पडण्यासाठी आता नवी नवी वै[illegible] वाटू लागलीत. कुणी स्वपीडणाच्या स्वत[illegible] तर कुणी स्वतःच्या cynicism वर गतकालातील दुःखद आठवणींचं ओ[illegible]

म्हणून प्रदर्शित करावसं वाटतं तर कुणी आपल्या अस्तित्ववादीपणावर फिदा. याची काही मोजकी उदाहरणं म्हणजे श्री. लक्ष्मीकांत तांबोळी, श्री. सुरेश भट व प्रस्तुत कवितासंग्रहाचे कवी श्री. रा. रा. अनिरुद्ध अ. कुलकर्णी. तांबोळींचा अस्वस्थ सूर्यास्त बराचसा दिखाऊ होता आणि श्री. सुरेश भटांच्या सत्यकथेत येणाऱ्या कविता ह्या आता विलक्षण, एकसुरी आणि रडक्या वाटतात. एखाद्या लहान मुलानं खूप वेळ रडणं जर चालू ठेवलं तर जशी त्याची आपल्याला उबग येईल तशी भटांच्या गझलाची आता यायला लागली आहे. सत्यकथावाले त्या का छापतात हे मात्र कळायला मार्ग नाही. डिसेंबर आणि इतर कविताकार श्री. कुळकर्णी ह्यांचा नार्सिसिझम असाच. एकदम एकशे एक्केचाळीस कवितांचा संग्रह काढण्याच्या मागे हेतू काय ? विसाव्या शतकातल्या नार्सिससला आणखी एक विशेष जडला असतो. तो म्हणजे एक्झिबिशनिज्मचा कुलकर्णी एक्झिबीशनिस्ट सुद्धा आहे हा त्यांच्या जवळपास दीडशे कवितांचा कविताखाना पाहून माझा ग्रह झाला आहे.

स्वत:वरचं प्रेम कसं दिसतं ? एक दोन कविता आपण घेऊ या. पान ११७ कवितेचं शीर्षक : वापरून रुळलेल्या.

स्वत:च्या शहाणपणाचं स्वरूप व्यक्त करताना कवी एकामागे एक चांगल्या चार प्रतिमा पहिल्याच दणक्यात वाचकांसमोर ठेवतात. "वापरून रुळलेल्या जोड्यांचा शहाणपणा माझ्यात आहे." सुन्दर प्रतिमा, जरी थोडीशी घरगुती, आवडणारी आहे पण मोह मोह म्हणताना सुचलेलं सर्व काही कवितेत घुसडून देण्याचा, तो काही कुळकर्ण्यांना टाळता येत नाही. मग ते लिहितात लगेच.

"(२) पाऊस तिरका आल्यावर खिडक्या लाऊन घेणाऱ्या हाताचा शहाणपणा" (त्यांच्यात आहे)

(३) "प्रचंडतेत निसटणाऱ्या दुबळी इतिहासाला पाठपुरावा आत्मचरित्रातलाच मानण्याचा शहाणपणा" (त्यांच्यात आहे.)

(४) "युधिष्ठिराबरोबरच्या कुत्र्यासारखा... न्यूनगंड माझ्यात डोकाऊ न देणारा" (शहाणपणा त्यांच्यात आहे.)

(संयमाचाच शहाणपणा नेमका नाही.)

कविता वाचणारे त्यांचा शहाणपणा एका ओळीत समजू शकणार नाहीत इतके ते नासमझ आहेत असा ग्रह करून रा. रा. कुळकर्ण्यांनी तीन प्रतिमांचा बळी देऊन कवितेचा तोल सुरुवातीलाच बिघडवून टाकला.

पहिल्या प्रतिमेनं तयार झालेली भावावस्था तिनं लागोपाठ येणाऱ्या पुनर्प्रत्ययी वाचनाने पार ढासळते. कुळकर्ण्यांच्या ह्या विधानाच्या प्रामाणिकतेविषयीच मग शंका यायला लागते. Repeat a lie and turn it into a truth असा त्यांच्या सर्वच अनुभूतीविषयी संशय तयार होतो.

श्री. कुलकर्णी खुश आहेत आणि त्यांनी खुश असावे. आपण फक्त त्यांच्या ह्या आनंदामागची काही कारणं शोधण्याचा प्रयत्न करायला हरकत नाही. शिवाय तो आनंद पुरेशा भक्कम पायावर उभा आहे की नाही हेही तपासून पहायला हवे. त्यांच्या अनुभवाला आलेल्या अनेकविध जाणीवा ते शब्दरूपात गोठवू शकतात. त्यासाठी त्यांची शब्दकळा तयार आहे. वेगवेगळ्या प्रतिमांकनातून [अर्थात हे वेगळेपण कवितासंग्रह जसजसा संपत जातो तसतसा वाचकाच्या अंगवळणी पडत जाते]. अनुभवाचं उत्कटपण ते समर्थपणे वाचकाला जाणवून देऊ शकतात. 'या रुग्णालयात' (पान ६०) ह्या कवितेतील खालील ओळी

तळापर्यंन्त समुद्र शोषून लालभडक झालेले ढग जसे
समुद्राच्या अंगावर रेललेले त्याप्रमाणे
आपलेच रक्त पिऊन ह्या लाल शाली
थंडपणे आपल्याच हाडांवर पसरल्या आहेत

त्यामुळे उडाले आहे साफ आपले आपल्यावरचेही प्रेम

ह्या भयानक बोलक्या आहेत. मृत्यूची चाहूल लागल्यामुळे आणि रुग्णालयात अनेक दिवस खितपत पडल्यामुळे येणारी कटुता आली त्यातून निर्माण होणारे संवेदनशील माणसाचा कडवट उपहास अतिशय परिणामकारकपणे ह्या पंक्तींतून व्यक्त झाला आहे. अंगावरच्या शालीच्या लाल रंगाचा संबंध शरीरातून जवळपास संपलेल्या रक्ताशी [शाली थंड का ? कारण त्या उबदार मुळात असूनसुद्धा रक्तहीनतेमुळे शरीरात ऊब निर्माण करू शकत नाही म्हणून]

जोडण्याचा एक विलक्षण इन्टेलीजन्ट आणि थोडासा आत्मपीडक छंद मरणसम्मुख माणसाला लागण्याची शक्यता कुलकर्ण्यांनी हेरली आहे. आणि ती तितक्याच प्रभावीपणे मांडण्यात आली आहे.

पण कुलकर्णी जेव्हा शास्त्रीय शब्द, पारिभाषिक शब्द, औषधांची नावे, अनुप्रास, समीकरणे ह्यांचा सरसकट उपयोग करू लागतात तेव्हा ते वाया जात आहे असं वाटतं "गझनी गुल्मोहराच्या कमानी कुर्निसाता खावून" ह्यात गुल्मोहर गझनी कशाला पाहिजे ? कुलकर्ण्यांना गझनी गुल्मोहर हे शब्द आवडले म्हणून त्यांनी ते वापरले आणि गझनी ह्या शब्दामुळे कुर्निसात हा दुसरा उर्दू शब्द लगोपाठ प्रयोजना-शिवायच येतो.

तर मुद्दा असा की वाचताना वाचक डोलावा ह्या हेतूने केलेली शब्दयोजना ह्या कवितेत असंख्य ठिकाणी केलेली दिसेल.

ही योजनाबद्धता म्हणजे कविता काय? तंत्र साधेल पण अनुभूती नसली तर अनेक कविता ह्या 'पोज' वाटतात. 'डिसेंबर' हा शब्दही माझ्या मते असाच फसव्या अर्थाने वापरला आहे. घेतलेल्या पोजसाठी शब्दव्यूह तयार करणे आणि असे करता करता काटेकोरपणा गमावून बसणे, भान हरवून जाणे असे कवितेप्रत अन्याय्य प्रकार घडतात त्याला श्री. कुलकर्णी मुळीच अपवाद नाहीत.

'कमरअली दरवेश' 'पैशाकडे पैसा जातो' ह्या अशाच कविता. सशक्त अनुभूतीची वाण शब्दांच्या रेलचेलीने भरून काढावी काय ?

तसेच भान विसरून लिहिलेली कविता एक पाहू. तशी कविता ही भान विसरुन लिहावीही. पण भानावर आल्यावर जर असे आढळले की कवितेच्या बंदिशीत काही Inbuilt-Contradictions आहेत— विसंगती आहेत तर त्या नाहीशा करणे हे माझ्या मते आत्मभान आल्यानंतर कवितेत होणाऱ्या योग्य फेरफाराचे लक्षण आहे.

'भविष्य काळात सरकणाऱ्या' ही कविता पाहू.

"तशा पिसाट आठवणी येतात गाढ मनात" 'आठवणी' शब्द अनेकवचनी. आठवण-आठवणी. १६ व्या ओळीत आठवणी अनेक न राहता त्या अचानक एकच आठवण होतात 'एकाच खड्याच्या स्पर्शाने तरंगावून सोडलेल्या । गडद तळ्याच्या पछाड-लेल्या पृष्ठभागासारखे ' एकच मुडा (एक=एकच) हा शब्दप्रयोग करताना 'च' लावल्यामुळे केवळ एका प्रसंगाच्या आठवणीमुळे माणूस केवढा बेचैन होतो असे त्यांना सुचवायचे आहे हे निश्चित.

म्हणून श्री कुलकर्णींनी प्रथम हे ठरवून घ्यावे की आठवणी अनेक की एक ?

हाच प्रकार काही ओळींनंतर पुन्हा घडतो.

'पहाटेच्या तांबड्या सुस्काऱ्यापासून लांब-नसलेली दरदरुन रात्रच रात्र' अशी एक ओळ आहे.

जर ती रात्रीची वेळ पहाटेच्या तांबड्या सुस्काऱ्यापासून लांब नसेल तर मग दरदरून रात्रच रात्र कशी असेल. दरदरून म्हणजे खूप (दरदरून घाम सुटणे). रात्रच रात्र म्हणजे खूप रात्र. म्हणजे रात्रीचा खूप खोल क्षण म्हणजेच रात्रीचा असा प्रहर की जो रात्रीच्या सुरुवातीपासून आणि शेवटापासून म्हणजे दोन्ही टोकांपासून खूप दूर आहे. म्हणणे रात्रीचे १२-१ ची वेळ. तर मग ही वेळ-पहाटेच्या तांबड्या सुस्काऱ्यापासून लांब नसणे शक्यच नाही. कुलकर्णींनी हे चमत्कारिक विधान कवितेच्या ओघात जे केले त्याचे प्रमुख कारण म्हणजे अतिशयोक्त विधानांचे, मरमसाठ विधानांचे, Hyperbolic Statement चे त्यांना भरपूर आकर्षण आहे, जे त्यांनी कटाक्षाने टाळावे. कवितेची थीम ती भावावस्था आली, ती संवेदना जेव्हा पुरेशी पकड न घेताच ती कागदावर उतरायची घाई झाली आणि भरीला उत्साह असला म्हणजे हा विसविशीतपणा आणि भोंगळपणा डोकावणारच. शिवाय साधारण मुलगी सजवून दाखवावी तशी कुलकर्णी कविता सजावतात.

'मोल्युकुलर करंट करंटे/कॅलोरीक धिजरीचे घेर.' 'आस्वानच्या अस्मितेत प्रचंड निळाईचे नाईली अर्घ्य.' 'सतत मी सान्निध्यात सर्वावतो स्वतःच्याच.'

अशा प्रकारप्रकारे वामनपंडिती अलंकाराने मढवून कुलकर्ण्यांना कविता छापण्याचा हव्यास आहे. हा अधंकच्चेपणाचा पुरावा ते जेवढ्या लवकर त्यांच्या कवितांतून वगळतील तेवढे बरे. त्यांचा एक चांगला चाहता वर्ग होऊ शकेल.

'फिडून चाललो आहे नादानी दैनंदिन दानाच्या.'

'दान देणाऱ्या आकाशाला पार्श्वभूमी नसते.

'देहव रात,'

सारख्या चांगल्या ओळीही त्यांच्यात आहेत. तशाच अशा यशस्वी ओळींना गालबोट लावणाऱ्याही भरपूर कविता ह्याच अंकात आहेत. शब्दांतील सुप्त आवाहनशक्ती त्यांनी वाऱ्यावर फेकून देण्याचा (वाटेल तसा आणि भरमसाट प्रमाणात वापरण्याचा) त्यांनी प्रयत्न करू नये. बीजं चांगली झाली तरी वाऱ्यावर फेकून पीक घेता येत नाही. निर्मितीची क्षमता असलेल्या भूमीतच ती रुजवावी लागतात.

संग्रहाचे जाता जाता एक वैशिष्ट्य सांगून टाकावेसे वाटते. कुणाही समीक्षकाचे प्रस्तावनारूपी ओळखपत्र, शिफारस घेऊन संग्रह अवतरला नाही म्हणजे कवितांतून त्यांनी जरी आपली व्यथा आग्रहपूर्वक गळी उतरविण्याचा प्रयत्न केला आहे तरी प्रथितयश टीकाकाराची भलावण न जोडल्यामुळे ह्या प्रकाराला थोडासा आळा बसलाच आहे.

कुलकर्ण्यांनी एवढं स्वातंत्र्य वाचकांना दिलंय हे त्यांच्या विकसनशीलतेचा पुरावा म्हणून स्वीकारायला माझी तयारी आहे.

* *

डिसेंबर आणि इतर कविता : अनिरुद्ध कुळकर्णी
कॉंटिनेंटल प्रकाशन, पुणे, ३० किंमत : ४ रुपये.

मराठी रंगभूमी : मराठी नाटक : घटना आणि परंपरा

व. कृ. वऱ्हाडपांडे

मराठी नाटके व रंगभूमी यांच्याविषयी आस्था बाळगणाऱ्या व्यक्तीस डॉ. अ. ना. भालेराव यांचे नाव सुपरिचित आहे. मराठी साहित्य व मराठी रंगभूमी यांच्या उर्जितासाठी एकलव्याच्या निष्ठेने परिश्रम करणारी ही प्रयत्नमूर्ती २५ ऑगस्ट १९५५ रोजी वयाच्या अवघ्या त्रेपन्नाव्या वर्षी इहलोकाच्या रंगमंचावरून अंतर्धान पावली. व्यवसायाने डॉक्टर असूनही डॉ. भालेरावांनी निदिध्यास बाळगला होता तो मराठी साहित्य व रंगभूमी यांच्या विकासाचा! मुंबई मराठी साहित्य संघ ही नामवंत साहित्य संस्था म्हणजे डॉ. भालेराव यांच्या वाङ्मयप्रीतीची सगुण साकार मूर्ती होय असे म्हणावे लागते. दुर्दम्य उत्साह, योजनाचातुर्य, संघटनाकौशल्य व लोकसंग्रहात्मक वृत्ती इत्यादी गुणविशेषांमुळे त्यांनी मुंबई मराठी साहित्य संघाला महाराष्ट्रात अतिशय मानाचे स्थान प्राप्त करून दिले व अशा प्रकारच्या सार्वजनिक संस्थांचे कार्य चालविण्याचा आदर्शच महाराष्ट्रात निर्माण केला.

अर्थात, अशा नाट्यप्रेमी व साहित्यप्रेमी डॉ. भालेरावांचे स्मारक मुंबई मराठी साहित्य संघाने करावे, यात अस्वाभाविक असे काहीच नाही. साहित्य व रंगभूमी यासंबंधातील सामाजिक स्वरूपाचे कार्य सतत चालू ठेवणे हा या स्मारकाचाच एक प्रकार असला तरी स्मृतिग्रंथाच्या रूपाने त्यांचे एक चिरस्थायी असे स्मारक होणे अत्यंत आवश्यकच होते. 'मराठी रंगभूमी मराठी नाटक : घटना आणि परंपरा' या नावाने मुंबई मराठी साहित्य संघाने डॉ. अमृत नारायण भालेराव स्मृतिग्रंथ रसिकापुढे सादर करून डॉक्टरांच्या ऋणातून अंशतः उत्तीर्ण होण्याचा व त्यांचे एक चिरंतन स्वरूपाचे स्मारक बांधण्याचा जो उपक्रम केला आहे तो म्हणूनच अत्यंत स्वागतार्ह आहे. मुंबई मराठी साहित्य संघाचे साधन हाती घेऊन डॉ. भालेरावांनी मराठी रंगभूमीच्या जीर्णोद्धाराचे अमोल कार्य केले व त्याद्वारे मुंबईतील असंघटित मराठी समाजाला मनाने एकत्र आणून त्यांच्या सांस्कृतिक व भावनिक ऐक्याचे जे भगीरथ प्रयत्न केले त्यामुळेच, प्रा. न. र. फाटक म्हणतात त्याप्रमाणे, मुंबईतील मराठी भाषिकांच्या अर्वाचीन इतिहासात संस्कृतिसंगोपनाच्या अंगाने ज्यांचे नाव अग्रगण्यत्वाने सदैव घेतले जाईल अशी डॉ. भालेरावांची कामगिरी आहे हे कोणालाही मान्य करावेच लागेल. व मुंबई हेच आज

महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनाचे केंद्र बनले असल्याने, पर्यायाने संपूर्ण महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनाला उन्नत करण्याचे बरेचसे श्रेय डॉ. भालेराव यांना द्यावे लागेल.

प्रस्तुत स्मृतिग्रंथात डॉक्टरांच्या जीवनकार्याचा आढावा घेणारा, स्मृतिग्रंथाचे कार्यकारी संपादक श्री. वा. रा. ढवळे यांचा एक लेख वगळल्यास इतर सारेच लेख मराठी नाट्यवाङ्मय व मराठी रंगभूमी यांच्याशी संबंधित आहेत. किंबहुना, हा स्मृतिग्रंथ म्हणजे मराठी नाट्यवाङ्मय आणि मराठी रंगभूमी यांच्या आस्थेवाईक अभ्यासकांना एक महत्त्वपूर्ण संदर्भग्रंथ म्हणून उपयुक्त ठरावा असाच हेतू संपादकांनी आपल्या दृष्टीसमोर ठेवला होता व तो हेतू सफल झाला आहे यात शंका नाही. रंगभूमीची–नटनाट्य नाटककारांची–गेल्या सवाशे वर्षांतील स्थित्यंतरे लोकांना सादर करणारा हा स्मृतिग्रंथ असून मराठी नाटके व रंगभूमी यांमध्ये बदलत्या जीवनगतीच्या प्रभावाने आजवर झालेल्या फेरफारांचे निवेदन आले आहे व ते अभ्यासी व्यक्तींच्या लेखणीतून उतरले असल्यामुळे सदर विषयाच्या जिज्ञासूंना बोधप्रदच नव्हे, तर मार्गदर्शक वाटल्याशिवाय राहणार नाही हे प्रा. फाटकांचे पुरस्कारातील विधान यथार्थच आहे.

या ग्रंथातील साहित्याचे दोन भाग पडतात. काही लेख मराठी रंगभूमीच्या व नाटकांच्या अंतर्बाह्य स्वरूपाचा विविधांगी आढावे घेणारे आहेत. अशा लेखांची प्रस्तुत ग्रंथातील उपस्थितीच ग्रंथाला संदर्भग्रंथाचे मोल आणून देते दुसऱ्या भागात मराठी रंगभूमीच्या विकासाच्या दृष्टीने मार्गदर्शक विचार आलेले आहेत अर्थात तेही महत्वाचे आहेत परंतु, स्मृतिग्रंथाला खरे वजन आले आहे ते प्रा. श्री. ना. बनहट्टी (मराठी नाटकाची घटना १८४३–१९३०), श्री. केशवराव भोळे (मराठी संगीत नाटकाची वाटचाल), श्री. बापूराव नाईक (मराठी रंगभूमीचा तंत्रदृष्ट्या विकास) व श्री. के. नारायण काळे (मराठी रंगभूमी : १९४०–७० सिंहावलोकन आणि समालोचन) यांच्या लेखांनी. या चार लेखांच्या सलग वाचनाने १८४३ पासून १९७० पर्यंतच्या सुमारे सव्वाशे वर्षांतील मराठी रंगभूमीची बरीवाईट स्थित्यंतरे मनश्चक्षूंपुढून जातात. प्रा. श्री. ना. बनहट्टी यांचे नाव मार्मिक नाट्यसमीक्षक म्हणून सर्वज्ञातच आहे. 'मराठी रंगभूमीचा इतिहास खंड : पहिला' हा त्यांचा ग्रंथ सर्वमान्य असून विष्णुदास भावे यांच्या काळातील मराठी रंगभूमीचे स्वरूप त्यांनी अत्यंत साधार रीतीने व्यक्त केले आहे. अण्णासाहेब किर्लोस्करांपूर्वीची मराठी रंगभूमी कशी होती हे त्या ग्रंथावरून कळते. परंतु, त्याचबरोबर प्रा. बनहट्टींच्या मार्मिक लेखणीतून उतरलेला मराठी रंगभूमीचा अद्ययावत इतिहास वाचावयास मिळावा अशी हुरहूरही मनात निर्माण होते—प्रस्तुत स्मृतिग्रंथातील त्यांच्या लेखाने ती हुरहूर काही प्रमाणात कमी होते असे म्हणता येईल. साधार विवेचन व पूर्वग्रहमुक्त निरूपणपद्धती यामुळे प्रा. बनहट्टींचे सारे लेखन मोठे रोचक झाले आहे. मराठी नाटकाचे 'आकार आणि रूप' यांचे मुख्यत्वेकरून निरूपण करणे हा त्यांच्या लेखाचा उद्देश असला तरी अनुषंगाने केलेला आशयाचा विचारही या लेखातून आढळतो. विष्णुदासी पौराणिक नाटकापासून शं. प. जोशी यांच्या 'खडाष्टका'पर्यंतच्या निर्मितीचा आढावा घेऊन मराठी नाटकाच्या आकारातील फेरबदलाचे संशोधन केल्यावर प्रा. बनहट्टींनी जो इशारा दिलेला आहे, तो येथे नमूद करावासा वाटतो. त्यांच्या मते मराठी रंगभूमी हा मुळात देशी वाण आहे आणि तिचा हा देशीपणा सदैव प्रभावी राहिला आहे. मराठी नाटक हा मराठी समाजमनाचा उद्गार आहे. त्यामुळेच आमच्या नाट्यवाङ्मयाकडे परकीय सिद्धांताच्या किंवा टीकातत्त्वांच्या दुर्बिणीतून न पाहता त्याच्याकडे वस्तुनिष्ठ दृष्टीने पाहून निगम (Induction) पद्धतीने त्याची छाननी करणे हेच अधिक उपयुक्त होईल. ट्रॅजेडी आणि कॉमेडी या शब्दांनी व्यक्त होणाऱ्या वर्गीकरणाचा ते या संदर्भात उल्लेख करतात व मराठीत या प्रकारची म्हणून ओळखली जाणारी नाटके मूलतः कशी वेगळी आहेत, हे नमूद करतात. त्यांची ही भूमिका मराठी नाट्यवाङ्मयाच्या आकलनाला अधिक उपकारक ठरेल यात शंका नाही.

'मराठी संगीत नाटकाची वाटचाल' हा केशवराव भोळ्यांचा लेखही असाच उपयुक्त आहे. संगीत हे मराठी नाटकाचे आरंभापासूनच प्राणतत्त्व राहिले असले तरी अण्णासाहेब किर्लोस्करांनी संगीत नाटकाला खऱ्या अर्थाने जन्म दिला, व आरंभी नाट्याचे पोषण करणारे संगीतच त्या नाट्याला खाऊन बसले ! मराठी नाट्यवाङ्मयातील संगीताच्या या प्रभावाचे प्रभावी चित्रण भोळ्यांनी केले आहे.

स्वतः भोळे हे मराठी रंगभूमीवरील एक श्रेष्ठ संगीत दिग्दर्शक असल्याने नाट्यसंगीताच्या वाटचालीसंबंधीची त्यांची मते महत्त्वाची आहेत. नाट्यसंगीतात 'मानापमान' या नाटकाद्वारे खाडिलकरांनी क्रांती केली हे विधान त्यांना पोरकटपणाचे वाटते; संगीत रंगभूमीला अनिष्ट वळण लावणारा नट म्हणून ते बालगंधर्वाकडे अंगुलिनिर्देश करतात. ही मते कदाचित कोणाला पटणार नाहीत. पण ती यथार्थ आहेत, यात शंका नाही ! नाट्यकथानकापासून तुटलेली पदे गाण्याची संधी नाटककाराने नटाला उपलब्ध करून दिल्याने रंगभूमीला संगीतसभेचे स्वरूप आले व त्या संगीताच्या स्वरगंगेत 'नाट्य' वाहून गेले हे खोटे नाही. त्यामुळेच वरेरकर आणि खाडिलकर यांनी नको असलेल्या संगीतामुळे नाट्याची हानी केली हे केशवराव भोळे यांचे विधान आवडले नाही तरी नाकारता येत नाही. नाट्यमन्वंतर, बालमोहन इत्यादी नाट्यमंडळींचीही नाट्यसंगीताच्या दृष्टीने केलेली कामगिरी त्यांनी नमूद केल्यामुळे त्यांचा लेख अद्यावत झाला आहे. नाट्यसंगीताने 'नाट्य' डावलता कामा नये, त्याचा परिपोष होईल इतपतच त्याने हातपाय पसरावे हे त्यांचे मत कुणालाही मान्यच होईल

बापूराव नाईकांनी संस्कृत नाट्यतंत्राच्या स्वरूपापासून तर पाश्चात्य नाट्यतंत्रातील आजपर्यंतच्या अवस्थांतरांचा विचार आपल्या लेखात केला आहे. मराठी नाट्यतंत्राचे स्वरूप सांगत असताच पाश्चात्य नाट्यतंत्राच्या स्वरूपाचेही ते दर्शन घडवितात व जुनी नाटके नवीन तंत्रविषयक प्रगतीचे साह्य घेऊन सादर केल्यास कशी प्रभावी होतात तेही सांगतात. मामा वरेरकर, पु श्री. काळे, आनंदराव मेस्त्री इत्यादी मराठी रंगभूमीवर तंत्रविषयक प्रयोग करण्यात पुढाकार घेणाऱ्या मंडळींच्या कार्याचे रेखीव वर्णन या लेखातून वाचायला मिळते व पाश्चात्य रंगभूमीवर ६०–७० वर्षांपूर्वीच आविर्भूत झालेल्या फिरत्या रंगमंचाचे मराठी नाट्यक्षेत्रात नुकतेच झालेले आगमन पाहून तंत्रदृष्ट्या मराठी रंगभूमी किती मागे आहे हेही प्रत्ययास येते.

के. नारायण काळे यांनी मराठी रंगभूमीचे १९४० ते ७० या अवधीतील स्वरूपाचे सिंहावलोकन केले असून मराठी रंगभूमीच्या विकासासाठी आजवर करण्यात आलेले प्रयत्न व त्या प्रयत्नांचे फलित यांचा आढावा घेतला आहे. त्याचप्रमाणे मराठी रंगभूमीच्या हिताच्या, प्रगतीच्या दृष्टीने काय करता येण्यासारखे आहे, त्याचेही सूतोवाच केले आहे. (अनंत काणेकरांनीही अशाच एका प्रयत्नाचा उल्लेख प्रस्तुत ग्रंथाच्या पृ. १८०–८१ वर केला आहे तोही लक्षात घेण्याजोगा आहे.)

याच प्रकारचे महत्त्वपूर्ण लेख म्हणून नटवर्य कै. केशवराव दाते यांचा 'महाराष्ट्र नाटक मंडळी : एक दृष्टिक्षेप १९०७–१९२९' व अनंत काणेकरांचा 'नाट्यमन्वंतर आणि मराठी रंगभूमी' ह्या दोन लेखांचा उल्लेख करावा लागेल. महाराष्ट्र नाटक मंडळी ही एकेकाळची मातब्बर नाटक मंडळी. नाट्याचार्य खाडिलकरांच्या गद्य नाटकांतील सौंदर्य प्रभावी रीतीने जनतेपुढे उकलून दाखविले असेल तर ते ह्याच नाटकमंडळीने ! या मंडळीतील एक नट व मालक म्हणून केशवराव दाते यांना जो अनुभव आला त्याचे सुंदर वर्णन या लेखात आढळते व तत्कालीन नाटकमंडळयांच्या अंतरंगाचे बोलके दर्शन घडते. 'नाट्यमन्वंतर' हीही अशीच एक महत्त्वपूर्ण संस्था ! तिच्या स्थापनेपासून तिच्याशी संबंधित असलेल्या काणेकरांनी लिहिलेला लेखसुद्धा असाच बोलका आहे.

वरील लेखांव्यतिरिक्त वि. स. खांडेकरांचा 'उजाडले, पण सूर्य कुठे आहे ?', वा ल. कुलकर्णी यांचा 'दोन मराठी सुखात्मिका', वि. वा. शिरवाडकर यांचा 'वाङ्मय हरवले, तर सारेच हरवले !' पु. ल. देशपांडे ह्यांचा 'नट, नाटककार आणि प्रेक्षक' या लेखांचा समावेश प्रस्तुत ग्रंथात आढळतो. मराठी नाटकांनी समाजाच्या बदलत्या स्वरूपाची दखल घेऊन सामाजिक समस्यांना हात घातला, इतकेच नव्हे तर मराठी नाट्यरसिकांच्या रसिकतेला योग्य वळण लावले. मात्र आताची नाटके या उद्दिष्टापासून दूर जात आहेत अशी खंत खांडेकर प्रकट करतात. नाटक हे मुळात नाटक असते. वाङ्मयात्मक अंगामुळे नाटक समृद्ध होते '' या अंगाकडे आजकाल फारसे लक्ष दिले जात नाही अशी हळहळ शिरवाडकर व्यक्त करतात. साहित्यानुभव व रंगानुभव यांच्या अवधानातूनच खरे नाटक फुलते असे पु. ल. देशपांडे सांगतात. नाटक या प्रकाराकडे पाहण्याची दृष्टी देणारे हे लेख सर्वसामान्य रसिकांची नाट्यविषयक जाणीव समृद्ध करणारे आहेत व म्हणून महत्त्वाचे आहेत हे उघड आहे. वा. ल.

कुळकर्णींनी आपल्या लेखातून माधवराव जोशी यांच्या 'स्थानिक स्वराज्य अथवा म्युनिसिपालिटी' या नाटकाचे व आचार्य अत्र्यांच्या 'साष्टांग नमस्कार'चे सौंदर्याविष्करण घडविले आहे.

सारांश, डॉ. अ. ना. भालेराव यांच्या स्मृतिग्रंथाच्या निमित्ताने मराठी रंगभूमी व नाट्यवाङ्मय यांच्या संबंधीचा हा संदर्भग्रंथ सिद्ध केला याबद्दल संपादक मंडळाला, विशेषत: कार्यकारी संपादक श्री. वा. रा. ढवळे यांना धन्यवाद द्यावेसे वाटतात. मौज प्रिंटिंग ब्यूरोच्या देखण्या छपाईने अर्थसुंदर असलेला हा ग्रंथ रूपसुंदरही झाला आहे व शेवटी परिशिष्ट म्हणून श्री. भगवान पंडित व माधव वझे यांनी तयार केलेली नाटकांच्या प्रथम प्रयोगांची सूची (१९४३–१९७०) दिली असल्याने त्याची उपयुक्तता वाढली आहे. मुंबई मराठी साहित्य संघाने प्रस्तुत ग्रंथ प्रकाशित करून आपली साहित्यविषयक व रंगभूमीविषयक आस्था सिद्ध केली व मराठीच्या नाट्यविषयक साहित्यसंग्रहात एका मौलिक ग्रंथाची भर घातली याबद्दल मराठी वाचक संघाचे ऋणी राहतील यात शंका नाही.

* *

मराठी रंगभूमी : मराठी नाटक घटना आणि परंपरा डॉ. अमृत नारायण भालेराव स्मृति ग्रंथ; पृष्ठे ३७८ किं. ३० रु. संपादक : कै. नारायण काळे. वा. ल. कुळकर्णी, वा. रा. ढवळे (कार्यकारी संपादक)

गोतावळा

शशिकांत नारायण केळकर

गोतावळा वाचताना आपण एका वेगळ्याच जगात जातो. आतापर्यंत आपण माणसांच्या, स्त्री-पुरुषांच्या खूप गोष्टी वाचल्या. माणसांचे एकलेपण, माणसांची आत्मीयता, माणसांचे परस्परांमधील प्रेम, द्वेष, असूया, भोगलालसा, महत्त्वाकांक्षा, अशा अनेक वासना व भावना यांची गुंतवणूक असलेल्या कितीतरी चांगल्यावाईट गोष्टी आपण अनुभवल्या आणि वाचल्याहि असतील. पण गोतावळ्याचे जग माणसांचे नाही तर ते विस्तारलेल्या शेतजमिनीचे, पाण्यापावसाचे, वाऱ्यावादळाचे जग आहे. या जगात माणसांऐवजी माणसाळलेले कितीतरी प्राणी आपले मुके जीवन धीमेपणाने, अफाट सहनशीलतेने जगत असतात. शेतीचे बैल, गाई, रेडे, म्हशी, कुत्री, कोंबडे, घोडे, गाढवं, घुबडं, कावळे, वानरं, शेरड्या, रानबोके, साप, विंचू, उंदीर, कासवं, ससे, सरडे असे अनेक विविध प्राणी यात वावरतात. गोतावळा, एका कादंबरीचे कथानक म्हणून जरी बाजूला ठेवले तरी या प्राण्यांचे मुकेपण व त्यांची असहायता, त्यांची लिंगपिपासा, त्यांची जीवनासक्ती, त्यांच्या दिनचर्येची, भावभावनांची छोटीमोठी वर्णने, त्यांचा जीवनसंघर्ष वाचताना मन उत्सुकतेने शिगोशीग भरून जाते. प्राण्यांच्या भावना, वासना, आक्रोश साक्षर नसतात, आवाजरहित असतात. विशेषत: गोतावळ्यामधील माणसाळलेल्या प्राण्यांचा त्यांच्या हेतुहीन – जशी काही जन्मत:च नियतीने दिलेली सश्रम कारावासाची जन्मठेप – जीवनाचा नि:शब्द कोलाहल हृदयाचा गाभारा व्यापून टाकतो.

पण हा सगळा जीवनपट एका संदर्भरहित कथानकाच्या, चौकटीत सीमित केला आहे. एका खानदेशी वाडवडिलार्जित शेतीवर लहानपणापासून नारवा हा गडी काम करीत असतो. मोटेचं पाणी काढणे, जनावरांना पाणी देणे, जनावरांचे खाणेपिणे, हवंनको पाहणे, शेतीची निगा राखणे, पिकाची राखण करणे ही कामं तो करतो. त्याला माय–बाप, भाऊ-बहीण, घरदार – काहीच आगापिछा नसतो. तो अगदी साधासीधा – मवाळ असतो. मालकाला देव मानतो, शेतीला घर मानतो व गायीगुरे, कुत्री, कोंबड्या यांनाच आपला गोतावळा मानतो. – आणि असंच त्याला शेवटपर्यंत मानून राहावं लागतं. कारण मालक त्याचं लगीन लावून देत नाहीत, त्याची कुणा बाईशी कधी गाठ पडत नाही. शेतात तो श्रमश्रम श्रमतो, खातोपितो, भरून येतो पण मोकळं व्हायला, वाहून

जायला त्याचा मातीशी संबंधच येत नाही. मग तो झाडासारखा वठत जातो. मनातल्या मनात कुढतो. वाळलेल्या लाकडासारखे आयुष्य ढकलत राहातो.

पण तो त्याच्या भोवतालच्या गाई, बैलं, म्हशी, रेडे, कोंबडा, कुत्री या गोतावळ्यात गुंतून जातो. या प्राण्यांच्या गुलामीत, एकाकीपणात, असहायतेत तो सहवेदना शोधत रहातो व त्यांच्या सान्निध्यात, जवळीकीत रणमाण होतो. त्या जनावरांबद्दल त्याला विलक्षण माया असते. त्या शेतीबद्दल, पिकांबद्दल, त्यांतील वडा-पिंपळांच्या मोठ्या वृक्षांबद्दल त्या सर्वांवर पसरलेल्या आभाळाबद्दल, त्या साऱ्याच वातावरणाबद्दल त्याच्या हृदयात आपुलकी दाटलेली असते. नाही तरी भोवतालच्या वातावरणात गुरफटून जायची कोणत्याही निर्व्याज मनाची खूणच असते.

पण नियतीला सहसा कोणत्याही वातावरणातले स्थैर्य पाहावत नसावे. नारबाचे हे सारे जीवनसमृद्ध जग विस्कटणार असते, देशोधडीला लागणार असते. शेतमालकाला अधिक समृद्धीची, अधिक पैशांची महत्त्वाकांक्षा सुटते. त्याला शेतावर ट्रॅक्टर आणायचा असतो. कारण ट्रॅक्टर राक्षसासारखा कामं करतो. लांबरुंद शेत खोलवर नांगरत जातो, मातीची ढेकळं फोडून चुरा करतो. ट्रॅक्टर जनावरासारखा थकत नाही, म्हातारा होत नाही किंवा आजारी पडत नाही. त्याच्या पोटात पेट्रोल ओतलं म्हणजे दिवसरात्र कर्कशपणे तो काम करत राहातो. म्हणून मालकाच्या महत्त्वाकांक्षेने तारवटलेल्या डोळ्यात सारखा ट्रॅक्टर तरळत असतो.

शेवटी शेतावरची गुरं एकेक काढून टाकली जातात. गाई पांजरपोळात पाठवल्या जातात. रेडे, बैल विकल्या जातात म्हालींग्या हा शेतीचा थोरला वृद्ध बैल तर खाटकाला दिल्या जातो. शेळ्याबकऱ्या अशाच विकल्या जातात. घोडं म्हातारं होऊन आधीच मेलेलं असतं कोंबडा कापून त्याची मेजवानी होते. हळूहळू नारबाचा सारा गोतावळा उध्वस्त होतो शेतावरचा मोठा पिंपळसुद्धा तोडून तोडून नाहीसा केल्या जातो. एकेकाळी झाडंझुडपं पीकपाणी, पशुपक्षी यांच्या जीवनचैतन्याने मुसमुसणारे शेत वाळवंटासारखे उजाड भकास होते. या साऱ्या विनाशाला साक्ष असणारा नारबाही मनातून खंगत जातो. त्या गोतावळ्याशिवाय वातावरणाशिवाय तो आणखी निराधार, पोरका होतो व कष्टी मनाने शेत सोडून जातो.

'गोतावळा' वाचताना मला श्रीनिवास कुळकर्णी यांचे 'डोह' हे पुस्तक आठवले. औदुंबर या छोट्याशा गावातील निसर्गाची, पशुपक्ष्यांची प्रत्ययकारक ओळख त्यात होती. या तऱ्हेच्या ललितकृती मराठीत मोजक्याच आहेत. बहुसंख्य मराठी शहरी वाचकांना यांतून एक वेगळेच जीवनाभूतीचे दालन खुले होते.

या कादंबरीतील जीवनपटाचा एकंदर आलेख सामर्थ्यपूर्ण आहे. नारबाचा एकलेपणा, हा एकलेपणा वैश्विक संदर्भातला नाही तर साध्या लैंगिक संदर्भातला एकलेपणा, व याची माणसाळलेल्या गाईबैलांच्या गुलामी एकलेपणाशी, समांतरता मोठी शोकाशयपूर्ण आहे. स्त्रीपुरुषांचे एकएकटेपण ही साऱ्या पौर्वात्य संस्कृतीचीच एक नाजुक जागा आहे. काही वर्षांपूर्वी 'अतिथी' या गाजलेल्या बंगाली चित्रपटात एक पोरगेलासा तरुण गावोगाव एकटाच भटकत असतो हे पाहून पाश्चिमात्य देशातील प्रेक्षकांना आश्चर्य वाटत असे. त्यांच्या मते अशा मुलाबरोबर एखादी मैत्रीण ही असायलाच पाहिजे. पण हा चित्रपट पाहाताना आपल्याला मात्र ते अगदी स्वाभाविक वाटत असे. गोतावळामधील नारबाचेही एकटेपण काहीसे त्याच स्वरूपाचे आहे.

हे सारे गभीर विचार बाजूला ठेवूनही या पुस्तकात जागोजागी विखुरलेली प्राणीजीवनातील प्रसंगचित्रे व भावचित्रे मन ताजे करून सोडतात. दोन कावळे, नुकताच नाकतोडा खाल्लेल्या सरड्याला मारतात तो प्रसंग तेवढ्यापुरता अगावर काटा आणतो. नारबाने मारून टाकलेल्या कावळ्याभोवती इतर कावळे गर्दी करून शोक व्यक्त करतात, चंपी कुत्रीला इतर कुत्री मारतात, नारबा खेकडा मारून भाजून खातो, नाग्या चाण्या बैलांची गाईसाठी सुंदोपसुंदी, घोड्याचे मरण, या सगळ्या गोष्टी मन गुंतवून टाकतात. या साऱ्या लहान लहान प्रसंगांतून उभे होणारे हे शेतीजीवन व प्राणीजीवन वाचकांना एक वेगळीच सर्जनशील अनुभूती मिळवून देते. म्हणून गोतावळा हे एक वेगळे आणि चांगले पुस्तक आहे असेच म्हणावे लागेल.

* *

गोतावळा (कादंबरी); आनंद यादव;
मौज प्रकाशन गृह, खटाववाडी, मुंबई-४; पृ. १४३; किं. ७. ७५.

अजून येतो वास फुलांना

मनोहर चिंतामणि वझे

श्री. वामन इंगळे ह्यांची 'अजून येतो वास फुलांना' ही कादंबरी वाचनात आली. तिच्या संदर्भात सुचलेले काही विचार न राहवत असल्यामुळे मांडत आहे.

एखाद्या सामान्य हिंदी बोलपटात ज्याप्रमाणे निसर्गसुंदर स्थळाचा उपयोग करण्यात येतो त्याप्रमाणे ह्या कादंबरीत संगीतकला वेठीस धरलेली आहे. संगीताचे अप्रस्तुत दाखले साहित्यचर्चेत लिहिण्याची तर इंगळे ह्यांची खोड प्रसिद्धच आहे कादंबरी लेखन सुद्धा ह्या त्यांच्या पृथगात्म शैलीतून निसटलेले नाही.

दुसरी एक लकब लक्षणीय आहे. कथानकाशी किंवा स्वभावचित्रणाशी काडीचाही संबंध नसताना फ्लेमिंग, मार्क्स, डार्विन, शंकराचार्य इ. चा उल्लेख कशासाठी ? फ्लेमिंग, कोणता, ? सर अलेक्झांडर की जेम्स बाँडचे पिताजी की एखादा कृष्णगौर पाद्री ? मार्क्सचा दाखला दिल्याशिवाय तर इंगळे लिहूच शकत नाही असे वाटते. ह्यामुळे कार्ल मार्क्सला 'मार्क्स बंधू'ची विनोदी अवस्था प्राप्त होते ह्याची त्यांना अजिबात जाणीव दिसत नाही. सामान्य वाचकावर आपल्या व्यासंगाचा दबदबा पाडण्यासाठी बेगडी बहुश्रुतपणाचे दिशाहीन नाटक रंगविण्याचे हे उद्योग फार दुःखदायक आहेत. त्रिखंडातल्या दोन तीन प्रसिद्ध पुरुषांची नामावली मधून मधून आपल्या लिखाणात घुसडून आशयघनता येते अशा भाबड्या अपसमजाने तर वामनरावजी ग्रस्त नाहीत ना ? परंतु काल्पनिक व्यासंगाची आयाळ खाजवत एखादे कथाबीज हाताळणे हे फार कलाहीन असते येवढेच सुचवितो.

आता भाषाविषयक काही लिहितो. उदाहरणार्थ इंग्रजीचा वापर "चिरयो. गुड नाईट" म्हणजे चिरायु हो असा अर्थ असावा काय ? दुसरा काही ह्याहून गहन अर्थ असल्यास पांडुरंग (चुकलो ! मार्क्स) जाणे. ह्याविषयी बरेच लिहिता येईल. परंतु एका मासल्यातच सगळा मामला लक्षात येण्यास पृ. १४२ वरील देवनागरीत छापलेली इंग्रजी तार देतो.

'काम इमिजिएटली विथ द फेमस सायकोलॉजिस्ट अँड फिजिशियन डॉक्टर साधन गुप्त. डॉक्टर सरपोतदार इज सिरियस बट विदाऊट एनी प्रिसाईज डायगनोसीस अँड देअरफर मेडिकेशन. परेरा'

ही तार एका सुशिक्षित पात्राने लिहिलेली आहे. चुकीचे उच्चार आणि चुकीच्या अर्थाने वापरलेले शब्द ह्यांचा प्रकार इतका थोर आहे की तो एका स्वतंत्र लेखाचा विषय व्हावा.

हे सर्व लिहिण्यात श्री. इंगळे ह्यांचा खेदा करावा असा अजिबात हेतू नाही. परंतु 'साहित्यिक महात्मता' हस्तगत करण्याचा सगळ्यात सोपा मार्ग म्हणून कादंबरी लेखन करण्यात येते तेव्हा असे होणे टळू शकत नाही. अशा लेखनाने होणारी मराठी भाषेची पडझड मनाला उद्विग्न करते आणि हे कुकर्म फार व्यापक प्रमाणावर काही व्यक्तींनी हाती घेतलेले असल्यामुळे मराठीच्या स्वरूपाविषयी फार चिंता आणि खेद वाटतो म्हणून हे लिहिणे आले.

* *

अजून येतो वास फुलांना (कादंबरी); वामन इंगळे, नागपूर प्रकाशन, पृष्ठे : १४८; किंमत ६–५०

स्मृति

प्रभाकर चाफेकर

कै. ह. रा. महाजनी यांना न ओळखणारा असा एकही मराठी सुबुद्ध वाचक नसेल. त्यांच्याबद्दलच्या स्मृती त्यांच्या सान्निध्यात आलेल्या नामवंत व्यक्तींकडून घेऊन एक संकलित स्वरूपाचा ग्रंथ त्यांची कन्यका सौ. कमलिनी फडके यांनी कै. ह. रा. महाजनींच्या प्रथम स्मृतिदिनी प्रकाशित करून एक मोठं कार्य केलं आहे. सौ. कमलिनी फडके यांनी प्रस्तावनेत लिहिल्याप्रमाणे मोठ-मोठ्या पुढाऱ्यांची नावेही कालाच्या ओघाने नष्ट होतात पण कै. ह. रा. महाजनींसारख्या निर्भीड, आग्रही आणि मनस्वी–तपस्वी अशा श्रेष्ठ

माणसाच्या कर्तृत्वाच्या कुठे तरी खुणा मागे राहणे आवश्यक असते. समाजाला अशा एका विख्यात पत्रकार–समाज सेवकाचे विस्मरण होऊ नये म्हणून त्यांच्या बद्दलचा स्मृतिग्रंथ काढून त्यांच्या कन्यकेने नि:संशयपणे समाजहिताचेच एक मोठे कार्य केले आहे.

कारण कै. ह. रा. महाजनींचे कर्तृत्व जवळून बघणाऱ्या व्यक्तींचे त्यांच्यावरील संकलित स्वरूपाचे लेख वाचून समाजहिताचे कार्य करू इच्छिणाऱ्या प्रत्येक माणसाला बरेच काही शिकता येईल एखाद्या माणसाने वैयक्तिक सुखावर तिलांजली देऊन समाज-सेवेकरिता जिवाचे रान केले, शेवटपर्यंत आपल्या तत्त्वांशी तडजोड केली नाही, त्यागाचा कळस गाठला तरी निदान समाजाने त्याची कदर करणे आवश्यक असतेच. ज्या तत्त्वांकरिता साऱ्या जीवनाचा होम केला ती तत्त्वे जर पायदळी तुडविली जात आहेत हे बघावे लागले तर ' यासाठीच केला का हा अट्टाहास ? ' ही विषादाची भावना कै. ह. रा. महाजनींप्रमाणे त्या माणसाला कशी अस्वस्थ करते आणि ज्यांना मदत केली तेच सोईस्करपणे पाठ फिरवतात हे लक्षात आले की मनावर फार मोठा आघात कसा होतो आणि याची तयारी अगदी प्रारंभापासून मनाशी करून ठेवणे कसे आवश्यक आहे याचा महत्त्वाचा इशारा हे पुस्तक वाचल्यावर आपल्याला मिळाल्याशिवाय राहात नाही. पुस्तक वाचून सपल्यावर लक्षात कायमचे राहते ते कै. ह. रा. महाजनींचे उत्तुंग कर्तृत्व. एका संस्कृत पाठ-शाळेत जुन्या पद्धतीने शिकलेल्या कै. ह. रा. महाज-नींनी अल्पावकाशात इंग्रजीत प्राविण्य मिळवले, प्रखर बुद्धिवादाने भोंदूपणावर प्रखर हल्ला केला, समाजवादी तत्वज्ञानाचा हिरीरीने प्रचार करतानाच पुरोगामी म्हणवल्या जाणाऱ्या पण ठोकळेबाज तत्त्वज्ञानावर आणि पोथीनिष्ठ साम्यवादावर कोरडे ओढले आणि वैयक्तिकरित्या निंदा–नालस्तीमुळे स्वत:बद्दलच्या अकारण व सकारण झालेल्या प्रचाराने ते विचलित झाले नाहीत शेवटपर्यंत पटेल तेच सांगेन, या तत्त्वाशी ते इमानदार राहिले. बोलके सुधारक न बनता त्यांनी स्वत: विधवेशी विवाह केला. स्वत:च्या घरी आंतरजातीय विवाहांना प्रोत्साहन देऊन एक आदर्श उभा केला. संपूर्ण पुस्तक वाचल्यावर त्यांच्या व्यक्तिमत्वातील ज्यांना human weaknesses म्हणता येतील ते लक्षात न राहता आपले मस्तक या वादळी थोर व्यक्तिमत्व:पुढे विनम्र होतें.

कै. ह. रा. महाजनींवर स्मृतिलेख लिहिणाऱ्या श्री. नरूभाऊ लिमये, श्री. विद्याधर गोखले, श्री. गोविंद तळवलकर, श्री. ग. त्र्यं. माडखोलकर, श्री. जयंत साळगावकर श्री. रमेश मंत्री, श्री. वसंतराव गात आदि साऱ्याच लेखकांचे लेख फार चांगले असून शेवटचा सौ कमलिनी फडके यांचा स्वत:च्या पित्या-वरील लेख देखील फार हृदयंगम आहे कै. ह. रा. महाजनींच्या व्यक्तिमत्वाचे विविध पैलू दाखवणारे हे सारे लेख कै. महाजनींचा श्रेष्ठपणा दाखवतातच; पण व्यक्ती म्हणून त्यांच्यात दिसलेल्या अनाकलनीय विरोधाभास व्यक्त करणाऱ्या स्वभावदोषांमुळे कै. महाजनींची आंधळेपणाने तारीफ करणारेच ते ठरत नाहीत; उलट त्यांचे व्यक्तिरेखाटण अतिशय वास्तव आणि चटका लावणारे ठरते.

लोकसत्ताकार म्हणून कै. ह. रा. महाजनींची ख्याती. ज्या काळी अखिल महाराष्ट्राच्या स्वरूपाचे एकही मोठे प्रसिद्ध दैनिक नव्हते तेव्हा "लोकसत्ता" हे दैनिक संपादित करताना कै. महाजनींनी किती कौशल्य दाखवले, किती काळजी घेतली ते वाचताना त्यांच्याबद्दलचा आदर दुणावतो. लोकसत्तेत नोकरी करताना त्या भूमिकेवरून त्यांनी भाडोत्री स्वरूपाचे संपादन केले नाही तर लोकसत्ता लोकप्रिय करण्याकरिता आपले सर्वस्व त्या कार्याच्या पणाला लावले. विशेषत: लोकसत्तेची साप्ताहिक आवृत्ती जास्तीत जास्त लोकप्रिय करण्याकरता त्यात लोकांना न समजणारा साहित्य–विलास वा विद्वज्जडता येऊ दिली नाही तर लोकशाहीचे हे व्यासपीठ आहे हेच लक्षात ठेवून समाजाशी संबंधित अशा साऱ्या समस्यांना आणि प्रश्नांना स्थान देण्याचा व रंजक व्यवहारोपयोगी माहिती देण्याचा त्यांनी प्रयत्न केला वेळ आली तेव्हा गीतारहस्यातली त्रुटी दाखवणाऱ्या आचार्य भाग-वतांचाही खरपूस समाचार त्यांनी घेतला तर स्वत:ला बडे गुलाम अलीखाँसाहेबांचे शास्त्रीय गायन आवडत असताना "संशयकल्लोळ" नाटकात त्यांचा दीड तासांचा जलसा ठेवण्याच्या गल्लाभरू अनिष्ट पद्धतीवर 'रेवतीच्या महाली बडे गुलाम अली ! ' हा अग्रलेखही लिहिला ! शिवसेनेला निर्भयतेने त्यांनी पाठिंबा या वृत्तपत्रातून दिला. कलावंतांना पुढे आणण्याच्या तळमळीने 'रूपायतन' या संस्थेचा पानभर परिचयही करून दिला, "रविवारची चिंतनिका" या मथळचा-खाली अनेक विचारप्रवर्तक लेख लिहिले. आणि असे

लिहिताना सामान्यजनांच्या भावनांना उल्हसित करणारा लेखन–विलास केला पण निश्चित विचाराशिवाय शैली रावबली नाही. अशा या मोलाच्या कार्यानंतर राजकारणामुळे त्यांना निवृत्त व्हावे लागले. फार काय नंतर इतरत्र ते लिखाण करत असताना त्याच लोकसत्तेने पुन्हा त्यांचे लिखाण मागवले नाही हे वाचल्यावर आपले मन विषण्ण होते.

पत्रकारितेशिवायही त्यांचे व्यक्तित्व फार विलोभनीय होते. रॉयिस्ट पक्षाच्या प्रचाराकरता आर्थिक अडचणींकडे लक्ष न देता त्यांनी आपल्या आयुष्याचे बरेच दिवस खर्च केले.

न्याय, मीमांसा, वेदांत आणि पाश्चात्य विचारांच्या अभ्यासानंतर ते तर्ककर्कश विद्वज्जड राहिले नाहीत. तर त्यांच्या व्यक्तिमत्वाला रसिकतेच्या सौंदर्याची झळाळी होती. पानतंबाखूचा रसिकतेनं बार भरणाऱ्या आणि रस्त्याकाठच्या लहान दुकानातल्या चहाचा आस्वाद घेणाऱ्या या मोठ्या माणसाची मैफलप्रियता विलक्षण होती आणि विविध क्षेत्रातल्या कै. आचार्य अत्रे किंवा नामवंत साहित्यिक श्री. ना. सी. फडके, साहित्यसंघाचे श्री. भार्गवराम पांगे यांच्यापासून तो माननीय यशवंतराव चव्हाण आणि नामदार बाळासाहेब देसाई पर्यंतच्या विविधरंगी व्यक्तिमत्वांच्या मैफिलीत ते संचार करीत. संगीत हा तर त्यांचा खास आवडीचाच विषय. संगीतावर वामनराव सडोलीकरांच्या प्रात्यक्षिकांच्या मदतीने त्यांनी अभ्यासपूर्ण आणि रंजक व्याख्याने दिली. प्रसिद्ध गायिका केसरबाई केरकर यांचे त्यांना चरित्रलेखन करायचे होते. सर्व उत्तम विषयांत त्यांना रस होता. ख्याल गायनापासून लावणी गायनापर्यंत साऱ्या प्रकारच्या दिलरंजन करणाऱ्या संगीतप्रकारांत त्यांना आवड होती. ते रंगभूमीपासून राजकारणापर्यंत आणि शांकरभाष्यापासून शृंगारापर्यंत कोणत्याही विषयावर चौफेर विद्वत्तेने उत्तम वक्तृत्व करू शकत.

अशा विलक्षण बुद्धिमत्तेच्या बहुश्रुत, धारदार लेखनशैलीच्या अविश्रांत परिश्रमी माणसाला आर्थिक दृष्ट्या संपन्नता प्रारंभी नसल्याने जे काही सहन करावे लागले त्यामुळे त्यांच्या जीवनात किंचित कडवटपणा आला होता. "दरिद्री माणसाने केलेल्या त्यागाला आणि तपस्येला काही किंमत नसते" असे त्यांचे मत होते आणि हा दारिद्र्याचा अनुभव आपल्या मुलांना तरी येऊ नये असे त्यांना उत्कटपणे वाटे आणि या उत्कट इच्छेपायी कधीकधी ते हास्यास्पद काटकसर करीत. हे वाचताना गंमत वाटते. होते तसे महाजनींचे व्यक्तिचित्रण त्यांच्या निकटवर्तीय मित्रांनी रेखाटल्यामुळे त्यांच्या मनातील संशय, संभ्रम, फलज्योतिषशास्त्र न मानताही त्यांनी दर्शविलेले ग्रहमान, त्यांचे टोकाचे रागलोभ, त्यांचा हळवा भावनाविवश स्वभाव या साऱ्या उल्लेखांमुळे त्यांच्या व्यक्तिमत्वाबद्दल कुठेही अनादर निर्माण न होता त्यांच्या निष्ठा, त्याग आणि मानवसुलभ अशा काही त्रुटिंमुळे उलट उठावदार व्यक्तिचित्रण झालेले हे संकलनात्मक पुस्तक फार परिणामकारक ठरते.

याच स्मृतिग्रंथात कै. ह. रा. महाजनींचे काही प्रसिद्ध निवडक लेखन घेण्यात संपादिकेने औचित्य दाखवले आहे. मात्र कै. ह. रा. महाजनींचा संपूर्ण जीवनपट थोडक्यात दिला गेला असता तर फारच छान झाले असते.

*

'स्मृति' संपादिका – सौ. कमलिनी फडके, सी ४४/४०२, गांधीनगर, वान्द्रा (मुंबई ५१), मूल्य ५ रुपये.

टिपणे

मनोहर चिंतामणि वझे

स्पॅनिश कवितांचा अनुवाद

स्पॅनिश कवितांचे मराठी अनुवाद करताना आलेला अनुभव आणि सुचलेले विचार मांडत आहे. हे अनुवाद, मला उपलब्ध झालेल्या इंग्रजी गद्य भाषांतरांचे अनेक वेळा वाचन आणि मनन केल्यानंतर, करण्यास घेतले.

प्रथमत: स्वत:ची काव्यविषयक आवडनिवड, मते, पूर्वग्रह इ. शक्य तितके दूर सारून वाचन केले. तेव्हा मला दृक्संवेदना प्रकर्षाने जाणवल्या. इतर संवेदना दृक्संवेदनेच्या तुलनेत क्षीण वाटल्या. कदाचित ही माझी वैयक्तिक प्रतिक्रिया असेल.

नेरूदाच्या दोन कविता—' Ercilla ' आणि ' Horseman in the rain '—ह्या संदर्भात अनुभव असा आहे. जटिल बिंबयोजनेत गुंफलेल्या प्रतिमांच्या लखलखाटाचे दर्शन झाले. प्रत्येक वाचनात हा अनुभव गडद होत गेला. दृक्संवेदना गहिरी होत गेली. प्रतिमा उकलून पाहाण्याचा प्रयत्न होत आहे असे वाटले. प्रतिमांच्या परस्परसंबंधाचे धागे दिसू लागले. आकृती अंधुक नंतर स्पष्ट होत गेली. नेरूदाच्या अतिवास्तववादी प्रभुत्वाची हाक, इंग्रजी भाषेपलिकडून ऐकू आली; नव्हे पाहिली. अनुवादास सुरुवात केली. भावानुभव मराठीत आणत असताना आशयानुवर्ती राहाण्याचा कसोशीने प्रयत्न केला. तथाकथित काव्यात्म भाषेचा मोह टाळला. अर्थातच इंग्रजी संहितेचे आशयविश्व अबाधित ठेवण्याचा प्रयत्न करूनही माझ्या कोनातून होणारे आकृतीदर्शन अनुवादात बऱ्याच अंशी उतरेल हे उघडच आहे. अनुवादकाचा दृष्टिकोन हा त्याचा कार्यात्मिक परीघ असतो; आणि हीच त्याची मर्यादाही असते हे प्रत्ययास आले. माझा भाषिक समज, मनोरचना, संस्कारामूर्त काही अंशी अनुवादात उमटणे अपरिहार्य होते. मुख्यत: नेरूदाच्या कवितांचा आशयात्मक भावानुभव काही प्रमाणात स्वभाषेत संक्रात झाला असे मनोमन वाटले. आकृतीचा ठसा फिका राहिला. ' पावसातील घोडेस्वार ' ही कविता वाचताना आणि अनुवाद करताना–कवी एका निर्जन घनदाट अरण्यात संपूर्ण अंधारात वादळी पावसात दूरवर घोड्यांच्या टापांचा आवाज ऐकतो आणि अनामिक जगड्व्याळ भीतीने घेरल्या जातो ह्या अनुभवाचे समर्थ चित्रण आहे ह्याची जाणीव असूनही हा भावानुभव माझ्यासाठी मुख्यत: दृक्संवेदनेच्या रूपात आला हे नमूद करावेसे वाटते. हा भावानुभव मराठी वाचकांपर्यंत रुजू करण्याचे काम कितपत यशस्वी झाले आहे हे त्यांनीच ठरवावे.

ह्या संदर्भात लोर्काच्या कवितेचा — ' सांडयोद्धयाच्या मरणाचा शोक ' — ह्या अनुवादाचा अनुभव वेगळा असल्यामुळे तो नमूद करण्याचा प्रयत्न करतो. एक अतिशय गंभीर, संवेदनक्षम, निरीश्वरवादी प्रतिभावंताला आलेला शोकाचा भव्य अनुभव अत्यंत प्रत्ययकारी पातळीवर काव्यरूपात मूळसंहितेत अवतरला आहे. संचित, पुनर्जन्म, ईश्वर, स्वर्ग इ. इ. मनास समजाविणाऱ्या आणि शोकाची तीव्रता कमी करण्यास उपयोगी पडणाऱ्या

संकल्पना उराशी न घेता, कवी कडेलोट दुःखाला सामोरा गेलेला आहे. त्याने मृत्यूचे विराट मुख पाहिले आहे. निखळ शोकाने फुटत असलेल्या उरात श्वास कोंडून, पापणीसुद्धा न लावता, लोर्का मुखर झालेला आहे. या कवितेने मला अक्षरशः रक्तबंबाळ केले. त्या निकराच्या अवस्थेत मी झपाटल्यासारखा होऊन हा अनुवाद केलेला आहे. कणाक्षणात मोडत, घडत, मृत्यूच्या रक्ताने भिजलेल्या पंज्याखाली, पापाणांवरून ठेचाळत, जणू मीच लिहित आहे असे वाटले. जाणीवपूर्वक कोणत्याही आशयविचाराचे, आकृतीविचाराचे, शब्दकळेचे, वंदिशीचे तरंग उगवले नाहीत. जितक्या जीवघेण्या सहजतेने कविता क्वचित येते तितक्या सहजतेने हा अनुवाद घडलेला आहे. हा अनुभव मला फार मौलिक वाटतो. स्वतःची कविता लिहित असतानासुद्धा इतकी दाहक तंद्री मी अजूनपर्यंत तरी भोगलेली नाही.

कवितेच्या अनुवादकाने साधारणतः अनुवाद स्वभाषेत करावे असा एक अत्यंत योग्य संकेत आहे. परभाषेचे आपले ज्ञान, आपला समज हा मुख्यतः तार्किक आणि वाच्यार्थप्रधान असतो. अनुवाद करताना स्वभाषेच्या नसानसात सामावलेले सामर्थ्य जितके उपयोगी पडते तितके परकीय भाषेचे सामर्थ्य उपलब्ध नसते. स्वभाषेचे संस्कारसंचित हे किती मौलिक आणि संपन्न आहे ही गोष्ट अनुवादकाच्या व्यक्तिमत्त्वावर अवलंबून आहे.

शेवटी ह्या संदर्भात सुचलेला एक मुद्दा मांडतो. अनुवाद नव्हे 'अपभ्रंश' अशी एक कल्पना मांडण्यात आलेली आहे. मूळ कवितेचा आकृतीबंध, आशयविश्व, एकंदर भावानुभव हा कधीच पूर्णतः अनुवादात येऊ शकत नाही हे खरे. परंतु अनुवादक हा मूळ कवितेचा भावानुभव आत्मसात करून, त्यास स्वतःच्या व्यक्तिमत्वाच्या मुशीत ओतून, स्वभाषेत मूर्त करताना (स्वतःची व स्वभाषेची मर्यादा विचारात घेऊन) जी प्रक्रिया होते ती मुख्यतः सर्जनात्मक असते. म्हणून काव्याचा चांगला अनुवाद (परप्रकाशित असूनही) प्रतिभावान अनुवादकाची सर्जनात्मक पुर्ननिमिती आहे असे म्हणावेसे वाटते.

* *

यशवंत मनोहर

ज्वाला आणि फुले

महाराष्ट्राच्या अनेक वर्षांच्या पुण्याईचा पुरावा म्हणजे बाबा आमटे यांचे व्यक्तिमत्व. पतितांच्या अनेक शतकांच्या वाटेवरील अंधारवनातून अक्षय सूर्यमंडळ मांडून देण्याच्या प्रतिज्ञेने बाबा आमटयांचे जीवन खऱ्या संतत्वाचा आशय व्यक्त करीत निघालेले आहे.

संतत्व ही पदवी पूर्णार्थाने सार्थ करणाऱ्या व्यक्ती महाराष्ट्राच्या इतिहासात विरळा आहेत, सूर्यबिंब पाठीपोटी प्रकाशमानच असते. ते कुणीही, कुठूनही पाहावे विशुद्ध प्रकाशप्रतिती सारखीच घडणार. असे सूर्यपूर्ण संतत्व महाराष्ट्रात अपवादानेच दिसते.

ज्या परंपरा काहींना सावत्र लेखतात त्यांपैकीच एखाद्या परंपरेची पालखी वाहणाऱ्या व्यक्तीला संत म्हणणे मला नामंजूर आहे. आणि महाराष्ट्रात अशा व्यतींनाच संत म्हणावयाचा प्रघात आहे.

अध्यात्म्याची डिटेक्टिव्ह कादंबरी मला मान्य नाही. काहींनी अत्यंत विचारपूर्वक घेतलेल्या पवित्र्यांची बेरीज म्हणजे अध्यात्म होय. शिवाय ऐहिकाच्या सर्वच प्रश्नांच्या वणव्यापासून दूर पळणारी आणि अस्तित्वहीनाच्या अस्तित्वाचे ग्रंथ लिहिणारी व्यक्ती मला निरुपयोगी वाटते.

बाबा आमटे अशा व्यक्तींच्या वाटा नाकारतात ही बाब आमटयांची पृथगात्मता सिद्ध करते. त्या पृथगात्मतेमुळेच आत्मतृप्तीत जे हजारो वर्षे रमू शकले त्या महात्म्यांना जहरी उपहासाने वंदन करण्याची

ताकद त्यांना मिळू शकली. पुष्कळांनी आजवर पुष्कळ तऱ्हांनी शब्द राबविले पण 'श्रमसरितेच्या तीरावर आपल्या गीतांचे कलश भरल्यासाठी कोणीच कसे आले नाही ?' या येथील परंपरांनी अस्पृश्य मानलेल्या प्रश्नापासूनच बाबा आमटयांच्या कार्याला आणि चिंतनाला प्रारंभ होतो.

बाबा आमटे लौकिकातीलच कुजकेपणावर, विकृतीवर भाजून निघण्याची तमा न बाळगता बोट ठेवतात. लौकिकातीलच महारोगी प्रदेशाच्या उद्धारासाठी तुम्हाआम्हाला शब्दांपलिकडे न परवडणाऱ्या वाटांचे होऊन जातात.

परवा बाबा आमटयांच्या जीवघेण्या आजाराविषयी वाचले. डोळयांपुढील अवकाशाची उदास संध्याकाळ झाली. अशुभाच्या सावल्या मनावर कोसळतच राहिल्या. आणि 'ज्वाला आणि फुले' ह्या बाबा आमटयांच्या पुस्तकाची आठवण झाली. आणि वाटले--

'ज्वाला आणि फुले' मधील लेखन हौशी लेखकाचे नव्हे, इतरांना फुले मिळावीत म्हणून ज्याने ज्वाला रिचविल्या, काटे गाडण्यासाठी स्वतःच्या जीवनाचा खंदक केला आणि इतरांच्या ताटातील अंधाराशी वैर मांडून स्वतः वेदनेच्या गावात घर बांधले त्या कळवळणाऱ्या करुणावंताचे हे लेखन आहे; चिंतन आहे.

जीवनात जे केले, जपले, जीवनात ज्याने मन फाटले आणि एका मृत्युंजय जिद्दीत जे वडावे असे वाटले त्याचे 'ज्वाला आणि फुले' हे शब्दरूप आहे. 'ज्वाला आणि फुले' हे बाबा आमटयांच्या मनातील 'मनुष्यमनाचे' चोवीस परिच्छेदांचे एक प्रकरण आहे.

मराठीत कवितेच्या नावाखाली आज विपुल लेखन होत आहे. ते वाचायचे कशासाठी हा प्रश्न मला नेहमीच उत्कटतेने पडत आलेला आहे. विशुद्ध भावकवित्वाची कळा प्राप्त व्हावी म्हणून हट्ट धरून बसलेले ते लेखन खोटे वाटते. प्रामाणिकपणाचा आणि ह्या लेखनाचा काही संबंध आहे असे वाटत नाही. लेखनाला ज्यामुळे बोलता येते अशा जिव्हा मी आजच्या लेखनात शोधतो. बहुतांश लेखनात मला त्या दिसतच नाहीत. लोकशाहीचा आणि समाजवादाचा जे आवाज उठवतात त्यांचे लेखन पुस्तकीकल्पनांनी सजवलेले आणि वाऱ्याची दिशा प्रमाण मानणारे वाटते. उदा. करंदीकर, कांत, वसंत डहाके यांचे संबंधीत लेखन आणि समाज समाज म्हणून आरोळया ठोकणारे चिकार चळवळवादी कवींचे लेखन. बाबा आमटयांचे लेखन मात्र समाजातील प्रत्येकच घटकाच्या पावनत्वाच्या, अर्थपूर्णत्वाच्या उगमाचा हट्ट घेऊन समाजवास्तवात न्हावून निघालेले लेखन आहे. म्हणूनच ह्या लेखनाला भेदकता प्राप्त होते.

शिवाय 'ज्वाला आणि फुले' मधील लेखनाने विशुद्ध भावकवित्वाची कळा प्राप्त व्हावी म्हणून कुठलाही हट्ट घेतलेला नाही. त्यासाठी ते अडूनही बसले नाही. त्याने तशी प्रतिज्ञाही जाहीर केली नाही. तरी 'ज्वाला आणि फुले' मधील लेखनातून एक सच्ची तळमळ सतत नांदताना दिसते. बाबा आमटयांचे उकळणारे अंतःकरण ह्या चिंतनातून सारखे फिरत आहे. खोटेपणा, अप्रामाणिकपणा आणि संबंधित रंगरंगोटी ही इतरत्र प्रतिष्ठित असलेली दैवते बाबांच्या व्यक्तित्वाशी कुठलेही नाते सांगू शकत नाहीत. बाबा आमटयांनी आपल्या चिंतनाला अपर्यायी प्रामाणिकतेचे तन, मन, धन वहाल केले आहे. ह्या चिंतनाला कदाचित विशुद्धभावकवितेची कळा लाभणार नाही. पण मराठीतल्या उदंड लेखनाला लागू होणारा 'मोले घातले रडाया' हा आरोप मात्र 'ज्वाला आणि फुले' च्या संदर्भात लागू पडण्याची कुठलीही सोय उपलब्ध नाही.

बाबांची जगण्याची प्रक्रिया हीच लेखनाची प्रक्रिया आहे. त्यांच्या जीवनातील व्रतांमधलाच लेखन हा एक विधी आहे.

प्रचलित अर्थाचा अलौकिक वगैरे आनंद देण्यासाठी हे लेखन नाही. दोन घटका मनोरंजन वा विरंगुळा ह्यासाठीही ते नाही. वाचकाच्या व्यक्तित्वाचा रूपपालट करू शकतील अशा प्रतिज्ञा या लेखनात ठाईठाई विखुरलेल्या आहेत. एका आत्ममग्नतेतून परंपराग्रस्तांनी ज्यांना जीवनाच्याच सनदा नाकारल्या त्यांच्या रक्ताने भळभळणाऱ्या आणि लक्तरांच्या जगात उभे राहून इथल्या परंपरांची, समाजव्यवस्थेचीच भेदक समीक्षा करणारे हे लेखन आहे. वाचकाला हे लेखन करपट आनंदाची भिक्षा घालणार नाही, मानवत्वाच्या प्रतिष्ठेची दीक्षा देईल.

अनुक्रमणिका

वाचकाच्या मनात हे लेखन अनंत अस्वस्थ दिवे पेटवून देईल. मनाच्या पूर्वव्यवस्थेलाच अविश्वासात उभे करून ठेवील. 'ज्वाला आणि फुले'मधील लेखनात याप्रमाणे तनामनाचे तळ ढवळून काढण्याची ताकद निश्चित आहे. आजच्या मराठीतील बहुसंख्य लेखनाप्रमाणे हे लेखन वांझ नाही. ते थेट वाचकाचीही समीक्षा करते. वाचकांच्या अप्रस्तुत श्रद्धानिष्ठांवरती सरळ मोर्चा नेते. वाचकाला अस्वस्थ, अंतर्मुख करते. वाचकाच्या मनात होणाऱ्या ह्या प्रक्रियेचे नाव दुसरे तिसरे काहीही नसून प्रतीती हेच आहे. वर्गीकरणवादी समीक्षेला. व्याख्यावेल्हाळ अभ्यासकांना 'ज्वाला आणि फुले' वर्गीकरण–व्याख्यांना चकवून आपली साहित्यातली जागा विचारीत आहे.

घाटाचे, तंत्राचे कौतुक करण्यासाठीही 'ज्वाला आणि फुले'चा अवतार नाही. बाबा आमटोंच्या मनोविश्वाचे श्री. रमेश गुप्ता यांनी शब्दांकन केले. ही प्रक्रियाच असे सांगते की तंत्राचा, घाटाचा विचार या लेखनाच्या संदर्भात अत्यंत बिनमहत्त्वाचा आहे. ह्या पुस्तकातील घाटा–बंधाची चर्चा करणे म्हणूनच मला अप्रस्तुत वाटते. हे लेखन मनाला प्रचंड भिडते ही बाब मला मोलाची वाटते. हे लेखन भिडते ते तंत्राच्या, घाटाच्या ठरीव कल्पनांना झुगारून देऊन. म्हणूनच प्रश्न पडतो की, हा सकलांच्या अस्तित्वांना अर्थ यावा म्हणून तळमळणारे मन शब्दांच्या स्वाधीन करणाऱ्या बाबा आमटोंचा विजय की तंत्र, घाट, वर्गवारी व व्याख्यांनी मुक्या झालेल्या येथील बांधील समीक्षेचा हा पराभव ?

आणखी थोडे. ज्ञानेश्वरीतील लेखन ललित जरूर आहे. पण त्याला विशुद्ध भावकविता म्हणता येत नाही. कुणी कितीही मल्लीनाथी केली तरी 'एका कवीने केले तत्त्वनिरूपण' यापेक्षा अधिक किंमत ज्ञानेश्वरीतील लालित्याला देता येत नाही. आणि वेगवेगळ्या कारणांसाठी ज्ञानेश्वरी आजही वाचली जातेच. ज्ञानेश्वरी-प्रमाणेच 'ज्वाला आणि फुले'मध्येही वैचारिकता आहेच. शिवाय ह्या वैचारिकतेला लालित्याचीही कमीअधिक जोड मिळतेच. ज्ञानेश्वरीतील विचारविश्व लालित्याने भारावलेले असले तरी ते विचारविश्व कालबाह्य आहे. (कारण आजच्या अपेक्षेने ज्ञानेश्वरांकडे पाहू नये. त्यांच्यावर टीका करू नये. त्यांचा काळही लक्षात घ्यावा असे म्हटले जाते.) 'ज्वाला आणि फुले'तील चिंतन ललितही आहे आणि माणुसकीच्या अपर्यायी आणि सर्वांगीण गौरवासाठी प्रतिज्ञाबद्ध झालेले आहे... (हा माणुसकीच्या गौरवाचा आकांत, प्रतिज्ञा कधीतरी कालबाह्य ठरतील काय ?) शिवाय बाबा आमटोंच्या पोटतिडिकेलाही कुठे नाव ठेवता येत नाही. तेव्हा साहजिकच ज्ञानेश्वरी की ज्वाला आणि फुले ? या प्रश्नाच्या उत्तरावरून मराठी मनातील हेतूंचा मागोवा घेता येईल. मराठी मनाची तयारी तपासता येईल. ते कुठल्या शतकात असू इच्छिते हेही एकदा पाहाता येईल...पण हा विषय मी इथे सोडून देतो. त्याचा सविस्तरपणे विचार व्हावा असा तो विषय आहे. असो.

तर बाबा आमटे नावाच्या एका खऱ्या माणसाने 'ज्वाला आणि फुले'मधील चिंतनाच्या रूपाने माणुसकी-साठी केलेला आकांत ऐकून निदान तरुण मनांची व्यवस्था अस्वस्थ झाली नाही तर मग आम्हा सर्वांच्याच जिवंतपणाबद्दल कुणीही शंका घ्यायला हरकत नाही.

'ज्वाला आणि फुले'ची ही प्रकृती; अस्तित्वाच्या ग्रंथी व्यापून टाकण्याची ताकद लक्षात घेतल्यावर 'ज्वाला आणि फुले'तील लेखनाला कुठल्या काव्यप्रकारात बसवावे या प्रश्नाची तर्कटी चर्चा करणाऱ्या हटवादी समीक्षकाची पुस्तकीयताही लक्षात यावी. साहित्यशास्त्रीय तत्वचर्चेचा घोळ घालून मुद्द्याला बगल देण्याची परंपराप्राप्त हुशारीही स्पष्ट व्हावी...

'ज्वाला आणि फुले'संबंधी जे वाटले ते लिहून काढले. प्रामाणिकपणे लिहून काढले...

'ज्वाला आणि फुले'चा कर्ता; आमच्यातला खराच संत आणि माणूस, खराच महात्मा आणि कर्मयोगी, मृत्यूशी निकराची झुंज देण्यात गुंतलेला आहे. अशुभाच्या सावल्या मनावर सांडत असतानाही वाटते, त्याने ती लढाई जिंकून यशस्वी परत यावे. मनुष्यायनाची बरीच अवघड प्रकरणे लिहून व्हायची आहेत...

* *

अनुक्रमणिका

वसंत वऱ्हाडपांडे

' गाडी ' या शब्दाचे मूळ

बैलगाडी, घोडागाडी यासारख्या मराठी शब्दांतील ' गाडी 'चे मूळ कोणते ? कै. प्रा. कृ. पां. कुलकर्णी यांच्या व्युत्पत्तिकोशात सं. गंत्री–का (?); प्रा. गंत्तिआ, गड्डिआ; देप्रा. गड्डी अशी नोंद या संदर्भात आढळते. हिन्दी साहित्य सम्मेलन, प्रयाग या संस्थेने प्रकाशित केलेल्या रामचन्द्र वर्मा संपादित मानक हिन्दी कोशात (दुसरा खण्ड) प्रा. गत्तिआ, गड्डआ अशी रूपे दिली असून पंजाबीत गड्. गड्डी, सिंधीत गाडो, गुजराथीत गाडी या रूपात हा शब्द आढळतो. प्रा. कुलकर्णींनी देप्रा. गड्डी गन्त्री हा देशी शब्दच मूळ असून तो ' गम् ' धातूशी संबद्ध असावा असे हेमचंद्राच्या देशीनाममालेचा हवाला देऊन म्हटले आहे.

या शब्दाचे मूळ देशी भाषेत आहे यात शंकाच नाही, पण ते मूळ ' गड्डी ' हे नव्हे. देशी प्राकृतातील ' गड्डी ' हा शब्दच मुळात साधित शब्द असावा व मूळ ' मृत्तिका ' वाचक ' गड ' या रूपापासून तो बनला असावा असे मला वाटते. या विधानाच्या स्पष्टीकरणासाठी मराठीतील पुढील शब्द पाहण्यासारखे आहेत. उदा० गड, गढी, गढ्ढा (खड्डा), गाडणे, गांडूळ, गाडगे इ०

या शब्दांचे निरीक्षण केल्यास हे सारे शब्द ' माती 'शी निगडित अशा वस्तूंचा निर्देश करतात असे दिसून येईल. गड म्हणजे किल्ला. गढी म्हणजे मातीचा किल्ला, पण गडाहून आकाराने बराच लहान असा. गढ्ढा म्हणजे जमिनीत केलेला खळगा, गाडणे म्हणजे जमिनीत खोल पुरणे. गांडूळ (नागपुरीत गेंढूर्) म्हणजे जमिनीतील कृमी. याखेरीज नागपुरीत येणारा ' गाडन् ' हा शब्द चिखल ह्या अर्थी येतो. पावसाळ्यात नरम जमिनीत पाय ' गड 'तात. ' गाडगे ' म्हणजे मातीचे लहान मडके. नागपुरी मराठीत घट्ट या अर्थी ' गाढा ' हा शब्द येतो. मराठीतील ' गाळ ' व हिंदी–मराठीत ' भिंतीसाठी तयार केलेली चिखलमाती ' या अर्थी येणारा ' गारा ' हा शब्दही लक्षात घेण्याजोगा आहे व त्याचा संबंध संस्कृतातील ' गाधा ' (=दलदल) या शब्दाशी आहे. संस्कृत ' गाध ' म्हणजे पाण्याखालचा जमिनीचा तळ, ' गढ़ूळ ' म्हणजेही मातीने युक्त असे. (अरबीतील ' गार् ' या शब्दाचा अर्थ जमिनीचा तळ; खड्डा असाच आहे.) हिंदीतील ' गाद ' व नागपुरीतील ' गदाडा ' या घाण, कचरा या अर्थाच्या शब्दांतही ' माती 'चा संपर्क आढळून येतो.

वरील स्पष्टीकरणावरून असे दिसून येईल की उपरोक्त सर्व शब्द ' माती 'शी निगडित असून ' गड् ' हे शब्दरूप सर्वत्र आढळणारे आहे. अर्थात, ' गड ' या शब्दरूपाचा अर्थ माती असा असून मातीवरून चालणारे वाहन या अर्थाने ' गाडी ' हा शब्द वरील शब्दरूपांपासून निष्पन्न झाला.

वरील स्पष्टीकरण लक्षात घेतल्यास ' गाढव ' हा शब्द साक्षात संस्कृत ' गर्दभ ' पासून व्युत्पन्न झाला असे म्हणता येणार नाही, हेही मान्य होईल. मातीत लोळणे हे ' गाढवा 'चे वैशिष्ट्य लक्षात घेतले तर या शब्दातील ' गाढ ' हा अंश मातीवाचक असावा व प्राकृत ' गड्डह ' हे त्याचे मूळ रूप असावे असा तर्क करता येतो. (कदाचित ' गर्दभ ' हेच शब्दरूप गर्त+आभ–मातीसारखा वर्ण असलेला–यांच्या द्वारे बनलेले असावे.) ' गर्त ' हा संस्कृत शब्द ' दरी ' या अर्थाने सर्वपरिचित असून खोल भूविवर या अर्थाने ' माती ' शी निगडित आहे. ' गाडणे ' या शब्दाची व्युत्पत्ती देतानाही प्रा. कुलकर्णी ' गर्ता ' हाच शब्द देतात.

' गड ' हा मूळ माती 'वाचक धातू. यामुळेच गडवा हा शब्द सं. ' घट ' पासून वा प्रा. कुलकर्णी नमूद करतात त्या सं ' गड्डुकः ' पासून व्युत्पन्न झाला असे न म्हणता (स्वतः प्रा. कुलकर्णीही ' गड्डुकः ' हे उत्तरकालीन संस्कृतीकरण हे असे स्पष्टच म्हणतात.) मूळ ' गड ' या धातूपासूनच निष्पन्न झाले असे म्हणता येते. कानडी ' गडू ' व देशीप्राकृत गड्डूअ ही या मूळ ' गड'चीच रूपे होत.

'गड' हा मातीवाचक धातू असून 'गाडी' (वा 'गाडा' हा मातीवरून धावणारे...जाणारे वाहन या अर्थाचा 'गड' धातूपासून बनलेला शब्द होय. व्युत्पत्तिशास्त्रात तर्काला बराच वाव असतो; अभ्यासकांनी माझा हा तर्कही विचारात घ्यावा अशी विनंती आहे.

* *

सुरेश म० डोळके

नरींद्र' रूक्मिणीस्वयंवराची ओवीसंख्या

'नरींद्र'विरचित 'ऋक्मिणीस्वयंवरा'च्या ओवीसंख्येविषयी दोन शब्द लिहिणे अवश्य आहे. नरींद्राच्या 'संपूर्ण' ऋक्मिणीस्वयंवराचे जे एकमेव हस्तलिखित उपलब्ध आहे, त्यात शेवटल्या ओवीसमोर '।।३४।।' हा आकडा लिहिलेला असून त्यानंतर '।। २९३९ ।।' हा आकडा लिहिलेला दिसतो. (मी संपादिलेल्या नरींद्र' ऋक्मिणीस्वयंवराच्या छायाचित्र-आवृत्तीतील पृ. ५५२ वरील छायाचित्र पहा).

ऐसी वागपुष्पी माळा : वोवीया एकोणतीसशतें एकुणचाळीस सरळा
पुजा केली श्रीचरणकमळा : देवरायासी ॥ २९२६ ॥

या ओवीतही 'एकोणतीसशतें एकुणचाळीस' असा उल्लेख आहे. यावरून, नरींद्राचे संपूर्ण ऋक्मिणीस्वयंवर २९३९ ओव्यांचे आहे अशीच कुणाचीही समजूत होईल.

—त्याचप्रमाणे, शेवटल्या ओवीसमोर लिहिलेल्या '।। ३४ ।।' या आकड्यावरून २९३४ ही ऋक्मिणीस्वयंवराची ओवीसंख्या आहे अशीही कुणाची समजूत होईल. कै० ह० ना० नेने[1] व डॉ० वि० भि० कोलते[2] यांची अशीच समजूत झालेली दिसते. 'महाराष्ट्र सारस्वत'कार वि० ल० भावे यांनी तर 'या ग्रंथाची हल्लींची ओंवीसंख्या तीन हजार आहे' असे लिहून ठेवले आहे.[3]

पण, वरीलपैकी एकही समजूत बरोबर नाही. कारण, ओव्यांना क्रमांक देताना काही ठिणाणी पोथीलेखकाने घोटाळे केले आहेत. '८७९' व '८८०' या क्रमांकांच्या ओव्या संपल्यावर पुढल्या ओव्यांना '८७९' व '८८०' हेच क्रमांक पुन्हा दिलेले दिसतात.[4] त्यामुळे, ८८१ या ओवीपासून पुढल्या ओवीक्रमांकांत; पोथीतील ओवीक्रमांक व ओवीसंख्या यांत २ चा फरक शेवटपर्यंत पडत जातो. ऋ० स्व० च्या शेवटल्या ओवीसमोर लेखकाने '।। ३४ ।।' हा जो आकडा लिहिलेला आहे; तो त्याच्या लक्षात ही चूक न आल्यामुळेच ! वस्तुतः त्या ठिकाणी '३६' (=२९३६) हाच क्रमांक पाहिजे होता.

२९३९ या ओवीसंख्येत आणखी २ चा फरक पडण्याचे कारण असे आहे की; २८९ ही ओवी संपल्यावर अशी खूण करून, डाव्या समासात, एक जास्तीची ओवी लिहिण्यात आलेली दिसते.[5] ती अशी–

ऐसा देखौनि नेत्राचा अनुकारू : भीमाप्रति वाखाणी कौन्नरू
ते लावण्य कवी नरींद्र : सांघैल आता ।।

---

१. संशोधनलेखसंग्रह, भा० १ ला, पृ० ८५.
२. नरेंद्र–कवि–कृत रुक्मिणीस्वयंवर, (आ० १ ली) प्रस्ता०, पृ० ११.
३. महाराष्ट्र–सारस्वत, भा० १ ला, पृ० १०९.
४. छायाचित्र-आवृत्ती, पृ० १६० वरील छायाचित्र.
५. छायाचित्र–आवृत्ती, पृ० ५४ वरील छायाचित्र.

तसेच, ८८१ ओवीनंतरही (पोथीतील पुर्लिखित '७९' या क्रमांकानंतर) √अशी खूण करून एक जास्तीची ओवी वरच्या समासात लिहिण्यात आलेली आहे.[६] ती अशी–

वोळगावेया श्रीचक्रधरा छपन्न कोडी यादव आले जुहारा
तो परीवार राहीला असे बाहीरा : तों देखीला द्वीजराजे ।।

पण, या दोन ओव्या पोथीत लिहिण्यात आलेल्या असूनही लेखकाने मूळ ग्रंथातल्या ओवीक्रमांकांत वाढ केलेली नाही. अर्थात, मूळ ग्रंथ लिहिल्यानंतर या जास्तीच्या ओव्या लिहिण्यात आल्या, हे स्पष्ट दिसते. त्यामुळे त्यांचा अंतर्भाव मूळ ग्रंथात करता येत नाही.

२९३९ मधील ४ ओव्यांची संगती वरीलप्रमाणे लागू शकते. तरीही, '।। ३४ ।। (= २९३४) व २९३९ यांत एका ओवीचा फरक शिल्लक उरतोच ! हा कां पडावा ? पोथीलेखकाने आणखी एक घोटाळा असा केला आहे की, ४५ वी ओवी आधी लिहून नंतर ४४ ही ओवी लिहिली आहे. क्रमांकही ४५ आधी व ४४ नंतर असा त्याने दिला आहे.[७] ग्रंथातल्या ओव्यांची गणना करताना असाच घोटाळा त्याच्या मनात असावा, व म्हणून त्याने एक ओवी जास्तीची गणली असावी !

वरील कारणांमुळे, ओवीक्रमांकांच्या दृष्टीने '।। ३४ ।।' (=२९३४) हा आकडा नमूद केल्यावर, एकूण ओवीसंख्या नमूद करताना त्याने ५ ची भर घालून २९३९ ही संख्या नमूद केली असावी.

एक शंका मनात येते ती अशी की, ग्रंथ पूर्ण होण्याच्या आधीच ग्रंथात किती ओव्या आहेत हे नमूद करणारी ओवी लेखकाने कशी लिहिली ? लेखकाला ग्रंथातली एकूण ओवीसंख्या सांगावयाची असल्यास ती तो ग्रंथ पूर्ण झाल्यावर सांगतो. पण प्रस्तुत पोथीत मात्र, ग्रंथ पूर्ण होण्याच्या आधीच संपूर्ण ग्रंथाची ओवीसंख्या सांगितलेली आहे.

सारांश, पोथीलेखकाने ऋक्मिणीस्वयंवराच्या शेवटल्या ओवीसमोर '।। ३४ ।।' व '।। २९३९ ।।' हे आकडे लिहिलेले असले आणि २९२६ (पोथीतील ओवीक्रमांकानुसार २९२४) या ओवीत 'एकोणतीसशतें एकुणचाळीस' असा निर्देशही केलेला असला तरी नरींद्र' ऋक्मिणीस्वयंवराची खरी ओवीसंख्या २९३६च ठरते !

---

६. छा० आ०, पृ० १६० वरील छायाचित्र.
७. छा० आ०, पृ० ८ वरील छायाचित्र.

* *

द. भि. कुळकर्णी

केशवसुतांचे ऐतिहासिक कार्य

'केशवसुत' म्हटल्याबरोबर काही ठराविक दहापाच कविता आपल्या डोळ्यासमोर उभ्या राहतात. झपूर्झा, हरवले श्रेय, तुतारी, स्फूर्ती, नवा शिपाई, सतारीचे बोल इत्यादी. सर्वसामान्य नागरिकाला नवल वाटत असते. या अशा दहापाच कवितांमुळे हा कवी एकदम आधुनिक मराठी कवितेचा जनक कसा काय झाला ? अशा सुंदर दहापाच कविता तर आयुष्यभरात अनेक कवी लिहून जातात ? नागरिकाची ही शंका प्रामाणिक आहे. मराठीतील कुठलाही प्रतिष्ठित कवी घेतला तरी त्याच्या संग्रहातून अशा तोलामोलाच्या दहापाच कविता सहज काढून दाखविता येतील.

अनुक्रमणिका

मग केशवसुतांनाच 'अर्वाचीन काव्याचा प्रणेता' हा सन्मान मिळतो तो का ? केवळ बालकवी आणि गोविंदाग्रज, तांबे आणि कुसुमाग्रज, माधव ज्यूलियन आणि मर्ढेकर यांच्या आधी ते जन्माला आले, यांच्या आधी त्यांनी नव्या धर्तीचे काव्य लिहिले म्हणून ? तसे असेल तर मग केशवसुतांच्या काव्यसृष्टीचा गौरव करण्याऐवजी केशवसुतांच्या जन्मसनाचाच गौरव करणे इष्ट ठरेल. पण तसे नाही. हा केवळ आधी जन्माला येण्याचा आणि आधी अर्वाचीन वळणाचे काव्य लिहिण्याचा प्रश्न नाही. केशवसुतांच्या काव्याचे ऐतिहासिक मोल क्वचितच याहून अधिक आहे.

केशवसुतांनी कवीच्या स्वातंत्र्याचा उद्‌घोष केला आणि तो प्रभावी कवितांतून केला हे माझ्या दृष्टीने केशवसुतांचे महत्त्वाचे कार्य होय.

केशवसुतांची पहिली कविता 'खिडकीकडे मौज पाहावयास' ही त्यांनी वयाच्या १९व्या वर्षी नोव्हेंबर १८८५ मध्ये लिहिलेली आहे आणि आयुष्याच्या अखेरीपर्यंत म्हणजे नोव्हेंबर १९०५ पर्यंत ते काव्यलेखन करीत होते. अर्थात १९वे शतक आणि २०वे शतक यांच्या संधिकाळात केशवसुतांच्या कविता—त्या एकूण १३२ आहेत—अवतरल्या. रेव्हरंड टिळक, विनायक इत्यादी कवी केशवसुतांच्या काळात काव्यलेखन करीतच होते. केशवसुतांच्या नजिकच्या गतकाळात महादेव मोरेश्वर कुंटे आणि विष्णु मोरेश्वर महाजनी हे दोन मोरेश्वरसुतही काव्य लिहितच होते. एवढेच नाही तर भक्तकवी, विदग्ध कवी आणि शाहीर अशी प्राचीन मराठीतील संपन्न कविपरंपराही केशवसुतांच्या आधीच मराठीला लाभली होती. केशवसुतांचे हे पूर्वसूरी, त्यांचे समकालीन आणि त्यांचे अनुगामी हे सारेच मराठी कवी–विभिन्न संदर्भात लक्षणीय कवी आहेत यात शंका नाही. पण यांपैकी कुणीच न केलेली कामगिरी केशवसुतांच्या कवितेने बजाविली. त्यांच्या कवितेने कवीच्या आणि कवितेच्या स्वातंत्र्याचा उद्‌घोष केला. भक्तकवींनी आपली कविता आणि आपली जिंदगीच ईश्वरचरणी अर्पिली होती. 'देव मस्तकी धरावा–अवघा हलकल्लोळ करावा' असा त्यांचा बाणा होता. म्हणूनच शांत आणि भक्ती या रसांचे त्यांना अगत्य होते, व काव्यकलेस अत्यावश्यक असलेल्या व्यंगार्थापेक्षा वाच्यार्थ त्यांना मोलाचा वाटत होता आणि म्हणूनच कलावादी भारतीय साहित्यशास्त्राचे आध्यात्मिकीकरण करून त्यांनी स्वतःचे 'पारमार्थिक साहित्य-शास्त्र'च सिद्ध केले होते त्यामुळे त्यांचा आध्यात्मिक आत्मोद्धार झाला, समाजाला परलोकाची सोपी वाट गवसली हे खरे. पण त्यामुळेच कवी म्हणून त्यांच्या स्वातंत्र्याला मर्यादाही पडल्या. माणसाच्या मनोविश्वातच जागे होणारे आणि तिथेच पुनश्च निद्रित होणारे सूक्ष्म आणि गहिरे भावानुभव; भोवतीच्या मानवी विश्वात लहान आणि महान घटनांमधून साकार होणारे असंख्य, भावानुभव, शिस्तशीर आणि तरीही विविधरूपी निसर्गानुभव...या साऱ्यापर्यंत भक्तिकाव्य क्वचितच जाऊन पोचले. त्याचा ऋणानुबंध माणसातील माणसाशी कमी आणि माणसातील देवदैत्यांशी अधिक होता. माणसाला मुक्त करणारे अध्यात्म; पण त्याच अध्यात्माने भक्तकवींना 'कवी' म्हणून कोंडून ठेवले होते. हे माणसांचे जग, त्यातील हरघडीची आशानिराशा, त्यातील हरेक रंग, रूप, गंध यांपासून या अध्यात्माने या कविभक्तांना विन्मुख केले. विदग्ध कवींनी एखाद्या पंथाची, दर्शनाची बांधिलकी स्वीकारली नव्हती, त्यांनी कलावादी भारतीय साहित्यशास्त्राचे पारमार्थिकरणही केले नव्हते. पण ते वेगळ्याच कोठडीत अडकले होते. त्या कोठडीचं नाव होतं ग्रंथ—पूर्वसूरींचे ग्रंथ. या विदग्ध कवींच्या डोळादेखत यादव–आणि–यवन यांचे महाभारत घडत होते, बहामनीकालीन समाज वनवास भोगत होता, शिव-कालात नवे रामायण घडत होते, रामदास नवे योगवासिष्ठ आणि नवी गीता सांगत होते; बाजीराव–मस्तानी स्वतःचे नवे भागवत घडवीत होते. पण या विदग्ध कवींना जुन्या ग्रंथांनी पुरे घेरून टाकले होते. वास्तविक महाभारत, रामायण, भागवत, भगवद्‌गीता, योगवासिष्ठ ते महान ग्रंथ. त्यांच्या साह्यानेही या कवींना स्वसम-कालीन विश्वव्यवहाराचे अन्वयार्थ, शोधता आले असते. पण या विदग्ध कवींचा भर 'व्याख्यागम्य काव्या'-वर'च अधिक होता. काव्यात रस–रीति–अलंकार हे हवे ना. मग या साऱ्यांचे अनुकरणात्मक दर्शन आपल्या लेखनात घडवा—असा त्यांचा खाक्या होता. त्यातही अलंकाराची हौस विशेष. हे अलंकारही आपल्या अशा खास सौन्दर्यवृत्तीतून मौलिकतेने अवतरले पाहिजेत याचे भान जाऊन चंद्र–कमळ–भ्रमर–चातक–चकोर–भृंग–अमृत

ही उपमानेच, पाढयासारखी, वेठीला धरली गेली. वाङमयात जीवनाचा सुगंध असावा तर या विदग्ध काव्याला पूर्व ग्रंथाचा दर्प आला. शाहिरांचेही वेगळ्या अर्थाने असेच घडले. त्यांनी लोकरंजनावरच जोर दिला. हे लोकही नगरातील वा ग्रामातील सर्वसामान्य लोक नव्हेत, तर दरबारातील मानकरी आणि लष्करातील धारकरी. या लोकांना वैषयिक करमणूक हवी होती ती भाषेच्या मार्फत शाहिरांनी पुरविली. या शाहिरांचे स्वतःच्या आणि इतरांच्या मनाकडे आणि आयुष्याकडे लक्षच कुठे होते ? त्यांनी आपली वाणी मनोरंजनाच्या पिंजऱ्यात झुलवीत ठेवली होती.

अर्थात या साऱ्याला अपवाद होतेच. परमार्थ आणि पूर्वग्रंथ आणि नर्मसाचित्र्य यांना बंधनरूप न होऊ देता आपली प्रतिभा आणि कविता मुक्त ठेवण्याचे सामर्थ्य ज्ञानदेव आणि चोखोबा, नरींद्र आणि मुक्तेश्वर, रामदास आणि होनाजी यांच्यापाशी होतेच. पण हे आणि आणखी एकदोघे हे अपवादच होत. नियम त्या वेळी हाच होता की त्या साऱ्या कवींनी आपले कवी म्हणून आणि माणूस म्हणून स्वातंत्र्य गहाण ठेवायचे.

इसवी सन १८१८ मध्ये इंग्रजी राजवट आली. इंग्रजी शिक्षण सुरू झाले. इंग्रजी वाङमयाचे अध्ययन होऊ लागले. मराठी कवींना शेक्सपियर, मिल्टन, पोप, कोलरिज, बायरन यांचे काव्य डोळ्यापुढे दिसू लागले. त्यांचे महाकाव्य, भावकाव्य, नाट्यकाव्य पाहून पहिल्या पिढीच्या कवींना वाटले आपणही असे काव्य लिहावे. म्हणजे आता नवे ग्रंथबंधन आले. व्यास, वाल्मीकी कालिदास, भारवी, माघ यांच्या ग्रंथबंधनाऐवजी आता नवे ग्रंथबंध आले दिशा बदलली पण वृत्ती तीच राहिली ग्रंथधार्जिणी, स्वतःचे स्वातंत्र्य गमाविणारी. केशवसुतांनीही अनुवाद केले, केशवसुतांनीही पाश्चात्य स्वच्छंदवादी कवींचे नमुने नजरेसमोर ठेवले. पण केशवसुत ग्रंथधार्जिणे झाले नाहीत. स्वच्छंदवादी कवींपासून कवीच्या आणि काव्याच्या आद्य अणि अंतिम स्वातंत्र्याचा धडा केशवसुत शिकले. म्हणूनच केशवसुतांच्या काव्याचे सर्व बरेवाईटपण हे त्यांचे स्वतःचे आहे, त्यांची प्रेरणाही तत्त्वतः निखळ आत्मनिष्ठ प्रेरणा आहे.

अशी असावी कविता, फिरून
तशी नसावी कविता, म्हणून
सांगावया कोण तुम्ही कवीला
आहात मोठे ? पुसतो तुम्हाला

असे जेव्हा केशवसुत म्हणतात तेव्हा तो त्यांचा उर्मटपणा नसतो, ती त्यांची, कवी म्हणून, स्वातंत्र्य घोषणा असते. आत्मबाह्य अशा कुठल्याच पंथाचे, ग्रंथाचे आणि हेतूचे ते गुलाम नसतात. ते आणि त्यांची कविता आत्मनिर्भर आणि म्हणूनच मुक्त असते. या मुक्तीमुळेच त्यांना आंतर्विश्वात आणि बाह्यविश्वात नाजूक आणि विराट हालचाली, अगदी नव्या रूपात दिसू लागतात.

जी सामान्य माणसे आत्मभिन्न पंथ–ग्रंथ–हेतू यांनी बांधलेली नसतात तीही तर्कप्रामाण्य आणि इंद्रियजन्य प्रत्यक्ष आणि प्रचलित संकेत–समजुती यांची गुलामच असतात. अशा सामान्यांना जग ही फक्त एक 'उपयुक्त वस्तू' वाटत असते. अशा सामान्यानी भरलेल्या आणि उपयोगितावादी दृष्टी 'असलेल्या विश्वाला केशवसुतांनी 'गद्यग्रथित जग' म्हटले आहे. या गद्यग्रथित जगावर केशवसुतांचा रोष आहे, पण त्यापासून पलायन करण्याची भीरुवृत्ती त्यांची नाही. त्यांना कणव आहे या गद्यग्रथित जगाची; त्यांना परिवर्तित करायचे आहे हे जड आणि जड जग एका सुंदर आणि समर्थ विश्वामध्ये. या जगाची अधू नजर, या जगाचे पंगूपण, या जगातील आर्थिक आणि जातीय विषमता, या जगातील राजकीय आणि मानसिक गुलामगिरी पाहून कवीचे मन कळवळते, तिळतिळ तुटते आणि मग ते टाहो फोडते—

'देवा केव्हा परवशपणाची निशा ही सरून
स्वातंत्र्याचा द्युमणि उदया यावयाचा फिरून ?
केव्हा आम्ही सुटुनि सहसा पंजरातून, देवा,
राष्ट्रत्वाला फिरूनि अमुचा देश येईल केव्हा ?

ही आत्मनिर्भरता, ही मुक्तावस्था एखाद्या कवीलाच कशी प्राप्त होते ? नाही केवळ कवीलाच नाही, केशवसुतांच्या मते, प्रत्येक प्रतिभावंताला ही मुक्तावस्था प्राप्त होते. कलावंत, शास्त्रज्ञ, तत्त्वज्ञ अशा सर्व प्रतिमावंतांना. पण कवीचे वैशिष्टच असे की अशा मुक्तावस्थेमध्ये त्याच्यातील एक अनन्य शक्ती कार्योन्मुख होते. या अनन्य शक्तीचे केशवसुती नाव आहे क्लृप्ती. क्लृप्ती म्हणजे युक्ती, कारागिरी किंवा चमत्कृती नव्हे.

> **क्लृप्तीची** मग करूनी नौका व्योमसागरावरि जाऊ
> उडुरत्ने या गरिब घरेला तेथुन फेकुनिया देऊ

—या ओळी प्रसिद्धच आहेत. 'चिनीकरण', 'सृष्टी आणि कवी', 'काव्य कोणाचे' या कवितांतही 'क्लृप्ती' हा शब्द केशवसुतांनी वापरला आहे. केशवसुती क्लृप्ती म्हणजे क्रिएटीव्ह इमॅजिनेशन—सृजनशील कल्पकता. या सृजनशील कल्पकतेमुळेच रूक्ष आणि सामान्य भासणाऱ्या विश्वघटनांमध्ये कवीला सौंदर्य प्रतीत होते आणि त्या गुप्त सौन्दर्याचा मुक्त आविष्कार त्याला आपल्या काव्यात करता येतो. एक साधेसे फूल, एक परिचित रांगोळी, उन्हाळचाच्या आरंभी नेहमीच दिसणारे धुळीचे भोवरे यात केशवसुतांना सौन्दर्याचा ठेवा गवसला तो या क्लृप्तीमुळे—सृजनशील कल्पकतेमुळेच. उपासमारीने व्याकूळ झालेला मजूर सामाजिक विषमतेमुळे घायाळ झालेला अंत्यज, निरर्थक बंधनांनी विटंबित झालेले स्त्रीजीवन पारतंत्र्याच्या बेड्यांनी जखडलेले राष्ट्रजीवन या साऱ्या घटनांना केशवसुत काव्यरूप देऊ धजले ते या सृजनशील कल्पकतेच्या बळावरच. या निबंधविषयांना माझ्या क्लृप्तीच्या स्पर्शाने सौन्दर्य प्राप्त होईल असा त्यांना विश्वास होता.

केशवसुतांची ही कामगिरी केवळ अपूर्व होय. कवीच्या मूलभूत स्वातंत्र्याचा हा उद्घोष आणि त्याच्या सृजनशील कल्पकतेचा व्यवच्छेदक लक्षण म्हणून असा गौरव—यामुळे सारे विश्वच कवीच्या आणि काव्याच्या मालकीचे झाले. कवी देवाचे लाडके ठरले. आपले अखिल विश्वच जणू देवाने कवीला आणि त्याच्या कवितेला बहाल केले. कवितेला अविषय असे काहीच उरलेच नाही. म्हणूनच केशवसुतांनी 'हरपले श्रेय' सारखी प्रतीतिधर्मीय कविता लिहिली. 'तुतारी'सारखी सामाजिक कविता लिहिली, 'एका भारतीयाचे उद्गार'सारखी राष्ट्रीय कविता लिहिली. 'एक खेडे'सारखी निसर्ग कविता लिहिली आणि 'गोष्टी घराकडील मी वदता गड्या रे' अशी कौटुंबिक कविताही लिहिली. केशवसुती कवितेने पुढील कवींसाठी अशी अनेक बंद दालने उघडून ठेवली. बंदिवान मराठी कवितेला त्यांनी 'गगनविहारी हो—जगतविहारी हो' म्हणून सांगितले. उत्तरकाळात मराठीत जी मधुर प्रेमगीते, अलवार निसर्गगीते आणि बंडखोर समाजगीते लिहिली गेली त्याचा आद्य बीजमंत्र केशवसुती कवितेने आळविला आहे.

एवढेच नव्हे तर कवितेला 'कविता' हा विषयही निषिद्ध नाही, हे केशवसुतांनीच प्रथम मराठी कवींना सांगितले. काव्यशास्त्रीय विचार गद्य परिभाषेतून मांडावयाचे व काव्यशास्त्रीय तत्त्वांचे परिपालन काव्यातून करावयाचे ही संकेतशृंखला तोडून केशवसुतांनी प्रतिमा, क्लृप्ती, स्फूर्ती, कविता, कवितेची भाषा, कवितेचे प्रयोजन, कवीचा धर्म या काव्यशास्त्रीय विषयांवर कवितेतूनच आपले चिंतन अभिव्यक्त केले. म्हणजे केशवसुतांनी काव्यशास्त्राला आणि कवितेलाही काव्यविषय केले. केशवसुतांची ही काव्यविषयक निर्मिती म्हणजे कवीच्या स्वातंत्र्य आणि सृजन या हक्कांची गर्जना करणारी आद्य सनद होय. हा अर्वाचीन कवितेचा जाहिरनामा होय. आणि नवलाची गोष्ट ही की हे सारे काव्यविषयक विचार काव्यशास्त्र अभ्यासून नव्हे तर आत्मचिंतनातून स्फुरलेले आहेत आणि त्याहून आश्चर्य हे की ते अंतिमतः शास्त्रशुद्ध आहेत.

'धूमकेतू आणि महाकवि' या कवितेत केशवसुत म्हणतात—

> निश्चित तुम्ही स्वयंप्रकाशी अप्रतिहत फिरता,
> केंद्र सोडुनी दूरवरी हो स्वैरपणे भ्रमता
> भास्करभसित स्थानापासुनि वेध घेत मोदे
> विश्रांतीचे तमात शिरता आपुल्याचि नादे

जगातिल महाक्रांतीचे ते भविष्य सांगाया
तुम्ही येतसा—लावितसाही ते लोका गाया

केशवसुतांचे हे उद्गार अर्थवादात्मक नाहीत. त्यांच्या काव्यसृष्टीकडे आणि काव्यदृष्टीकडे स्वातंत्र्य—सौन्दर्य आणि सृजन या संदर्भातून पाहिले तर "जगातील महाक्रांतीचे भविष्य वर्तविणारा महाकवी" मराठीत उद्या खचित अवतीर्ण होईल.

* *

म. द. हातकणंगलेकर

काव्यसमीक्षा मूल्यसंकेतांची सापेक्षता

साहित्यसमीक्षेतील मूलभूत सिद्धांतांचा कसोशीने विचार चालू आहे. नवे मूल्यसंकेत निर्माण होत आहेत. हे स्थिर व प्रस्थापित झालेले नाहीत. हे नवे मूल्यसंकेत कोणते ? ते जुन्या मूल्यसंकेतांहून वेगळे आणि अधिक उपयुक्त का आहेत ? त्यांचे निश्चित स्वरूप काय ? यासंबंधीचे विचारमंथन टीकाकार व सौन्दर्यशास्त्रज्ञ करीत आहेत. बहुतेक विचार पाश्चात्य टीकाकारांनी केला आहे, हे वेगळे सांगण्याची जरुरी नाही. या विचारांतून निर्माण होत असलेल्या सिद्धांतस्वरूप संकल्पनांचा आधार घेऊन मराठीत कै. मर्ढेकर, प्रा. गंगाधर गाडगीळ, वा. ल. कुलकर्णी, प्रा. दि. के. बेडेकर, माधव आचवल, पु. शि. रेगे दिलीप चित्रे, डॉ. द. भि. कुलकर्णी, नरहर कुरुंदकर, मे. पुं. रेगे, प्रभाकर पाध्ये, श्री. के. क्षीरसागर, आदी टीकाकारांनी वेळोवेळी आपले विचार मांडले आहेत. साहित्याची व काव्यसमीक्षेच्या नवीन शास्त्राची ही पूर्वतयारी चालू आहे असे म्हणता येईल. शास्त्र संज्ञेला पात्र होईल अशी या विषयावरील विचारांची सुसंगत मांडणी अजून उपलब्ध नाही. स्फुट स्वरूपाचे लेखनच अस्तित्वात आहे असे म्हटले पाहिजे. पाश्चात्य लेखकांचे या विषयावरील लेखन अर्थातच अधिक कसदार व मर्मग्राही असले, तरी साहित्याचे नवे शास्त्र तेथे निर्माण झाले आहे असे दिसत नाही. किंबहुना काही टीकाकारांच्या मते असे शास्त्र निर्माण होणे कठीण आहे व तसा प्रयत्न करणे चुकीचे आहे; यासंबंधीच्या ज्या वेगवेगळ्या कसोट्या व निष्कर्ष मांडले गेले आहेत त्यांचाच अधिक निकोप व अनाग्रही विचार करणे इष्ट. निर्लेप; वस्तुनिष्ठ कलातत्त्वे असू शकत नाहीत. कलातत्त्वे प्रमाण मानताना त्यांची सापेक्षता गृहीत धरावी लागते. सापेक्षतेमुळे तत्त्वांच्या शुद्धतेला उणेपणा येतो असे वाटले तरी त्यामुळे ती जास्त वास्तव व उपयुक्त ठरतात, या भूमिकेचा अधिक विचार झाला पाहिजे, असे मला वाटते.

जुने साहित्यशास्त्र आणि नवे साहित्यशास्त्र म्हणजे काय ? अत्यंत स्थूल मानाने, सांप्रदायिक साहित्यशास्त्र हे आशयवादी, हेतुप्रधान, प्रतिभेच्या दैवी शक्तीचे अधिष्ठान गृहीत धरणारे, रस व अलंकार यांचा अनेकपरीने विवेक करणारे व औचित्य कल्पनेचा दंडक मान्य करणारे असे होते. नवे साहित्यशास्त्र हे आकृतिवादी, कलेच्या केवलस्वरूपाचा वेध घेणारे, साहित्यबाह्य मूल्यकल्पनांचा अधिकार अमान्य करणारे, हेतुरहित हेतुपूर्णतेचा शोध घेणारे व मूल्यांची अनेकविधता प्रतिपादन करणारे असे आहे. जुन्या साहित्यशास्त्राचा मथितार्थ काय ? रसोत्पत्ती करणारे लेखन म्हणजे साहित्य हे साहित्याचे स्वरूप; जीवनदर्शन म्हणजे नैतिक आदर्शाचे दर्शन हा साहित्यहेतू आणि साहित्याची श्रेष्ठ कनिष्ठता अजमावण्याचे निकष हे सत्य, सौंदर्य, (शिव) कल्पनांवर आधारलेले. जुने

साहित्यशास्त्र अपुरे आणि असमाधानकारक वाटू लागले. कारण (१) त्यातील प्रमुख संज्ञा, (सौन्दर्य. रस, शिव इ.) शास्त्रीय कसोटीला न उतरल्याने संदिग्ध ठरल्या, (२) जीवनमूल्य व साहित्यमूल्य एकच आहेत असे मानण्याची फसगत त्याने होऊ लागली, (३) त्यातील निकष आशयप्रधान असल्याने शुद्ध वाटले नाहीत. नवीन साहित्यविचारात आशय बाजूला ठेवला गेला व साहित्यनिर्मितीची प्रक्रिया, साहित्याचे माध्यम (भाषा नव्हे संवेदना) साहित्यिक भाषेचा हेतू व स्वरूप यांचे शास्त्रीय ज्ञान व कलात्मक संघटनेची तत्त्वे या प्रश्नांवर लक्ष केंद्रीभूत होऊ लागले.

कलेची प्रक्रिया हेच कलेचे स्वरूप व मूल्य हा विचार स्थिर होत आहे. कला प्रक्रियेची आर्तता, ताण व समतोल या गोष्टी निर्णायक महत्त्वाच्या ठरत आहेत. ('भाषेच्या सुप्त सामर्थ्याचे अविरत चिंतन व आर्जव हेच साहित्य स्वरूपाचे रहस्य' हा ऑडेन या कवीचा या बाबतीतला लक्षणीय अभिप्राय) थोडक्यात साहित्य व स्वरूप व सौन्दर्य यांच्या मर्माचे बौद्धिक आकलन करून घेण्यासाठी कोणती पद्धती अगर तंत्र जास्त उपयुक्त ठरेल या विचारात नवीन साहित्यशास्त्र गढले आहे.

योजिलेला विषय काव्य समीक्षेचा आहे. वरील विचारांच्या पार्श्वभूमीवर असे दिसते की, काव्य-निर्मितीची प्रक्रिया, काव्यांतर्गत रचनातत्त्वे व काव्यातील भाषेचा उपयोग यावर आधारित निकष समीक्षेस आज अधिक उपयुक्त ठरतील. त्या संबंधात काही मुद्दे लक्षात घ्यावे लागतील. पहिला मुद्दा काव्याभिरुचीच्या समीक्षेचा, काव्य या साहित्यप्रकाराच्या विकासाचा व काव्याभिरुचीच्या विकासाचा एक क्रम मानता येतो. यातून अभिजात साहित्याचे युग वेगळे काढावयास पाहिजे. कारण ते एकमेव व अपवादभूत आहे. ते पुन्हा निर्माण होण्याची शक्यता विचाराबाहेर ठेवलेली बरी. काव्याभिरुचीत, काव्यनिर्मितीत व काव्यास्वादात बदल होतो म्हणजे काय होते ? काव्यवस्तूत जे निरनिराळे घटक, अर्थ व अर्थमूल्ये, आविष्काराच्या पद्धती, भाषा व तिच्यात सामावलेले उपघटक, ध्वनी, स्मृतिवलय (Associations) आणि लक्षणेच्या नानाविध तऱ्हा इ. सामावलेले आढळतात. त्यांपैकी काही विशिष्ट घटकांवर अधिक भर दिला जातो, या घटकांची अवधी समृद्धी आणि शक्यता धुंडाळण्याची जिज्ञासा व जिद्द निर्माण होते. हीच काव्याला मिळणारी नवी दिशा, विकासा-साठी शोधलेला नवा अवसर. स्थूल विवेचनाच्या सोयीसाठी दोन विभाग कल्पिता येतील. शब्दार्थात व्यक्त होणारा व नैतिकमूल्याधिष्ठित सौन्दर्याचा एक भाग तर अलंकार, रस नादमाधुर्यादिता लक्षणाप्रकारांनी साकार होणाऱ्या सौन्दर्याचा दुसरा भाग. या ढोबळ विभागांच्या अनुरोधाने काव्याचे प्राचीन व अर्वाचीन असे खंड पाडता येतील. प्रत्येक विभागाचे विश्लेषण म्हणून विस्तार व या विस्ताराचा क्रम कल्पिता येतो. या विस्तार क्रमांक काव्यवस्तूचा एकजिनसीपणा, एका अभिजात, विशाल काव्यभूमिकेतून दुभंगला जाणार हे उघड आहे, म्हणून अभिजात काव्यनिर्मिती अपवादात्मक राहणार हे गृहीत धरले. — पण असे होत असताना निरनिराळ्या सुट्या घटकांची संपन्नता वाढीस लागते हे ध्यानात घेणे जरूरीचे आहे. या विकासक्रमाला अनुसरूनच काव्य-समीक्षेच्या मूल्यसंकलनात बदल करावे लागतात. हे बदल करीत असता सर्वसमावेशक भूमिका अर्थातच सोडावी लागते. नैतिक आदर्शाचा संकेत सोडावा लागतो. विशिष्ट तऱ्हेच्या सौन्दर्याचा संकेत सोडावा लागतो. औचित्य-कल्पनेचे संकेत सोडावे लागतात. थोडक्यात, अभिरुचीची व मूल्यसंकेतांची सापेक्षता आपणास मान्य करावी लागते. असे करताना अभिजात संकेतांना बाध [illegible] अशी शंका येते. पण कोणतीही रसिकता पोकळीत वावरू शकत नाही, याचा विसर पडता कामा नये. [illegible]शिष्ट काळात अपरिहार्यपणे निर्माण होणाऱ्या काव्यनिर्मितीच्या प्रेरणा सहृदय रसिकतेला व समीक्षेला सम[illegible] घेणे अत्यंत अगत्याचे आहे. केवलस्वरूपी, कालनिरपेक्ष आग्रह उराशी बाळगून व्यवहार करू पाहणारी [illegible]क्षा उपकारक ठरत नाही. 'Aesthetic theory is not the contemplation of eternal verit[illegible]s concerning the nature of an eternal object called art.' R. G. Collingwood. काव्य[illegible]क्षेत या उद्गाराचे स्मरण असावे, तसेच कोणत्याही काळातील

संवेदनरीती समजावून घेणे अगदी आवश्यक आहे हे सुप्रसिद्ध आधुनिक इंग्रज कवी व टीकाकार टी. एस्. इलियट यांचे मतही दृष्टीआड करून चालणार नाही. कारण 'Technique can be studied and judged only in terms of the sensibility it expresses' **T. S. Eliot.**

तर मग आधुनिक काव्याला अपेक्षित असलेले मूल्यसंकेत कोणते ? ते ठरविताना आजची संवेदनारीती लक्षात घ्यावयास पाहिजे. आजच्या कविप्रतिभेचा ध्यास कोणता ? तिच्या आकांक्षा व इप्सिते काय आहेत ? प्रथमतः सर्व मूल्यकल्पनांच्या अभावी केवळ संवेदनांची सत्य व सौंदर्यच ही प्रतिभा ग्राह्य मानते. निखळ संवेदनांचा अनुभव व त्यांची रचना हे एक स्वायत्त कलामूल्य असे तिला वाटते. या संवेदना अनेकरूप असतील. सूक्ष्म; गूढ, अबोध, विशाल, संमिश्र प्रवाही, अनाकृत. त्यांचा प्रत्यय सुसंगत नसला तरी तीव्र असेल. संवेदना वस्तुसाक्ष असतील असे नाही. त्या शब्दबद्ध करण्याच्या प्रयत्नात नवनवीन संवेदना आवर्तनांचा उदय होत राहील शब्दसाक्ष अशी नवी अनुभूती साकार होईल. थोडक्यात शब्दाविष्कार हीच एक कलात्मक अनुभूती असेल. या प्रक्रियेत सुश्लिष्ट व अर्धस्फुट प्रतिमांची एकमेकात गुंतलेली मालिका बनेल. या मालिकेचे मूळ प्रेरक आकारहीन संवेदनांचे सुबोध नाते दिसणार नाही. पण त्या समांतर म्हणून संबंधित असतील. याच संदर्भात इलियटने मांडलेली Objective Co-relativesची कल्पना स्पष्ट होते. दिलीप चित्रे यांनीही असाच विचार मांडला आहे "बाह्य पदार्थात आपल्या गतिमान अस्तित्वभानाची सिंबॉलिक ट्रान्स्फर करणे ही कलेची मूळ प्रेरणा आहे."

संवेदनांच्या शुद्ध प्रवाहात अवगाहन करताना अमूर्त, अनादी आणि अनंत अशा चिद्शक्तींना कवेत घेण्याचा धाडसी प्रयत्न ही प्रतिभा करेल. या गूढ शक्तींच्या सामर्थ्याचा आणि गूढतेचा उकल करण्याचा मनस्वी ध्यास तिला लागेल. रंग, रूप, रस, गंध, प्रकाश, अवकाश, ध्वनी व वारा या मूलतत्त्वांना पेलण्याचा व मृत्यूच्या विनाशाच्या गवाक्षातून त्याचे उगमस्थान शोधण्याचा प्रयत्न ती करेल. प्रा. दि. के. बेडेकर यांनी आधुनिक काव्यातील धर्मप्रायतेचे जे प्रमेय मांडले आहे त्याचा उलगडा या संदर्भात होऊ शकेल. माधव आचवल यांच्या तरल प्रतिभेला प्रकाश, वारा, ध्वनि इ मूलतत्त्वांचे आकर्षण नव्याने वाटावे. ही गोष्टही अर्थपूर्ण होते.

हे साधण्याची उत्कटता ज्या प्रतिभेला आहे तिला सांकेतिक शब्दांचे अपुरेपण बोचावे आणि त्यातून निसटण्याचा आटोकाट प्रयत्न तिने करावा यात नवल नाही. यातूनच शब्दात दडलेल्या ध्वनिद्रव्याचे आणि स्मृतिद्रव्याचे आकर्षण आजच्या काव्यप्रतिभेला वाटते. या आकर्षणाच्या मागे धावताना ही प्रतिभा शब्दार्थापासून किती तरी दूर जाते, काही ध्वन्यानुकारी कविता लिहिताना आपणास 'अर्थदृष्टचा अनाकृत स्वरुपाचा आनंद मिळाला' असे चित्रे यांनी नमूद केले आहे.

आजच्या कवितेमागील या सर्वसाधारण प्रेरणा आहेत. ही नवी संवेदनरीती आहे. ती बरोबर की, चूक हा फार मोठा व काहीसा अप्रस्तुत मुद्दा आहे. तत्त्वचिंतकांनी त्याचा स्वतंत्र विचार करावा. काव्यसमीक्षेने मात्र या प्रेरणांचे योग्य ते भान ठेवून, त्या कोठे, कशा व किती प्रमाणात सफल होतात याचाच विचार करणे उचित होय. बेडेकर ज्या निर्मल, अनाग्रही समीक्षक वृत्तीचा आग्रह धरतात ती अशीच असणार. या वृत्तीतूनच आधुनिक काव्याच्या आस्वादाला व वास्तव समीक्षेला हितकारक असे मूल्य–संकेत निर्माण होतील.

'भाषेच्या सुप्त सामर्थ्याचे अविरत चिंतन व आर्जव' हे आधुनिक साहित्याचे, काव्याचे एक प्रमुख लक्षण याची सतत जाणीव आजच्या कवींना आहे. शब्दांच्या सांकेतिक वापराने त्यांचे सत्वच नष्टप्राय होते हे सांगताना विंदा करंदीकर म्हणतात––

शब्दांच्या खिडीत । अर्थ आला कामी

अस्तित्वाचे नवे भान जागत असताना शब्दात नवे प्राण ओतावे लागतात––

अस्तित्व कोनाचा
विकास साधताना

गरोदर भापेला
लागतात डोहाळे
सगुण शब्दांचे

हीच भावना अधिक तलमपणे 'ग्रेस'नी व्यक्त केली आहे.

या व्याकूळ संध्यासमयी
शब्दांचा जीव वितळतो.

ठोकळेबाज शब्द वितळत असता त्यांची विविध समरूपे जाणीवेत तरंगत येतात व काव्याकृती धारण करतात— असे शब्दविभ्रम पु. शि. रेग्यांच्या कवितेत सापडतात—

डोळे मोडीत चालसी,
उभा गांव चाळविसी...
मागे वळून पाहसी
उभा गांव चाळविसी.

'चालणे' 'चालविणे' 'चाळविणे' हे विभ्रम व त्यांच्याशी निगडित 'उभे'पण.

जाणीवेच्या याच चलनवलनात शब्द फुटतात, एकमेकांत शिरतात आणि नवे आकार, अर्थ जागवतात. रेग्यांची प्रतिभा या वाटेवर नेहमी फिरत असते—

'डोळ्यांमधले पात दमास्कास
ओठांची ती झपचिप गुंफण'

'हृदयाचा उधळ–मोकळा आनंद' 'मंद, लाजरीं, गवती, दंवतीं फुले', दिनवाणेपणाची छटा असलेले, 'नार्सिससवाणें उगाच डोळ्यांतले पाहणे', पहांटेचा वारा सुखावलेल्या पांघरुणासारखा असतो म्हणून त्याच्या 'दाही दशांना असतात सुगंधाचे पल्लव, लवलव', रात्री मात्र कसलाही वारा 'सुखा–भूखा असतो' 'नकोजलेल्या' (कोमेजलेल्या) पांघरुणासारखा; तिच्या मनातील असह्य, मन–भोर (काळेभोर) काहूर, झाडांतून लदबदले बहर कांचनाचे 'पुष्कळा' हे या प्रक्रियेचे प्रातिनिधिक उदाहरण—

पुष्कळाच तूं–पुष्क–कलावंती;
पुष्कळ, पुष्कळ, पुष्कळणारी.

पुनरुक्ती, पडसादाने उमलत उलगडत जाणारा हा अर्थ व ध्वन्यर्थ–प्राथमिक पंतोजीचे उदाहरण हवेच असेल तर विंदा करंदीकरांच्या एका कवितेत सापडते.

कशापासून काहीही होते
जसे 'झरोक्यातून' निघतात
'रोक्यातून', 'क्यातून' 'आतून'
'तून' 'ऊन' 'न'

या पातळीवर हा पोरखेळ वाटेल. प्रतिभेने पेलला तर त्याची किमया बनते.

क्षणिक संवेदनांचे सत्त्व, सौंदर्य हेरण्याची अधिक लक्षणीय प्रवृत्ती आधुनिक काव्यात आहे. कीट्सच्या सुप्रसिद्ध उद्गाराला लाभलेली ही मग्नता आहे असे म्हणता येईल.

क्षण पुढचा, पुढचा मला सेवु द्या
जीवन सारे खुशाल तुम्ही घ्या   **पु. शि. रेगे**

जीवनाचे सार सापडत नाही म्हणून तर संवेदनाचे खंडित सत्य स्वीकारावे लागते—

तिपी तिपी ऊन, श्रावणाचे गान कंठात झुलते   ना. धों. महानोर

आकाशाच्या निळ्या ढालीने
माझ्या अज्ञानांचे संरक्षण करणारा मी
असतो चुकवीत
सूर्याची मेडुसाच्या नजरेची जहरी तलवार
मात्र ओंजळीतल्या रक्ताच्या पाण्यात
जगवीत असतो असंख्य असंबद्ध प्रतिबिंबे
माझ्याच शतखंडित अस्तित्वाच्या सूर्याची--**दिलीप चित्रे**

संवेदनांचा पाठपुरावा म्हणजे निव्वळ भोगवाद असे म्हणणे चूक होईल. कारण या संवेदनांचा विस्तार विश्वरहस्याला स्पर्श करू पाहतो.

संथ दिवसांचा लमाण-तांडा
सरकतो आहे अनंताच्या वाळवंटामधून
जसे आमच्या दु:खांची ओझी वाहणारे स्वप्नांचे उंट
सरकत आहेत अशिल्पित पिरामिडांच्या भयाण छायांतून
मृत्यूच्या मृगजलाकडे **दिलीप चित्रे**

'विश्वाच्या भव्य भिंगातून पल्याड पाहणाऱ्या प्रतिभेचा' डोळा जर भिजला तर 'कोसळत्या शब्दांचा केवळ अंधारच' ठरतो याची जाणीव याच कवितेत दिली आहे. आजच्या कवींना दुर्बोधतेत भूषण वाटते, असा सरसकट आरोप करताना या जाणीवेकडे दुर्लक्ष होऊ नये. चित्र्यांची आणखी एक कविता;

विश्वाच्या जडतेत स्पंदन करी भारावले काळिज
तूं नेलेस कुठे जरी न कळले काळजातुनीही वर,
जेथे खोल जलात आज पडल्या छायापरी चांदण्या
विश्वाश्चर्य मनात अन् उमटले पाण्याहुनी निर्मळ.

याच जाणीवेचा प्रत्यय देणाऱ्या 'ओसपणाचे कोसच्या कोस' सारख्या कविताही आठवतात. 'संज्ञेच्या अग्रावर स्थिर झालेली प्राणांची भिंगरी' भ्रमत्या विचारांच्या वेगात लोपून जाते.

असंग व अमूर्त भावनांचे उमाळे आणि कल्लोळ साकार करण्यासाठी वस्तुनिष्ठ प्रतिमा, प्रसंग प्रामुख्याने निसर्गजीवनातील--रंगविणे हे आजच्या काव्यप्रतिभेचे आणखी एक प्रधान लक्षण. (इलियटचे objective Co-relatives) ग्रेस' या कवीची वृत्ती सर्वस्वी या जातीची आढळते. त्यांच्या 'पांढरे हत्ती' या कवितेचे द. भि. कुलकर्णी यांनी केलेले विश्लेषण आठवावे.

की श्रावण घेऊन हृदयी
ओवीत उतरले खेडे
की चिंब अभंगामधला
भगवंत स्मृतीवर दाटे...

या प्रकाराला 'स्मरणशिल्प' असे सार्थ नाव 'ग्रेस'नी दिले आहे. ते म्हणतात देखील--

शापच आहे मला संगमरवरात स्वप्न
लपवून ठेवण्याचा-

या शिल्पाची अधिक प्रत्ययकारी रूपे इतर कवींनी दाखविली आहेत.

सांजल्या मनात
जाणीव जागली

लेऊन मोत्याचा तुरा

विस्कटली संध्याकाळ गळे नेत्रांत
प्राणात मालवे दीप, कोसळे रात   **ना. धों. महानोर**

अगदी रेखीव 'सायुज्य' पु. शि. रेग्यांचे--

जिवंत पाते
टणक् चिवट तिरकमठ्याची दोरी.
दंडाला बळकट पीळ
डोळ्यात लसत् सूक्ष्म आगीचे तेज;
सुकोमल हृदयामधला भाव......
बघता बघता
विसर मला माझाच पडे,
उरली कणवच भुवनातली,
सायुज्यच जणु सहज उभे
मौनातील भेटीस्तव पहिल्या

किंवा याहूनही नेमके--

दाणे डाळिंबाचे
लाभोर
टपोर............
एकाशी एक चुस्त जुळवित मोहळ मदिर वृंद
एक एक जणु रूप तुझेच माझ्या मनचे.

हे खरे रेखीव स्मरणशिल्प--

दुर्बोधतेच्या जाती शोधण्याचा खटाटोप न करता, समीक्षकांनी या स्मरणशिल्पाच्या जाती शोधल्या तर ते किती उपकारक ठरेल !

आणि काव्यातील नादमयता. तिने देखील आज नवी रूपे घेतली आहेत.

'ललित लवंगलता परिशीलन कोमल मलय समीरे' ही जयदेवाची ओळ नादमधुर आहेच, पण बोरकरांच्या

गोपी झाल्या भिजून--चिंब
थरथर कापति निंब--कदंब
घनांमनांतुन टाळ--मृदंग
तनूंत वाजवि चाळ अनंग

या ओळींतील नादमयता वेगळ्या प्रकारची आहे. अशी बंदिस्त नादमयता आजच्या काव्यात नसेल. पण अपरिचित नादांचे पडसाद त्यात अनेक तऱ्हांनी उमटतात. रेग्यांच्या या आकार, नाद जागवणाऱ्या सचेतन 'रेषा' पहा--

रेषा......
मिळत्या, उलगडत्या,
अधिकाधिक उमजवित्या,
उमजत्या,

मोकळ्या
हलके हिंदोळत्या,
लवचिक गिरकीत
घनसंयत घोळवित्या,
भरलेपण भरहर्षे
भोगवित्या......

आणि चित्र्यांचा अनवट छंद—

विचित्र पद्मपात्र, भ्रमर-रात्र, मध कुठे ?
फुले फुले वहारलेली, वहरलेली, ओठ कुठे ?
....
सरलो आहे, विसरलो आहे, या वाटा कुठे जातात.'
चालून चालून थकलों तरी पायाखाली कशा येतात.'

महानोरांची कविता तर एका अंतस्थ नादात झुलत राहते.

आजच्या कविप्रतिभेच्या नव्या प्रेरणा, तिची संवेदनारीती जाणून घेऊन समीक्षकांनी मूल्य-संकेतांची बांधणी केली तरच आजच्या काव्याला योग्य न्याय मिळेल. संकेतांची सापेक्षता मान्य केली तरच हे शक्य आहे.

* *

खालील विषयांवरील महत्वाच्या टिपणांचा 'युगवाणी' आस्थेने स्वीकार करील.

१ पु. भा. भावे
२ भा. रा. लोवलेकर
३ डॉ. झिवॅगो (बोलपट) मधील बर्फाची प्रतीकशक्ती
४ चि. त्र्यं. खानोलकर
५ माधवी मुखर्जी
६ हेमाडपंथी देवळे
७ विभावरी शिरूरकर
८ श्रीकृष्ण पोवळे
९ ऑपेरा
१० गीताई
११ डॉम मोरेस
१२ नूरजहाँ (गायिका)
१३ वोगनवेल
१४ स्व. कुंदनलाल सैगल
१५ वी. रघुनाथ यांच्या कादंबऱ्या

संघवार्ता

मा. नी. गलगलीकर
सरचिटणीस

शिक्षणमंत्री श्री. मधुकरराव चौधरी व सुप्रसिद्ध साहित्यिक श्री. जैनेंद्रकुमार यांची भेट

मंगळवार दि. १४ सप्टेंबर '७१ रोजी महाराष्ट्र राज्याचे शिक्षणमंत्री श्री. मधुकरराव चौधरी व हिंदीचे सुप्रसिद्ध साहित्यक श्री. जैनेंद्रकुमार यांनी वि. सा. संघाला भेट दिली.

नाट्यसमिती

डॉ. श्रीराम लागू यांची भेट

सुप्रसिद्ध नट डॉ. श्रीराम लागू यांनी सोमवार दि. २५ ऑक्टोबर १९७१ रोजी सायंकाळी संघाला ६ वाजता भेट दिली. सरचिटणीस श्री. मा. नी. गलगलीकर यांनी पुष्पमाला घालून स्वागत केल्यानंतर 'नटसम्राट' नाटकाच्या अनुषंगाने चर्चा झाली.

१२८ वा रंगभूमी दिन

नाट्य समितीच्या वतीने शुक्रवार दि. ५ नोव्हेंबर १९७१ रोजी १२८वा मराठी रंगभूमी दिन साजरा करण्यात आला.

यावेळी अॅडव्होकेट श्री. चंद्रशेखर धर्माधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली सुप्रसिद्ध नाटककार वि. वा. शिरवाडकर यांच्या 'नटसम्राट' नाटकावर चर्चा आयोजित करण्यात आली होती.

चर्चेत सौ. पुष्पा मेढेकर, सौ. शकुंतला खोत, प्रा. सौ. माणिक पांढरीपांडे, प्रा. सुरेश पांढरीपांडे, सर्वश्री भाऊ समर्थ व चंद्रकांत कुळकर्णी यांनी भाग घेतला.

श्री. शंकर घाणेकर यांचे व्याख्यान

रविवार दि. १४ नोव्हेंबर रोजी सुप्रसिद्ध विनोदी नट श्री. शंकर घाणेकर यांचे 'गडकऱ्यांच्या नाटकातील विनोदी पात्रे' या विषयावर सुश्राव्य व्याख्यान झाले.

कला केंद्र

रविवार दि. १४ नोव्हेंबर ७१ रोजी बालक दिनानिमित्त बाल चित्रकला प्रदर्शन दिनांक १४ ते १८ नोव्हेंबर पर्यंत आयोजित करण्यात आले होते.

कला–केंद्राच्या वतीने शनिवार दि. २० नोव्हेंबर १९७१ रोजी आयोजित केलेल्या तैलचित्रे व जलचित्रे असलेल्या चित्रकला प्रदर्शनाचे उद्घाटन नागपूर विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. वि. भि. कोलते यांनी केले. प्रदर्शन दि. २५ नोव्हेंबरपर्यंत खुले होते.

श्रीशिवाजी संदर्भ ग्रंथालय

कै. डॉ. य. खु. देशपांडे अभ्यासिकेचे उद्घाटन व संशोधन सप्ताह–'व्याख्यानमाला'

श्री शिवाजी संदर्भ ग्रंथालयात संशोधक–अभ्यासकांसाठी निर्माण करण्यात आलेल्या स्वतंत्र अभ्यासिकांपैकी एका अभ्यासिकेला सुप्रसिद्ध वैदर्भीय संशोधक, यवतमाळच्या शारदाश्रमाचे संस्थापक व वि. सा. संघाचे पूर्वाध्यक्ष कै. डॉ. यशवंत खुशाल देशपांडे यांचे नाव दिलेल्या अभ्यासिकेचे उद्घाटन कै. देशपांडे यांच्या प्रथम स्मृतिदिनी, शनिवार दि. २७ नोव्हेंबर १९७१ रोजी कुलगुरू डॉ. विष्णू भिकाजी कोलते यांच्या हस्ते झाले.

कै. डॉ. य. खु. देशपांडे यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ सुरू झालेल्या संशोधन सप्ताह–व्याख्यानमालेचेही उद्घाटन डॉ. कोलते यांनी केले अध्यक्षस्थानी म. म. डॉ. वा. वि. मिराशी होते. संशोधन सप्ताह–व्याख्यान मालेतील प्रथम पुष्प दि. २० नोव्हेंबर रोजी डॉ. वि. भि. कोलते यांनी 'प्राचीन शिलालेख व मराठी संशोधन' या विषयावर गुंफले.

दुसरे व्याख्यान रविवार दि. २१ नोव्हेंबर ७१ रोजी डॉ. ग. त्र्यं. देशपांडे यांचे 'प्राचीन संशोधन : काही समस्या' या विषयावर झाले. तिसरे व्याख्यान बुधवार दि. २४ नोव्हेंबर ७१ रोजी प्रा. म. शं. वाबगावकर यांचे 'डॉ. य. खु. देशपांडे : व्यक्ती आणि कार्य या विषयावर झाले.

चौथे व्याख्यान गुरुवार दि. २५ रोजी प्रा. डॉ. देगलूरकर यांनी 'मूर्तिविज्ञान व मराठी संशोधन' या विषयावर गुंफले.

'कै. डॉ. य. खु. देशपांडे अभ्यासिके' करिता उपस्कर (फर्निचर) व कै. डॉ. आप्पासाहेब देशपांडे यांचे छायाचित्र त्यांचे चिरंजीव श्री. राजाभाऊ देशपांडे यांनी देणगीदाखल दिले. याबद्दल संस्था त्यांची आभारी आहे.

कै. कृ. प्र. खाडिलकर जन्मशताब्दी व नटश्रेष्ठ कै. केशवराव दाते यांच्या तैलचित्राचे अनावरण

मंगळवार दि. २३ नोव्हेंबर १९७१ रोजी सुप्रसिद्ध नाटककार कै. कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर यांची जन्म शताब्दी गडकरी सभागृहात साजरी करण्यात आली.

याप्रसंगी सुप्रसिद्ध नट श्री. सखारामपंत जोशी यांनी वि. सा. संघाला भेट म्हणून दिलेल्या नटश्रेष्ठ कै. केशवराव दाते यांच्या तैलचित्राचे अनावरण सुप्रसिद्ध साहित्यिक व पत्रकार श्री. ग. त्र्यं. माडखोलकर यांच्या हस्ते झाले. तसेच श्री. ग. त्र्यं. माडखोलकर यांचे 'नाटककार खाडिलकर' या विषयावर व्याख्यान झाले.

कै. केशवराव दाते यांचे तैलचित्र नागपूर स्कूल ऑफ आर्ट या संस्थेचे माजी प्राचार्य श्री बापूसाहेब आठवले यांनी तयार करून दिले.

डॉ. प्रभाकरराव माचवे यांची भेट

रविवार दि. २१ नोव्हेंबर १९७१ रोजी सकाळी ११.३० वाजता डॉ. प्रभाकरराव माचवे, सचिव, साहित्य आकादमी, नवी दिल्ली यांनी वि. सा. संघाला भेट दिली.

शाखा वृत्त

वाशीम

वि. सा. संघ–शाखा वाशीमच्या वतीने दि. ७ ते १० नोव्हेंबर ७१ पर्यंत नगरपरिषदेच्या सभागृहात व्याख्यानमालेचे आयोजन केले होते.

प्रथम पुष्प डॉ. द. भि. कुळकर्णी यांनी 'साहित्य आणि सामान्य वाचक' या विषयावर गुंफले.

दुसरे व्याख्यान डॉ. यु. म. पठाण यांचे 'तुका झालासे कळस' या विषयावर झाले.

प्राचार्य महात्मे (पातूर) यांनी 'विदर्भाची सांस्कृतिक अस्मिता' या विषयावर तिसरे पुष्प गुंफले.

व्याख्यानमाला यशस्वी करण्याची जवाबदारी शाखाध्यक्ष प्रा. श्री. भ. पाटील; सर्वश्री नाना फाटक, श्रीकांत साकेरकर, किशोर जहागीरदार व कृष्णा सावरकर यांनी उचलली.

कै. माधवराव पटवर्धन स्मृतिदिन

श्रीशिवाजी संदर्भ ग्रंथालयाच्या वतीने सोमवार दि. २९ नोव्हेंबर रोजी सुप्रसिद्ध कवी कै. माधवराव पटवर्धन यांच्या स्मृतिदिनानिमित्त श्री. श्री. बा. रानडे यांचे 'कै. पटवर्धन आणि विरहतरंग' या विषयावर व्याख्यान झाले.

* *

अनुक्रमणिका

विदर्भ साहित्य संघाचे मुखपत्र

यु ग वा णी

वर्ष २५ मे १९७० ते जानेवारी १९७१

लेखांची सूची

लेखकांची सूची

दूरध्वनी क्रमांक २२५२९

विदर्भ साहित्य संघ, परीक्षा समिती,

उत्तर अंबाझरी मार्ग, नागपूर–१२

श्री केंद्राधिकारी, परीक्षाकेंद्र आणि विद्यार्थी यांचे करिता आवश्यक माहिती

प्रस्तुत पत्रकाद्वारे आपणास विदर्भ साहित्य संघातर्फे घेण्यात येणाऱ्या मराठी भाषा आणि वाङ्मयाच्या परीक्षांविषयी पुढील माहिती कळविण्यात येत आहे.

उद्देश :— मराठी भाषा आणि वाङ्मय या विषयाची गोडी वाढविण्यासाठी तसेच महाराष्ट्रातील अ–मराठी भाषिकांमध्ये मराठीचा प्रचार करण्याकरिता अभ्यासक्रम तयार करण्यात आला आहे.

कळविण्यास आनंद होतो की, महाराष्ट्र शासनाने पत्र क्र. १५६९–३३६७३ म. दि. २४ जुलै १९६९ च्या अन्वये अ–मराठी भाषिकांसाठी घेण्यात घेणाऱ्या मराठी प्रवीण व मराठी प्राज्ञ ह्या नवीन परीक्षांना अनुक्रमे मराठी निम्नस्तर व मराठी उच्चस्तर परीक्षांच्या समकक्ष परीक्षा म्हणून मान्यता दिली आहे. (' मराठी प्रवीण ' व ' मराठी प्राज्ञ ' परीक्षांचे स्थानिक केन्द्राची व्यवस्था फक्त विदर्भ साहित्य संघातच राहील व वरील दोन्ही परीक्षांचे वर्ग संस्थेतर्फे चालविण्यात येतात. फेब्रुवारी १९७२ च्या सत्रातील परीक्षांचे वर्ग दि. २५ नोव्हेंबर १९७१ पासून सुरू होतील. विद्यार्थ्यांनी संपर्क साधावा.)

फेब्रुवारी १९७२ पासून परीक्षा समितीने अभ्यासक्रमात आवश्यक बदल केला असून महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षण मंडळ आणि नागपूर विद्यापीठ यांच्या विद्यमाने होणाऱ्या सर्व परीक्षांशी मराठी विषयापुरता वि. सा. संघ परीक्षा समितीने नेमलेला अभ्यासक्रम शक्यतो समरूप व समकक्ष ठेवला आहे.

२. सूचना आणि विनंती

आपण केंद्र उघडण्याची इच्छा दर्शविल्यास आपणाकडे अभ्यासक्रम पाठविण्यात येईल. तसेच अ–मराठी विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र अभ्यासक्रम तयार करण्यात आला आहे. त्याची अंमलबजावणी आपण आपल्या दृष्टीने करावी, अशी अपेक्षा आहे.

३. आगामी फेब्रुवारी १९७२ सत्राच्या परीक्षा शनिवार दि. ५ आणि रविवार ६ फेब्रुवारी १९७२ ला घेण्यात येतील.

४. नवीन केंद्र सुरू करण्यासाठी कमीत कमी २५ विद्यार्थी परीक्षेस बसविले तरच केंद्र मान्यता देण्यात येईल असा समितीचा परिपाठ आहे. परीक्षार्थी–आवेदनपत्र मूल्य २५ पैसे प्रमाणे केंद्रातच अवांतर खर्चासाठी राखून ठेवावे. केवळ परीक्षार्थ्यांचेच निर्धारित शुल्क केंद्रीय कार्यालयाकडे पाठवावे.

आपण आपल्या केंद्रातून दि. ५ जानेवारी १९७२ पर्यंत परीक्षार्थी आवेदनपत्रे सशुल्क भरून घेऊन केंद्रीय कार्यालयाकडे दि. १० जानेवारी १९७२ चे आत पाठविण्याची दखल घ्यावी. तदनंतर आलेली आवेदनपत्रे स्वीकृत करण्यात येणार नाहीत.

प्रत्येक सत्रात जास्तीत जास्त विद्यार्थी परीक्षेस बसवून आम्हास सहकार्य देऊन उपकृत करावे, ही विनंती.

आपला

कृ. मा. चवरे

संचालक, परीक्षा समिती, वि. सा. संघ.

दिनांक २०–११–७१

अनुक्रमणिका

संकल्प : काव्यविशेषांक

卐 श्रीज्ञानेश्वर ते एकोणीसशे एकाहत्तर 卐

- काव्य म्हणजे काय ?
- काव्याचे वर्गीकरण
- कवितेचे रसग्रहण
- कवितेचे अध्यापन
- प्राचीन मराठी काव्यातील परिवर्तने
- अर्वाचीन मराठी काव्यातील परिवर्तने

- मर्ढेकरांनंतरची मराठी कविता

○ श्रीज्ञानेश्वर ○ नरेंद्र ○ होनाजी ○ कुंटे
○ केशवसुत ○ बालकवी ○ गोविंदाग्रज ○ तांबे
○ मर्ढेकर ○ कुसुमाग्रज ○ र. कृ. जोशी

टिपणे ● विराणी ● भारूडे ● लावणी ● करूणाष्टके ● नाट्यपदे
● मध्वमुनीश्वर ● जनाबाई ● मोरोपंत ● सामराज ● भावगीत
● वामन पंडित ● महदंबेचे धवळे ● सुनीत ● मराठी ओवी
● मराठी मुक्तछंद ● मराठी गद्यकाव्य ● प्रतिमा व प्रतीक

शिवकालातील दोन कवी तुकाराम रामदास
प्राचीन मराठी काव्यसमीक्षा
अर्वाचीन मराठी काव्यसमीक्षा
समकालीन भारतीय काव्य

उपविभाग अँग्लोयुरोपियन कविता ○ बंगाली कविता
गुजराती कविता ○ उर्दू कविता ○ हिंदी कविता
आणि निवडक कवितांचा समृद्ध विभाग.